# श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा

(विचारधन भाग तीन)





दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

# श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा

## (विचारधन भाग ३)

**साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे यांचे संकलन**

डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

❐ **श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा** *(विचारधन भाग तीन)*

*डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर*
*६०१, मेरीलँड कॉर्नर*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड*
*सायन (पूर्व) मुंबई ४०० ०२२*
*दूरध्वनी : ४०७२३६८ / ४०७२११५*

❐ *ISBN-81-7418-127-X*
*ShriDatta Maharaj Kavishwar*
*Yanchi Vicharsampada (Marathi)*
*Dr. Sharadchandra Kopardekar*

❐ **प्रकाशक**
*श्याम दयार्णव कोपर्डेकर*
*इंद्रायणी साहित्य प्रकाशन*
*२७३, शनिवार पेठ, पुणे ३०*
*दूरध्वनी : ४५८५१८*

❐ *©सौ. पौर्णिमा कोपर्डेकर*

❐ **प्रकाशन दिनांक**
*३ जानेवारी, १९९९*

पहिली आवृत्ती : जानेवारी ९९
सुधारलेली दुसरी आवृत्ती : फेब्रुवारी ९९
चौथे मुद्रण : डिसेंबर, १९९९

❐ **मुखपृष्ठ सजावट व मुद्रक**
*सुगम मुद्रण,*
*माहीम, मुंबई - १६.*

❐ **सेवाभावी मूल्य पन्नास रुपये**



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

卐

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे दीक्षागुरू

# योगीराज श्रीगुळवणीमहाराज

यांचे

चरणी

भक्तीभावाने

अर्पण

卐

## - प्रकाशकाचे मनोगत -

"श्रीदत्तमहाराज कवीश्वर-चरित्र आणि विचारधन" हे पुस्तक आम्ही गेल्यावर्षी प्रकाशित केले. आमचे बंधू डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांनी चरित्र कथन करतांना श्रीदत्तमहाराजांच्या आत्मस्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन 'विचारधन भाग २' याच पुस्तकात समाविष्ट केले असून साधकांचे काही अनुभव शेवटी दिले आहेत.

या पुस्तकाला महाराष्ट्राच्या सर्व भागातून फार मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक दिवस आमच्या कार्यालयात ग्राहकांच्या रांगा लागत होत्या. वासुदेव निवासमध्येही तशीच स्थिती होती. मुंबईला आयडिअल बुक डेपोत पहिल्याच दिवशी साठ प्रती विकल्या गेल्या आणि ग्राहकांची मागणी बरेच दिवस टिकून राहिली. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून फोन व पत्राद्वारे अनेकजण हे पुस्तक मागवित राहिले. पुस्तकाचे कौतुक करणाऱ्या पत्रांचा वर्षावच झाला. अनेक दिवस हे पुस्तक सर्वाधिक खपाचे (Bestseller) होते. कांही महिन्यातच पाच आवृत्त्या संपल्या आणि नुकतीच सहावी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे.

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र वाचून अनेक लोक प्रभावित झाले आणि त्यांच्या दर्शनाला आले. विचारधनमधील ज्ञानामृतामुळे अनेकांना संजीवन मिळाले, शांती लाभली. विचारधनचा पुढचा भाग लौकर प्रकाशित करा असा आग्रह अनेकजण करीत राहिले. म्हणूनच उत्साहाने प्रस्तुत पुस्तक आम्ही सादर करीत आहोत. यापूर्वी प्रसिद्ध न झालेले साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे प्रस्तुत पुस्तकांत समाविष्ट केली आहेत.

श्रीदत्तमहाराज वेदांत विशुद्ध स्वरूपांत सांगतात आणि त्याला भक्तीची जोड देतात. वेदांतातील ज्ञान आणि भागवतांतील भक्ती यांचा मनोहारी संगम विचारधनमध्ये पहायला मिळतो. श्रीदत्तमहाराजांच्या मनांत लोकांबद्दल जी असीम दया व करूणा आहे, त्यातूनच विचारधनमधील श्रीदत्तमहाराजांची उत्तरे

अवतरली आहेत. शांत व संतुष्ट मनोवृत्ती, उदार दृष्टीकोन, सुक्ष्मातही मूळापर्यंत जाणारी खोल बुद्धी, विश्वव्यापकाला गवसणी घालण्याचा आवाका आणि घनगंभीर शब्दरचना ही श्रीदत्तमहाराजांच्या विचारधनची काही वैशिष्ट्ये आहेत.

हिंदू धर्मात अनेक दैवते, संप्रदाय, पंथ आणि विचारधारा आहेत. या सर्वांतून एक समदृष्टी आहे असे श्रीदत्तमहाराज दाखवून देतात. (पृ.१३०-१३४) ही समदृष्टी आम्हाला फार महत्वाची वाटते. त्यामुळे हिंदू धर्मातील विविधता कायम ठेवता येईल आणि विघटन प्रवृत्ती टाळून सर्वांना एकत्र आणणे शक्य होईल. सर्व संतमहात्म्यांचे सांगणे एकच आहे हे कळायलाही आपली बुद्धी शुद्ध, सूक्ष्म व्हावी लागते. त्यासाठीच तर धर्माचरण करायचे असे श्रीदत्तमहाराज सांगतात (पृ. १०३). सर्व विचारधारांमध्ये समत्व पाहणे ही बुद्धीची अंतिम शक्ती आहे आणि अशी समदृष्टी वैदिक ऋषींना प्राप्त होती असे श्रीदत्तमहाराज सांगतात (पृ. १३२, १३४).

"ईश्वर आहे" हे बुद्धीवाद्यांना पटवून देण्यासाठी श्रीदत्तमहाराजांनी तर्कसामर्थ्य व वादपटुत्व पणाला लावले आहे (पृ.१५३-१५६). हे विवेचन वाचून कोणताही नास्तिक निरूत्तरच होईल.

वैज्ञानिकांच्या प्रयत्नाने लोकांची दुःखनिवृत्ती होणार नाही. खरा आनंद त्यांना मिळणार नाही. त्यासाठी अध्यात्म साधनाच आवश्यक आहे असे श्रीदत्तमहाराज सांगतात (पृ. १३५ - १३७) आम्हाला हे फार महत्वाचे वाटते.

श्रीदत्तमहाराजांचा भर भक्तीवर आहे. भक्तीच्या संकल्पनेचा उगम ऋग्वेदातील मंत्रात असला तरीही भक्ती या संकल्पनेचा पुरेसा विस्तार भागवत व नारद भक्तीसूत्रांमध्येच आढळतो. त्याचा आधार घेऊन श्रीदत्तमहाराजांनी भक्तीचे तंत्र, भावमयता आणि तत्त्वे यांचे विवेचन केले आहे. हे विवेचन सर्वार्थाने परिपूर्ण वाटते. त्यात प्रसाद, सोपेपणा व गेयता आहे. तर्क आणि वादपटुता यांचा त्याला खंबीर पाया आहे आणि तरीही अलिप्तता किंवा भावुकतेचा एकसुरीपणा त्यांनी टाळला आहे. गरीब प्रापंचिकांनी भक्ती

साधण्यासाठी काय करावे याबद्दलचे मार्गदर्शन सर्वांनाच अत्यंत उपयुक्त ठरेल (पृ. ६०-६४), श्रीदत्तमहाराजांचे हृदय भक्तीने ओथंबलेले असल्याने ते भक्तीच्या विवेचनात खूपच रंगून जातात आणि भक्तीचा उद्घोष विशेष बहारीचा होतो. बुद्धीवादी वाचकांच्या मनांतही तो भक्तीभावनेची ओढ निर्माण करेल असा आहे. अनन्य शरणता हा गुण भक्तीमध्ये सर्वात मोठा आहे असे श्रीदत्तमहाराज सांगतात. त्यांनी सांगितलेले निष्कामभक्तीचे स्वरूप वाचतांना कोणताही श्रद्धावंत गहिवरूनच जाईल (पृ. ४१, १५०-१५३). भक्तीला विवेकाची बैठक द्यावी म्हणजे वैराग्याचा पाया तयार होतो. इच्छा कमी कमी करत जाणे हेच वैराग्य. इच्छा तृप्त करीत राहिल्यास त्या कमी होत नाहीत. त्यासाठी मनोनिग्रहच करावा लागतो. मुक्ती म्हणजे मनांतील सर्व इच्छा नाहीशा होणे असे श्रीदत्तमहाराजांनी सांगितले आहे (पृ. १५१).

श्रीदत्तमहाराज सांगतात की भक्ती परिपूर्ण अवस्थेला पोचली म्हणजे भक्ताला भगवंताचे निर्गुण निराकार रूप अनुभवता येते आणि तरीही त्यानंतर सगुण साकार रूपाचीच भक्ती करीत रहावेसे वाटते. भगवंताशी एकरूप झाल्यावरही भक्त ईश्वराची भक्तीच करत रहातो. हीच अद्वैत भक्ती. (पृ. १८४-१८६), ज्ञानमार्गात जग मिथ्या आहे हे कळते आणि दुःखनिवृत्ती होते. पण भक्ताला मात्र सर्वत्र भगवंतच दिसत असल्यामुळे दुःखनिवृत्तीही होते आणि परमानंदही मिळत रहातो. हे विवेचन फारच रसाळ झाले आहे. (पृ. १६५- १६८, १८३-१८४) ते वाचतांना आगळ्याच शांतीचा अनुभव येतो आणि ईश्वरसाक्षात्काराद्वारे जीवन धन्य करून घेण्याची ओढ मनांत निर्माण होते.

साधकांना उपयुक्त वाटेल असे खूप कांही या पुस्तकांत आहे. अहंकार कसा घालवावा? (पृ. ६५-६८, ७९, १०९), आसक्ती कशी घालवावी ? (पृ. ९३), ध्यान कसे लावावे ? (पृ. ८२-८५, १४८), वासना कशा घालवाव्या ? (पृ.७६, ९७), वैराग्य कसे मिळवावे ? (पृ. ७८), निंदा, अपमान झाला तरी मनःशांती कशी टिकवावी ? (पृ.५१-५६,६७), उपवास कसा

करावा ? (पृ. १४४-१४६), गृहस्थाश्रमांतही तप कसे करावे ? (पृ. ६०-६२), आत्मस्वरूपापर्यंत पोचण्यासाठी काय करावे ? (पृ. १३९, १७६) इत्यादी.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांनाही मोलाचे वाटेल असेही या पुस्तकांत खूप कांही आहे. शंकराचार्यांनी गीतेचा अर्थ संन्यासपर लावला तर ज्ञानदेवांनी भक्तीपर. दोघेही एकच अनुभूती कशी सांगताहेत? (पृ. १५६-१७६), ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग, योगमार्ग व संन्यासमार्ग यांत अविरोध कसा आहे ? (पृ. १७१), या अविरोधाची अनुभूती कशी घेता येते? (पृ.१७२) चार्वाकदर्शन सांगतांना बृहस्पतींचा मूळ हेतू कोणता होता आणि ते उथळ असूनही दर्शनशास्त्रांत समाविष्ट कां केले गेले ? (पृ. ८७), वेदांचा अर्थ कसा लावला पाहिजे ? (पृ. १२७, १३९), जीव व ईश्वर भिन्न की अभिन्न ? (पृ. १४०-१४१). पातंजल योगदर्शन आणि गीता यांत शक्तीपात विद्या कशी सूचित केली आहे ? (पृष्ठ क्र. ४८, ११३-११४) इत्यादी. ज्ञानेश्वरीतील कांही ओव्यांचा श्रीदत्तमहाराजांनी सांगितलेला गूढार्थ मर्मग्राही आहे. त्यातून श्रीदत्तमहाराजांच्या प्रगाढ अनुभूती व्यक्त होत रहातात असे आम्हाला वाटते. (पृ. ११७, १२१, १४१, १७५-१७९), आध्यात्मिक प्रगतीसाठी ब्रह्मचर्य आवश्यक आहे असे अनेकजण सांगतात. याबाबत शास्त्रे काय सांगतात आणि गृहस्थाश्रमी व्यक्तीने कसे वागावे याचे मार्गदर्शनही फारच मोलाचे आहे (पृ. ५७-६०). बौद्धांचा शून्यवाद कांही वाक्यांतच खोडून काढतांना श्रीदत्तमहाराजांनी दाखवलेले तर्कपटुत्व व बुद्धीची झेप पाहून मन स्तिमीत होते (पृ. ११९). ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' या महामंत्रात वेदांत आणि भक्ती शास्त्रातील प्रमुख सिद्धांतांची सांगड कशी घातली आहे हे विवेचन साधकांनाही नवी दृष्टी देईल (पृ. १८७ ते १९२). विस्तारभयामुळे आणखी उदाहरणे देण्याचा मोह टाळत आहोत.

स्तिमीत करणारी बुद्धीमत्ता, असाधार[illegible]क्ती, असामान्य प्रगल्भता, अलौकिक धारणाशक्ती व मेधाशक्ती, ऋतंभरा प्रज्ञा, पूर्ण वैराग्य, अभिजात

रसिकता, परिपूर्ण वादपटुता, पूर्ण आत्मविश्वास, ठामपणा आणि अलौकीक कल्पनावैभव ही वैशिष्ट्ये विचारधनमध्ये जागोजागी जाणवतात. भक्तांच्या हितासाठी वेदांताचे सार सांगणे आणि वेदांताचा प्रसार करणे यासाठीच श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाले आहेत. तो हेतू पूर्णतया सिद्धीला गेला आहे असे म्हणावेसे वाटते. त्यांचे धर्मजागरणाचे कार्य पाहिले म्हणजे शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर यांची आठवण होते.

आमचे हे मनोगत पूर्ण करण्यापूर्वी प्रस्तुत पुस्तक सादर करणारे आमचे बंधू डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांच्यासंबंधीही काही लिहावेसे वाटते. लहानपणापासून आमच्या बंधूंना अध्यात्माची आवड आहे. विद्यार्थीदशेत ते अभ्यासू व बुद्धिमान विद्यार्थी म्हणून ओळखले जात. बहुतेक सर्व परीक्षांतून ते पहिल्या वर्गात पहिले आले. वक्तृत्व, निबंध, वगैरे अनेक स्पर्धांतून त्यांनी पारितोषिके मिळविली. वाचनाची आवड पहिल्यापासून असल्याने त्यांनी खूप कांही वाचले आहे. कथा, कविता व ललित लेख लिहीणे विद्यार्थीदशेतच सुरू झाले. असामान्य बुद्धीमत्ता, सौम्य मवाळ स्वभाव, ऋजुतेने वागणे, चिंतनशील मनोवृत्ती, कवीमनाचा भावूकपणा, सरळपणा, निखालस प्रामाणिकपणा ही त्यांची काही स्वभाव वैशिष्ट्ये लहानपणापासूनच दिसून येतात.

स्टेट बँकेत ते सहा वर्षे अधिकारी होते. एका नामांकित मोठ्या कंपनीत ते बारा वर्षे मार्केटींग मॅनेजर होते. गेली सोळा वर्षे ते वेलिंगकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक आहेत. ही संस्था त्यांनीच भरभराटीला आणली आणि जगातील एक उत्तम मॅनेजमेंट संस्था असा नावलौकीक संस्थेला मिळवून दिला. उत्तम शिकवणारे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व कुशल प्रशासक म्हणून त्यांचा लौकीक आहे. २२ विद्यार्थ्यांना त्यांनी पी.एच्.डी.च्या संशोधनासाठी मार्गदर्शन केले आहे. ते अनेक समित्यांवर आहेत. चॅन्सेलरचे (महाराष्ट्राच्या राज्यपालांचे) प्रतिनिधी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर ते आहेत.

व्यवसायाच्या कामामुळे त्यांना पन्नासपेक्षाही अधिक वेळा भारतभर भ्रमण करावे लागले. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स,स्वित्झर्लंड वगैरे अनेक देशांना

कामानिमित्त भेटी द्याव्या लागल्या. प्रवास विमानाने. वास्तव्य पंचतारांकित हॉटेलमध्ये. पण काम संपताच ते तडक हॉटेलमध्ये परतून ज्ञानेश्वरीत रमून जातात. फावल्या वेळात प्रेक्षणीय स्थळे बघण्यापेक्षा देवळांत वा मठांत जावे आणि साधू किंवा संन्यासी यांचे दर्शन घेऊन त्यांच्याकडून काही ऐकावे यातच त्यांना आनंद वाटतो.

गेली अनेक वर्षे मुंबईसारख्या मोहमयी नगरीत ते संपन्न जीवन जगत आहेत. व्यवसायपरत्वे उच्च अधिकारी आणि धनसंपन्न लोकांमध्ये उठबस करावी लागते. पण मनांत वैराग्य भावच असतो. ऑफिसचे काम होताच ते घरी परततात आणि ज्ञानेश्वरी किंवा अध्यात्म ग्रंथ वाचत रहातात. पार्ट्या, विनाकारण भेटीगाठी टाळतात. त्यापेक्षा एखाद्या देवळांत, मठांत वा आश्रमात जाणे, साधुसंतांचे दर्शन घेऊन धर्मचर्चा करणे यांतच त्यांना रस वाटतो. सदाचार व धर्माचरण कटाक्षाने पाळायची वृत्ती आहे. अनेक आघात सोसावे लागूनही हृदयांतील श्रद्धा व भक्तीभाव फुलतच राहिला आहे ही ईश्वरी कृपाच म्हणायला पाहिजे. सतराव्या शतकांत अवतीर्ण झालेले थोर संत श्रीकृष्णदयार्णव हे आमचे मूळ पुरूष. त्यांचा हा वारसाच लाभला आहे असे वाटते.

अम्माडी गंमत हे आमच्या बंधूचे पहिले पुस्तक. बालगीतांचा हा संग्रह आम्हीच प्रकाशित केला. त्यानंतर त्यांची पुस्तके येतच राहिली. आत्तापर्यंत त्यांची ५४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अर्थशास्त्र, व्यापारशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र वगैरे क्षेत्रातील ३६ पुस्तके त्यांनी लिहिली. सोपे आणि लालित्यपूर्ण लिहायची देणगीच लाभली असल्यामुळे त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांना खूपच भावली आणि अनेक पुस्तकांच्या ९-१० आवृत्त्याही झाल्या. काही पुस्तके सर्वाधिक खपाची (Best Seller) ठरली. ''आणखी लिहा, लिहाल ते छापतो'' असे प्रकाशक म्हणत असतांनाच त्यांनी व्यावसायिक लेखन थांबविले आणि ते संत साहित्यावर लिहू लागले. संतसाहित्य विषयक सुमारे दोनशे लेख ठिकठिकाणी प्रसिद्ध झाले आहेत. अनेक संतांची चरित्रे त्यांनी लिहिली आहेत.

''ज्ञानेश्वरीची शिकवण'' हे त्यांचे पुस्तक खूप लोकांना आवडले आहे.

''पातंजल योगदर्शन'' या त्यांच्या पुस्तकांतील विवेचन योगशास्त्रावरील सिद्धांताना पूर्णपणे धरून आहे आणि तरीही ते खूप सोपे वाटते. आचरणात आणण्यासारखे त्यांत बरेच कांही आहे असेही अनेकजण सांगतात. या पुस्तकाला विद्यापीठांमध्येही मान्यता मिळाली आहे. ''धर्मभास्कर'' या ख्यातनाम मासिकांतून पन्नासाहून अधिक आध्यात्मिक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या प्रकाशित संतसाहित्याची माहिती पुढे दिली आहे.

इ.स. १९८६ साली नेदरलॅण्डमध्ये झालेल्या 'जागतिक भक्ती वाङ्मय परिषदेत' त्यांनी ज्ञानेश्वरीवर एक निबंध वाचला. 'भारतातील विद्वान परंपरेला साजेसा निबंध' असा त्याचा गौरव झाला. यामुळे जीवनाला वेगळे वळण मिळाले. व्यावसायिक व्याख्याने पूर्णपणे थांबविली. ज्ञानेश्वरी आणि पातंजल योगावर ते प्रवचने देऊ लागले. प्रभावी वक्तृत्व असल्यामुळे प्रवचने सोपी, मुद्देसुद आणि रसाळ व्हायची. ज्ञानेश्वरीवर बोलायला लागले म्हणजे श्रोते मंत्रमुग्धच व्हायचे. रेडिओ आणि दूरदर्शनवरुनही ते ज्ञानेश्वरीवरीवर अनेकवेळा बोलले. सुमारे दोनशे प्रवचने झाली. प्रवचनाची बोलावणी वाढतच होती. पण बहिर्मुखता येते आहे असे वाटल्याने त्यांनी प्रवचने बंद केली व अंतरंग साधनेवर लक्ष केंद्रीत केले. श्रीदत्तमहाराजांची दीक्षा त्यांनी घेतली असून त्याप्रमाणे साधना चालू आहे.

शिक्षणक्षेत्र व वाङ्मयक्षेत्रांतील कामाबद्दल राज्यपातळीवर व राष्ट्रीयपातळीवर अनेक पुरस्कार आणि गौरव आमच्या बंधूंना प्राप्त झाले आहेत. आध्यात्मिक क्षेत्रातही त्यांच्या हातून आता कांही घडत आहे याचा आम्हा कुटुंबियांना अभिमानच वाटतो. 'श्रीगुरुःशरणम्'मध्ये त्यांनी व्यक्त केलेला भाव ध्यानात घेऊन हे पुस्तकही आम्ही सेवाभावी मूल्य ठेवून वितरीत करीत आहोत.

***श्याम कोपर्डेकर***

## - डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांचे प्रकाशित झालेले संतसाहित्य -

*(डॉ. कोपर्डेकर यांची एकूण ५६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी ३५ पुस्तके कॉमर्स, इकॉनॉमिक्स आणि मॅनेजमेंट या विषयावरील आहेत बाकीची पुस्तके संतसाहित्य विषयक आहेत.)*

* **इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३ शनिवार पेठ, पुणे यांची प्रकाशने**

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर -चरित्र आणि विचारधन (सातवी आवृत्ती)

**साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन विचारधन या नावाने पुढील तीन भागात प्रसिद्ध झाले आहे.**

२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - विचारधन भाग -१ (चौथी आवृत्ती)
३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर विचारधन भाग - २ (तिसरी आवृत्ती)
४. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा (विचारधन भाग ३) चौथी आवृत्ती
५. श्रीरामकृष्ण परमहंस - चरित्र
६. स्वामी विवेकानंद - चरित्र
७. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र आणि तत्त्वज्ञान
८. श्रीगाडगेमहाराज - चरित्र
९. पातंजल योगदर्शन भगवान पतंजलींची मूळ संस्कृत सूत्रे, त्या सूत्रांचा मराठी भावार्थ आणि विवरण
१०. श्रीरंगअवधूत महाराज - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)
११. श्रीचैतन्य महाप्रभू - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)
१२. श्रीरमण महर्षी - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)

* **श्रीवासुदेव निवास, कर्वेरोड, पुणे यांचे प्रकाशन**

१३. गुण गाईन आवडी
(श्रीदत्तमहाराजांची प्रवचने व श्रीदत्तमहाराजांवरील तीन लेख)
(डॉ.सौ. माधुरी पणशीकर यांच्या समवेत संपादित)

*** श्री भगवती प्रकाशन, पुणे यांचे प्रकाशन**

१४. आनंदलहरी विचारधन - १ (आवृत्ती संपली)

*** साधुवासवानी मिशन, वासवानी रोड, पुणे-१ यांचे प्रकाशन**

१५. साधु वासवानी - चरित्र

*** नवचैतन्य प्रकाशन, शशांक सोसायटी, ए-००२, एक्सर रोड, बोरीवली(प), मुंबई-९२ यांची प्रकाशने**

१६. स्वामी शिवानंद (ऋषिकेश) - चरित्र

१७. शिकवण ज्ञानेश्वरीची(ज्ञानेश्वरीचे सार या पुस्तकात सुबोध भाषेत गद्यस्वरूपांत दिले आहे.)

*** भारतीय विद्याभवन, चौपाटी, मुंबई यांचे प्रकाशन**

१८. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र (इंग्रजी भाषेत)

***

**आगामी प्रकाशने-**

१. संत श्रेष्ठ श्रीकृष्ण दयार्णव - यांच्या चरित्रावर आधारीत कादंबरी

2. ShriDattamaharaj Kavishwar - A Biography In English

3. Vichardhan
(English translation of selected Answers given by ShriDattaMaharaj Kavishwar)

४. कुंडलिनी योग
(कुंडलिनी योग साधना या विषयाचे तात्त्विक विवेचन आणि साधकांचे निवडक अनुभव - मराठी भाषेतील सुबोध विवरण)

5. Kundalini Yoga
(A treatise on the Theoary & Practice of Kundalini Yoga)

## ॥ मनोगत ॥

"श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा - विचारधन भाग ३" हे पुस्तक वाचकांच्या हातात देतांना आनंद होत आहे. "विचारधन भाग १" आणि "श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन" या दोन्ही पुस्तकांप्रमाणेच या पुस्तकाचेही स्वागत होईल असा विश्वास वाटतो. सद्गुरुंचे स्तवन करण्याच्या एकमेव प्रेरणेतूनच ही पुस्तके लिहिली आहेत. सद्गुरुंचे स्तवन करण्यात अपार सुख असते, विशुद्ध आनंद असतो असा अनेक संतमहात्म्यांचा अनुभव आहे. परंतु ही संधी मिळायलाही भाग्य लागते. ज्ञानदेव सांगतात. "अनेक जन्मे पुण्यकर्मे केल्यावरच सद्गुरुंचे स्तवन करण्याचे भाग्य लाभते." प्रस्तुत पुस्तकाच्या निमित्ताने सद्गुरुंचे स्तवन करण्याची संधी मला लाभत आहे याचा आनंद वाटतो.

धर्मजागरणाचे कार्य करण्यासाठी श्रीदत्तमहाराज कवीश्वर अवतीर्ण झाले आहेत. वेदांतातील तत्त्वज्ञान विशुद्ध स्वरुपात ते सांगत आहेत आणि ते तत्त्वज्ञान स्वतः जगतही आहेत. त्यांच्या स्वतःच्या आचरणात वेदांत पूर्णतया प्रतिबिंबीत झालेला आहे. त्यांच्या हातून घडलेले धर्मजागरणाचे कार्य फार मोठे आहे. विसाव्या शतकांत झालेले वेदांताचे महनीय प्रवक्ते असे श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे वर्णन करावेसे वाटते. श्रीदत्तमहाराजांचे विचारधन आणि त्यांची प्रवचने हा वेदांताचा आजच्या बोलीभाषेत झालेला मनोहारी आविष्कार आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर वेदांताशी एकरुप झाले आहेत. म्हणूनच वेदांताचे स्तवन हे सद्गुरुंचे स्तवन आहे या भूमिकेतून प्रथम वेदांताबद्दल काही लिहावेसे वाटते.

वेदवाङ्मय हा भारताचा अमोल ठेवा आहे. भारतीय अध्यात्मशास्त्र वेदांमधूनच प्रगटले. वैदिक ऋषींनी आपले जीवन पूर्णतया चिंतनालाच

वाहिलेले होते. विश्वाचे स्वरूप, आत्मस्वरूप (म्हणजे खरा 'मी' याचे स्वरूप), विश्व व मी यांच्यातील नेमका संबंध अशा अनेक प्रश्नांवर ऋषींचे चिंतन चालू असे. त्या चिंतनातूनच भारतीय अध्यात्मशास्त्राने आकार घेतला आणि ते ऋषींच्या मुखातून वेदांच्या रूपाने प्रगटले.

वेदवाङ्मयाचे चार भाग आहेत. संहिता, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, आणि उपनिषदे. वेदवाङ्मयाचा पहिला भाग म्हणजे संहिता. उच्च भावावस्थेत स्फुरलेल्या छंदोबद्ध मंत्ररचना वैदिक ऋषी गात असत. या मंत्ररचना म्हणजे संहिता. देवतांची स्तुती, प्रार्थना व वर्णने संहितांमध्ये आहेत.

वेदवाङ्मयाचा दुसरा भाग म्हणजे ब्राह्मणग्रंथ. ब्राह्मणग्रंथ गद्य स्वरूपात आहेत. संहितामधील मंत्रांचे अर्थ व स्पष्टीकरण ब्राह्मणग्रंथात आहे. यज्ञांचे प्रकार, कृती आणि फळ याचेही विवेचन ब्राह्मण ग्रंथात आहे.

वेदवाङ्मयाचा तिसरा भाग म्हणजे आरण्यके. अनेक वैदिक ऋषी अरण्यांत राहून ब्रह्मविषयक चिंतन व मनन करीत. या चिंतनाबद्द वैदिक ऋषींनी केलेले विवेचन आणि त्यांच्या परस्पर चर्चा आरण्यकांमध्ये आहेत. विश्वस्वरूप आणि आत्मस्वरूप यासंबंधी अनेक विचारबीजे संहिता, ब्राह्मणग्रंथ आणि आरण्यके यांत आहेत. या विचारबीजांचे विस्ताराने केलेले विवेचन म्हणजे उपनिषदे. उपनिषदे हा वेदवाङ्मयाचा चौथा भाग आहे. उपनिषदांनाच वेदांत असे म्हणतात. वेदांत म्हणजे वेदांचा अंतिम भाग, निश्चयात्मक भाग. भारतीय अध्यात्मशास्त्राचे सार एकत्रित स्वरूपांत उपनिषदांमध्ये आहे. म्हणूनच वेदांताला वेदांचे उत्तमांग (आम्नायमस्तक) असे म्हणतात. या अर्थाने वेदांत हे नाव उपनिषदांना चांगलेच शोभून दिसते. चिंतन करतांनाच ऋषींना आकलन झाले की, आपल्या अंतर्यामी एक चैतन्य आहे. ते स्वयंप्रकाशी आहे. तेच चैतन्य

आपल्या बुद्धीला प्रेरणा देते, देहाची इंद्रिये जिवंत ठेवते आणि देहाच्या इंद्रियांकडून कार्यही करुन घेते. त्या चैतन्याने सर्व विश्वालाही व्यापून टाकले आहे. त्या चैतन्यामुळेच सर्व विश्व कार्यरत आहे, गतिमान आहे. विश्वाच्या असलेपणाला त्या चैतन्याचाच आधार आहे. ऋषींनी या चैतन्याला ब्रह्म हे नाव दिले. ब्रह्म हे अव्यक्त आहे. पण त्यांतूनच भोवती दिसणारे विश्व निर्माण होते. ब्रह्म ही एकच वस्तू या जगांत खरी आहे, सत्य आहे. ईश्वर म्हणजे सगुण ब्रह्म, सर्व ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती या ब्रह्माची म्हणजे ईश्वराचीच आहे. ईश्वर दर्शनाचा आनंद म्हणजे आत्मानंद. तोच खरा आनंद आहे, शाश्वत आनंद आहे. हा आनंद कसा मिळवावा हे सांगतांना वैदिक ऋषी म्हणतात, आपल्या सर्व वासना निमाल्या, सर्व इच्छा नाहीशा झाल्या म्हणजे आत्मानंद अनुभवता येतो.

उपनिषदकार सांगतात- सत्ता, पैसा, मान, उपभोग, खाणेपिणे यामुळे देहाला सुख मिळते. पण त्याने खरा आनंद मिळत नाही. कारण मी देह नाही. मी आनंदस्वरूप आत्मा आहे. आत्मा म्हणजेच ब्रह्म. मी ब्रह्म आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे यालाच आत्मसाक्षात्कार म्हणतात. हीच आत्मानुभूती. आत्मानुभूती हाच उपनिषदांचा प्राण आहे. आत्मसाक्षात्कार कसा करुन घ्यावा हे सांगण्यासाठीच उपनिषदे अवतीर्ण झाली आहेत.

उपनिषदांनी दाखवलेल्या मार्गाने साधना करुन अनेकांनी आत्मसाक्षात्कार करून घेतला आहे. आत्मसाक्षात्काराचे ध्येय एकाच जन्मांत गाठता आले नाही, तरीही उपनिषदांनी सांगितलेल्या मार्गावर वाटचाल करतांना शांती मिळते, रोजच्या जीवनांतील दु:खे व अडचणींचा विसर पडतो, मन स्थिर होते, खूप समाधान मिळते असा अनुभव आहे. हा अनुभव असंख्य लोक घेत आले आहेत. ''शुद्ध आनंदाचा अनुभव घ्या म्हणजे तुमचे जीवन धन्य होईल'' असेच सर्व साधुसंत सांगत आले

आहेत. संतांच्या उपदेशाचा भारतीय जीवनावर मोठाच प्रभाव आहे.

भारतीयांची जीवनपद्धती व विचारपद्धती यांत वेदांताचा गाभा स्पष्टपणे दिसतो. वेदांताच्या साच्यातूनच भारतीयांची ज्ञानमीमांसा आणि ज्ञानसाधना यांनी आकार घेतला. राजनीती आणि न्यायदान पद्धती यावरही वेदांताचा ठसा आहे. भारतीय धर्म आणि संस्कृती वेदांतातून निर्माण झाली आहे. भारतीय कला आणि साहित्य यांचे भावपोषणही वेदांतातूनच झाले. अनेक कवी, लेखक आणि विचारवंत यांनी वेदांतातून स्फुर्ती घेतली. त्यामुळे त्यांचे वैयक्तिक जीवनही उंचावले आणि त्यांच्या हातून उच्च दर्जाची साहित्यनिर्मिती झाली. अनेक प्रतिभाशाली कलावंतांनी वेदांताचा अभ्यास केला. त्यामुळेच ते उच्च दर्जाचा कलाविष्कार करु शकले. भारताचा इतिहास सांगतो की भारतीय संस्कृतीवर जेव्हा जेव्हा कठीण प्रसंग आले, तेव्हा तेव्हा वेदांतातील तत्त्वज्ञानाने भारतीयांना वाट दाखवली आणि प्रसंग निभावून नेला.

वेदकाळापासून अगदी आजपर्यंत भारतीय संतमहात्म्यांनी समाजाला केलेला उपदेश वेदांताला अनुसरुनच आहे. काळाची गरज लक्षात घेऊन संतांनी प्रचलीत भाषेत वेदांतच सांगितला. आद्य शंकराचार्यांचे वाङ्मय म्हणजे तत्त्वज्ञानाचा कलात्मक आणि सौंदर्यमय आविष्कार कसा करावा चा आदर्श मानला जातो. शंकराचार्यांचे संपूर्ण वाङ्मय शुद्ध वेदांतच आहे. ज्ञानदेवांनीही शुद्ध वेदांतच सांगितला आहे.

विसाव्या शतकांत अवतीर्ण झालेले श्रीदत्तमहाराजही पूर्णपणे वेदांतीच आहेत. त्यांच्या विचारधनमध्ये शुद्ध वेदांतच सोप्या भाषेत प्रकट झाला आहे. सनातन धर्म विशुद्ध स्वरूपांत आकलन करून घेण्याची इच्छा अनेकांना असते. परंतु संस्कृत भाषेचा अभ्यास नसल्यामुळे वेद, उपनिषदे आणि शास्त्रग्रंथ मूळातून वाचता येत नाहीत. मराठी भाषेतील पुस्तके

वाचत राहिले तरी त्यातील कोणते विवेचन सनातन शास्त्रांना धरून आहे आणि कोणते विवेचन लेखकाचे स्वत:चे आहे हे उमगत नाही. मनांतील शंका, प्रश्न आणि साधनेतील अडचणी याबद्दल सनातन शास्त्रांतील मार्गदर्शन विशुद्ध स्वरूपांत वाचायचे म्हटले तर काय वाचावे हे कळत नाही. निरनिराळ्या पुस्तकांत जे वाचलेले असते त्याचा समन्वय करता येत नाही. त्यामुळे जितके वाचावे तितका गोंधळच वाढतो.

श्रीदत्तमहाराजांचे विचारधन या सर्व अडचणी दूर करते. साधकांच्या जवळ जवळ सर्व प्रश्नांना श्रीदत्तमहाराजांनी उत्तरे दिली आहेत. साधकांच्या जवळ जवळ सर्व अडचणींबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले आहे. श्रीदत्तमहाराजांचे विवेचन सनातन धर्माला पूर्णतया धरून आहे. त्यांनी जे काही सांगितले त्यांत सनातन धर्माचा गाभा विशुद्ध स्वरूपात प्रगट झाला आहे.

श्रीदत्तमहाराजांनी आधुनिक जीवनपद्धती डोळसपणे पाहिली आहे. नवीन विचारप्रवाह आणि पाश्चात्य संशोधन यांची त्यांना माहिती आहे. नवीन सुधारणा व आधुनिक विचारप्रवाह यांचे ते स्वागतच करतात. तथापि केवळ देहाचा विचार करणारे, देहाला आराम देणारे पाश्चात्य संशोधन व जीवनपद्धती माणसाला शाश्वत समाधान देऊ शकत नाही याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच नवीन जीवनपद्धती व आधुनिक विचारप्रवाह यांचे स्वागत करतांनाच श्रीदत्तमहाराज सनातन शास्त्रांचे विशुद्ध सार आचरणांत आणावे असे ते ठामपणे सांगतात. श्रीदत्तमहाराजांच्या निरूपणात आधुनिक व सनातन यांचा उचित संगम झालेला दिसतो. पूर्व आणि पश्चिम यांचा समन्वय श्रीदत्तमहाराजांनी विचारधनमध्ये साधला आहे. त्यामुळे सुशिक्षित तरूणवर्गही विचारधनने प्रभावित झाला आणि सनातन धर्माकडे वळला आहे.

आत्मानुभूती केंद्रस्थानी ठेवूनच त्यांचे प्रत्येक वाक्य प्रगट होते. त्यांच्या शब्दाशब्दांतून आत्मानुभूतीच बोलत असते. उपनिषदांतील अनेक मंत्र मराठमोळी वस्त्रे नेसून विचारधनमध्ये जागोजागी मानाने वावरतांना दिसतात. त्यामुळे वेदांतातील अनुभूती विशुद्ध स्वरूपात सामान्य माणसांपर्यंत पोचल्या आहेत. श्रीदत्तमहाराजांचा प्रत्येक शब्द शास्त्रांना धरून आहे. विवेचनाचा गाभा सनातन असला तरी आविष्कार मात्र ताजा, नवीन आणि सुबोध आहे.

विचारधनमधील विवेचनांत श्रीदत्तमहाराजांनी रोजच्या बोलीभाषेतील शब्दच वापरले आहेत. परंतु श्रीदत्तमहाराजांच्या श्रीमुखांतून जे शब्द बाहेर येतात त्यांना शुद्ध चैतन्याचा स्पर्श झालेला असतो. त्यामुळे त्या शब्दांना नवा अर्थ प्राप्त होतो, एक वेगळाच ताल, सूर व लय प्राप्त होतो. विचारधन वाचतांना आपण दिव्य संगीताचे सूर ऐकत आहोत असे त्यामुळेच वाटते.

श्रीदत्तमहाराजांचे शब्द ब्रह्मरसांत न्हाऊन येतात, ओजस्वी तेजाची वस्त्रे लेवून येतात. श्रीदत्तमहाराजांचे सहज बोलणे आणि सांगणेही ब्रह्म निरूपणच असते. म्हणून त्यांचे शब्द आपल्या हृदयांत खोलवर जातात आणि आपण अंतरात्मा काहीक्षण जागृत होतो. भोवतालच्या बाह्य विषयांकडून आपले मन बाजूला व्हावे, आंत वळून खोलवर जावे आणि आत्मस्वरूपाची ओळख वाचकांना व्हावी यासाठीच श्रीदत्तमहाराजांचे विचारधन अवतरले आहे. शास्त्रातील गूढ व गहन गंभीर सिद्धांत विचारधनमध्ये सहज सुंदर आणि सुटसुटीत वाक्यात, सोप्या भाषेत व्यक्त झालेले दिसतात. विचारधन वाचत राहिले की वेदांतातील अनुभूती आपल्याला वेढून टाकत आहेत आणि आंत खोल जाऊन आपल्याला

व्यापून टाकत आहे असे वाटते असा अनुभव काही साधकांनी सांगितला आहे.

श्रीदत्तमहाराज वैराग्य, पावित्र्य व शुचिता यांची घनीभूत मूर्तीच आहेत. सर्व शास्त्रग्रंथाचे सार त्यांनी पचवले आहे, त्यातील अनुभूती स्वतः घेतल्या आहेत आणि त्या अनुभूती श्रोत्यांपर्यंत पोचवण्यासाठी आवश्यक असलेले तपसामर्थ्य, ऋतंभरा प्रज्ञा आणि अलौकिक प्रतिभा त्यांना लाभली आहे. ते शब्दप्रभु आहेत, शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. नेमके शब्द, सोपी व सुटसुटीत वाक्ये आणि थोडक्यांत खूप मोठा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. पारिभाषिक शब्द टाळून ते अध्यात्म सांगतात. स्वतः अनुभूती घेतलेली असल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनांत ठामपणा, सोपेपणा व निःसंदिग्धपणा आपोआपच आला आहे. अनेक वाक्ये भावावस्थेत स्फुरलेली आहेत. त्यामुळे मंत्ररुप घेऊनच ती वाक्ये प्रगटली असे जाणवत रहाते.

आत्मानंदाचा ठेवा हेच वेदांतातील उपनिषदांचे रहस्य आहे. श्रीदत्तमहाराजांनी आपल्याला विचारधन स्वरूपाने उपलब्ध करुन दिले आहे. विचारधन हे ललित पुस्तकासारखे वाचून चालणार नाही. एका वाचनातच त्यातील मर्म समजणार नाही. त्याचे अध्ययनच करायला हवे. ते पुनःपुन्हा वाचायला हवे आणि त्यावर चिंतन आणि मननही करायला हवे. तर्काने किंवा बुद्धीने विचारधनचे मर्म जाणून घेता येणार नाही. पूर्ण श्रद्धा ठेवून अध्ययन करत राहिले तरच अध्यात्मप्रसाद होतो आणि अंतरात्मा जागा होऊन आत्मानुभूतीपर्यंत पोहोचता येते.

परमेश्वरस्वरूप झालेल्या संतांचे वचन हे वेद वचनासारखेच असते असे शंकराचार्य स्वामीमहाराज म्हणतात. केवळ गुरुंचे शब्दच मनन करीत राहिले, दुसरे काहीही वाचले किंवा ऐकले नाही तरीही तो भक्त

आत्मसाक्षात्कारापर्यंत जातो असे ज्ञानदेवांनी स्पष्टपणे सांगितले आहे. केवळ विचारधनचे अध्ययन करणे ही आत्मसाक्षात्कारापर्यंत नेणारी परिपूर्ण साधना ठरते असा अनेक साधकांचा अनुभव आहे.

वयाच्या सोळाव्या वर्षापासून श्रीदत्तमहाराज भागवत सप्ताह व प्रवचनेयांतून वेदांत सांगत आहेत. धर्माचरण व सदाचार यांचे महत्त्व सांगत आहेत. दुःखी आर्तांना आश्वासन देऊन शांती प्रदान करीत आहेत. दीक्षा घेतलेल्यांना परमार्थ मार्गावर पुढे नेत आहेत. शरणागतांचा प्रपंच व परमार्थ सांभाळत आहेत. श्रद्धावंतांशी मौनातून बोलत आहेत आणि ''शब्देवीण संवाद'' करून त्यांना गूढ सुक्ष्म अनुभूती देत आहेत. अनेकजण आत्मसाक्षात्कारापर्यंतही पोचले आहेत. अशारीतीने श्रीदत्तमहाराजांच्या प्रभावामुळे मराठी लोकांत धर्मजीवनाला मोठाच उजाळा मिळाला आहे. मोठेच धर्मजागरण झाले आहे.

श्रीदत्तमहाराजांचे धर्मजागरणाचे कार्य पाहिले म्हणजे '' धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे'' या गीतेतील आश्वासनाची पूर्तता होत आहे असे जाणवत रहाते.

प्रस्तुत पुस्तक योगीराज श्रीगुळवणीमहाराज यांच्या पंचवीसाव्या पुण्यतिथीच्या वर्षात प्रसिद्ध होत आहे हे अत्यंत औचित्यपूर्ण आहे. श्रीगुळवणीमहाराज हे श्रीदत्तमहाराजांचे दीक्षागुरु. गुरुशिष्यांची ही जोडी म्हणजे अद्वैताचे मूर्तिमंत उदाहरण आहे. श्रीनिवृत्तीनाथ आणि श्रीज्ञानदेव या गुरुशिष्यांचे जसे भावाद्वैत होते तसेच श्रीगुळवणीमहाराज आणि श्रीदत्तमहाराज या गुरुशिष्यांचे आहे. या गुरुशिष्य जोडीमध्ये अद्वैत खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण झाले आहे, साकार झाले आहे. श्रीगुरुमहाराजांनी आपले सर्वस्व श्रीदत्तमहाराजांना दिले व समाजाला भरभरुन देण्याचे लोकोद्धाराचे कार्य श्रीदत्तमहाराजांवर सोपवले. स्वतः श्रीगुरुमहाराजांनी कधीही लेखन व

प्रवचन केले नाही. परंतु भावकोमल, विवेकनिष्ठ, प्रतिभाशाली व अनुभूतीसंपन्न श्रीदत्तमहाराजांजवळ समाजाला सांगण्यासारखे खूप आहे हेओळखून श्रीगुरुमहाराजांनी सदैव श्रीदत्तमहाराजांना बोलते ठेवले. श्रीदत्तमहाराजांच्या मागे उभे राहून त्यांच्या शक्ती प्रवाहीत केल्या, आपला अधिकार, सत्ता व सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या मागे उभे केली आणि श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांमधून आणि विचारधनमधून अध्यात्मविद्येच्या अमृताचा जगावर वर्षाव केला. स्वतः नामानिराळे राहिले. श्रीज्ञानदेवांना पुढे करुन श्रीनिवृत्तीनाथ जगावर अमृताचा वर्षाव करीत आहेत तसेच येथे घडत असलेले दिसते.

अनेक लोकांना कुतुहल वाटते. विचारधनमधील प्रश्न श्रीदत्तमहाराजांना कोणी विचारले? ते प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीला आम्हाला भेटावेसे वाटते असेही कांहीजण म्हणतात. वस्तुस्थिती प्रामाणिकपणे सांगायची झाली तर हे प्रश्न दुसऱ्या कोणी विचारलेले नाहीत. प्रश्न विचारणारेही श्रीदत्तमहाराज स्वतःच आहेत आणि उत्तरे देणारेही श्रीदत्तमहाराज स्वतःच आहेत.

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायांत ज्ञानदेवांनी भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद कथन केला आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ''अर्जुना, या आत्मस्वरुपाची चर्चा सदासर्वदा मोठ्या आवडीने करावीशी वाटते. पण काय करावे ! तसा विचारणाराच कोणी भेटत नाही. तू तोंड भरुन विचारायला आलास म्हणूनच माझे मनोरथ सफल झाले. अद्वैतप्राप्तीनंतरही अनुभवसुख भोगायला जे साह्यभूत होते, तेच विचारून तू मला सुख देत आहेस. आरसा समोर आला म्हणजे आपले स्वरुप आपल्याला त्या आरशांत दिसते, तसा हा आपला दोघांचा निर्मळ संवाद आहे. तुला एखादी गोष्ट समजत नाही, म्हणून तू ती मला विचारतो आहेस आणि मग मी त्याचे उत्तर देतो आहे, असे हे आपले दोघांचे संभाषण नाही.

जसा दोन ओठांतून एकच शब्द निघतो, दोन पायांनीं चालण्याची क्रिया एकच होते त्याप्रमाणे तू विचारणारा आणि मी सांगणारा दोघांचा अभिप्राय एकच आहे. प्रश्न विचारणारा आणि उत्तरे देणारा दोघेही एकच आहेत.''

भगवान श्रीकृष्णांच्या वाक्यांचा अर्थ समजून घेतला पाहिजे. श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांचे ज्ञान, भूमिका व अधिकार एकच आहे असा या वाक्यांचा अर्थ नाही. यांतून एक आध्यात्मिक रहस्य प्रगट झाले आहे. धर्मजागरणाच्या कार्यासाठी ज्ञान पुन्हा प्रकट करावे, सनातन शास्त्रांचे सार पुन्हा सांगावे हा भगवान श्रीकृष्णांचा संकल्प होता. अर्जुनाशी संभाषण करण्याच्या निमित्ताने तो भगवंतांनी पूर्ण केला. वेद व उपनिषदांचे सार एकत्रित स्वरुपात सुबोध भाषेत सांगणे हे भगवान श्रीकृष्णांचे उद्दिष्ट होते. भगवंताच्या प्रेरणेने अर्जुनाला प्रश्न विचारायची बुद्धी झाली. त्याचे प्रश्न तसे सामान्यच. पण त्या सामान्य प्रश्नांचे निमित्त घेऊन भगवंतांनी विवेचनाला सुरुवात केली आणि सर्व भारतीय तत्त्वज्ञान पुन्हा एकदा गीतेच्यारूपाने सुबोध भाषेत एकत्र मांडले. त्यामुळे भगवद्गीता हा परिपूर्ण तत्त्वज्ञानाचा ग्रंथ झाला आहे.

विचारधन भाग १, २ व ३ या प्रश्नोत्तरांच्या पुस्तकांचे स्वरुप असेच आहे. सनातन शास्त्रांचे सार आजच्या बोलीभाषेत सांगणे हा श्रीदत्तमहाराजांचा संकल्प होता. कोणाला तरी निमित्त करून त्यांनी आपला संकल्प पूर्ण केला आहे. प्रश्न विचारणारे तेच आहेत. उत्तरे देणारेही तेच आहेत. प्रश्नही त्यांचेच, उत्तरेही त्यांचीच. सर्व कर्तृत्वशक्ती, सर्व ज्ञानशक्ती त्यांचीच आहे. म्हणूनच या ग्रंथाचे गौरव श्रीदत्तमहाराजांच्या चरणी रूजू झाले आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या विचारधनमध्ये ज्या उदार धर्मभावना प्रकटल्या आहेत, त्यांत प्राचीन संस्कृती व अर्वाचीन जीवनपद्धती यांचा अभिनव

स्वरुपाचा समन्वय आहे. आधुनिक काळातील विश्वसंस्कृतीला पोषक ठरेल अशी प्रेरकशक्ती प्राचीनतेतून कशी घेता येते हे श्रीदत्तमहाराजांच्या विचारधनमध्ये प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे या विचारांचे अनुसरण करणारे लोक जितके वाढत जातील, तितके मानवी समाजाचे कल्याण आपोआपच साधत जाईल. श्रीदत्तमहाराजांचे विचारधन हा अक्षयनिधी आहे. म्हणून विचारधनद्वारा श्रीदत्तमहाराजांचे लोकोद्धाराचे कार्य भारतभूमीवर दीर्घकाळ प्रकर्षाने होत रहाणार आहे. विचारधन वाचल्यावर अनेक लोक धर्मजीवनाकडे आकृष्ट झाले आणि श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती पोचले आहेत, तेथे स्थिर झाले आहेत हा श्रीदत्तमहाराजांच्या धर्मजागरणाच्या कार्याचाच एक भाग आहे. सर्व ईश्वरी शक्तीचीच लीला आहे. धर्मजागणाच्या कार्यासाठीच श्रीदत्तमहाराज पुनःपुन्हा अवतीर्ण होत राहणार आहेत आणि कोणाला तरी निमित्त करुन वेदांत प्रचलित भाषेत पुनःपुन्हा समाजापुढे मांडत राहणार आहेत.

श्रीदत्तमहाराजांनी आता ९० व्या वर्षात पदार्पण केले आहे. तरीही धर्मजागरणाचे कार्य त्याच उत्साहाने आणि जोमाने चालू आहे. धर्मजागरणाच्या त्यांच्या कार्यात त्यांचे थोरले चिरंजीव श्रीअशोकरावमहाराज आता त्यांना सहाय्य करत आहेत. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी अनुमती मिळावी ही प्रार्थना श्रीअशोकरावमहाराजांना सादर केली. त्यांनी अनुमतीही दिली आणि पुस्तकाचे स्वरूप कसे असावे याबद्दल मोलाचे मार्गदर्शनही केले. त्यांच्या मार्गदर्शनात व्यावहारिक सुजाणपणा होता आणि पारमार्थिक भूमिकाही होती. सर्वोच्च पारमार्थिक भूमिका असूनही व्यवहारांत कसे साफल्य मिळवता येते याचा आदर्श म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे जीवन. श्रीअशोकरावमहाराजांचे मार्गदर्शन तसेच होते, या आदर्शाप्रमाणेच होते. श्रीअशोकरावमहाराजांनीच संकलनातील

सर्व अडचणी व त्रुटी दूर करून प्रस्तुत पुस्तकाला हे "स्वरूप" प्राप्त करून दिले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या धर्मजागरणाच्या कार्यात श्रीअशोकराव महाराज यांची भावी काळात कोणती भूमिका राहणार आहे हेच यांतून सूचित होत आहे.

अनेक जन्मे माझ्या हातून खूप मोठी पुण्यकर्मे घडली असली पाहिजेत. त्यांचे फळ म्हणूनच मी श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती येऊन पोहोचलो. त्यांनी मला जवळ केले म्हणूनच मी त्यांना सद्गुरू असे संबोधत आहे.

विकारांनी घेरलेला, अज्ञानाने भरलेला, स्वतःलाच हरवून बसलेला असा मी सद्गुरूंच्या चरणप्रांती जेव्हा पोचलो, तेव्हा अमावास्येच्या अंधारात बुडून गेलेल्या टेकडीसारखी माझी स्थिती होती. पण सूर्य उगवल्यावर त्याचे कोवळे किरण फाकले म्हणजे आसमंत उजळून निघतो आणि अंधारात बुडून गेलेली टेकडीही प्रकाशमय होते . येथेही तसेच झाले. सद्गुरूंचे दर्शन झाले. त्यांनी या सामान्य जीवाला जवळ केले. त्यांची कृपा झाली. अभय दिले हे सूचित करण्यासाठी त्यांना आपला उजवा हात उचलून अभयमुद्राही दाखवावी लागली नाही. त्यांच्या हृदयांतील कारूण्य आणि दया उचंबळून आली आणि कृपाकटाक्षातून प्रेमाचा वर्षाव झाला. आनंदाच्या वृष्टीत मी न्हाऊन निघालो. मनाची मूळ 'सुखरूप' स्थिती कशी असते याचा अनुभव त्यांच्या दर्शनाने क्षणभर मला आला. हे केवळ त्यांच्याच कृपेने घडू शकले.

सद्गुरूंच्या मुखातून आशीर्वाद देण्यासाठी शब्द उमटले आणि मला वाटले, इंद्राच्या दरबारातील हजारो वीणा एकदम झंकारल्या. त्या झंकाराचे सूर आसमंतात भरून दाहीदिशांच्या पलीकडे गेले. त्यांचे अमृतमधुर शब्द कानावर पडताच वाटले, देवी सरस्वतीच्या मुखातून उमटलेली नादब्रह्माची लकेरच मी ऐकतो आहे. वाऱ्याची झुळुक येताच सरोवरात पाण्याच्या

लहरी उमटत रहातात, तसे भगवत्‌भक्तीचे तरंग माझ्या मनावर उमटले. अंध:कार नाहीसा होऊ लागला. पावित्र्य आणि शुचिता यांनी हृदयांत प्रवेश केला. विकारांची बंधने सैल होऊ लागली. ग्रीष्माच्या उन्हाने मरगळलेल्या वेलीवरील कोमेजल्या फुलावर अमृताचा वर्षात व्हावा तसे झाले. मनांतील भावभक्तीला अनेक कोंब फुटले.

सद्‌गुरूंच्या श्रीमुखाकडे क्षणभर पाहिले. अलौकीक लावण्य एकवटलेले दिसले, दिव्य तेज घनीभूत स्वरूपांत पुंजाळलेले दिसले. सद्‌गुरूंच्या डोळ्यांतील तेज क्षणभरही सहन करता येण्याची पात्रता मजजवळ नव्हती. आपोआप माझी दृष्टी खाली वळली, सद्‌गुरूंच्या चरणी गेली. सद्‌गुरूंच्या चरणप्रांती अध्यात्मशास्त्र विसाव्याला आलेले दिसले. भक्ती, वैराग्य आणि ज्ञान तेथेच माहेरपणाला आलेले होते. सर्व सुखे तेथेच वास्तव्य करून आहेत असे जाणवले.

डोळे मिटले आणि जाणीव झाली की सद्‌गुरूंचे सगुण साकार रूप चिन्मय खरे. पण सद्‌गुरूंच्या सगुण रूपाच्या पलीकडे सद्‌गुरूंचे खरे स्वरूप आहे. सर्वसाक्षीणी तुर्या हेच सद्‌गुरूंचे खरे स्वरूप आहे. 'सर्व खल्विदं ब्रह्म' हेच तिचे व्यापक स्वरूप आहे. ब्रह्म, माया आणि आत्मानुभूती यांची जाणीव सद्‌गुरूंच्या त्या स्वरूपात एकवटली आहे. त्या तुर्येने सर्व विश्व व्यापून टाकले आहे.

सद्‌गुरूच शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. सद्‌गुरूच बुद्धीची प्रेरक शक्ती आहेत. सद्‌गुरूच वाणीची अधिष्ठात्री देवता आहेत. सद्‌गुरूंचे स्तवन तरी कसे करू शकणार? त्यांच्याच चरणापाशी पडलेले काही शब्द उचलून घेतले आणि सद्‌गुरूंचे स्तवन करण्याच्या निमित्ताने ते येथे सर्वांच्या पुढे ठेवले आहेत. निरांजनातील ज्योतीने सूर्याला ओवाळावे, सागरातील पाणी ओंजळीत घेऊन सागरालाच अर्घ्य द्यावे तसे हे झाले. सद्‌गुरूस्वरूप अनंत

आहे, अपार आहे. सद्गुरूस्वरूपाचे यथार्थ वर्णन करणे कोणालाच शक्य होणार नाही. मौन स्वीकारावे, लीन व दीन होऊन सद्गुरूंच्या चरणी मस्तक टेकावे एवढेच करता येण्यासारखे आहे.

सद्गुरूंनी मला जवळ केले आहे म्हणून धीर करुन एक प्रार्थना सद्गुरूंच्या चरणी सादर करत आहे. या पुढील जीवनात माझ्या मुखांतून जे जे शब्द बाहेर पडतील, त्यांचे सद्गुरूंच्या पावन नामजपातच रूपांतर व्हावे. हाताच्या सर्व हालचालीतून सद्गुरूंनाच वंदन व्हावे. सहज चालणेही सद्गुरूंच्या भोवती प्रदक्षिणाच व्हाव्यात. मुखात घेतलेला अन्नाचा प्रत्येक घास सद्गुरूंनी प्रेमाने दिलेला प्रसादच व्हावा. घेतलेला पाण्याचा प्रत्येक घोट सद्गुरूंचे चरणतीर्थच व्हावे. कानावर पडलेला प्रत्येक आवाज सद्गुरूंचाच आवाज आहे अशी अनुभूती सतत येत रहावी. जेथे स्पर्श होईल तेथे सद्गुरूंचे चरणच जाणवावेत. जेथे दृष्टी पडेल तेथे सद्गुरूंचे सगुण साकार रूपच दिसावे. डोळे मिटल्यावर आंतही फक्त सद्गुरूच दिसावेत. प्रत्येक श्वासोच्छ्वासाला सद्गुरूंच्या कपाळावरील चंदनाच्या टिळ्याचा सुगंधच यावा. मनांत येणारे प्रत्येक विचारही सद्गुरूंची अतीव प्रेमाने केलेली आरतीच व्हावी. झोप घेण्यासाठी माझा देह विसावला तर तो सद्गुरूंना साष्टांग नमस्कारच व्हावा. देह असेपर्यंत जीवनाचा प्रत्येक क्षण म्हणजे आत्मार्पण बुद्धीने केलेली सद्गुरूंची पूजाच व्हावी. या देहाचे अस्तित्व म्हणजे सद्गुरूंच्या चरणांवर वाहिलेले कोरांटीचे एक लहानसे फुल व्हावे. सद्गुरूंनी हे भातुके मला द्यावे, एवढीच सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना आहे.

**शरद्चंद्र कोपर्डेकर**

# ऋणनिर्देश

सद्‌गुरुंच्या संकल्पामुळेच हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. सद्‌गुरुंच्या या कार्याला अनेकांचे साह्य झाले आहे. माझ्या पत्नी सौ. पौर्णिमा कोपर्डेकर यांचे साह्य सर्वात मोलाचे आहे. सर्व कार्याचे सचिव पण त्यांनी समर्थपणे सांभाळले. श्री. रघुनाथ सुर्वे, कु. शिल्पा कुलकर्णी, कु. स्वप्ना चित्राव आणि श्री. रविंद्र सुंभे यांनी प्रश्नोत्तरे ध्वनीफितीवरून लिहून काढून सुवाच्य मुद्रणप्रत तयार करण्याचे काम केले. पुस्तक देखण्या स्वरूपांत वाचकांपुढे यावे यासाठी सौ. सुमेधा सबरवाल, सौ. कल्पना हंस, श्री. संदीप केळकर आणि श्री. पराग पिंपळे यांनी खूप मेहनत घेतली. प्रत्यक्ष छपाईचे काम श्री. सुनिल महाशब्दे यांनी उत्तमरित्या केले. छायाचित्रे श्री. भाऊसाहेब वाकडे व श्री. प्रसाद पाटणकर यांनी उपलब्ध करुन दिली. पुस्तक लौकरात लौकर प्रकाशित व्हावे यासाठी सर्वतोपरी उत्तेजन देऊन श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी कार्याला वेग दिला. माझे बंधू श्री. शामराव कोपर्डेकर यांनी इंद्रायणी साहित्य प्रकाशनातर्फे पुस्तक प्रकाशित करुन बंधूप्रेमाचा धागा अधिक बळकट केला. पुस्तक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावे यासाठी सेवाभावी मूल्य ठेवले व वितरणाची व्यवस्थाही चोख केली. इतर अनेकजण या गुरुसेवेत सामील झाले आहे. या सर्वांची सेवा गुरुकृपेला निश्चितच पात्र आहे.

# विचारधन भाग तीन

## (साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे यांचे संकलन)

*प्रश्न : महाराज, शास्त्रग्रंथ स्वतःच्या बुद्धीने वाचूनही अर्थ लावता येतो. मग गुरुशिष्य परंपरेला भारतात एवढे महत्त्व कां दिले जाते?*

उत्तर : शब्दाचे अर्थ वेगवेगळे केले जातात. बुद्धीमध्ये संस्कार असतील, त्या संस्कारांप्रमाणे त्या वाक्यांचा अर्थ वाटतो आपल्याला. म्हणून आपल्या भारतामध्ये शिक्षणाची गुरुपरंपरा प्राचीन काळापासून आहे. गुरुंनी ह्या ग्रंथांचा उपदेश आपल्या शिष्यांना करायचा, त्यांनी आपल्या शिष्यांना करायचा, अशी सगळी परंपरा ऋषीमंडळींपासून चालत आलेली आहे. ज्ञान हे निष्कलंक निर्दोष व्हायला पाहिजे आणि तसं ते निर्दोष राहिलं पाहिजे याकरिता हा प्रयत्न आहे. त्यासाठी गुरुशिष्य परंपरा आहे. पाठाच्या अगोदर ह्या सगळ्या गुरुपरंपरेचे स्मरण करायचे, मग ऐकायचे आणि नंतर सांगणाऱ्याने सांगायचे. अशी ही परंपरा चालत आलेली आहे. गुरुशिष्य परंपरा ही वेदांची परंपरा आहे, शास्त्राची परंपरा आहे.

केवळ एखाद्याच्या बुद्धीनं अर्थ लावण्यासंबंधी निर्णय होऊ शकतो. पण स्वतंत्र बुद्धीने कोणाचही वाचायचं नाही, कोणाचही ऐकायचं नाही. माझं मला सगळं समजतंय, समजू शकेल, अशा दृष्टीने हे ग्रंथ वाचून त्यांचा अर्थबोध मनाला नीट होऊ शकत नाही. ज्ञान परंपरेने पुढे चालत आलेले आहे. परंपरेने चालत आले म्हणूनच ज्ञान शुद्ध राहिले आहे. ज्ञान शुद्ध रहाण्यासाठी गुरुशिष्य परंपरेला महत्व आहे.

*प्रश्न : महाराज, संसारात सगळी सुखे मिळत राहिली म्हणजे माणसाचे मन परमार्थाकडे वळतच नाही कां?*

उत्तर : संसारात सगळी सुखं असली म्हणजे मग आणखी काही वेगळे खरे

सुख असते याची कल्पना येत नाही. संसारातल्या सुखाबद्दल वैराग्य उत्पन्न होत नाही. संसारातले हे सुख चांगले नाही, ते नश्वर आहे याचा विचार होत नाही, ईश्वराच्या भजनाकडे प्रवृत्ती होत नाही. अत्यंत दुःख झाले की आपले मन परमार्थाकडे जाते. आत्मानात्म विचार समजतो. अधिकारी पुरुषाने अशावेळेला केलेला उपदेश मनावर ठसतो, संसार कसा आहे हे समजून येते आणि पारमार्थिक योग्यता प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, दुःख हे आध्यात्मिक प्रगतीचे साधन आहे असे कोणी तरी म्हटले आहे. तसे म्हणता येईल कां ?*

उत्तर : अनुकूल काळ असला, संसारातील सगळी सुखं मिळत राहिली, म्हणजे मन सुखात आसक्त होते. मग ईश्वराचे स्मरण रहात नाही. महाभारत युद्ध संपल्यावर श्रीकृष्णांनी कुंतीला काय इच्छा आहे असे विचारले तेव्हा तिने दुःखच मागितले. ''पांडवांना जास्त सुखी करु नका. जर पांडवांना साम्राज्य मिळालं, सर्व सत्ता मिळाली तर ते सुखांत आसक्त होऊन जातील, त्यामुळे त्यांना अहंकार उत्पन्न होईल आणि तुम्हाला ते विसरुन जातील. तुमचे विस्मरण होईल असं सुख आम्हाला नको. आम्हाला विपत्तीतच ठेवा. आम्हाला दुःख द्या.''

कुंतीने हे मागणे अगदी विचारपूर्वक मागितलेले आहे. दुःख भोगावे लागले की आम्ही विचार करतो. लक्षात येतं की आज ना उद्या हे सर्व जाणार आहे. सगळ्यांचा विनाश हा ठरलेला आहे. हे चिंतन झाले म्हणजे मन सुखांत आसक्त होत नाही. अनुकूल परिस्थिती आली तरी विवेकी मनुष्य या दोषाचे चिंतन करीत रहातो आणि सुखांतही त्याला भगवंताचा विसर पडत नाही.

*प्रश्न : महाराज, आम्हाला वाटते खूप पैसा मिळाला म्हणंजे जीवनांत सुख लाभेल, आनंद मिळेल. सुखाच्या साधनांवाचून, धनावाचूनही आनंद मिळू शकेल हे मनाला कसे काय समजावून द्यावे ?*

उत्तर : धन मिळाले म्हणजे सुख मिळते असे आपण समजतो. म्हणून धन मिळवत रहातो, सुखसाधने जमवत रहातो, सुखसाधनांचा उपभोग घेत रहातो.

धन मिळाले की सुख मिळते हा कार्यकारणभाव ठरवला कोणी ? तो फक्त परंपरेने चालत आला आहे. स्वप्नामध्ये आपण खूप सुख पाहतो. पण प्रत्यक्षात काहीही नाही. गाढ झोपेत तर काहीच नाही. फक्त आनंद आहे. गाढ झोपेच्या वेळी देह शय्येवर पडलेला असतो. कोणतेही चैतन्य नाही. त्याच्या ठिकाणी विषयच नाहीत. खाणंपिणं, गाणं बजावणं काही नाही. गाढ झोपेत ती इंद्रियेच नसतात, विषयही नसतात, सुखाची साधनेही नसतात. मग सुख मिळते कसे ? आनंद मिळतो कसा ? गाढ झोप लागली म्हणजे खरा आनंद मिळतो हा तर आपला रोजचा अनुभव आहे.

*प्रश्न : म्हणजे विषयापासून सुख मिळत नाही असंच म्हणायचं कां महाराज?*

उत्तर : विषयापासून आपण सुखी होऊ असं आपल्याला वाटतं. पण विषय मृगजळाप्रमाणे असतात. विषयापासून सुख मिळेल ही समजूत गेली पाहिजे. गाढ झोप लागली असता किती आनंद असतो ! तेव्हा आपल्याजवळ एकतरी सुखाचं साधन असतं कां? धन नाही, सत्ता नाही, सुखाची साधनं नाहीत, विषय नाहीत. गाढ झोपेत आपण शरीरही विसरतो. ज्या इंद्रियांनी सुख भोगायचं ती इंद्रियही विसरतो. गाढ झोपेत जो आनंद होतो, तो आनंद कोणता आहे? तो आत्माच मुळांत आनंदरुप आहे हेच

याचं उत्तर आहे. तो आनंद हेच आपलं मूळ स्वरुप आहे. खरा आनंद बाहेर नाही. तेच आपले मूळ स्वरुप आहे.

*प्रश्न : महाराज, हा खरा आनंद आम्ही कसा मिळवावा ?*

उत्तर : आनंद आपल्याजवळच आहे. संतमहात्मे सांगतात, ईश्वराची भक्ती केली की खरा आनंद मिळतो, खरे सुख मिळते. स्वतः अनुभव घेऊन ते पुनःपुन्हा सांगताहेत. भक्तीमार्गाने ते स्वतः गेले आणि सुखी झाले. इतरांनाही ते सुखी करताहेत. इतरांची दुःखे ते दूर करताहेत. ही परंपरा आहे. श्रद्धा ठेवली तर हा अनुभव कोणीही घेऊ शकतो.

*प्रश्न : महाराज, आत्मस्वरूपापर्यंत पोचण्यासाठी आणि आत्मस्वरूपाच्या आनंदाचा अनुभव सतत येत रहावा यासाठी आम्ही काय करावे ?*

उत्तर : उपनिषदांत सांगितलंय, ईश्वर आनंदरूप आहे आणि त्याचा अंशरूप असणारा जीवात्माही आनंदरूप आहे. हे समजून घेण्यासाठी, त्याचा प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी उपनिषदांनी अभ्यास व वैराग्य हा प्रयत्न सांगितला आहे.

कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग, योगमार्ग असे अनेक मार्ग आहेत. शरीर म्हणजे मी आहे ही बुद्धी कमी होण्यासाठी हा अभ्यास आहे. वैराग्य म्हणजे मनांतील ममता दूर करणं. हे माझं आहे, ते माझं आहे, हे सुरक्षित राहिले पाहिजे असं आपल्या मनाला वाटते. हे सगळे असं सुरक्षित राहण्यासाठी प्रयत्न करण्यांतच आयुष्यांतला सगळा वेळ निघून जातो. ईश्वर चिंतनाला वेळच रहात नाही. म्हणून घरदार वगैरेबद्दलची ममता गेली पाहिजे. मनांतील इच्छा कमी कमी झाल्या पाहिजेत. हा फार मोठा अभ्यास आहे. त्याकरता ईश्वराच्या सहाय्याची जरुरी आहे. म्हणून ईश्वराची उपासना सांगितली आहे.

देवाची भक्ती घडली पाहिजे, गुरुंची भक्ती झाली पाहिजे आणि कर्माचरणही झालं पाहिजे. आत्मस्वरुप हे अविनाशी आहे हा पक्का निश्चय झाला पाहिजे. शरीर म्हणजे मी आहे ही बुद्धी कमी होण्याकरिता अभ्यास आणि वैराग्य सांगितले आहे. म्हणजे ममता दूर व्हायला पाहिजे. मनाचा निरोध झाल्याशिवाय आत्मानंदाचं सुख कळत नाही आणि त्या आत्मानंदामध्ये मन राहूच शकत नाही. मनाला सतत बाहेर जायचीच सवय लागली आहे ना ! मनाला आंत वळवायचं आहे. त्यासाठी ईश्वराची कृपा पाहिजे. त्याच्या कृपेने बाहेर गेलेलं मन एकदम आत वळू शकतं. मन अंतर्मुख झालं की त्या मनाला विचार करण्याची शक्ती मिळते. विचारांनी मनातले दोष घालवता येतात. दोष गेले म्हणजे मन स्थिर होऊ शकतं.

जे आपल्याला समजलंय, त्याचं अखंड चिंतन करायचं. त्यालाच ध्यान असेही म्हणतात. त्या ध्यानाचा परिपाक म्हणजे समाधी अवस्था आहे. समाधि म्हणजे अत्यंत दृढ ध्यान.असं दृढ ध्यान चालू असतांना एकदम साक्षात्कार त्या चित्तामध्ये होऊन जातो. पूर्ण आनंदस्वरुप मी आहे. तो पूर्ण आनंद म्हणजेच गुरुस्वरूप आहे. सद्गुरूंचं आणि ईश्वराचं स्वरूप एकच आहे. तेच आत्मस्वरूप. आनंदरुपच आहे ते. सद्गुरूंच्या कृपेनेच तो आनंदाचा अनुभव येतो.

*प्रश्न : ज्ञानदेव म्हणतात ''अवघाचि संसार। सुखाचा करीन। आनंदे भरीन। तिन्ही लोक।'' ज्ञानदेवांनी या अभंगात सुख आणि आनंद यांचा जो उल्लेख केला आहे, तो आनंद, ते सुख कोणते ?*

उत्तर : आनंद किंवा सुख म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. चित्त एकाग्र झाले, स्थिर झाले की सुखाचा अनुभव येतो. एक आत्माच सुखरूप आहे, आनंदरूप आहे. आनंद आणि सुख हेच आपले मूळ स्वरूप आहे.

त्यावाचून बाहेर कोठे सुख, आनंद असं काही नाही. चित्त स्थिर झाले की त्यात तो आनंदरूप आत्मा प्रतिबिंबित होतो आणि माणसाला सुख मिळाले, आनंद मिळाला असे जाणवते. सुखाची अवस्था नसणे यालाच दुःख म्हणतात. ''दुःखमल्पसुखं स्मृतम्।'' असे त्रिपुरारहस्यांत सांगितले आहे. सुखरहितस्थिती म्हणजेच दुःख. जीवनांत जे काही सुख मिळते, आनंद मिळतो तो आत्मस्वरूपाचाच असतो.

*प्रश्न : महाराज, ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात सुख म्हणजे काय हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात,*

*आता यावरी सुख । ते एवंविध देख ।*
*जेणे एकेंचि अशेष । विसरे जीव ।।*
*मना वाचे काये । जे आपुली आण वाये ।*
*देहस्मृतीची त्राये । मोडीत ये जें ।।*

*या ओव्यांमध्ये ज्ञानदेवांनी सांगितले आहे की, ''सुख म्हणजे मी देहरुप आहे याचा विसर पडणे.''*

*हे समजावून सांगावे अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : आपले हे जे बाह्य शरीर आहे, त्या बाह्य शरीराचा आपल्याला विसर पडला की मग केवळ एक आत्मस्वरुपच आहे. मग आत्मस्वरूपाशिवाय दुसरं काही नाहीच. आत्मस्वरूप आनंदरूपच आहे.

प्रश्न : **महाराज, बाहेरच्या जगांत आनंद मिळतच नाही कां?**

उत्तर : पूर्ण सुख बाहेर आहे कां आत आहे हा विवेकच होत नाही आमचा. मी कोण आहे हा विवेकच झालेला नाही. देहापर्यंत जाऊन थांबतो आम्ही. इंद्रियापर्यंत जाऊन थांबायचं, प्राणवायूपर्यंत येऊन थांबायचं, बुद्धीपर्यंत येऊन थांबायचं. खरं जे आत्मस्वरूप आहे ते तर ह्या सर्वांच्या पलिकडे

आहे. त्याच्या पलिकडे काही नाही.

शंकराचार्यमहाराज सांगतात - आत्मा आनंदरूप आहे. खरा आनंद आपल्या आतच आहे. आत्मस्वरूप स्वतः आनंदरूप असतांना जीवाची बाहेर आनंद शोधायची धडपड चालली आहे. पूर्ण सुख आत आहे पण आपण ते सुख बाहेर शोधत आहोत. संसारामध्ये सुख नाही असं म्हणत नाहीत ते. परंतु ते सुख, तो आनंदसुद्धा आत्मानंद आहे असा सिद्धांत आहे वेदांचा.

सुखाचा अनुभव घेण्याच्या वेळेला मन हे स्थिर असावं लागतं. मनाची स्थिरता झाल्यावर तो आत्मानंद मनांत प्रतिबिंबित होतो. आपण समजतो आनंद बाहेरच्या साधनांनी मिळाला, धनाने मिळाला, कीर्तीने मिळाला. पण तो आनंद आतून आलेला असतो. आत्मा जो आनंदरुप आहे, त्याचं प्रतिबिंब आपण आपल्या स्थिर झालेल्या मनांत अनुभवलेलं असते. धन, मानसन्मान, कीर्ति अशा बाहेरच्या साधनांनी संसारामध्ये मिळणारा आनंद हा असा आहे. संसारात असा हा आनंद मिळतो. पण तो न टिकणारा आहे, विनाशी आहे.

म्हणजे संसारामध्ये असलेला कोणताही आनंद जो आहे, तो बाह्य सांसारीक प्रयत्नांनी असा मिळविता येतो. पण तो आनंद विनाशी आहे. हे जर मनाला पटलं असेल तर मन तिकडे जाणार नाही. दुसरा आत्मानंद हा अविनाशी आहे, कायमचा आहे. हे आनंदाचं पृथक्करण ज्याच्या मनाला करता येईल, त्याचं मन विनाशी आनंदाकडे जाणार नाही. हे मनाला पटलेलं असतं. परंतु हा संसार आता मला नको आहे अशी अवस्था एखाद्या महापुरुषालाच प्राप्त होते. हे खरं वैराग्य तात्काळ पक्क होऊ शकतं केवळ ईश्वराच्या कृपेनेच. पूर्वसुकृत असल्याशिवाय ह्या आनंदाच्या मार्गाकडे तो जाऊ शकत नाही.

आत्मानंद जो आहे, तोच पूर्णानंद आहे. तो आत्मानंदच केवळ अविनाशी आहे. हा सगळा जगामध्ये असलेला आनंद त्या मूळ अविनाशी आनंदाचा एक अंशरुप आहे. आत्मानंदापर्यंत पोहोचलेला जीवात्मा आनंदरुप होऊन जातो. त्याचा जीवभाव नाहीसा होतो. हे वेदांनी मार्गदर्शन केलेलं आहे. शेवटची भूमिका काय आहे हेही सांगितलेलं आहे. त्या भूमिकेपर्यंत जाण्याची सर्व साधनेही सांगितली आहेत.

*प्रश्न : महाराज, संसारात राहूनही हा आत्मानंद मिळवता येईल कां ?*
उत्तर : एकनाथ महाराजांनी संसारात राहूनच विवेक केला, वैराग्य पक्कं केलं. संसारात असतांनाच ते शेवटच्या भूमिकेपर्यंत पोचले. मनांत संसार नसला म्हणजे झालं. अनेक संतमहात्म्यांनी संसारात राहून हा आनंद मिळवला आहे. आजही असे महात्मे आहेत.

*प्रश्न : महाराज, सामान्य माणसाला एकनाथमहाराजांसारखे वैराग्य मिळवणं कसं काय शक्य होणार? प्रपंचात असलेल्या सामान्य माणसाने सुखी होण्यासाठी काय करावे ?*
उत्तर : केवळ इंद्रियसुखाच्या मागे लागले, कामक्रोधलोभ यांची कास सोडली नाही, इंद्रियांचेच लाड पुरवीत राहिले तर सुख मिळणे शक्य होणार नाही. ऐहिक भोगही तो सुखाने भोगू शकणार नाही. मनांतल्या इच्छा तृप्त करीत राहिलं तर विषयसुखही इच्छेप्रमाणे मिळत नाही, आणि आपला उद्धारही होत नाही.

काय करावे आणि काय करु नये हे शास्त्रकारांनी सांगितले आहे. जे करु नये असे शास्त्रे सांगतात ते करु नये. जे करावे असे शास्त्रे सांगतात, ते श्रद्धापूर्वक अंत:करणाने आचरण करून पूर्ण करावे. असे वागत राहिले म्हणजे रागद्वेष हे विकार कमी होत जातात. चित्ताची शुद्धी होत जाते.

शास्त्राप्रमाणे जो वागत रहातो त्याचेच कल्याण होते. त्यालाच प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतात. म्हणूनच ज्ञानेदव सांगतात-

पै अहितापासुनी काढिती । हित देऊनि वाढविती ।
नाही श्रुतिपरौती । माऊली जगा ॥

शास्त्रे सांगतात तसे वागावे म्हणजे प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतात. त्यातच आपले कल्याण आहे.

*प्रश्न : महाराज, जीवनांत आम्हाला सुखी होता यावे म्हणून आम्ही काय करावे असे शास्त्रे सांगतात ?*

उत्तर : आपल्याला दु:ख येऊ नयेत म्हणून दु:खाचे कारण काय व सुखाचे कारण काय हे समजून घ्यावे. ते शास्त्रांत दिलेले आहे. सुखाला पुण्यकर्म कारण असते आणि दु:खाला पापकर्म कारण असते असे शास्त्रकार सांगतात. ते ज्ञान संपादन करुन पुण्यकर्मे केली आणि जर पापकर्मे केली नाहीत तर उन्नती होते, चांगले सुख मिळते. वेद, उपनिषदे ही सगळी शास्त्रे तेच सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, श्रुतिप्रमाण मानावे असे शास्त्र सांगते. परंतु संस्कृतचा पुरेसा अभ्यास नसल्याने वेद, उपनिषदे, गीता मूळांतून वाचून, समजून घेणे शक्य होत नाही. शास्त्रग्रंथ वाचून काही समजून घ्यावे हे होत नाही. आम्ही काय करावे ?*

उत्तर : शंकराचार्यस्वामीमहाराज सांगतात-'वेदस्येश्वरप्रोक्तत्त्वात् यथार्थत्वे न संशयः । मुक्तस्येश्वररूपत्वात् तद्वागपि तादृशी ॥'

''परमेश्वरानेच वेद उत्पन्न केले आहेत तेव्हा वेदांच्या प्रामाण्याबद्दल यत्किंचितही शंका नाही. पण जे संतमहात्मे परमेश्वराशी एकरुप झालेले आहेत, जे मुक्त आहेत, त्यांचे वचनही कमी मानायचे कारण नाही. त्यांचे

वचन वेदांप्रमाणेच प्रमाण मानावे''- असे आचार्य सांगतात. परमेश्वरस्वरुप झालेल्या सत्पुरुषाचे वचन कदापिही वेदविरोधी असत नाही.

ज्ञानदेव ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात सांगतात- ''जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचें मंत्र । गुरुवाक्यावांचून शास्त्र । हातीं न शिवे ॥'' सद्‌गुरुंचे नाम हाच एकमेव मंत्र आहे या श्रद्धेने सद्‌गुरुंचे नाम घ्यायचे. सद्‌गुरुंनी जे काही सांगितले त्याचेच चिंतन करायचे. सद्‌गुरुंच्या वचनावाचून अन्य काही ज्याला माहितच नाही, असा भक्तही तरुन जातो असे ज्ञानदेव सांगताहेत.

जे शास्त्रे सांगतात तेच संतमहात्मेही सांगताहेत. वेदांतून जे सांगितले आहे, तेच संतमहात्म्यांनीही आपल्या ग्रंथांतून सांगितले आहे. ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज अशा संतांनीही ग्रंथ करुन ठेवले आहेत. ज्ञानेश्वरी आहे, एकनाथी भागवत आहे. त्यांत सगळं दिलेले आहे. ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग सगळं विवेचन त्यांत दिलेले आहे. त्याप्रमाणे वागण्यातच आमचे कल्याण आहे. सत्कर्मे करावीत, वाईट कर्मे करु नयेत म्हणजे सुख मिळते. सत्कर्मे करण्यातच आपले हित आहे असेच संतांचे सांगणे आहे.

*प्रश्न : सत्कर्मे हातून घडावीत म्हणून आम्ही काय करावे महाराज ?*

उत्तर : सत्कर्म हातून घडण्याकरीता ईश्वराची उपासना करायची.

*प्रश्न : महाराज, आम्ही सत्कर्मे कशी ठरवायची? अमुक एक कर्म हे सत्कर्म आहे हे ज्ञान आम्हाला कोठे आहे ?*

उत्तर : चांगली कर्मे कोणती हा निर्णय आपण आपल्या बुद्धीने करायचा नाही. आमच्या बुद्धीला काहीही चांगलं वाटलं तर ? अर्जुनाला युद्धातून जाऊन भिक्षा मागावी हेच चांगलं वाटलं होतं नां ? पण भगवंतांनी सांगितलं

तो अधर्म होईल. ही दया नाही. हा अहंकार आहे म्हणाले. बुद्धी शुद्ध झाल्याशिवाय चांगलं कर्म कोणतं आणि वाईट कर्म कोणतं हे बुद्धीला ठरवता येत नाही. सद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे सत्कर्मे हातून घडली पाहिजेत. चांगली कर्मे कोणती ते संत सांगताहेत, शास्त्रेही सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, केवळ सत्कर्मे करुन भागेल कां ?*

उत्तर : केवळ कर्म हे सिद्ध रहात नाही. ईश्वराला ते कर्म निवेदन करायचं, अर्पण करायचं, प्रार्थना करायची. कर्माबरोबर भक्ती, उपासनाही जरुरी आहे. ईश्वराच्या भक्तिशिवाय कर्मही व्यवस्थित होत नाही, पूर्ण होत नाही. म्हणून शास्त्रकारांनी कर्म आणि भक्ती यांचा समुच्चय सांगितला आहे. ईश्वराची आज्ञा म्हणून कर्म करतोय, या भावनेनं निष्काम कर्म केलं तर कर्मयोग हा स्वतः भक्तियोगच होतो.

*प्रश्न : महाराज, ज्ञानमार्गापेक्षा भक्तीचा मार्ग अधिक सोपा आहे असे सांगतात. भक्तीच्या मार्गाने, श्रद्धेनेच परमार्थ लौकर साधतो कां ?*

उत्तर : शास्त्रांचा सांगोपांग अभ्यास केल्याशिवाय ज्ञान होत नाही. कांही संदेह राहतातच. एखादे वाक्य वाचून काहीतरी कल्पना घ्यायची हे चूकच. शब्द वाचायचे तर खूप वाचावे लागेल. तेवढा वेळ व बुद्धी कोणाला आहे? सद्गुरुंवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागलं तर लौकर पुढे जाता येतं. ज्ञानाचा मार्ग फार अवघड आहे. ज्ञानमार्गावरुन साक्षात्कारापर्यंत जायला खूपच वेळ लागतो. श्रद्धेचा मार्ग त्यामानाने खूप सोपा आहे, लौकर फळ देणारा आहे.

*प्रश्न : महाराज, संशय हा मोठा दोष कां मानतात ?*

उत्तर : संशय हा मोठा दोष आहे. एखाद्यावेळी संशय आला तर तो फार मोठा दोष आहे असे म्हणता येणार नाही. परंतु संशय कायम राहिला तर तो

फार मोठा दोष आहे, संशयात्मा विनश्यती, असे म्हणतात. नुसती चिकित्सा करीत बसले, माझ्या बुद्धीला पटलं पाहिजे असे म्हणत बसले तर काहीच होणार नाही.

*प्रश्न : मनांतील सगळे संशय, संदेह हे आम्ही कसे घालवावे, महाराज ?*

उत्तर : सद्गुरु ही पूर्ण शक्ती आहे. या पूर्ण शक्तीची जी आज्ञा होईल त्याप्रमाणे वागायचे. ही भूमिका असली की मनांत कोणताच संदेह रहात नाही. सद्गुरुंची आज्ञा म्हणून धर्मांचरण करीत रहावं म्हणजे मनांत संशय येत नाहीत. सद्गुरुंवर पूर्ण श्रद्धा ठेवावी. श्रद्धा मार्गच सोपा व कमी वेळांत साक्षात्कारापर्यंत नेणारा मार्ग आहे असे संतमहात्मे सांगतात.

*प्रश्न : महाराज, मनांतील विकार जावे असे खूप वाटते. पण तसे होत नाही.*

उत्तर : ईश्वर भक्ती हेच एकंदर सर्व साधनात श्रेष्ठ साधन आहे असे संत महात्म्यांचे सांगणं आहे. मनामध्ये उत्पन्न होणारे अनेक विकार कसे घालवायचे या विचाराने निराशा उत्पन्न होते. केवळ आपण प्रयत्न करुन आपल्या मनाचा निग्रह करणं, मन निरहंकार बनविणं अशक्य आहे असं आपल्याला वाटतं. मनाचा निग्रह करण्यासाठी शास्त्राने साधने सांगितली आहेत. त्या शास्त्राचे सिद्धांत जाणणाऱ्या संत महात्म्यांना भगवंताने आता जगाचा उद्धार करण्याचा आदेश दिला आहे. ईश्वर भजन करून अनेक संतमहात्मे स्वतः उद्धरून गेले आहेत आणि लोकांना सन्मार्ग दाखवायचे काम करीत आहेत.

संतमहात्म्यांच्या ग्रंथाचे वाचन, चिंतन घडले म्हणजे चित्तावर परिणाम होऊन अध्यात्म मार्गामध्ये सहज प्रगती होऊ शकते. प्रपंचामध्ये राहून आपल्याला जमेल तितकी ईश्वर भक्ती करावी. शास्त्राने जे सांगितले आहे त्याप्रमाणे करावे. नामस्मरण, स्तोत्रपठन, संतांच्या ग्रंथाचे चिंतन. हे

सर्व फलाची विशेष आशा न धरता करायचं. ईश्वराची कृपा व्हावी म्हणून कर्तव्यबुद्धीने करायचे. म्हणजे ईश्वरकृपेने संतमहात्मे भेटतात, त्यांचे मार्गदर्शन मिळते आणि बुद्धीत सुधारणा होते. चित्तातले विकार हळूहळू कमी कमी होऊ लागतात. आपल्या मनाचे सतत परिक्षण करीत रहावे. किती विकार गेले, किती दोष गेले, किती राहिले. विकार जाण्याकरता नित्य तळमळीने ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे. ही तळमळ जेवढी उत्पन्न होईल, तितकी चित्तशुद्धी होते.

*प्रश्न : महाराज, प्रतिकूल परिस्थिती पाहून काही वेळा निराशा वाटते.*

उत्तर :निराश होऊ नका आपण. निराश होण्याचे कारण नाही. चालायचंच. प्रपंचामध्ये प्रतिकूल अनुकूल सगळं असतं. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा इथेच उपयोग करायचा. हाही काळ जातो. योगायोग असतात.

*प्रश्न : महाराज, जीवनांतील दुःखांचा विसर पडावा आणि जीवन आनंदाने भरलेले रहावे, म्हणून आम्ही काय करावे?*

उत्तर : रजोगुण व तमोगुण जास्त असले की सुखाचा अनुभव अल्प असतो. सात्विक माणसाला सुखाचा लाभ जास्त होतो. सत्वगुण जसा वाढत जातो तसे सुखही वाढत जाते.

आत्मा जसा सुखरुप आहे, तसा परमात्माही सुखरुप असतो. म्हणून भगवंताचे स्मरण सतत ठेवायचे. सर्व कर्मे त्यालाच अर्पण करायची. मनांत भगवंताचेच चिंतन ठेवायचे. नामस्मरण करीत रहायचे. भक्तीचा आनंद घेत रहायचे. भक्तीमुळेच जीवन आनंदाने भरुन जाते. सगळे संत तेच सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, आमच्या मनांत ईश्वराची खरी भक्ती निर्माण व्हावी म्हणून आम्ही काय करावे ?*

उत्तर : ईश्वराची खरी भक्ती ईश्वराजवळच मागावी लागते. आपल्या प्रयत्नांनी आपण भक्ती करु म्हटलं तर ते होत नाही.

*प्रश्न : महाराज, निर्मल भक्तीसुद्धा ईश्वराकड मागावी लागते कां ?*

उत्तर : निर्मल भक्ती म्हणजे शुद्ध प्रेम. भक्तीकरता भक्ती पाहिजे. अमुक पाहिजे, तमुक पाहिजे, अशा हेतूने ईश्वराची भक्ती केली तर ती भक्ती शुद्ध निर्मळ भक्ती नव्हे. ती व्यापारी भक्ती झाली. खरी भक्ती म्हणजे निष्काम भक्ती. निष्काम भक्त ईश्वरावर प्रेम करतो. पण ईश्वराकडे काहीही मागत नाही. अशी निर्मल भक्ती, अशी पूर्ण भक्ती ईश्वराच्या कृपेनेच मिळते.

*प्रश्न : महाराज, भक्ताने देवाकडे संसारातलं काही मागायचं नाही असं कां सांगतात ?*

उत्तर : भगवत्‌भक्त हे देवाकडे काहीही मागत नाहीत. भगवंताचे अखंड चिंतन करीत रहावे अशी त्यांची इच्छा असते. मनांतील वासना नाहीशा झालेल्या असतात. मग देवाकडे काही मागावं अशी इच्छा मनांत कशी निर्माण होणार? पण मागितल्याशिवाय भगवंत देतात हेही खरे आहे. परमेश्वरानं जे दिलं आहे, त्यांत समाधान मानूनच भगवद्‌भक्त राहतात. भगवंताने ठेवले आहे तसे राहतात. समाधानानं राहतात. अशाप्रकारचे अधिकारी महात्मे अनेक होऊन गेले, आजही आहेत.

*प्रश्न : महाराज, आम्हाला अशी ईश्वरभक्ती कशी साधेल ?*

उत्तर : गोपींसारखं अनन्य झालं पाहिजे. ईश्वरभक्तीशिवाय मनांत दुसरं काही नाही. बाहय़ विषयाकडे मन असेल, संसाराकडे मन असेल तर संसाराकरिता देवाकडे मागणी करावीशी वाटते. पण तुकाराममहाराज संसारासाठी काही मागत नाहीत. ''हेचि दान देगा देवा । तुझा विसर न

व्हावा।''असं जे तुकाराममहाराज मागतात ते त्यासाठीच. अन्य ठिकाणी मन नसलं तरच अशी भक्ती साधेल. गोपींचं प्रेम, भक्ती अशी आहे. म्हणून शुक्राचार्यमहाराजांसारखे विरक्त महात्मेही गोपींच्या भक्तीची प्रशंसा करतात.

*प्रश्न : महाराज, भक्ती अप्रतिहत रहावी लागते कां ?*

उत्तर : भक्ती अप्रतिहत व्हावी लागते. तेवढ्यापुरतं काही अनुकूल घडलं की ईश्वराबद्दल प्रेम वाटते. ते तात्पुरतंच असतं. खरी भक्ती अहेतूक असते आणि अप्रतिहत असते.

*प्रश्न : अप्रतिहत भक्ती कशी मिळते महाराज ?*

उत्तर : देवाने आपल्याला कधी सोडू नये हे सतत देवाजवळ मागणे मागायचे. देवाला आपले विस्मरण झाले नाही म्हणजे आपल्याला त्याचे स्मरण सतत रहाते.

*प्रश्न : महाराज, परमार्थात विवेकाचं एवढं महत्त्व कां सांगतात ?*

उत्तर : विवेक हे मोठे साधन आहे. प्रपंचातही विवेक पाहिजे आणि परमार्थात तर विवेक पाहिजेच पाहिजे. एखाद्याजवळ पैसा पुष्कळ असेल, सत्ता असेल, मानसन्मान असेल. पण जर विवेक नसेल तर त्याला स्वतःलाही शांती लाभत नाही आणि मग तो इतरांनाही शांती व समाधान देऊ शकत नाही.

पूर्ण विवेक ज्यांच्या मनांत आहे त्यांना योग्य काय आणि अयोग्य काय हे कळते. आपण आत्तापर्यंत काय मिळविले आणि पुढे काय मिळविले पाहिजे याचे ज्ञान होते. आपल्याला विवेक संपादन करता येतो, वाढवता

येतो आणि त्या विवेकाच्या बळावर परमार्थाची पुढची साधनं प्राप्त करुन घेता येतात.

*प्रश्न : महाराज, शास्त्रकार सांगतात की वासनाक्षय होण्यासाठी हेयोपादेय विवेक, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक, नित्यानित्यविवेक हे ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे. आम्ही हे ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावे ? त्यासाठी कोणते ग्रंथ वाचावे ?*

उत्तर : आत्मानात्मविवेक, नित्यानित्यविवेक, हेयोपादेय विवेक हे ज्ञान भक्तीनेही प्राप्त होते. ती भक्ती मात्र तशा योग्यतेची पाहिजे. तेवढी भक्ती असेल तर केवळ भक्तीनेही वासनाक्षय होतो. वासना वगैरे सर्व जातात आणि जीवन्मुक्त अवस्था प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, पारमार्थिक उन्नतीची इच्छा सगळ्यांना कां होत नाही ?*

उत्तर : भोगाची तृष्णा असते. अनेक वासना असतात. त्यामुळे ईश्वराची उपासना करावी अशी इच्छाच होत नाही. कोण आहोत आपण ? कुठून आलोत ? कुठं जायचंय ? अहम् कोण आहे ? इकडे काही लक्षच जात नाही. हजारो माणसांत एखाद्यालाच अशी इच्छा होते. ईश्वराच्या कृपेनं, सद्गुरुंच्या कृपेनंच अशी इच्छा होते. मला परमार्थ करायचाय असा निश्चय झाला की परमात्मा त्याला सहाय्य करतोच करतो.

*प्रश्न : महाराज, मुमुक्षा म्हणजे काय ?*

उत्तर : मुमुक्षा म्हणजे मोक्षाची इच्छा. मोक्ष म्हणजे दुःखाची पूर्ण निवृत्ती. सर्वही दुःख पूर्णपणे जाणे याला मोक्ष असे म्हणतात.

*प्रश्न : महाराज, जगांत दुःख तर कोणालाच नको असते ! मग मोक्षाची इच्छा सगळ्यांना कां होत नाही ? अध्यात्माकडे फार थोडे लोक वळतात.*

*असे कां होते?*

उत्तर : मनुष्य जन्मात आपण सारेजणच दुःखाचा अनुभव घेत असतो. शारीरिक दुःखं, मानसिक दुःखं अशा अनेक दुःखांचा आपण अनुभव घेत असतो. दुःखं घालावयाचा तात्पुरता प्रयत्न करतो आणि त्यामुळे दुःखं गेलं की दुःख संपलं असं समजतो. तसं समाधान मानणं म्हणजे दुःख निवृत्ती नाही. मोक्ष पदार्थ नीट समजला पाहिजे. मोक्ष म्हणजे पूर्ण सुख, ज्यामध्ये दुःखांचा संबंध नाही. सर्वही दुःखांची पूर्ण निवृत्ती म्हणजे मोक्ष. सर्व दुःख पूर्णपणे संपणं शक्य आहे हे आधी पटलं पाहिजे.

शास्त्रकारांनी सगळं मांडून ठेवलंय. मन कसे आहे, इंद्रिये कशी आहेत, मनोनिग्रह कसा करायचा. सगळ्याचं ज्ञान संपादन करुन अनुभव घेऊन त्यांनी मांडलं आहे. त्यावर आधी विश्वास बसला पाहिजे. तसं झालं तरंच शास्त्राने सांगिलेले उपाय आहेत त्याप्रमाणे आचरण घडते. फारच थोड्या लोकांना हे कळते. म्हणूनच मुमुक्षुत्व दुर्लभ आहे असं शास्त्रकार सांगतात.

*प्रश्न : महाराज, असा विश्वास आम्ही कसा मिळवायचा ?*

उत्तर : पुष्कळ प्रयत्न करुन ईश्वराच्या कृपेनं, सद्गुरुंच्या कृपेनं हा विश्वास मिळत असतो. महात्म्यांनी अनेक जन्म प्रयत्न करुन सद्गुरुंच्या कृपेनंच हा विश्वास मिळविलेला असतो.

*प्रश्न : म्हणजे महाराज, हा प्रयत्न अनेक जन्म चालू असतो कां ?*

उत्तर : आपले आयुष्य काही एवढेच नसते. अनेक जन्म त्या त्या जन्मात प्रयत्न चालू असतो. आधीच्या जन्मात केलेला प्रयत्न पुढच्या जन्मात पुढे सुरु होतो. आपल्याला मागचा किंवा पुढचा जन्म माहीत नसतो. पण तो सद्गुरुंना दिसत असतो. त्याप्रमाणे ते मार्गदर्शन करतात.

*प्रश्न : महाराज, देह गेला की सगळं गेलं असं पाश्चात्य सांगतात ?*

उत्तर : मृत्यु आला की सगळं गेलं असं नाही. देह आला म्हणजे आलं आणि देह गेला म्हणजे गेलं असं नसतं. हा काही अंधविश्वास नाही. शास्त्रकारांनी पूर्ण ज्ञान प्राप्त करुन घेऊन पूर्ण अनुभव घेऊन हे लिहून ठेवलंय.

*प्रश्न : चित्तातून संसार नाहीसा झाल्यामुळेच ज्ञानी महात्मे आनंदात असतात कां महाराज ?*

उत्तर : आत्मस्वरुप आनंदरुपच आहे. त्या आनंदाचा आस्वाद घेण्याकडे ज्या ज्ञानी महात्म्यांचे चित्त गेलेलं असेल, त्यांच्या चित्तातून संसार नाहीसा झाला आहे. संसाराचं स्मरणही नाही. चित्तातले सगळे संस्कार गेले आहेत. असे ज्ञानी महात्मे भगवंताचं जे आनंदस्वरुप आहे, त्या आनंदाचाच आस्वाद घेत रहाताहेत.

*प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांनीसुद्धा अनेक जन्म प्रयत्न केलेला असतो कां?*

उत्तर : महात्म्यांनीही अनेक जन्म पुष्कळ प्रयत्न करुन सद्गुरुंच्या कृपेनंच मिळवलेलं असतं. त्यांच आयुष्यही काही एवढंच नसतं. भगवान अर्जुनाला सांगतात, तुला जरी तुझा मागचा व पुढचा जन्म माहिती नसला तरी मला तो दिसतोय. अनेक जन्म प्रयत्न करूनच महात्म्यांनी पूर्ण आनंद मिळवलेला असतो.

*प्रश्न : महाराज, संतमहात्मे पूर्ण विवेक, पूर्ण आनंद दुसऱ्याला देऊ शकतात कां ?*

उत्तर : संतमहात्म्यांनी स्वतःही पूर्ण विवेक प्राप्त करून घेतलेला असतो आणि दुसऱ्यालाही तेवढे विवेकसंपन्न बनवू शकतात. या मार्गावर ते

आपल्याबरोबर दुसऱ्यांनाही घेऊन जाऊ शकतात. ''आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तयालागी।'' हे त्यांचे सामर्थ्य असते.

*प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांना दुसऱ्याच्या बुद्धीतले दोष दिसतात कां ?*

उत्तर : संतमहात्म्यांना दुसऱ्याची बुद्धी ओळखता येते. त्याच्या बुद्धीतले दोष ते बरोबर जाणू शकतात आणि ते दोष कसे दूर करावयाचे हेही ते बरोबर सांगू शकतात. आपल्यासमोर आलेला जीवात्मा कोणते कर्म घेऊन आलेला आहे, त्याचा भवरोग कसा घालवायचा याचे पूर्ण ज्ञान त्यांना असते. याची सुधारणा कधीच होणार नाही असं ते म्हणत नाहीत, म्हणूनच त्यांना संतमहात्मा म्हणायचे. आपली जशी योग्यता आहे तशी योग्यता दुसऱ्यात ते निर्माण करु शकतात, म्हणूनच त्यांना संतमहात्मा म्हणायचे.

*प्रश्न : महाराज, अशा संतमहात्म्यांना पुन्हा जन्म असतो कां ?*

उत्तर : असे संतमहात्मे शरीरापासून बाजूला होऊ शकतात. शरीराचा काही संबंध नाही. सगळी कर्म संपली. त्यामुळे पुन्हा शरीर धारण करायचं त्यांना कारण नाही.

*प्रश्न : महाराज, असे संतमहात्मे केव्हा भेटतात ?*

उत्तर : संतमहात्म्यांची भेट होणे फार कठीण असते. त्यांची संगती, कृपा प्राप्त होणे तर दुर्लभच असते. त्यांची भेट व्हायलाही देवाचा अनुग्रह पाहिजे. देवाचा अनुग्रह झाला तरच त्यांची भेट होते, संगती लाभते आणि त्यांची कृपा प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, हे संतमहात्मे आपणहून भेटतात कां ? की आम्हीच त्यांचा शोध घ्यायचा ?*

उत्तर : संतमहात्मे योग्य शिष्याचा स्वतः शोध करीत असतात. योग्य शिष्य

अधिकारी तसा कोणी भेटला तर ते आपणहून आपले ज्ञान त्याला देतात. त्यांच्याजवळ अहंकार नाही, काही नाही. योग्य शिष्याला ज्ञान मागावेही लागत नाही. गुरु ते आपणहून देतात. संतमहापुरुष शोधतच असतात की मुमुक्षु असा जगात कोण आहे. शुक्राचार्यमहाराज आपणहून परीक्षित राजाला भेटायला आणि भागवत सांगायला निघाले, हे परीक्षित राजाचे पुण्य.

संतमहात्मे शोध करतात की पुण्यशील जीवात्मा कोठे आहे. त्याचा त्यांना बरोबर शोध लागतो. त्याला मार्गदर्शन करुन त्याचा उद्धार करायचा आहे ही त्यांची सद्बुद्धी आहे. पुण्यशील जीवात्म्याचा महापुरुष आपणहून शोध घेत रहातात. तसा पुण्यशील जीवात्मा भेटला की ते त्याला धीर देतात, आश्वासन देऊन या सर्व दुःखांतून दूर करतात आणि मोक्ष मिळेपर्यंत ते त्याच्याबरोबर रहातात, त्याला मार्गदर्शन करीत रहातात.

*प्रश्न : महाराज, संतमहात्मे फक्त पुण्यशील जीवात्म्यांनाच मार्गदर्शन करतात कां? इतर कोणाला ते काही सांगतच नाहीत कां?*

उत्तर : संतमहात्मे इतर कोणाला काही सांगतच नाहीत असा याचा अर्थ नाही. ते सगळ्यांनाच सांगतात. पण ज्याच्या त्याच्या बुद्धीमध्ये जशी योग्यता असेल त्याप्रमाणे प्रत्येकाला मिळते. मार्गदर्शन करायचं संतमहात्म्यांचं काम सतत चालू असते. योग्य मार्गदर्शन करीत रहायचं. कोणी ऐकलं, कोणाला पटलं, त्याप्रमाणे त्याने वागायला सुरुवात केली तर त्यात त्याचेच कल्याण आहे. सांगणं एवढं आपलं काम आहे अशाच भूमिकेतून मार्गदर्शन करण्याचे काम चाललेले असते.

*प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांनी मार्गदर्शन केले तरी त्या मार्गदर्शनाप्रमाणे वागायची शक्ती आमच्याकडे कोठे आहे?*

उत्तर : निश्चयात्मक बुद्धीने वागणारा साधक असेल तर महात्मे त्याला मार्गदर्शनही करतात आणि त्याप्रमाणे वागायला जी शक्ती लागते ती शक्तीही देतात. हाच शक्तीपात. अशा महात्म्यांचा संकल्प झाला की साधकाचे कल्याण होते. अशा प्रकारचे महात्मे भेटणे, त्यांनी मार्गदर्शन करणे, त्यांनी साधकाचे कल्याण करायचे ठरवणे हे फार मोठं आहे. हीच खरी ईश्वराची कृपा आहे. ईश्वराचा हा खरा अनुग्रह आहे. नाहीतर असे मार्गदर्शक भेटतात की, मार्ग सांगून मोकळे व्हायचे आणि कुठेतरी निघून जायचे. ऐकणाऱ्यानेही ते नीट ऐकले, लक्षात ठेवले आणि त्याप्रमाणे केले तर केले. नाही तर नाही. याला काही देवाचा अनुग्रह म्हणता येणार नाही. देवाची कृपा झाली तर असे महात्मे मार्गदर्शक त्याची बुद्धी शुद्ध ठेवतात, आणि त्याला शक्ती देऊन त्याच्याकडून साधना करवून घेतात. अदृश्य रुपाने सर्व काही स्वतःच करवून घेतात.

*प्रश्न : महाराज, मनुष्यजन्म, मुमुक्षुत्व व संतमहात्मे संश्रय दुर्लभ आहेत असे शंकराचार्य स्वामीमहाराज कां सांगतात?*

उत्तर : मनुष्यजन्म, मुमुक्षुत्व व संतमहात्मे संश्रय दुर्लभ आहेत याचा अर्थ या तीन गोष्टी केवळ आपल्या प्रयत्नांनी मिळणाऱ्या नाहीत. देवाचा अनुग्रह असेल तरच या तीन गोष्टी प्राप्त होतात. आचार्यमहाराजांनी देवाचा अनुग्रह ही चौथी गोष्ट मुद्दाम दाखवलेली आहे. दुर्लभ तीनच आहेत. पण देवाच्या कृपेशिवाय त्या मिळतच नाहीत असे आचार्यमहाराज सांगतात. या तीन गोष्टी दुर्लभ आहेत याचा अर्थ असा की देवाचा अनुग्रह मिळाल्याशिवाय त्या तीन गोष्टी मिळत नाहीत. जर या तीन गोष्टी मिळाल्या तरच देवाचा खरा अनुग्रह आहे असे आचार्यमहाराजांना सांगायचे आहे.

*प्रश्न : महाराज, अशा संतांच्या नुसत्या दर्शनानेही लाभ होतो कां ?*

उत्तर : संतमहात्म्यांजवळ पूर्ण ज्ञान असते आणि पूर्ण आनंदही असतो. त्यांना नुसते पाहिले, त्यांच्या नुसते जवळ गेले तरी मनांतले विकार शांत होतात आणि आनंद उत्पन्न होतो. नुसते त्यांचे सान्निध्य मिळाले तरी दुःखे नाहीशी झाली आहेत असा अनुभव येतो. देवाची कृपा असेल तरच महात्मे भेटतात. नाहीतर भेटतच नाहीत. देवाची कृपा झाली तरच त्या महात्म्यांची सेवा घडते आणि त्यांची कृपा घडते.

*प्रश्न : महाराज, सर्व वासुदेवरुप आहे असा अनुभव संतांना सतत येत असतो कां ?*

उत्तर : ज्ञानी संतमहात्म्यांना ''वासुदेवः सर्वम् ।'' हे ज्ञान झालेले असते. त्याचा त्यांना सतत अनुभव येत असतो. म्हणून त्यांचे मन कुठेच गुंतत नाही. सर्वच वासुदेवरुप आहे. त्यामुळे हे अनुकूल किंवा हे प्रतिकूल ही बुद्धीच नाहीशी होते.

*प्रश्न : ईश्वराची कृपा झाल्याशिवाय असे संत ओळखता येत नाहीत असेच असते कां महाराज ?*

उत्तर : ईश्वराची कृपा झाल्याशिवाय असे संत ओळखता येत नाहीत. ते सांगतात तसे वागणे, त्यांची सेवा घडणे हे त्याच्या पुढचे आहे. 'अजून आयुष्य आहे, काय गडबड आहे? पुढे म्हातारपणी बघू' असे विचार मनांत येतात. ईश्वराची कृपा झाल्याशिवाय पारमार्थिक म्हणून उन्नतीचा मार्ग आहे हा शोध घेण्याचीही बुद्धी होत नाही. मग धर्माचरण, संतमहात्म्यांची सेवा हे घडणे दूरच रहाते. ईश्वराची कृपा झाली तरच संतमहात्मे भेटतात. ते भेटले तरी ईश्वराची कृपा झाली तरच ते ओळखता येतात.

*प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांचा प्रत्यक्ष वैयक्तिक उपदेश मिळाला तरच साधकाचा उद्धार होतो कां ?*

उत्तर : संतांच्या संगतीमध्ये काही प्रत्यक्ष वैयक्तिक उपदेश मिळालाच पाहिजे अशा आग्रहाची जरुरी नाही. प्रत्यक्ष वैयक्तिक उपदेश मिळाला तरच उद्धार होतो असे नाही. संतमहात्म्यांकडे जावं, दर्शन घ्यावं, बसावं. कोणाला ते काय सांगतात ते ऐकावं. "उपदेश ते न देती। तरी ऐकाव्या तयांच्या गोष्टी ॥" असे म्हणतात. ज्याच्या मनांत पूर्ण भक्ती आहे अशा साधकाला कुठूनही मार्गदर्शन मिळू शकतं आणि त्याचा उद्धार होऊ शकतो. अवधूत सांगतात,'पंचमहाभूतांपासून मला कळलं.' अंतःकरण शुद्ध झालं असलं की ते मिळतं.

*प्रश्न : महाराज, अंतःकरण शुद्ध झाले असे केव्हा म्हणता येईल ?*

उत्तर : अंतःकरण शुद्ध झाले म्हणजे मनाला काही संकल्पही करावेसे वाटत नाहीत आणि काहीही घडले तरी मनांत काही विकल्पही येत नाहीत. संकल्पाचीही ओढ वाटत नाही आणि विकल्पाचीही ओढ रहात नाही. रजोगुण व तमोगुण असे कांही मनांत रहात नाही. सतत आत्मचिंतनातच मन रमलेले रहाते. काही वाईट झाले किंवा काही चांगले झाले तरी मनाची चलबिचल होत नाही. आत्मस्वरुपाची गोडी लागते. मग आत्मस्वरुपाशिवाय कशातच रस वाटत नाही.

*प्रश्न : अशा ज्ञानी महात्म्यांना त्यांच्या हातून होणाऱ्या कर्मांचा संबंध पोचतो कां ?*

उत्तर : ज्ञानी महात्म्यांच्या अंतःकरणांत पूर्ण निवृत्ती असते. त्यामुळे त्यांच्याकडून घडणाऱ्या क्रियमाण कर्मांचा संबंध त्यांना पोचत नाही. पूर्वी होऊन गेलेल्या कर्मांचा तर ज्ञानामुळे नाश झालेलाच असतो. त्यांनी जे

ज्ञानरुपी तप केलं आहे त्यामुळे त्यांचे पूर्वीचे दोष गेलेले असतात. नंतर ते प्रपंचात असले तरीही अंतःकरणांत पूर्ण निवृत्ती असते. त्यामुळे त्यांच्या हातून जी कर्मे घडत असतात त्यांचा दोष त्यांना लागत नाही.

*प्रश्न : महाराज, इतर लोक ज्ञानी महात्म्यांचा जेव्हा अपमान करतात, तेव्हा त्या ज्ञानी महात्म्यांच्या मनांत कोणते विचार येतात ?*

उत्तर : ज्ञानी महात्म्यांच्या मनांत भगवंताचे चिंतन सदैव चालू असते. शरीराने, वाणीने, मनाने होणारी सर्व कार्ये भगवंताचे स्मरण करुनच ते करीत असतात. मानापमानाकडे त्यांचे लक्षच नसते. मान होवो, अपमान होवो. त्यांच्या मनांत कोणतेच विकार उत्पन्न होत नाहीत. स्वतःच्या शरीराकडेही त्यांचे लक्ष नसते. मग शरीराला उद्देशून जे अपशब्द इतरांनी वापरले त्या अपशब्दांकडे कुठले लक्ष असणार ?

कोणी अपमान करणारे शब्द वापरले किंवा लागेल असे बोलले की ज्ञानी महात्म्याच्या मनांत विचार येतात. हे तर माझे शेवटचे शरीर आहे. जगाचा आणि माझा संबंध आता संपणार आहे. तो मनुष्य अपशब्द वापरतो आहे, निंदा करतो आहे. बोलेना बिचारा ! या देहाला उद्देशून तो बोलतो आहे! पण अविद्येने तयार झालेलं हे शरीर खरं नाहीच आहे! ते खोटे आहे. ते शरीर म्हणजे मी आहे असं कां समजायचं? या शरीराला उद्देशून कोणी काही बोललं तर मला काही वाटायचं काय कारण आहे? मी कोण आहे हे मला कळलं आहे. मी देह नाही. मी आत्मा आहे. मग या आत्म्याला तुम्ही काय बोलणार ? काय शिक्षा करणार ? आत्मा हा कर्ता नाही आणि भोक्ताही नाही. कर्तृत्व, भोक्तृत्व असं आत्म्याला काही नाहीच. शरीराच्या कोणत्याच क्रियेचा आत्म्याशी संबंध नाही. मग कोणी अपमान केला, कोणी दुःख दिलं असं काही मनांत यायचं कारणच नाही !

ज्ञानी महात्म्याला टाकून काही कोणी बोलले तरी त्या महात्म्याच्या मनांत कोणताही विकल्प मनांत येत नाही. अंतःकरणांत फक्त दया आहे. अपमान करणाऱ्याबद्दलही दया आहे. दुःख देणाऱ्याबद्दलही दयाच आहे. अशा ज्ञानी पुरुषाच्या दर्शनानेही समोरच्या माणसाला शांती मिळते. त्याच्या सहवासांत इतरांचं अंतःकरण शुद्ध होते. पूर्ण जलाने भरलेला समुद्र जसा गंभीर आहे तसा तो ज्ञानी महात्मा आहे. त्याने कोणाला काही उपदेश केला आणि त्यामुळे त्याचा उद्धार झाला तरीही त्या ज्ञानी महात्म्याचे तिकडे लक्ष नाही. उपदेश ऐकणाऱ्याचा जो उद्धार झाला तो त्याच्या प्रारब्धामुळे झाला. माझं काय त्यांत असं ज्ञानी महात्माला वाटतं.

''हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाचि स्थिर । किंबहुना चराचर आपण जाहला ।'' अशी या ज्ञानी महात्म्यांची स्थिती आहे. मान ठेवणारेही माझे आहेत. अपमान करणारेही माझे आहेत. निंदा करणारेही माझेच आहेत. सगळेच माझे आहेत. त्यांची ही ममता हा गुण आहे. आमची ममता हा दोष आहे. कारण आमची ममता म्हणजे हे घर माझं आहे, ही मंडळी माझी आहेत एवढीच आमची ममता आहे. सगळंच माझं आहे अशी ममता झालेली असते ज्ञानी महात्म्यांची. भगवद्भक्तीनेच अशी अवस्था प्राप्त होऊ शकते.

*प्रश्न : महाराज, अंते नारायणः स्मृती । असे कां सांगतात ?*

उत्तर : मनुष्य जन्म मिळाल्याचा खरा लाभ कोणता आहे ? तर अंते नारायणः स्मृतीः । अंतकाली नारायणाचे स्मरण व्हावे. म्हणजे जन्म सफल झाला, सार्थक झाला असं समजावं. अंतकाली नारायणाचे स्मरण व्हायचे म्हणजे आरंभापासून अभ्यास पाहिजे. प्रल्हादजींनी लहानपणापासूनच

भगवद्भक्ती करायला आरंभ केला. नारदासारखे सद्गुरू त्यांना भेटले. त्यांनी आपल्या सर्व मित्रांनाही - भगवद्भक्ती करायला सांगितले.

भगवदभक्ती लहानपणापासून केली म्हणजे आपल्या आयुष्याचा शेवटचा काळ सार्थकी लागतो. याच साठी केला होता अट्टाहास । शेवटचा दीस गोड व्हावा ।। मृत्यु समीप आलेला आहे. सगळं इथंच सोडून जायचं आहे. त्यात अर्धा सेकंदही जास्त मिळायचा नाही. ठरलेल्या घटकेला जावं लागतं. त्या शेवटच्या क्षणी ईश्वराचं स्मरण झालं पाहिजे असं संत महात्म्यांचं सांगणं आहे.

*प्रश्न : महाराज, भगवंत सुहृद आहेत म्हणजे भगवंत सर्वांचे मित्र आहेत असा अर्थ घ्यायचा कां ?*

उत्तर : अर्जुनाला उपदेश करतांना भगवंत म्हणतात, सर्व भूतांचा मी सुहृद आहे. भक्तीशास्त्र हे यामुळे प्रवृत्त झाले आहे. भगवंतांची भक्ती, प्रेम यामुळे वाढतं आहे. आचार्यमहाराजांनी सुहृद शब्दाची व्याख्या केली आहे, "सुहृद म्हणजे प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारीणम् ।" भगवान श्रीहरींचं अंतःकरण केवढं मोठं आहे ! भक्तांनी माझी पूजा केली की नाही, मला विचारलं की नाही असं भगवंताच्या मनांत काही नाही. माझ्याकरता काहीही करायला नको. मी त्याच्यावर (भक्तावर) उपकार केला म्हणून त्याने माझ्याकरता अमूक करायला पाहिजे अशी काहीही अपेक्षा नाही. तो सुहृद होऊ शकतो. सुहृद शब्दाचा अर्थ वेगळा आहे. मित्र शब्दाचा अर्थ वेगळा आहे. प्रत्येक शब्दाचे इतके व्यवस्थितरितीने अर्थ सांगणारे शब्दशास्त्र जगातल्या इतर कोणत्याच भाषेत नाही. त्यामुळे या भाषेवरुन आपल्याला किती तरी अर्थबोध होतो. चित्तावर परिणाम होतो.

*प्रश्न : महाराज, संसार सोडून देऊन वनांत जाऊन राहिलं तर परमार्थ लौकर नाही कां साधणार ?*

उत्तर : वनामध्ये जाऊन शांत राहू, सुखी राहू असं वाटतं आपल्याला. पण वनामध्ये गेलं तरी मनामधले विकार सगळे बरोबरच असतात. हे सगळे शत्रू बरोबरच घेऊन जातो आपण. तिथं तरी ते शत्रू काय करतील याचा नेम नाही. म्हणून कर्मयोगाचा विशेष पुरस्कार प्राचीन शास्त्रकारांनी केलेला आहे. कर्मयोगाकडे लक्ष द्या, भक्तीमार्गांने चाला असा संतांचा उपदेश आहे. ज्यांची बुद्धी निसर्गतःच निवृत्ती मार्गकडे गेलेली आहे, ज्यांना कर्मत्याग करुन राहाता येणं शक्य आहे, असे ज्ञानी महात्मे निवृत्तीमार्गाने गेल्याचीही काही उदाहरणे आहेत. परंतु जास्तीत जास्त लोकांनी प्रवृत्ती मार्गाकडे जावं असं सृष्टीकर्त्याचं - ब्रह्मदेवाचं सांगणं आहे. त्या कर्मयोगाचं आचरण करा आणि ईश्वराचं आस्तिक्य मान्य करा असाच सगळ्या संतांचा उपदेश आहे.

किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥

हे सोडू नये कोणी. सगळी सुखं लोकांना मिळू देत म्हणाले. पण त्या ईश्वराचं भजन त्यांनी सोडू नये असं ज्ञानेश्वरमहाराजांनी मागणं मागितलं आहे.

*प्रश्न : महाराज, जगांत सज्जन लोकांना फार त्रास सहन करावा लागतो. दुर्जन लोक सज्जन माणसांचा अपमान करतात, त्याना त्रास देतात असं खूप वेळा आढळतं. ज्ञानेश्वरमहाराज, तुकाराममहाराज अशा संतांचाही खूप छळ झाला. इतका छळ होऊन संतमहात्मे शांत कसे राहू शकले ?*

उत्तर : बाहेरच्या जगाकडे लक्ष न देता आत्मचिंतनात मग्न रहाता येतं. आत्मचिंतनांत मग्न असलेल्या अनेक संतमहात्म्यांना दुर्जनांनी त्रास दिलेला आहे. अपमान केलेला आहे. अगदी बांधून ठेवलेलं आहे. काठीनं मारलेलंदेखील आहे. पण धैर्याने आणि विवेकाने सोसत राहीले आहेत. कारण त्यांना माहिती आहे की, जी जी सगळी दुःखे पुढे येतात ते आपलं दैव आहे. लोकांनी कितीही त्रास दिला तरी मनांत भगवंताचेच विचार आहेत. त्यामुळे बाहेरच्या त्रासाकडे लक्षच नाही. हे मला त्रास देताहेत ? लोक? काय कारण आहे? हे मला त्रास देणारे नाहीत. खरा त्रास कोणापासून होतो? देवतांपासून त्रास होत नाही. ग्रहांच्यापासून त्रास होत नाही, कर्मांपासून त्रास होत नाही. सगळे कार्यकारणभाव काढून टाकता येतात. हे मनच फक्त त्रास देणारं आहे. हर्षाविषाद या मनामुळे उत्पन्न होतात. त्याला निमित्त झालेले शत्रूमित्र ठरतात ते केवळ मनामुळेच. संसारचक्र हे सगळं मन चालवत आहे. मनामध्ये वासना उत्पन्न होतात आणि चांगलं-वाईट कर्म घडतं. त्याप्रमाणे जन्माला जावं लागतं. आत्मस्वरुपाला काही कर्माचा संबंधच नाही. ते मनामध्ये येतच नाही. आत्मा निष्क्रीय आहे. दान, स्वर्धमाचरण, यमनियमांचं आचरण ही सगळी साधनं मनोनिग्रह करण्याकरता सांगितली आहेत. मनाला ज्यानं जिंकलेलं आहे, त्याला काहीच सुख, दुःख नाही. तो तरुन गेलेला आहे.

लोकांनी दुःख दिलं हा पक्ष मानला तरी कोणाला दुःख दिलं ? कोणाचा अपमान केला ? देहाला मारलेलं आहे. देह म्हणजे मी आहे असं ठरवणारं मन आहे. ज्यावेळेला विवेक होतो मनामध्ये, त्यावेळेला आपल्याला कळून येतं की आत्मा वेगळा आहे आणि देह वेगळा आहे. मी देह नाही, मी आत्मा आहे. मग आत्म्याला कुठे मारलं ? आत्म्याचा कुठे अपमान झाला ? काही संबंध नाही. अंर्तनिरीक्षण करावं अधिकाधिक.

आत्मस्वरुपाला सुख नाही, दुःख नाही, कर्म नाही, काही नाही, पाप नाही, पुण्य नाही.

हा विवेक इतका ज्याच्या मनांत जागृत झालेला आहे तो सुखदुःखाच्या पलिकडे जातो. या विवेकसंपन्न बुद्धीनं सर्व सुखदुःखापासून तो मोकळा झालेला आहे. कोणीही सुखदुःख देणारा नाही. आपलाच भ्रम आहे. संसार हा अविवेकाने, अज्ञानाने झालेला आहे. म्हणून या मनाचा निग्रह ज्याला साध्य झालेला आहे आणि मन भगवंताच्या ठिकाणी ज्याला स्थिर करता आलेलं आहे, तो मुक्त झालेला आहे.

*प्रश्न : महाराज, प्रपंचात राहूनही आम्ही आमचं मन कसं बनवावं म्हणजे साधेल ?*

उत्तर : आपल्याला कुठे जायचंय ? भगवंताकडे जायचंय. भगवंताची भक्ती भीष्माचार्यांच्या अंतःकरणात केवढी होती ! प्रपंचात राहूनही मन कसं बनवावं ह्याचा आपल्यासमोर एक आदर्श ठेवला आहे त्यांनी. ब्रह्मचर्याचे पालन केले. राज्याची आसक्ती सोडून दिली. पुन्हा वासना मनामध्ये नाही. एकदा निश्चय झाल्यावर पुन्हा तिकडे प्रवृत्ती नाही. वैराग्य उत्पन्न होण्याकरता किती तरी अभ्यास करावा लागतो. दोषदृष्टी विषयांबद्दल निर्माण झाली पाहिजे. प्रत्येक ठिकाणी दोष आहे तो, पक्का समजला म्हणजे त्याचा त्याग होतो. वैराग्य नंतर येते.

वैराग्य ही मनामध्ये असणारी विरक्त वृत्ती आहे. भीष्माचार्य कुठे प्रपंच सोडून गेले ? प्रपंचातच राहिले. संपूर्ण विषय त्यांच्यासमोर आहेत. सगळे शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध सगळे समोर आहेत. पण त्यांचा भीष्माचार्यांच्या चित्तावर काहीही प्रभाव पडू शकला नाही. त्यांची तटस्थ

वृत्ती आहे. कर्तव्यदक्षता आहे. हा इतका मनोनिग्रह त्यांनी केलेला आहे. केवळ ज्ञान प्राप्त झाले म्हणजे हा मनोनिग्रह करता येत नाही.

ज्ञान झाल्यावरसुद्धा तत्वज्ञान, मनोनाश, वासनाक्षय या तिघांचा अभ्यास त्याला पुढे चालूच ठेवावा लागतो. भीष्माचार्य प्रपंचामध्ये होते. आणि असं असूनसुद्धा त्यांच्या मनामध्ये काहीही वासना नाहीयेत. राज्याची आसक्ती नाही. कनक आणि कांता हे दोन्हीही त्यांनी मनातून काढून टाकलेले आहेत. ही केवढी योग्यता त्यांनी मिळवली !

*प्रश्न : महाराज, अनेकजण सांगतात की आध्यात्मिक प्रग तीसाठी ब्रह्मचर्य आवश्यक आहे. आम्ही गृहस्थाश्रमी व्यक्तींनी काय करावे?*

उत्तर : ''यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।'' सुखाचे दोन वर्ग सांगितले आहेत. एक कामसुख म्हणजे इच्छेची पूर्ती झाल्यामुळे मिळणारे सुख. दुसरे ब्रह्मसुख किंवा मुक्तीसुख. सांसारिक आसक्ती कामरुप धारण करते. पण हाच काम ईश्वरासंबंधात केला तर तो काम धर्मरुप होतो. गीतेमध्ये भगवंत सांगतात. 'धर्मोविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।'

धर्मविरुद्ध नसलेला काम म्हणजे भोगेच्छा मी आहे असे भगवंत सांगत आहेत. विषयवासनेचा एकदम त्याग करणे अशक्य आहे याची शास्त्रकारांना जाणीव आहे. म्हणून त्यांनी तसे करायला सांगितलेले नाही. विषयवासनेची पूर्ती कोणत्या मार्गाने करावी, याबाबतीत शास्त्रांनी नियम घालून दिले आहेत. त्या नियमानुसार विषयसुख घेतले तर ते ब्रह्मचर्यपालनच आहे असे शास्त्र सांगते. ते धर्माचरणच ठरते. तसे वागणारे पुरुष संसारसुख भोगत असतांनाच मोक्ष मिळवू शकतात. म्हणूनच ''धर्मविरुद्ध नसलेला काम म्हणजे मी आहे''असे भगवंतांनी गीतेत

सांगितले आहे. अनेक ऋषीमुनी संतमहात्मे गृहस्थाश्रमीच होते. संसारांत राहून शास्त्रनियमानुसार त्यांनी संसारसुख घेतले आणि मोक्ष मिळवला.

*प्रश्न : महाराज, "धर्मविरुद्ध नसलेला काम" म्हणजे काय ते सांगावे अशी प्रार्थना आहे ?*

उत्तर : स्वैर विषयसुख भोगाकरिता धर्म निर्माण झालेला नाही. स्वैर विषयवासनेला आळा बसून जीवाला मोक्ष प्राप्त व्हावा या उद्देशाने धर्म निर्माण झाला आहे. 'ऋतौ भार्यामुपेयात्' असा नियम शास्त्रकारांनी घालून दिला आहे. "ऋतौ एव, भार्यामेव," असा नियमविधी शास्त्रसंमत मानला गेला आहे. विषयसुखाची इच्छा स्वतंत्र न ठेवता केवळ भगवंताची आज्ञा म्हणून शास्त्रनियम पाहून विषयसेवन करावे. मग ते विषयसेवन मोक्ष प्राप्ती करुन देते असे शास्त्रकार सांगतात. धर्माप्रमाणे वागले की पतीपत्नीसंबंध वासनामय रहात नाही तर तो ब्रह्ममय होतो, मोक्षापर्यंत नेतो असेच संतमहात्मेही सांगतात.

*प्रश्न : महाराज, अनेक संतमहात्मे कामसुख खोटे आहे, त्याज्य आहे असे सांगतात. ते तसे कां सांगतात?*

उत्तर : काम हा केवळ भोगाकरिताच असेल तर त्याने पूर्ण शांती होणे कधीच शक्य नाही असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. संतमहात्म्यांचा तोच अनुभव आहे. तहान लागली असता पाणी पिणे, भूक लागली असता भोजन करणे, ही साधने स्वतः सुख देणारी नाहीत. ती साधने औषधासारखी रोग दूर करणारी आहेत. पण लोक त्यांनाच सुख मानतात ही लोकांची भ्रांति आहे असे वैराग्यशतकांत सांगितले आहे. औषधाने रोगाची शांती होते. पण रोगाचे मूळ नाहीसे होत नाही. काम म्हणजे सूक्ष्म

आंतरिक वृत्ती आहे. श्रवण, कीर्तन, मनन अशी भक्ती करीत राहिले म्हणजे कामवृत्तीची पूर्ण शांती होते असे भागवतकार सांगतात.

सांसारिक जीवनांत कामावर विजय मिळवणे हाच पुरुषार्थ आहे. काम नष्ट करणे हा पुरुषार्थ नाही. भगवद्भक्तीने कामावर विजय मिळवता येतो हेच भगवान श्रीकृष्णांनी रासलीला करुन दाखवले आहे. हेच रासलीलेचे रहस्य आहे. कामसुखाचा आरंभ स्त्रीसहवासापासून होतो आणि त्याचा शेवट भगवंतांच्या सहवासांत होतो. तेच कामसुख भगवंतांच्या सहवासात दिव्य महासुख बनते असे भागवतकार सांगतात.

ब्रह्मसूत्रांवर भाष्य करतांना शंकराचार्य स्वामीमहाराजांनीही सामान्य माणसाला गृहस्थाश्रम उपकारक आहे असे सांगितले आहे आणि गृहस्थाश्रम सार्थ ठरेल असे जीवन जगता येते हे सूचित केले आहे.

*प्रश्न : महाराज, गृहस्थाश्रमांत असतांना आम्ही कसे वागावे म्हणजे जीवन सार्थ ठरेल हे सांगावे अशी प्रार्थना आहे?*

उत्तर : धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ शास्त्रकारांनी सांगितले आहेत. काम हा एक पुरुषार्थ आहे असेच शास्त्रकार सांगतात. परंतु केवळ सांसारीक सुखांतच आसक्त राहिले की जीवनांत दुःखेच भोगावी लागतात. मोक्ष म्हणजे सर्व दुःखांची निवृत्ती. संसारात राहूनही मोक्ष मिळवता येतो. म्हणून हा पुरुषार्थ जास्त महत्वाचा आहे. संसारांतच राहून मोक्ष कसा मिळवावा याचे शास्त्रकारांनी विस्तृत विवेचन केले आहे.

स्थूल विषयांशी इंद्रियांचा संयोग झाला की सांसारीक सुख मिळते हा आपला अनुभव आहे. पण विवेकाने कळते की विषय विनाशी आहेत. म्हणून विषयांच्या संयोगाने जे सुख मिळते ते सुखही विनाशी आहे. तात्कालीक आहे, क्षणापुरते आहे, नाहीसे होणारे आहे. केवळ सांसारीक

सुखांतच आसक्त झाले तर जीवन दुःखपर्यवसायी होते. एकदम विषयसेवनाचा त्याग करणे शक्य नाही. म्हणून शास्त्रकार सांगतात. संसारात मिळणारी सुखे घ्यावीत. परंतु त्या सुखातील आसक्ती कमी कमी करण्याचा अभ्यास करावा आणि उपासना साधना वाढवीत जावे. मोक्षसुख प्रयत्नांनी मिळवता येते. मोक्षसुख साधणे आणि शेवटी परमात्म्यांमध्ये लीन होणे हेच हितकारी आहे असे शास्त्रकार सांगतात.

*प्रश्न : महाराज, सामान्य मनुष्य प्रपंचात अडकलेला असतो. जवळ फारसा पैसा नसतो. पण साधना करायची इच्छा असते. त्याने काय करायचे ? त्याने सुखांतील आसक्ती कमी कशी करायची ?*

उत्तर : ईश्वरचिंतन चित्तांत सतत बाळगत राहिले म्हणजे सुखातील आसक्ती कमी कमी होत जाते. ईश्वराविषयीचा विचार अंतःकरणांत सतत बाळगला पाहिजे. हेच खरे तप आहे. ईश्वरचिंतन असे सतत व्हावे यासाठी संसार सोडून कोठे रानावनांत जावे लागत नाही. संसारांत राहूनही ते करता येते. चित्तात जे ईश्वरचिंतन करायचं त्याला ज्ञानदेव शारीरीक अनुष्ठान, वाणीचे अनुष्ठान आणि मानसिक अनुष्ठान यांची जोड द्यायला सांगतात आणि त्याप्रमाणे शारीरीक तप, वाणीचे तप व मानसिक तप असे तपाचे तीन प्रकार सांगतात. प्रपंचात राहून ते करता येतात.

शारीरीक तप म्हणजे देवदर्शनाला देवळांत जाणं, तीर्थयात्रेला जाणं. आपल्याला प्रिय असलेल्या देवतेच्या मंदिरात दर्शनाला जात रहायचा छंद लावून घ्यावा. घराचे आंगण हे देवाचेच आंगण आहे असे मानून आंगण स्वच्छ करायचे, सडासंमार्जन करायचा, माळा लावून ते सुशोभित करायचे. त्यासाठीच ईश्वराने आपल्याला हात दिले आहेत असे समजायचे. मंदिरातल्या, घरातल्या देवमूर्तींची मनापासून पूजा करायची. आपल्या प्रिय

देवतेची मूर्ती कोठेही दिसली की लवून नमस्कार करायचा. कोणी गुणवान, ज्ञानी, ब्राह्मण भेटले की त्यांचा आदर करायचा, विनयाने त्यांची सेवा करायची. कोणी अडचणीत असेल, रोगाने पीडित असेल, संकटात सापडल्याने खिन्न असेल तर ईश्वराची सेवा करतो आहे अशा भावनेने त्यांना मदत करायची. त्यांना सुखी करायचा प्रयत्न करायचा. हीही ईश्वराची मनोभावे केलेली पूजाच आहे. आईवडीलांची श्रद्धेने सेवा करणे हेही शारीरीक तपच आहे. सद्गुरुंच्या सेवेबद्दलही सांगतात. सद्गुरुंची भेट झाली म्हणजे आत्मज्ञान प्राप्त होते. संसारांतील दारुण दुःखही नाहीसे होते. अहिंसाही सांगतात. सर्व जड आणि चेतन वस्तूंमध्ये जीव आहे याची जाणीव ठेवायची आणि कोणालाही दुःख द्यायचे नाही. अगदी गवताच्या पात्यालाही हिसका द्यायचा नाही. विनाकारण झाडाची पानेही तोडू नये. कोणालाही इजा पोचेल असे काही शरीराकडून घडू नये. ही सगळी कर्मे देहाच्या आधाराने करायची आहेत. मनांतील ईश्वरचिंतनाला पोषक ठरतील अशीच ती आहेत. हेच शारीरीक तप आहे. यामुळे शरीराबद्दलची आसक्ती कमी होते व चित्तांतील ईश्वरचिंतन सखोल होत जाते.

वाणीचे तप कोणते ? कोणाच्याही मनाला उद्वेग वाटणार नाही असे बोलायला शिकायचं. वाणीचा निग्रह करायचा, वाणी सौम्य ठेवायची. सत्य बोलायचे. पण ते प्रिय वाटेल असेच बोलायचे. आणि हितकारकही सांगता आले पाहिजे. हेच वाणीचे तप. कोणी विचारलेच तर असे बोलायचं. नाहीतर नामस्मरण करीत बसायचं. स्तोत्रे म्हणत बसायचं. अविचाराने कधीही बोलायचं नाही. हे वाणीचे तप संसारांत राहूनही करता येते.

मानसिक तप म्हणजे मन सदैव प्रसन्न ठेवायचे. चांगलं नाही, वाईटही नाही, फारसं बोलायचंच नाही. मौनवृत्तीच ठेवायची. भोवती काहीही

घडलं तरी मनाची स्थिरता राखायची. मनाची चलबिचल होऊ द्यायची नाही. मन शांत ठेवायचं. संसारसुखाची इच्छा झाली तर ते देवाजवळच मागायचं म्हणजे त्यांतून सुटका कशी करायची ही जबाबदारीही देवावरच पडते आणि मनांतील इच्छा, संकल्प विकल्प सगळं कमी होत जातात. मनांतील इच्छा जशा कमी होतात तशी विषयाची ओढही कमी होते. मनाची अस्वस्थता कमी होत जाते. अशी ईश्वरचिंतनासाठी शुद्ध भूमिका तयार होत जाते.

हे सगळे करायचे. पण फळाची आशा मनांत ठेवायची नाही. पूर्ण श्रद्धेने करायचे. पूर्ण आस्तिक्यबुद्धीनेच करायचे. मोठेपणा मिळावा, मान मिळावा, लोकांनी स्तुती करावी म्हणून करायचे नाही. नाहीतर त्यांत स्थिरता रहाणार नाही. ते आचरण टिकणार नाही.

शरीर हा आपला शत्रू आहे असे समजून शरीराला पीडा देणे, पंचाग्नीच्या ज्वाळा लावणं, डोक्यावर गुग्गुळ जाळणे, पाठीला गळ लावणं, खाली डोकं वर पाय असं काही करणं, थंडीच्या दिवसांत आकंठ पाण्यात बुडून बसणं हे असलं आपल्याला त्रास करुन घेऊन काही करणं याला ज्ञानदेव तप म्हणत नाहीतं. या असल्या गोष्टींनी काही साधत नाही. मनांतील ईश्वरचिंतन प्रगाढ होत गेलं पाहिजे, मनांतील विषयसुखाच्या इच्छा कमी कमी होत गेल्या पाहिजेत. ईश्वराच्या जवळ आपण जातो आहोत असं झालं पाहिजे.

*प्रश्न : महाराज, हेयोपादेय विवेक म्हणजे काय ?*

उत्तर : काय घ्यावं, आणि काय सोडावं हेच आमच्या बुद्धीला समजत नाही. आता वाटतं हे घ्यावं. पुढे वाटतं हे घेतलं नसतं तर बरं झालं असतं. टाकलं असतं तर बरं झालं असतं. अगोदर बुद्धी स्थिर होत नाही. बुद्धी

स्थिर व्हायला पाहिजे, कोणाचा गुण आहे आणि कोणाचा दुर्गुण आहे, दोष कसा सोडायचा, गुण कसा समजून घ्यायचा हे समजून घेतलं पाहिजे. यालाच हेयोपादेय विवेक म्हणतात.

*प्रश्न : महाराज, हा हेयोपादेय विवेक आम्हाला कसा प्राप्त करुन घेता येईल?*

उत्तर : हे मागणे देवाकडेच मागावे लागते. जीवाच्या प्रयत्नांनी हे साध्य होत नाही. धर्माबद्दल अत्यंत प्रेम उत्पन्न व्हावे, प्रेमपूर्वक धर्माचे आचरण व्हावे, त्याचे फळ शुद्ध बुद्धीरुपाने मिळावे. धर्माबद्दल प्रेम हे एक उपादेय आहे. दुसरे उपादेय सन्मती. देवभक्तीहेही एक उपादेय आहे. ही उपादेय भगवंताकडेच मागायची. धर्माबद्दल प्रेम, सन्मती, भगवद्भक्ती हे उत्पन्न होण्यासाठी संतांची संगती देवाकडे मागायची. संत जेव्हा व्यक्त अवस्थेत असतात, तेव्हा त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्व भक्तांना आपापल्या सुकृताप्रमाणे वरील उपादेय वस्तूंचा लाभ होतोच. परंतु संतांच्या तपाचा असा प्रभाव असतो की ते व्यक्त स्वरूपात अथवा अव्यक्त स्वरूपात जेथे जेथे वास्तव्य करतात ते स्थान पवित्र होते आणि संत स्वरूपच होऊन जाते. पूर्ण श्रद्धा असली म्हणजे त्या स्थानाच्या दर्शनाने, त्या स्थानांत निवास करण्याने सर्वही उपादेय वस्तूंचा लाभ होतो. संतांच्या कृपेनेच अज्ञानी जीवांच्या अंतःकरणांत हेयोपादेय विवेक ठसतो. हेय दूर होऊन त्यांच्याच कृपेने उपादेयाची प्राप्ती होते.

*प्रश्न : महाराज, संसारात राहूनही आम्ही तप कसं करायचं ?*

उत्तर : तप शब्दाचे दोन अर्थ आहेत. तप या शब्दाचा पहिला अर्थ म्हणजे क्लेश, कष्ट सहन करणं, उपासतापास करणं, एका आसनांतच बसून रहाणं वगैरे. तप या शब्दाचा दुसरा अर्थ म्हणजे आलोचन म्हणजे चिंतन करणे.

परमेश्वराच्या अवतारांचं, त्यांच्या कर्मांचे, त्यांच्या लीलांचं चिंतन करणे. भगवंतांची अनेक गुण प्रयुक्त नामे आहेत. त्या नामांनी भगवंताच्या गुणांचा, लीलांचा बोध होतो. दामोदर हे भगवान श्रीकृष्णाचं नाम आहे. यशोदेने उखळाला बांधलं त्या लीलेचं स्मरण देणारं हे नाम आहे. गोविंद हे नाम श्रीकृष्णांनी गोवर्धन पर्वत उचलून गायींचं व गोपालांचं संरक्षण केलं त्याचं स्मरण करून देणारं नाम आहे. अशी गुण प्रयुक्त नामे घेत गेलं की ईश्वराच्या लीलांच आणि गुणांचं चिंतन घडतं. ईश्वराचं चरित्र डोळ्यासमोर येतं. ईश्वराच्या दिव्य चरित्राचं आलोचन असं ईश्वराच्या नावावरुन करता येतं.

*प्रश्न : महाराज, विष्णुसहस्त्रनामासारखी स्तोत्रे म्हटली तर ते तप होईल कां?*

उत्तर : नामांचं चिंतन म्हणजे ईश्वराच्या चरित्रांच चिंतन, भगवंतांच्या कर्मांचं चिंतन. त्यासाठी विष्णुसहस्त्रनाम म्हणतात. गणेश अष्टोत्तरशतनामार्चना स्तोत्र आहे. राम अष्टोत्तरशतनाम स्तोत्र आहे. अनेक नामस्तोत्रे आहेत. शंकराचं आहे, दुर्गामातेचं आहे. हे सगळे अवतार म्हणजे सगुण रुपं, आकार धारण केलेली ईश्वराची रुपं. त्यांची नामस्तोत्रे म्हणतांना या रुपांचं चिंतन त्या मनानं करायचं. त्या चिंतनांचा काळ किती गेला याचं स्मरणही नाही असं झालं पाहिजे. ते तपच आहे.

*प्रश्न : महाराज, काम, क्रोध, लोभ हे सगळे विकार भक्तीयोगात जिंकता येतात कां ?*

उत्तर : प्रेमद्वारा भगवंताच्या ठिकाणी चित्त स्थिर करणे म्हणजे भक्तीयोग. भगवंताचे प्रेम लागले की चित्त भगवंतांच्या ठिकाणी स्थिर होते आणि

विकारांवर विजय मिळवता येतो असा संतमहात्म्यांचा अनुभव आहे. म्हणूनच त्यांनी भगवंताची भक्ती करायला सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, एकाने आपल्याजवळ बोललेले दुसऱ्याकडे जाऊन आपण बोलू नये असे साधकांना सांगतात. ते कां ?*

उत्तर : एखादा मनुष्य कोणाच्या विरुद्ध बोलला की आपण तो विरोध वाढवण्याचा प्रयत्न करतो. चहाडखोरपणा करतो. तुम्हाला हे असे असे बोलले, आपल्याबद्दल असे असे बोलले. म्हणजे त्यांत पुन्हा भर पडणार. हे पैशुन्य. अशाने द्वेष संपत तर नाहीच. उलट वाढत जातो.अशाने साधनेत मन स्थिर रहात नाही.

*प्रश्न : महाराज, ईश्वराचा अनुग्रह कसा होईल? त्यासाठी आम्ही काय करावे?*

उत्तर : केवळ व्यवहारामध्ये आसक्ती ठेवायची नाही. आस्तिक्य बुद्धी ठेवली पाहिजे. ईश्वरभक्ती मनांत असली पाहिजे. ईश्वरप्रसाद आपल्यावर झाला पाहिजे असं आपलं वर्तन ठेवलं पाहिजे. असा प्रयत्न ठेवला पाहिजे. दैवी संपत्ती असलेले गुण अंगात येण्यासाठी इच्छा पाहिजे आणि तसे प्रयत्न केले पाहिजेत.

*प्रश्न : महाराज, मनातून अहंकार पूर्णतया कसा घालवावा ?*

उत्तर : एक शक्ती आहे जिच्या योगानं कार्य चाललं आहे. कर्तृत्व तुम्ही आपल्याकडे घेत असलात तरी कार्य ती शक्ती करते आहे. ईश्वरी शक्तीच्या प्रेरणेनं सगळं कार्य चाललं आहे. हा सिद्धांत पटवून घेतला पाहिजे.

संसारात आपली मति कुंठीत करणारे प्रसंग अनेक वेळा घडतात. इतका विचार करुन वागलो मी ! सल्लागारही अगदी उत्तम ज्ञानीच अभ्यासू होते. तरीही कार्य झालं नाही. याचा कार्यकारण भाव बुद्धीने ठरवता येत नाही. सर्वच आपल्या बुद्धीनं होणं शक्य नाही हे मान्य करायलाच हवं. एकच डॉक्टर, एकच औषध, एकच रोग, एकच उपाययोजना असली तरी काही रोगी बरे होतात तर काही होत नाहीत. हा अनुभव घेतला म्हणजे अहंकार पूर्ण नाहीसा होतो. नाही माझं कर्तृत्व काही नाही.

प्रल्हादजी सांगताहेत, ''भजन मी करीत नाही. अंतर्यामी जो श्रीहरी आहे त्याच्या प्रेरणेने माझं मन तिकडं जात आहे''. हे उत्तर प्रल्हादजी विचारपूर्वक देताहेत. शिक्षा होऊ नये म्हणून भितीने ते उत्तर देत नाहीत.

*प्रश्न : महाराज, धर्मग्रंथाचा अभ्यास करतांना श्रद्धा असेल तरच पुढे जाता येतं कां?*

उत्तर : मन, वाणी, शरीर यांना प्रेरणा देणारी एक शक्ती कायम आहे असा पूर्ण विश्वास पाहिजे. तेच खरे ज्ञान आहे. हे ज्ञान असेल, आस्तिक्य बुद्धी असेल, पूर्ण श्रद्धा असेल तरच परमार्थ मार्गावर पुढे जाता येते. नाहीतर उगाच वाचून काही होत नाही. नुसता वेळ घालवणं होतं.

*प्रश्न : महाराज, पूर्णश्रद्धा नसेल त्याने धर्मग्रंथ वाचूच नये असे म्हणावे कां?*

उत्तर : आपल्या मनावर आज नाही, उद्या परिणाम होईल अशा आशेने धर्मग्रंथाचा अभ्यास केला तर हरकत नाही. पण धर्मग्रंथाचा अभ्यास करतांना श्रद्धा हवीच, विश्वास हवाच. अविश्वासाने अभ्यास केला तर काहीच साधत नाही. आस्तिक्य बुद्धी ठेवली तरच अभ्यास होणार आणि अनुभव येणार.

*प्रश्न : जी पापकर्मे हातून झाली आहेत त्यांचे क्षालन करण्यासाठी, पापक्षय करण्यासाठी काय करावे ? प्रायश्चित्ताने पापक्षालन होईल कां?*

उत्तर : शास्त्राने सांगितलेली प्रायश्चित्तकर्मे केली तर पापक्षय होतो.

*प्रश्न : पण प्रायश्चित्ताने पापक्षय झाला तरी पुन्हा पापकर्मे करण्याची प्रवृत्ती रहाणारच. पापकर्मे करण्याची प्रवृत्ती नाहीशी कशी करावी ? तुरुंगात शिक्षा भोगून आल्यावर चोर पुन्हा चोरीच करतो नां ! मग प्रायश्चित्ताचा उपयोग काय ?*

उत्तर : केवळ कर्माने कर्मक्षय होत नाही. खरं प्रायश्चित्त म्हणजे ''आत्मज्ञान क्षीयन्ते चास्य कर्माणि ।'' परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यानंतरच सर्व कर्मांचा क्षय होतो. परमात्म्याचं प्रत्यक्ष दर्शन होईपर्यंत त्याप्रमाणे वागणाऱ्या मनुष्याला रोगाची पीडा होतच नाही. तसं शास्त्रीय कर्मे करणारा आत्मज्ञानापर्यंत जातो. पापक्षय करण्याकरता अनेक मार्ग आहेत. तप, इंद्रियदमन, दानधर्म असे पापक्षय करण्याकरता अनेक मार्ग शास्त्रात दिले आहेत. आणखी एक मार्ग आहे. केवळ भक्ती भगवंताची आहे. केवळ भगवंताचे प्रेम अंतःकरणात आहे. गोपींच्या मनात केवळ प्रेम होतं, भक्ती होती, दानमिश्र नाही, कर्ममिश्रही नाही. अशा भगवंताच्या केवळ भक्तीने पापक्षय होतो. केवळ भक्तीत तो पवित्र होऊन जातो. सगळी पापे नाहीशी होऊन जातात.

*प्रश्न : महाराज, सर्व परिस्थितीत मन शांत ठेवणं कसं काय मिळवावं ?*

उत्तर : कसाही प्रसंग जरी आला तरी त्याप्रसंगी आपलं मन शांत ठेवणं या गुणाला असंमोह असे म्हणतात. कधी मनाची चलबिचल न होणं, ही मनाची जी स्थिती आहे ती ईश्वराच्या कृपेनंच प्राप्त होते. भगवान श्रीकृष्ण गीतेत ''मत्त एव'' असे म्हणतात. हे गुण माझ्यापासून मिळतात. मीच देतो

म्हणाले. दुसऱ्या प्रयत्नांनी नाही. ईश्वराची कृपा व्हावी यासाठी ईश्वराची उपासना किंवा महात्म्यांची संगती, त्यांचं मार्गदर्शन याची अतिशय जरुरी असते.

*प्रश्न : महाराज, कर्म तर करायचं. परंतु त्या कर्माचे बंधन होऊ नये म्हणून मी कर्म करतो आहे हा अभिमान धरायचा नाही. कर्मफळाची अपेक्षाही करायची नाही असे सांगतात. परंतु कर्म करण्याचा अभिमान मनांत नसला तर आमच्या हातून कर्म चोख कसे होईल? आणि कर्म करतांना कर्मफळाची अपेक्षा ठेवली नाही तर ते कर्म आमच्या हातून चोख कसे होऊ शकेल ?*

उत्तर : सर्वकर्तृत्वशक्ती भगवंताची आहे, ज्ञानशक्ती भगवंताची आहे. हे समजून घेतले म्हणजे कर्तृत्वाचा अभिमान निर्माण होणार नाही आणि कर्मही चोख होऊ शकेल. यजमानाच्यावतीने यजमानाकरिता पुरोहित यात्रा करतो. मी यात्रा करतो आहे अशी कर्तृत्वभावना, अभिमान त्याच्या मनांत येत नाही. तरीही तो कर्म चोख करतो नां? राजाने सहीशिक्क्याने सरदार नेमला. लढाईची साधने, सैन्य देऊन लढायला पाठवला. युद्ध करणारा राजा असतो आणि विजय राजालाच मिळतो अशीच सरदाराची भावना असते. तरीही युद्धाचे काम तो चोख करतो. कर्ताही तोच भगवंत आहे. भोक्ताही तोच भगवंत आहे. माझे काहीही नाही अशी भावना असली तरी कर्म चोख करता येईल.

कर्मफळाची अपेक्षा न ठेवताही काम चोख होऊ शकते. मूल सांभाळायला ठेवलेली दाई आईसारखे मूल सांभाळायचे काम चोख करते. ते मूल पुढे आई म्हणून माझा सांभाळ करेल अशी कांहीही अपेक्षा तिच्या

मनांत नसते. गांवच्या गाई राखणारा गुराखी त्या गाईंचे दूध मिळेल अशी अपेक्षा ठेवत नाही. तरीही त्याचे काम चोख होत नाही कां ?

*प्रश्न : महाराज, ईश्वरचंद्र विद्यासागरांनी इतका परोपकार केला. पण त्यांना शांती मिळाली नाही. अनेक लोक परोपकार करत असतात. तरीही त्यांना शांती मिळालेली दिसत नाही. असे कां होते ?*

उत्तर : परोपकार खरोखरच होतो कां ? परोपकार झाला म्हणायचं. समजूत करुन घेतो आपण. परंतु स्वार्थ पूर्णपणे सुटल्याशिवाय खरा परोपकार घडत नाही. ''आता उरलो उपकारापुरता'' हे जे ठामपणे सांगू शकतात, ज्यांना स्वार्थ काही राहिलेला नाही, त्यांच्याकडून जी सेवा घडते, त्या सेवेलाच खरा परोपकार म्हणता येईल. तसे झाल्याशिवाय शांती मिळणार नाही.

*प्रश्न : महाराज, कर्म तर जाणारी आहेत, नाहीशी होणारी आहेत. मग ती आमच्या पाठीमागे कां लागतात ?*

उत्तर : आपली वाणी आणि इंद्रियं सर्वकाळ आपल्या ताब्यात रहात नाहीत. आपल्या इंद्रियांकडून आपल्या इच्छेप्रमाणे सगळ्या क्रिया घडत नाहीत हा नेहमीचा अनुभव आहे. मी कर्म केलेले आहे, मी करणार आहे असं जर अहंकारानं म्हणायचं झालं तर मी आहेच की मृत्युपर्यंत ! मग आपली इच्छा शेवटपर्यंत पूर्ण कां होत नाही ? याचं उत्तर काय द्यायचं ? कर्म जाणारी आहेत, कर्म संपणारी आहेत. पण ते कर्म पाठीमागं लागतं, याचं कारण आमचा निष्कारण अहंकार. सर्व कर्म मी करतो असं आम्हाला वाटतं. पण आम्हाला करावीशी वाटणारी सर्व कर्म आम्ही पूर्ण करु शकत नाही. ज्या क्रिया आम्हाला कराव्याशा वाटतात, त्या सर्व क्रियाही आम्ही करु शकत नाही. मनांतील सर्व इच्छा आम्ही पूर्ण करु शकत नाही. काही कर्म सोडून द्यायची, काही कर्म करायची नाहीत असंही आम्ही ठरवू शकत

नाही. ज्या क्रिया मी करायच्या ठरवतो त्या सर्वही क्रिया मी कां पूर्ण करु शकत नाही ? मनांत येणाऱ्या सर्व इच्छा मी कां पूर्ण करु शकत नाही ? याचं उत्तर काय द्यायचं ? कर्मे न होणं हेही आमच्या हातात नाही. कर्मे होतील कां होणार नाहीत हेही आम्ही ठरवू शकत नाही. कर्मे होतील कां होणार नाहीत हे भगवंतच ठरवू शकतो, आपण नाही. ''करणे कां न करणे। हे आघवे तोचि जाणे।'' तुमच्याकडून कर्म व्हायची कां न व्हायची हे त्याला माहिती आहे. नियामक तो आहे.

*प्रश्न : महाराज, जर सर्वच कर्मे जाणारी असतील तर सत्कर्मेही जाणारच आहेत. मग संतमहात्मे चांगली कर्मे करायला कां सांगतात ? सत्कर्मे करीत रहावे असा कां उपदेश करतात ?*

उत्तर : सत्कर्मे करीत राहिले म्हणजे मनांतले, बुद्धीतले दोष दूर होतात आणि चांगले गुण उत्पन्न होतात. म्हणूनच संतमहात्मे सत्कर्मे करण्याचा उपदेश करतात. एक जन्म नव्हे तर जितकेही जन्म येतील त्या सर्व जन्मांतही सत्कर्मे झाली पाहिजेत आपल्या हातून.

*प्रश्न : महाराज, आमच्या हातून पूर्वी जी कर्मे झाली आहेत त्यांचे फळ आम्हाला भोगावेच लागणार आणि आमच्या प्रारब्धाप्रमाणे आम्हाला सुखेदु:खे मिळत राहणार असेच शास्त्रकार सांगतात. संतमहात्म्यांच्या दर्शनाने प्रारब्धांत बदल होतो कां ?* वाडीला जाऊन महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले तर आमचे प्रारब्ध बदलू शकेल कां ? वाडीला स्वामीमहाराजांचे जरी प्रत्यक्ष दर्शन झाले असते तर त्यांनीही आमच्या प्रारब्धाकडेच बोट दाखवले असते कां ? प्रारब्धाचे फळ तुम्हाला भोगावेच लागेल असे त्यांनी सांगितले असते कां ?

उत्तर : श्रीपादवल्लभ संन्यास घेण्यासाठी घर सोडून निघाले, तेव्हा पंगु व अंध भावांचे व्यंग त्यांनी दूर केले आणि त्यांना शास्त्राचं ज्ञानही दिलं. इथं प्रारब्ध वगैरे काही नाही. कुरवपूरला जाणाऱ्या ब्राह्मणाला चोरांनी ठार मारले. पण श्रीपादवल्लभ यांनी त्याला पुन्हा जिवंत केले. शिराळ्याच्या ब्राह्मणस्त्रीला महाराजांच्या कृपेने पुत्र झाला. बालपणांतच त्याचा मृत्यु झाला. नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी त्याला जिवंत केले. या सगळ्या हकीकती चरित्रात दिलेल्या आहेत. त्यांना दया आली म्हणूनच त्यांनी प्रारब्ध बदलले. नुसती दया नाहीए. दुःख दिसलं, वाईट वाटलं, दया उत्पन्न झाली असं नाही. ते दुःख दूर करण्यासाठी पूर्ण शक्ती त्यांच्याजवळ आहे. प्रारब्ध आहे तुमचं असे ते म्हणाले नाहीत. म्हणजे ईश्वर प्रारब्ध बदलू शकतो हे जे संतमहात्मे सांगताहेत ते खरं आहे.

प्रारब्ध कर्म आहे. कर्माप्रमाणे फळ मिळते हे खरं आहे. पण ईश्वराचे ऑफीस वेगळे आहे. ईश्वराला जो शरण आलेला आहे, त्याच्याबद्दल विशेष विचार होतो. त्याचे कर्मफळ बदलण्याचीसुद्धा शक्ती आहे ईश्वराची. कुठल्या कर्माचं फळ किती व केव्हा द्यायचं हे भगवंत ठरवू शकतात. एकाचे फळ दुसऱ्यालाही देऊ शकतात. प्रारब्ध बदलणे शक्य नाही असा जरी सिद्धांत असला तरी ईश्वराची शक्ती म्हणून काही आहे. म्हणून संतमहात्मे ईश्वरभक्तीतच निमग्न झालेले असतात. त्यांना संसारचिंता काहीही राहिलेली नाही याचे कारण म्हणजे ईश्वराच्या इच्छेने प्रत्येक गोष्ट होते आहे अशी त्यांची ठाम धारणा आहे. देणाराही तोच आहे आणि संरक्षण करणाराही तोच आहे. आपल्याकडून सत्कर्म करुन घेणाराही तोच आहे. अशी भावना पक्की असल्यामुळे भगवद्भक्तांना भीती वाटत नाही. चिंता वाटत नाही. अशा निश्चिंत झालेल्या भक्तांचे संरक्षण केल्याशिवाय भगवंत कसा राहील ? जे सज्जन धर्मनिष्ठ भगवत्भक्त महात्मे

आहेत त्यांचे संरक्षण करायचे, त्यांना त्रास होऊ द्यायचा नाही ही भगवंताची प्रतिज्ञाच आहे.

सर्वही कर्म ईश्वरार्पणबुद्धीने करणारे, भक्ती करुन निश्चिंत रहाणारे अशाप्रकारचे भगवद्भक्त जे असतात, त्यांच्यावरती ही अशी कृपा होते. आम्हाला असा काही अनुभव नाही, म्हणून ईश्वर नाही असे कसे म्हणता येईल? तसे अनुभव येण्याकरिता मनाची तयारी पाहिजे. ईश्वर तर आहेच. ईश्वरस्वरुप झालेले महात्मेही सत्यसंकल्प असतात. त्यांच्या संकल्पाप्रमाणे कार्य होते. त्यांना दया आल्यावर त्यांचा संकल्प झाल्यावर कार्य झाल्याशिवाय कसे राहील ?

श्रीपादवल्लभ लौकीक दृष्ट्या अदृश्य झाले असले तरी त्यांचे भक्तोद्धाराचे कार्य अखंड चालू आहे. त्यांच्या स्थानात आजही अनेक भक्त येताहेत. त्यांच्या इच्छा पूर्ण होताहेत. नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज वाडीलाही अदृश्यरुपाने आहेत आणि गाणगापुरलाही अदृश्यरुपाने आहेत. या दोन्ही स्थानांमध्ये भक्तांना तसा अनुभव येतोय. दोन्ही ठिकाणी भक्त येताहेत. त्यांच्या इच्छा पूर्ण होताहेत.

संत व्यक्त स्वरूपात आहेत. तोवर त्यांचा सहवास घेता येतो आणि कल्याण करून घेता येते. ज्या स्थानात संत राहिले ते स्थानही संतरूप होऊन जाते. संत अव्यक्त असले तरी त्या स्थानांत ते आहेतच. भक्तांचे कल्याण करण्याचे त्यांचे कार्य तेथे चालू आहे.

कालीदास सांगतात ईश्वराची इच्छा असेल तर विषाचेही अमृत होईल. मीराबाईला विषाची बाधा झाली नाही. नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज अदृश्य आहेत म्हणून ते नाहीत असे म्हणता येणार नाही. ते वाडीला पादुकारुपाने आहेतच. ईश्वराची पूर्ण शक्ती आहे ही भावना मनांत धारण करुन जर त्यांच्याकडे गेले तर त्यांची निश्चितपणे कृपा होते. प्रारब्धाकडे

बोट दाखवून तुमच्या कर्माचे फळ तुम्हाला भोगायला पाहिजे असे सांगून ते बाजूला होत नाहीत असेच या प्रसंगांवरुन दिसते.

*प्रश्न : महाराज, केलेल्या चांगल्या कर्मांचे पुण्यही भोगतच रहावे लागते कां? पुण्यकर्मांचे फळ भोगत बसणेही नको वाटते पुष्कळ वेळा ?*

उत्तर : पुण्याला सुद्धा वेदांत शास्त्राप्रमाणे पाप असंच नांव आहे. बंधन होते आपल्याला. पूर्वीच्या पुण्यकर्माप्रमाणे सुख भोगायचे आहे आपल्याला. ध्रुवाने चार-पाच महिने खडतर तपश्चर्या केली आणि भगवंताच्या कृपेने त्याला सर्वोच्च स्थान मिळाले, अढळपद मिळाले आणि नंतर त्याला पश्चाताप झाला. काय मागितलं हे मी असं देवाकडे असे त्याला वाटलं ! आता या सर्वोच्च स्थानात रहायचे म्हणजे इतर हेवा करणारच. पुण्य असेपर्यंत ईश्वराच्या कृपेने सुख भोगायला मिळेल. पण द्वेष करणारी मंडळीही असणारच ! विरोध झाला म्हणजे पुन्हा मनांत शंका येणार, हे सुख टिकेल की नाही. हे असे जे प्रतिबंध निर्माण होतात त्यामुळे सुख कसे लाभणार ! शिवाय याच्यामध्ये अर्थ तरी काय आहे, म्हणाला. अपमान धुवून निघाला, सर्वोच्च स्थान मिळालं. पण त्यामुळे अहंकारही होण्याचा संभव आहे. इतरांपेक्षा मी मोठा आहे असे वाटू लागणार. म्हणजे ईश्वराकडे लक्ष कमी होणार. ज्याच्या कृपेने हे आपल्याला मिळाले त्याची आठवण राहील की नाही हा एक पुन्हा प्रश्न आहे. असे अनेक दोष ध्रुवाच्या लक्षात आल्यावर त्याला पश्चाताप झाला. चुकलो म्हणाला मी. पण आता काही इलाज नाही. पुण्य केले आहे आता त्याचे फळ भोगलेच पाहिले.

सकाम कर्म नको जे म्हणतात, ते याकरताच. पण तशी आपली एकदम भूमिका होत नाही.

*प्रश्न : महाराज, माणसाच्या जीवनात अनेक दुःखे भोगावी लागतात. मनाला सारखा काही ना काही त्रास होत रहातो, मनाला काही ना काही क्लेश होत राहातात. ते तसे कां होतात ? ते होऊ नयेत म्हणून आम्ही काय करावे?*

उत्तर : क्लेश म्हणजे मनांत सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, द्वेष, अज्ञान. हे सर्व दोषच आहेत. देह म्हणजे मी आहे, ही आमची जी गैरसमजूत आहे, त्यामुळे ही पुढची सर्व दुःख निर्माण होतात. देहात्मवादाने सर्व ज्ञानी पंडितही ग्रासलेले आहेत. ते पांडित्य दाखवतात. पण मी देह आहे ही बुद्धी काही जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे, मी म्हणजे शरीर आहे आणि शरीराला उद्देशूनच तो हे सर्व समजतो.

हा असा देहात्मवाद इतका बळावला आहे की, इतर कुठे लक्ष जातच नाही. फार काय, घरातल्या माणसांकडेही लक्ष जात नाही. तो फार मोठा अभिमान उत्पन्न होतो. मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहीले पाहिजे. ज्यांचे पालनपोषण आपण करतो, त्यांच्याबद्दल सुद्धा अभिमान आहे. त्यांनी जरा आपल्या मनाविरुद्ध केले की, आपल्याला राग येतो. मन देहातच गुंतून पडलं की मग ईश्वर, संत यांची काही आठवणही होत नाही. सारखा मनांत देहाच्या सुखाचाच विचार होत रहातो. हे स्वाभाविक क्लेश मानलेले आहेत. आणि यामुळे सगळी कर्मही दोषी होतात. असे विचार मनांत असले म्हणजे स्वतःच्या हातून शुद्ध कर्म होत नाही.

या सगळ्याला मी देह आहे ही भ्रांती, अज्ञान कारणीभूत आहे. देहापेक्षा मी निराळा आहे. मी अजरामर आहे. मी आत्मा अविनाशी आहे. आतापर्यंत असे अनेक देह मी धारण केलेले आहेत. या देहाचा आणि माझा संबंध काही काळापुरता आहे. अशी भावना असली म्हणजे मग

कोणी मानसन्मान केला तरी त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही आणि कोणी निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्त्व वाटणार नाही. मग मानसिक क्लेश, त्रास रहाणारच नाहीत.

*प्रश्न : महाराज, आपल्या हातून सत्कर्मे झाली, मोठी कार्ये झाली तरीही लोकांनी आपल्याला विसरुन जावं अशी भूमिका घ्यायला शास्त्रकार कां सांगतात ?*

उत्तर : लोकांनी विसरुन जावं मला. म्हणजे याचा अर्थ असा की आपण केलेलं कर्म कदाचित मोठं असलं तरी विसरुन गेलेले आहेत. त्यावेळेला ते अमानित्व येते. कीर्तीसुद्धा नको. कीर्तीची सुद्धा इच्छा नाहीये. ते अमानित्व आहे. करणारा कोण आहे ? जीवात्म्याचे कर्तृत्व हे मर्यादित आहे. मान्य करतात. मारुतीरायांनी सांगितलं, ''समुद्र उल्लंघन मी करू शकत नाही. माझी शक्ती एवढीच आहे. या झाडावरुन त्या झाडावर उडी मारणं. समुद्राचं उल्लंघन मारुतीने केलेलं नाही.'' मारुतीराय म्हणताहेत, सगळी कर्म रामरायांनीच केली. द्रोणागिरी आणलेला आहे. पण मारुतीराय म्हणतात, ''समुद्र उल्लंघन मी केलं नाही. तुमच्या प्रभावाने झालेला आहे.'' ते नुसतं शाब्दिक नाहीये. मनामध्येसुद्धा तो विचार नाही. आपलं कर्तृत्व मनातसुद्धा नाही. याला म्हणतात निर्वासन मन. कर्तृत्वाची जाणीवसुद्धा नाही. स्वतःला स्वतः विसरल्याशिवाय लोकांनीसुद्धा मला विसरुन जावं असं म्हणता येणं शक्य नाही.

*प्रश्न : महाराज, आत्मस्वरुप कसं असतं याची अनुभूती आमच्यासारख्या सामान्य माणसाला कशी घेता येईल ?*

उत्तर : जगांत आपल्याला भोवती जे पदार्थ दिसतात त्या सर्व पदार्थांना विकार आहेत. उत्पन्न होणे, वाढणे, कमी होणे, नाश होणे असे हे विकार

जगातल्या सगळ्याच पदार्थांना असतात. पण आत्मस्वरुपाला मात्र कोणताच विकार नसतो. ते विकारांच्या पलीकडे असतं. जगांत आपल्या भोवती असलेल्या सर्व पदार्थात हे विकार दिसत असतात. मग आत्मस्वरुप निर्विकार कसे काय असू शकेल असं आम्हाला वाटतं. आत्मस्वरुप म्हणून काही आहे असंसुद्धा आम्हाला वाटत नाही.

ज्ञानी महात्म्यांचं दर्शन झालं म्हणजे कळतं की आत्मस्वरुप कसं निर्विकार असतं ते. सुखदु:ख नाही, क्रोध नाही, काही नाही. कोणताच विकार नाही. महात्मे शांत असतात, पूर्णपणे निर्विकार असतात. भक्तीशास्त्रकार सांगतात- असे निर्विकार महात्मे हे भगवंतच आहेत.

''तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् । स्थिरमति:'' हे सर्व परमात्मस्वरुपाचे गुण आहेत. संतमहात्मा कसा असतो हे बघायचं. निंदा झाली खेद नाही. स्तुति झाली हर्ष नाही. खरे नाही, खोटे नाही. बोलणेच नाही. मौन धारण केलेले आहे. सुख मिळाले, आनंद नाही. सुख मिळाले नाही तरीही खिन्नता नाही. तृप्त आहे, संतुष्ट आहे, प्रसन्न आहे. भगवंताची भक्ती करण्यातच केवळ गोडी आहे. निरहंकार आहे. मीपणा असा काहीही नाही. भगवंताशी समरस झाला आहे, एकरुप झालेला आहे, मोक्ष देण्याचे सामर्थ्य आहे. पण इतके सामर्थ्य असूनही आपणाला सर्वांपेक्षा लहान समजतो आहे, धाकुटा मानतो आहे. असा ज्ञानी महात्मा पाहिला म्हणजे आत्मस्वरुप कसं असतं ते समजून येतं. तो ज्ञानी महात्मा परमेश्वरस्वरुपच आहे. स्थितप्रज्ञाचे गुण, भगवद्‌भक्ताचे गुण, गुणातीताचे गुण हे सर्व परमेश्वरस्वरुप दाखवणारे आहेत.

*प्रश्न : महाराज, मनांतील वासना कशा नाहीशा कराव्यात ?*

उत्तर : मनांत अनेक वासना असतात. हे मला पाहिजे, ते मला पाहिजे,

संसारसुख हवं. विषयसुख हवं. मोक्षाला या वासना प्रतिबंध करतात. ईश्वर सेवेला वासना प्रतिबंध करतात. वासनांमुळे ईश्वर साक्षात्कार होऊ शकत नाही. भोग घेऊन मनातील वासना संपत नाहीत. इच्छा कमी होत नाहीत. आगीमध्ये तूप घातल्यावर अग्नी वाढत जातो. तूप घालत राहिले तर तो अग्नी कधीच शांत होत नाही. इंद्रियांच्या द्वाराने मन सारखं बाहेर विषयांकडे जात असतं आणि त्या विषयांचा भोग घेतला म्हणजे पुन्हा ते विषय मनामध्ये वासनारूपांनी येऊन राहतात. एक वासना भोगाने तृप्त केली की दुसरी येते. दुसरी तृप्त केली की तिसरी येते. हे चक्र चालूच रहातं. हे बंद कसे होईल ? मनाने विषयांना सोडायचे का विषयांनी मनाला सोडायचे ? हे दोन्ही शक्य नाही.

मन आणि विषय बाजूला झाले पाहिजेत यासाठी एकच उपाय आहे ईश्वराची भक्ती करणे, ईश्वराचे ध्यान करणे. ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी मन स्थिर झाले तर मन आणि विषय यांचा वियोग होऊन जातो. ते मन आंतच रहाते. बाहेर विषयांकडे जात नाही. त्या भक्तीच्या आनंदाचा आस्वाद मिळाल्यावर मन बाहेर जातच नाही. भक्तीचे मुख्य फळ ते सांगितले आहे. ही खरी कृपा आहे.

*प्रश्न : महाराज, मनांतल्या अशुभ वासनाही घालवायच्या हे उचितच आहे. परंतु मनांतील शुभ वासनाही कां घालवायच्या ?*

उत्तर : कोणत्याही वासना मनामध्ये उत्पन्न होऊन उपयोग नाही. शुभसुद्धा उपयोग नाही. योगशास्त्रकारांनी अभ्यास करायची जी पद्धती सांगितली आहे, ती अशी आहे- मनामध्ये शुभ आणि अशुभ दोन्हीही वासना असू नयेत. मनांत काही शुभ वासना असतात, काही अशुभ वासना असतात. दोन्ही वासना जायला पाहिजेत. शुभ वासनाही जायला पाहिजे. इतरांचं

कल्याण व्हावं अशी शुभवासना मनांत असली तर ती तशी शुद्ध रहात नाही. जे लोक आपल्याला मान देतात, आपल्याला चांगलं म्हणतात. त्यांचं कल्याण व्हावं असं आपल्या मनाला वाटतं. कारण मनांत ममता आहे. माझ्या देहाबद्दल ममता आहे.

वासनाक्षय हा ममतेचा विषय आहे. 'मी', 'माझं' हे गेलं पाहिजे. सर्व कार्य हे ईश्वरी शक्तीनं चाललेलं आहे. मनांत काही इच्छाच नाही. चांगली नाही, वाईटही नाही. माझं काही नाही. मी केवळ माध्यम आहे. ईश्वरी शक्तीच सर्व काही करते आहे. हाच खरा सिद्धांत आहे. ही मोठी भूमिका आहे. खरं ज्ञान त्यांनाच झालेलं आहे.

*प्रश्न : महाराज, वैराग्य कसे मिळवावे ?*

उत्तर : विवेक केला पाहिजे. वैराग्य मिळविल्याशिवाय मोक्ष नाही. दुःखे नाहीशी होत नाहीत. धृतराष्ट्राला विदुरांनी हाच उपदेश केला आहे, विचार कर, "तुझ्या मुलांना तुझ्या संमतीने किंवा संमती नसतांना राज्य मिळाले. ते किती दिवस राहणार आहे ? काही दिवसांनी तरी त्याचा नाश होणार नां ? राज्य तरी जाईल किंवा राज्य मिळवणारा तरी जाईल. संग्रह जेवढा करावा तेवढा त्याला क्षय आहे. सर्वांपेक्षा अधिक सामर्थ्य मिळाले तरी शेवटी त्याला पतन आहे. जेवढा उंच जाणार तेवढी खाली पडण्याची भीती जास्त. माझे माझे म्हणून सगळ्यांचा संग्रह करायचा आणि शेवटी सर्व येथेच ठेवून निघून जायचे. शेवटी वियोगामध्येच त्याचे पर्यवसान आहे."

हे मला मिळाले पाहिजे. ते मिळाले पाहिजे. ह्या ज्या अनेक इच्छा आहेत यालाच 'काम' म्हणतात. आणि या इच्छा पूर्ण होण्याकरता विषयभोग हे साधन नाही. उलट त्या जास्ती वाढतात. "लाभे लोभोऽभिवर्धते" कोणी आपल्याला प्रतिबंध केला तर एकदम राग येतो.

आपल्या इच्छेप्रमाणे पदार्थ मिळाल्यावर इच्छा थांबत नाहीत. उलट त्या वाढतात. इच्छेपेक्षा जास्ती मिळाले पाहिजे असे वाटते. मनाला शांती लाभत नाही. लोभामध्येच मन हे जास्ती जास्ती गुंतत जाते.

म्हणून संतमहात्मे सांगतात, जे कांही मिळते ते ईश्वरानेच दिलेले आहे हे लक्षात ठेवा. त्याच्या शिवाय दाता कोणी नाही. ही जर आपली भावना दृढ झाली तर वासना कमी कमी होत जातात. संसारसुख देवाजवळ मागा म्हणतात. म्हणजे त्यातून सुटका कशी करायची ही जबाबदारी देवावर पडते.

सर्वही अनित्य आहे. विनाशी आहे. जगामध्ये काही टिकणारे नाही. हे काय करायचे ? अनित्य आहे, विनाशी आहे. नित्य फक्त एक परमात्मा आहे. एक भगवंतच नित्य आनंदरुप आहेत. ही बुद्धी ईश्वरप्रसादानेच होते. ही बुद्धी जेव्हा दृढ होईल त्यावेळी मनांतील वासना जातात. विषय नकोत असे वाटते आणि विनाशी पदार्थ संग्रह करुन ठेवायची इच्छा होत नाही.

*प्रश्न : महाराज, अहंकार बाजूला व्हावा यासाठी काय करावे ?*

उत्तर : अहंकार अनेक जन्म पाठीमागे लागलेला आहे. बुद्धीचे स्वरुपच आहे तो. त्या अहंकारामध्ये सापडलेला जीवात्मा ईश्वर समोर उभा राहिला तरी ओळखता येत नाही. संतमहात्मे ओळखता येत नाहीत. अहंकार बाजूला करण्याचं कार्य या संतमहात्म्यांचं चाललेलं आहे. भक्ताला अहंकार होऊ नये हे देवाचं कार्य ते करताहेत. सर्वांच्या कल्याणाकरिता उपदेश करताहेत. अनेक लोकांची कार्य करताहेत. संकटातून निवारण करताहेत. पण मी केलं अशी भावना नाही. संतमहात्मे स्वतः अहंकाररहीत आहेत. तुकाराममहाराज म्हणतात, 'आपुलीया बळे नाही बोलवत । सखा कृपावंत वाचा त्याची । माझी वाणी नाहीए. कर्तृत्व त्याचं आहे, ते खरे

ज्ञानी आहेत. भगवंताच्या अनुकंपेमुळेच जगातलं सगळं कार्य चालले आहे. पण लोक कर्तृत्व बाळगतात. मी केलं असे म्हणतात. असा अभिमान धरणं खरं नाही. सगळं देवाचं आहे. खरा कर्ता तो आहे. हेच खरे ज्ञान आहे. ईश्वराची भक्ती करीत राहिले म्हणजेच अहंकार दूर होतो आणि ईश्वराच्या स्वरुपाचे ज्ञान होते.

*प्रश्न : महाराज, चांगलं कर्म हातून घडलं की लगेच मी हे कर्म केलं अशी कर्तृत्वभावना आमच्या मनांत निर्माण होते. मनाला कसं काय समजवावं की सर्व कर्तृत्व ईश्वराचेच आहे ?*

उत्तर : आपण कर्म करायचं ठरवतो. नंतर ते विसरुन जातो. ते कर्म करायचं तसंच राहून जातं. अहंकारानं कर्म करणारा विसरु शकतो कसा ? मी कर्म करणारा आहे असं म्हणणारा विसरु शकतो कसा? विस्मरण होण्याचं तरी कारण काय ? स्मरण होण्याचं तरी कारण काय ? कार्यकारण भाव सांगता आला पाहिजे. त्याशिवाय नुसतं अस्ति आणि नास्ति असं म्हणून उपयोग नाही. सर्व ठिकाणी ईश्वर आहे. ज्ञानशक्ती, कर्मशक्ती सगळी ईश्वराची आहे. सर्व कर्तृत्व ईश्वराचे आहे. असं सांगणारे शास्त्र आहे. शब्दप्रमाण आहे ते. संतमहात्मेही तेच सांगताहेत. स्वतः अनुभव घेऊन सांगताहेत. त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवल्याशिवाय अनुभव कसा येईल ?

*प्रश्न : महाराज, ज्ञानेश्वरमहाराजांनी भिंत चालवली आणि ते चांगदेवांना सामोरे गेले. संतमहात्मे असे चमत्कार कां दाखवतात ?*

उत्तर : संतमहात्मे चमत्कार दाखवतात ते जगाची सुधारणा करण्यासाठी. स्वतःची कीर्ती व्हावी म्हणून नव्हे. ज्ञानेश्वरमहाराज बसलेली भिंत चालायला लागली. चांगदेवांना अभिमान आहे. मी अंतराळी आहे. साप हातांत घेतलेला आहे चाबूक म्हणून. वाघ, साप यांचं नियंत्रण मी करु



श्रीगुळवणीमहाराज

शकतो हा अभिमान घेऊन गुरुंच्या दर्शनाला आलेले आहेत. इकडे तर भिंत चालायला लागली. भिंतीवर बसून ज्ञानदेव सामोरे गेले निवृत्तीनाथांची इच्छा म्हणून.

अभिमान बाळगण्यासारखी शक्ती कोणाची आहे हा विचार केला पाहिजे. वाघावर बसून आलं किंवा साप हातात घेतला, अंतरिक्षातून आलं वगैरे या सगळ्या शक्ती, योगसामर्थ्य आहे, ते चेतन आहे. वाघ चेतन आहे. त्याचं नियंत्रण सर्कसवाले सुद्धा करु शकतात. पण दगडामातीची भिंत अचेतन. त्या भिंतीमध्ये क्रियाशक्ती निर्माण करण्याची शक्ती ज्ञानदेवांची आहे. ती शक्ती मोठी आहे.

पण यापेक्षाही जास्त विचार करायचा म्हणजे इतकी सगळी मोठी शक्ती स्वतःजवळ असूनही ज्ञानदेव ती शक्ती स्वतःजवळ आहे हेच विसरुन गेलेले आहेत. हे फार मोठे आहे. अहंकार सगळा पूर्णपणे गेलेला आहे. कर्तृत्वभावना पूर्णपणे गेलेली आहे. अहंकार बाळगण्यासारखी परिस्थिती असूनसुद्धा आपल्या क्रियाशक्तीचा विसर ज्ञानदेवांना पडलेला आहे. याचा अर्थ सर्वही कर्तृत्व परमेश्वराचं आहे, आपलं काही नाही आहे ही ज्ञानदेवांची पक्की बुद्धी आहे. म्हणून विसरुन गेले आहेत. मी केलंच नाही कांही अशी बुद्धी हीच सर्वात मोठी शक्ती आहे.

*प्रश्न : महाराज, आम्हाला खूप वाटतं की आपली बुद्धी परमेश्वराला अर्पण करावी. परंतु तसं घडत नाही. आम्ही कसं करावं ?*

उत्तर : मनाचं सारखं निरीक्षण केलं पाहिजे. मनांत कोणची वासना आहे काय ? विकार आहेत काय ? ते काढून टाकायचा प्रयत्न करीत रहायचं. हाच अभ्यास आहे. भगवद्भक्तीचं सहाय्य त्यांच्या जोडीला घ्यायचं. सदाचरणाचं सहाय्य घ्यायचं. मनाचं निरीक्षण अखंड करीत रहायचं.

मनांत थोडाही दोष राहू द्यायचा नाही. देवाचं चिंतन करायचंय आपल्याला मनांत ! ते स्थान शुद्ध पाहिजे. आत्मनिरीक्षण करुन मन शुद्ध करता येतं. इच्छा नाहीशा करता येतात. सगळा अहंकार गेला पाहिजे. कर्तृत्वभावना गेली पाहिजे. मी देह आहे ही भावना गेली पाहिजे. मग संसार सगळा देवाला देऊन टाकला. संसार संपलेला आहे. असे अधिकारी महात्मे संसारात राहून अलिप्त आहेत. त्यांनी मनांतले सगळे दोष काढून टाकले आहेत. त्यांनीच आपली बुद्धी परमेश्वराला अर्पण केलेली आहे.

*प्रश्न : महाराज, ध्यान म्हणजे काय ? समाधी आणि ध्यान यात फरक काय ?*

उत्तर : ध्यान म्हणजे चित्त स्थिर होणं. ध्यानावस्थेमध्ये मी ध्यान करतो आहे अशी थोडी भावना असते. ध्याता, ध्येय आणि ध्यान ही क्रिया, ही त्रिपुटी शिल्लक असते. ती बंद होऊन केवळ ध्येयाकार चित्त झाले तर त्याला समाधी म्हणतात. ध्येयरुपाशिवाय चित्त दुसरीकडे जातच नाही. शरीराकडे नाही. इंद्रियाकडे नाही. शरीराच्या बाहेर माझं माझं म्हणून जे काही आहे, ममता ठेवण्यासारखं आहे, तिकडेही लक्ष नाही. ती समाधी आहे. ध्यानाच्या पुढची अवस्था आहे.

ध्यानावस्थेतही मनाने चिंतन करणारे आहेत. भगवंतांच्या अनेक रुपांचं चिंतन करणं, एखाद्या रुपाच्या ठिकाणी चित्त स्थिर करुन रहाणं. तेलाच्या धारेप्रमाणे, हे ध्यानच आहे. तेल खाली जेव्हा आपण ओततो तेव्हा खाली ओततांना तेलाची धार अखंड असते. तुटत नाही ती. ती धार जशी अखंड असते, तसे चित्त एका विषयावर स्थिर करता आले पाहिजे. असा हा मोठा अभ्यास आहे. तो होण्याकरिता फार मोठे सुकृत पाहिजे. मनांतले सर्व विषय बाजूला करुन केवळ एका विषयावर चित्त स्थिर करता

आलं पाहिजे. एकाग्रता प्राप्त करुन घेता आली पाहिजे. तर ध्यान सिद्ध होते.

*प्रश्न : महाराज, ध्यान करण्यासाठी भोवती पूर्ण शांतता असावी लागते कां?*

उत्तर : ध्यानाचा अभ्यास हा आंतरीक अभ्यास आहे. त्यासाठी अंतःकरण शुद्ध व्हावं लागतं. मनात दोष नसले, मळ नसला तर ध्यान केव्हाही, कोठेही सिद्ध करता येतं. मनांतील सर्व विषय बाजूला करता येणं महत्वाचं आहे. तसं करता आलं की ध्यान सिद्ध होतं. चित्त बाहेर जातच नाही. असं झालं तर भोवती शांतता आहे कां नाही हे पहायची आवश्यकताच रहात नाही. द्रोणाचार्यांचा ध्यानाचा अभ्यास फार चांगला होता. भारतीय युद्धांत रणांगणावर भोवती युद्धाची धुमश्चक्री चालू असतांनाही ते ध्यान सिद्ध करु शकत होते असे सांगतात.

*प्रश्न : महाराज, ध्यान, समाधी चांगली लागली असं केव्हा मानता येईल ?*

उत्तर : समाधीअवस्थेमध्ये काळाचं ज्ञान रहात नाही. देशाचं ज्ञान नाही. देहाचं ज्ञान नाही. काळच निघून गेला. मग आयुष्य किती ? किती आहे ? घरांत काही आहे की नाही ? पुरेल की नाही ? हे सगळं काळावर अवलंबून आहे. इतक्या काळामध्ये इतकं लागलं, इतक्या काळाला इतकं पुरलं पाहिजे. असं मनांत काहीही राहिलेलं नाही. काळ ही भूमिकाच नाही. त्यामुळे अंतःकरण मोकळं, अगदी मोकळं होऊन जातं.

*प्रश्न : महाराज, ध्यान चांगले लागावे, त्यांत प्रतिबंध येऊ नयेत यासाठी आम्ही काय करावे ?*

उत्तर : त्यासाठी ईश्वराचा अनुग्रह पाहिजे. ईश्वराची कृपा पाहिजे. उपासना अखंड झाली पाहिजे. त्या उपासनेच्या योगाने सगळी साधने आपोआप

प्राप्त होतात. दोषनिवृत्ती होते. गुणप्राप्ती होते. साधनाभ्यासही अखंड चालू रहातो. प्रतिबंध सगळे दूर होतात. हे ईश्वराच्या अनुग्रहाचे फळ आहे. ईश्वरभक्तीने चित्त शुद्ध होत जातं. चित्ताची शुद्धी झाली म्हणजेच खरं ध्यान घडू शकतं.

*प्रश्न : महाराज, आम्ही आमचं मन शुद्ध कसं करायचं ?*

उत्तर : वितृष्णा गेली पाहिजे. मनाचं सारखं निरीक्षण करीत राहिलं पाहिजे. आपल्या मनांत कोणती वासना आहे काय ? कामक्रोधादि विकार मनांत आहेत काय ? ते असले तर ते काढून टाकायला हवेत. हा अभ्यास सतत चालू ठेवायला हवा. हाच खरा अभ्यास आहे. त्या अभ्यासाला भगवद्भक्तीचं साहच्य घ्यायचं आहे. सदाचरणाचं साहच्य घ्यायचे आहे. मनाचं निरीक्षण अखंड चाललं पाहिजे. थोडाही दोष राहू द्यायचा नाही. भगवंताचं चिंतन करायचं आहे त्या मनांत. ते स्थान शुद्ध पाहिजे. मन पूर्ण शुद्ध होईपर्यंत मनाचं असं सतत निरीक्षण करत राहिले पाहिजे. सर्व तृष्णा, वासना, कामना, इच्छा पूर्णपणे नाहीशा झाल्या पाहिजेत. मनांत काहीही वासना नाही अशी बुद्धी झाली पाहिजे. बुद्धी ईश्वराला पूर्णपणे अर्पण केली पाहिजे.

*प्रश्न : महाराज, बुद्धी ईश्वराला अर्पण कशी करायची ?*

उत्तर : बुद्धी ईश्वराला अर्पण करायची म्हणजे संसार सगळा ईश्वराला देऊन टाकायचा. मन माझं नाही. मन देवाचं आहे अशी बुद्धी झाली की संसार संपलेला आहे. अहंकार गेला, देहाचं तादात्म्य गेलं म्हणजे खरं ध्यान साधते आणि संसारात राहूनही अलिप्तता येते. मग देहानं संसारात राहिलं तरी मनातून संसार नाहीसा होतो. हे अनेक अधिकारी महात्म्यांनी केलेलं आहे. संसारात राहूनही अलिप्त आहेत. त्यांनाच ब्रह्मप्राप्ती होत असते.

*प्रश्न : महाराज, ध्यान चांगलं लागावं म्हणून आम्ही काय करावं ?*

उत्तर : चित्तात जोवर अहंकार आहे, तोवर ध्यान होणार नाही. अहंकार गेला पाहिजे. चित्त शुद्ध झालं पाहिजे. शुद्ध चित्ताशिवाय ध्यान होणं शक्य नाही. ध्यान हेच खरं तप आहे. अशा तपाचा अधिकार प्राप्त होण्यासाठी भक्ती अखंड घडली पाहिजे. त्या भक्तीच्या योगाने सगळी साधनं आपोआप प्राप्त होतात. दोषनिवृत्ती होते. गुण प्राप्ती होते. साधनाभ्यासही अखंड चालू रहातो. प्रतिबंध सगळे दूर होतात. हाच खरा ईश्वराचा अनुग्रह आहे. संसारातलं अनुकूल मिळत रहाणं हा ईश्वराचा खरा अनुग्रह नाही. संसारांत राहूनही अलिप्त रहातां येणं, मनांतला संसार नाहीसा होणं हाच खरा ईश्वराचा अनुग्रह आहे. हीच जीवन्मुक्तीची अवस्था आहे. ईश्वराच्या कृपेनेच ही अवस्था प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, भगवान श्रीकृष्ण सांगतात, बाहेरचे विषय बाहेरच ठेव. हे कसे करायचे ?*

उत्तर : इंद्रियांच्याद्वारे आपलं मन बाहेर जाते. बाहेरच्या विषयांशी असा मनाचा संबंध आल्यावर ते विषय संस्काररुपाने आंत मनांत येतात. म्हणून इंद्रियांचा निरोध करायचा. त्यालाच प्रत्याहार म्हणतात. इंद्रियांचा निरोध झाल्यावर मनही बाहेर जायचं बंद झालं. खिडक्या उघडल्यानंतर बाहेरचा वारा आंत येणार. बंद केल्यावर कशाला येतोय? मन बाहेर जायचं बंदच झाल्यामुळे ते विषय आत येण्याचे बंद झाले. संस्कार नाही. वासना नाही. बाहेरच्या बाहेर ते विषय राहिले. त्यानंतर अगदी डोळे मिटून बसलं तर झोप येणार. डोळे उघडून बसलं तर व्यग्रता येणार, हे दिसलं ते दिसलं असे विचार मनांत येणार. म्हणून अर्धोन्मिलित दृष्टी सांगितली आहे. भ्रूमध्यात नेत्र न्यायचे, श्वास प्रश्वास, पूरक व रेचक हे सम करायचे. बाहेरही श्वास

जायचा नाही, आंतही यायचा नाही. तो फक्त सम म्हणजे कुंभकरुपाने राहिलेला आहे. त्या अवस्थेत निरंतर रहायचे. हा अभ्यास, आत्मचिंतन अनेक महात्मे करीत असतात.

*प्रश्न : महाराज, अनेक निधर्मवादी काहीतरी लिखाण करतात आणि समाजात ईश्वराबद्दल, धर्माबद्दल अविश्वास निर्माण करतात. तस होऊ नये म्हणून काय करता येईल ?*

उत्तर : अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी होतोच असं नाही. कोणाच्या मनांत अविश्वास उत्पन्न व्हायचा, कोणाच्या मनांत विश्वास उत्पन्न व्हायचा, कोणाची पुण्यकर्म कशी आहेत, कोणाचं पूर्वसुकृत कसं आहे, हे ईश्वरी शक्ती जाणते. कोणाचा विश्वास किती असावा हे ईश्वरी शक्ती ठरवते. प्रल्हादाच्या मनांत अविश्वास निर्माण करण्याचे काय कमी प्रयत्न झाले? बाकीची सर्व मंडळी ईश्वर न मानणारी होती. एकही त्याच्या बाजूचा नाही. त्याचे वडील त्याला सांगताहेत- माझ्या बुद्धीनं सगळं झालं पाहिजे. माझे ऐकलं नाही तर तुला मरावे लागेल." इतकी ही भिती आहे. तरीही प्रल्हादानं ईश्वरभक्ती सोडली नाही. पाच वर्षाचा मुलगा इतका निर्भय कसा राहू शकला ? गुरुजींनासुद्धा हात टेकावे लागले. ते म्हणाले "मी कांही त्याची बुद्धी बदलू शकत नाही. नैसर्गिक बुद्धी आहे." निसर्गाचं उत्तर त्यांनी दिलेलं आहे. निसर्ग याचा अर्थ 'हे आघवे तोचि जाणे,' तो परमात्मा आहे.

*प्रश्न : महाराज, जगांत आपणाला कोणाबद्दल प्रेम वाटते तर कोणाबद्दल प्रेमच वाटत नाही असं कां घडते ?*

उत्तर : पूर्व ऋणानुबंध असतात, कोणाबद्दल प्रेम का वाटावे आणि

कोणाबद्दल प्रेम का वाटू नये हे काही सांगता येत नाही. काहीतरी कारणे असतात.

*प्रश्न : महाराज, भारतीय तत्त्वज्ञानांत बारा दर्शने आहेत असे सांगतात. चार्वाकदर्शन हेही या बारा दर्शनांत येते. चार्वाक दर्शनात काय विचार दर्शनकारांनी मांडले आहेत.*

उत्तर : पृथ्वी, जल, तेज व वायु ही चारच तत्त्वे इंद्रियांनी समजतात. म्हणून ती चारच तत्त्वे चार्वाक मानतात. प्रत्यक्ष हे एकच प्रमाण ते मानतात. अतींद्रिय पदार्थ त्यांना मान्य नाहीत. अर्थात वरील चार भूतांचा एकत्र संयोग होऊन बनलेले शरीर म्हणजेच आत्मा. आत्मा आणखी वेगळा नाही. विषयभोगाने शरीराला सुख देणे हाच मुख्य पुरुषार्थ आहे. त्याकरितां पाप, पुण्य, नीति, अनीति इत्यादि विचार करण्याचे कारण नाही. बुद्धी आणि पौरुष नसणाऱ्या कोणीतरी स्वतःच्या कल्पनेने वेद लिहिले आहेत. म्हणून ते वेद प्रमाण मानत नाहीत. अर्थ व काम हे दोनच खरे पुरुषार्थ आहेत. राजा किंवा मुख्यमंत्री हाच परमेश्वर. त्यांची अनुकूलता संपादून सुख भोगावे. मरण म्हणजे शरीरनाश म्हणजेच मोक्ष. असे सिद्धांत चार्वाकदर्शनामध्ये मांडले आहेत. या मताचे प्रतिष्ठापक प्रधान आचार्य बृहस्पति म्हणून सांगितले जातात.

*प्रश्न : महाराज, हे विचार तर अगदीच उथळ वाटतात, वरवरचे वाटतात. बृहस्पती तर अत्यंत बुद्धिमान म्हणून प्रसिद्ध होते. ते असे विचार कसे काय मांडतील ?*

उत्तर : चार्वाकदर्शन अत्यंत स्थूल दृष्टीने मांडलेले आहे हे खरेच आहे. म्हणून तर महर्षि श्रीवेदव्यासांनी आपल्या ब्रह्मसूत्रांत खंडनीय म्हणून सुद्धा या मताचा विशेष उल्लेख केलेला नाही. वास्तविक पाहतां, उच्छृंखल

समाजाला संयम दाखवून, हळूहळू शास्त्रीय मार्गावर आणण्याकरितांच बृहस्पतींनी चार्वाकदर्शन निर्माण केले आहे. शरीरच आत्मा आहे असे म्हटल्यावर इतर सर्व आत्म्याकरिता आहे. आत्मा मुख्य आहे. म्हणून घरदार, धन इतर वस्तू इत्यादि विषयांवरील आसक्ती कमी केली पाहिजे. शरीररुप आत्म्याचे रक्षण करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. शरीराची उपेक्षा करुन केवळ धनाचा ध्यास घेतच कृपण माणसाप्रमाणे मरुन जाणे हा मूर्खपणा आहे असे सांगून बाह्यवस्तूंचा ध्यास कमी करण्यासाठी चार्वाकमताचा उपयोग होणं शक्य आहे. अर्थशास्त्राला व कामशास्त्राला प्राधान्य या मतात आहे. पण अर्थ आणि काम यांचा बेसुमार उपभोग घेत राहिले तर शरीर किती काळ राहील हा विचार करावा.आहार व विहार युक्त ठेवावे. शरीरप्रयत्न युक्त ठेवावे. संयम करावा. नाहीतर शरीर फार काळ टिकणार नाही. 'यावज्जीवेत् सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः?' हा सिद्धांत चार्वाकांनी मांडला आहे. पापपुण्याची चाड न बाळगता विषयभोग इष्ट असला तरी त्याचा अतिरेक केव्हाही इष्ट असणार नाही. याकरिता शरीरात्मवाद्यांनाही संयम करावाच लागेल. बृहस्पतींनी हे मूळ हेतू समोर ठेवून चार्वाकदर्शन मांडले आहे. या मूळ उद्देशांचे स्पष्टीकरण चार्वाकांनी केले नाही. विषयप्रवण लोकांचे जीवन पूर्णतया अनर्थपर्यवसायीच होते. 'मूर्खं छन्दोनुरोधेन' या न्यायाने विषयप्रवण लोकांना प्रथम केला जाणारा उपदेश म्हणजे चार्वाकदर्शन. बृहस्पतींनी त्यासाठी चार्वाकदर्शन मांडले. परंतु विषयप्रवण लोकांनी अंशतः तरी संयम शिकावा म्हणून एखादी विशिष्ट आचरणप्रणालीही चार्वाकांनी समाजापुढे मांडली नाही. केवळ उच्छृंखलतेला पोषक विचारांचाच पुरस्कार करीत राहिले. त्यामुळे बृहस्पतींचा मूळ उद्देश झाला नाही आणि चार्वाक अत्यंत स्थूल

दृष्टीचे नास्तिक ठरले. म्हणूनच भारतात चार्वाकांच्या विचारांचे स्वतंत्र अस्तित्व टिकू शकले नाही.

*प्रश्न : महाराज, आत्मज्ञान झालेला पुरुष व्यवहारांत उतरला तर त्याला व्यवहारातही यश मिळते कां ?*

उत्तर : जगांतले सर्व व्यवहार खरे ज्ञानी महात्मे मिथ्या समजतात. तत्त्वज्ञान झाल्यावर व्यवहार संपलेच. व्यवहारच जिथे नाही तिथे तो व्यवहार खरा आहे हे कोण समजणार ? तत्त्वज्ञानी माणसाच्या मनांत व्यवहार असा काही नाही. मनामध्ये रजोगुण, तमोगुण जोपर्यंत आहेत, तोपर्यंत सगळा व्यवहार दिसतो आहे, भासतो आहे आणि त्या व्यवहाराचं सत्यत्व भासतं आहे. सुख मिळालं, दुःखं मिळालं, दुःख गेलं, सुख जास्ती झालं या वासना सगळ्या मनांतच उत्पन्न होतात. हे सुख आणि दुःख केवळ मनांतील वासनांमुळे वाटतं. त्यामुळे आपण कर्मे करीत रहावे असे वाटते. मग संसार खरा वाटतो. मग सगळे व्यवहार खरे वाटतात.

जोपर्यंत चित्ताला त्या आत्मस्वरुपाचं भान होत नाही, तोपर्यंत व्यवहार खरा वाटतो आहे. व्यवहार खरा वाटतो त्याला कारण म्हणजे हे मन आहे. मनानेच हे सगळं खरं मानलं आहे. त्यामुळे व्यवहार हे खोटे आहेत असे ज्ञानी महात्मे जे सांगत आहेत, ते आम्हाला पटत नाही.

परंतु हे मनच आत्मस्वरुपाचं ज्ञान करुन देऊ शकतं. मनच संसारताप दूर करुन आत्मस्वरुपाचा अनुभव देऊ शकतं. सद्गुरुंची किंवा श्रीहरींची उपासना त्यासाठीच आहे. भक्तीच्या मार्गाने मनावर नियंत्रण ठेवता येतं आणि आत्मज्ञानापर्यंत जाता येते.

*प्रश्न : महाराज, आमचे हित कशांत आहे हेच आम्हाला कळत नाही. पुण्यकर्मे कोणती करायची हेही आम्हाला कळत नाही. आम्ही काय करायचे ?*

उत्तर : कायद्याचे ज्ञान सगळ्यांना नसते म्हणून आपण वकीलाकडे जातो. वकील कायद्याचा अभिप्राय काय आहे ते सांगतो. अनुकूल काय आहे, प्रतिकूल काय आहे हे संदर्भाप्रमाणे वकील सांगतो आणि त्याप्रमाणे आपण पुढे वागतो. प्रत्येक गोष्टीला कायदा आहे. ईश्वराला जो कायदा आहे तो वेदशास्त्ररुप आहे. परंतु शास्त्रे स्वतः वाचणे सगळ्यांना शक्य नाही. म्हणून संतमहात्म्यांकडे जावे. ते मार्गदर्शन करतात, उपदेश करतात. वेदशास्त्रात काय आहे ते सांगतात. ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज यांनी पुष्कळ उपदेश करुन ठेवलेला आहे. तो उपदेश ऐकणे, वाचणे, शंकांचे समाधान करुन घेणे, हे करायचे. त्याप्रमाणे कर्मे करायची.

'संसर्गणा दोषगुणा भवन्ति' असे शास्त्रकार सांगतात. संतमहात्म्यांच्या संगतीत बुद्धीवर चांगले संस्कार होतात. बुद्धीची सुधारणा होते. बुद्धी सात्विक बनवायची. राजस तामस बुद्धीचा परिहार करायचा. म्हणजे कर्म सुधारते. महात्म्यांच्या संगतीत बुद्धीवर चांगले संस्कार होतात आणि आपलं अंत:करण आणि इंद्रिये चांगल्या कर्माकडे प्रवृत्त होतात.

*प्रश्न : महाराज, पुण्यकर्मे केली म्हणजे बुद्धी शुद्ध होते कां ? हातून पुन्हा पाप घडत नाही कां ?*

उत्तर : बुद्धी शुद्ध होण्याकरता शास्त्रकारांनी पुण्यकर्मे सांगितली आहेत. पण पुण्यकर्मांनी बुद्धी शुद्ध करायची म्हणजे कठीण असतं. अनेक जन्माचे दोष बुद्धीतून भरलेले असतात. पुन:पुन्हा दोष होत असतात. ते दोष जायचे

कसे ? तांब्याचे भांडे अनेक दिवस घासलेलं नसतं. पुटावर पुटं चढलेली आहेत. ते स्वच्छ करायला चिंच बिंच लावून किती वेळा घासावं लागतं.

पण ईश्वरशक्ती समर्थ आहे. ईश्वराला दया आली की मलीन बुद्धी शुद्ध होऊन जाते. अनेक जन्मांचे पापसंस्कार जरी असले तरी ते पापसंस्कार नाहीसे करण्याचे सामर्थ्य भगवंताच्या भक्तीमध्ये आहे. म्हणून भगवंताचं नामसंकीर्तन करायचं, गुणसंकीर्तन करायचं. मग मनांतले पापसंस्कारही नाहीसे होतात. मग पुन्हा हातून पाप घडत नाही.

*प्रश्न : महाराज, पुण्यक्षेत्री राहून साधकाने सत्कर्मे करावीत असे कां सांगतात ?*

उत्तर : पुण्यक्षेत्री राहून सत्कर्म केले तर फळ जास्त मिळते. महापुरुष संतमहात्मे जेथे राहिले आहेत, त्या स्थानाचा महिमा असतो. त्या स्थानामध्ये राहून तेथे अनुष्ठान केलं, नामस्मरण केलं तर अधिक फळ मिळते. इतर ठिकाणी आपल्या कर्मामुळे प्रतिबंध येतात. विघ्ने येतात. पण ईश्वराच्या स्थानात ईश्वरकृपेने ते प्रतिबंध दूर होतात, अभ्यास चालू रहातो. नरसोबाच्या वाडीला अनेक संतमहात्मे राहिले होते. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजही तिथे रहात होते. मौनीस्वामी, दीक्षितस्वामीमहाराज अनेक संतमहात्मे तिथे राहिले आहेत.

*प्रश्न : महाराज, मनांत फार येतं की नरसोबाच्या वाडीला काही दिवस रहावं?*

उत्तर : अशा ठिकाणी रहातांना साधनेकडेच लक्ष देऊन राहिले पाहिजे. लोकांचा उपसर्ग झाला तरी तितिक्षेने रहायला पाहिजे. मनांत तळमळ असली पाहिजे. मग ईश्वराच्या कृपेने साधनाभ्यास अखंड चालू राहतो, दृढ होत जातो, साक्षात्कार मुक्ती वगैरे सर्व प्राप्त होतं. पण त्यासाठी तेथेच

रहायला पाहिजे असे नाही. सद्गुरुंच स्मरण जर अखंड राहिलं तर देहानं कोठेही राहिलं तरी काय त्याचं ?

*प्रश्न : महाराज, उपासना पक्की झाली असं केव्हा म्हणता येईल ?*

उत्तर : शास्त्रकार सांगतात मनांतला संसारभ्रम सगळा दूर झाला पाहिजे. ईश्वराची उपासना करण्याकडे अखंड लक्ष लागलं पाहिजे. मी उपासना करतो आहे अशी कर्तृत्वभावना नाहीशी झाली पाहिजे. उपासनेचं कर्तृत्व मनांतून पूर्णपणे गेलं पाहिजे. मी उपासना करणारा आहे असे जोवर वाटते आहे तोवर उपासना पक्की झाली असं म्हणता येणार नाही. प्रल्हादजींनी सांगितलं, ''मी भक्ती करीत नाही. हृदयस्थ जो श्रीहरी परमात्मा आहे, त्याच्या इच्छेनं भजन चाललंय. मी काहीही करीत नाही.'' हे खरे ज्ञान आहे. भक्तीच्या भूमिकेवर असूनसुद्धा प्रल्हादजी ज्ञानी आहेत. कर्तृत्व आपलं नाही म्हणतात.

उपासना मार्गाला आपण लागलो आहोत तेही सद्गुरुंच्या कृपेनं. त्यांच्या कृपेनेच उपासना भक्ती आपल्या हातून घडते आहे ही बुद्धी अंत:करणांत निरंतर ठेवूनच उपासना झाली पाहिजे.

*प्रश्न : महाराज, मनाला पूर्ण शांती केव्हा लाभेल ?*

उत्तर : संसारातून मन बाजूला झालं, वित्त भ्रम सोडला आणि मन ईश्वरस्वरुपाच्या ठिकाणी लावलं तरच शांती मिळणार. सर्व काही ईश्वर आहे ही भावना मनांत झाली की मग 'शत्रूमित्र', 'अनुकूल-प्रतिकूल' असं काही राहातच नाही. मग कोणीही कितीही त्रास दिला तरी मनावर परिणाम होत नाही. मग मन शांतच राहतं. जोवर मनांत अहंकार आहे. तोवर रागद्वेषादि विकार मनांत असतात. अहंकारामुळे संसार होतो. जर महात्म्यांची कृपा

झाली तर संसार बाजूला होतो आणि ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर होतं. मग फक्त आनंद. काय मिळवायचं ते त्यांनीच मिळविलेलं आहे.

*प्रश्न : महाराज, आमच्या मनांतील संसाराची आसक्ती जावी म्हणून आम्ही काय करावे ?*

उत्तर : त्यासाठी महात्म्यांचा सहवास उपयोगी पडतो. वर्षातून काही काळ कां होईना, पण अशा ज्ञानीमहात्म्यांचा सहवास घेतला पाहिजे. सतत त्यांचं अनुसंधान करायला पाहिजे. चिंतन करायला पाहिजे. या ज्ञानी महात्म्यांचं मन कसं झालेलं आहे ? तेवढं आपलं मन कसं होईल ? त्यांच्या मनात संसाराबद्दल पूर्ण उपेक्षा कशी आहे ? संसार त्यांच्या मनांत नाहीच आहे. संसारातून त्यांच मन मोकळं झालेलं आहे आणि ईश्वराच्या ठिकाणी स्थिर झालेलं आहे. संसाराबद्दल कसलीच आसक्ती त्यांच्या मनांत नाही. त्यांच्याजवळ इतकी विरक्ती आहे.

जेवढं चिंतन होईल तेवढं करायचं. संसारातून मन बाजूला काढणं आणि परमात्म्यांच्या ठिकाणी ते मन स्थिर करणं ही दोनच साधनं आहेत. या दोन साधनांनीच होतं. त्यासाठी सद्गुरुंचं सहाय्य पाहिजे. ईश्वरभक्ती, गुरुभक्ती त्यासाठीच पाहिजे.

*प्रश्न : महाराज, ''वित्तभ्रमा सोडीती ते कृतार्थ'' असं वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज म्हणतात. वित्तभ्रम म्हणजे काय ?*

उत्तर : वित्त म्हणजे द्रव्य, धन. शास्त्रकार सांगतात दोन भाग आहेत. मानुष वित्त आणि दैवीवित्त. शेतीवाडी, घरदार, द्रव्य वगैरे सगळं मानुष धन आहे. ते सुखाचं साधन आहे असं आपल्याला वाटतं. म्हणून आपण ते संपादन करायच्या मार्गाला लागतो. त्यांतून सुख मिळेल असं आपल्याला वाटतं. पण तो सगळा भ्रमच असतो.

दैवीवित्त म्हणून एक आहे असे सांगतात. देवानं दिलेलं वित्त म्हणजे उपासना भक्ती. ज्यानं ईश्वरभक्ती मिळवलं आणि मानुषवित्ताकडे लक्ष ठेवलेलं नाही त्यालाच खरा आनंद मिळणार. शुद्ध भक्ती, प्रार्थना, उपासना हे दैवीवित्त सद्गुरुंच्या कृपेनेच प्राप्त होते. सद्गुरुंच्या कृपेनं मनांतला संसार बाजूला झाला आणि चित्त ईश्वराच्या ठिकाणी स्थिर झालं की खरा आनंद मिळतो. ज्यांनी ही अवस्था मिळवली त्यांनीच काय मिळवायचं ते मिळवलं. तेच कृतार्थ झाले.

*प्रश्न : मनाचा निग्रह कसा करायचा महाराज ?*

उत्तर : शरीराचा निग्रह, मनाचा निग्रह, वाणीचा निग्रह हा सगळा साध्य व्हावा अशी इच्छा पाहिजे, तळमळ पाहिजे. म्हणजे ईश्वराच्या कृपेनं साध्य होऊ शकतं. मनाला, वाणीला, आवरण्यासाठी स्वतःच स्वतःचे निरीक्षण करीत रहायचे. आपण वागतो ते सगळं बरोबरच आहे अशी समजूत करुन घेतली तर सुधारणा होणारच नाही. मनाचे निरीक्षण करुन दोष, उणीवा घालवण्याकरीता जे प्रयत्न करताहेत त्यांच्यावर प्रसाद होतो.

*प्रश्न : महाराज, धर्माने वागले तरच जीवनांत सुख मिळते असे शास्त्रकारांना* सांगायचे आहे कां ?

उत्तर : न्यायाने धर्माने वागणाराच सुखी होतो असे महाभारतांत सांगितले आहे. कौरव अधर्माने वागले. अन्यायाने वागले. म्हणून राज्य, सत्ता, संपत्ती मिळवूनही ते सुखी होऊ शकले नाहीत. परंतु पांडव धर्माने वागले, न्यायाने वागले. म्हणून वनवासांतही ते सुखीच राहिले. दुःखांतही ते समाधानाने राहू शकले. वनवासांतही त्यांनी सत्कर्मे केलेली आहेत. धर्म सोडला नाही शेवटपर्यंत. कृष्णभक्ती होती. त्यामुळे मनाचं समाधान होतं. धर्माने, न्यायाने वागणाराच सुखी होतो हे महाभारताचं सार आहे.

रामायणांतही तेच सांगितलं. न्यायाने वागणाऱ्याला, धर्मशील महात्म्याला पशुपक्षीही सहाय्य करतात. वानरांनीसुद्धा रामरायाला सहाय्य केलं. प्रत्यक्ष मूर्तीमंत धर्म म्हणजे राम आहे असे वाल्मिकींनी वर्णन केलंय. उलट धर्ममार्ग ज्या रावणाने सोडला त्यांच काय झालं ? केवढी शक्ती, केवढी सत्ता, केवढे वैभव मिळाले होते, पण समाधान मिळालं नाही. शेवटी सगळा विनाश झाला.

धर्माने, न्यायाने वागल्याशिवाय समाधान मिळत नाही. म्हणून धर्माने, न्यायाने वागण्याची बुद्धी ईश्वराकडे मागायची.

प्रश्न : महाराज, पाश्चात्यांनी सांगितलेला बुद्धीवाद चुकीचा आहे कां ? पाश्चात्यांनी केलेल्या सुधारणा भारतांत न आणणेच बरे असे म्हणता येईल कां ?

उत्तर : पाश्चात्यांनी जो बुद्धीवाद सांगितला आहे त्यात मोक्ष हा पुरुषार्थ मानलेला नाही म्हणतात. अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थच डोळ्यासमोर ठेवून त्यांचा प्रयत्न चालला आहे. त्यांच्या ज्या काही सुधारणा म्हणून आम्ही समजतो त्या सुधारणा इथेही झाल्या पाहिजेत असे आपल्याला वाटते.

आधुनिक बुद्धीवादांत सगळाच दोष आहे असे नाही. पण केवळ इहवाद उपयोगाचा नाही. केवळ या जन्माचा विचार करुन भागणार नाही. काहीतरी परमार्थ दृष्टीने विचार केला गेला पाहिजे. तो व्यक्तीलाही उपयोगी आहे आणि समाजालाही उपयोगी आहे. हाच आमचा धर्म आहे. त्यांत कोणाचा द्वेषही नाही आणि विरोधही नाही हे समजून घेतलं पाहिजे. केवळ एकटयाने सुखी व्हावे ही आसुरी वृत्ती झाली. ते जाऊन देवबुद्धी आली पाहिजे. संस्कारीत बुद्धी आली पाहिजे. धर्मानुकूल वागण्याची बुद्धी

आली पाहिजे. त्यासाठीच संतांचे प्रयत्न चालले आहे. ईश्वराचीही तशीच इच्छा आहे. ईश्वरसुद्धा त्यासाठीच अवतार घेऊन पुनःपुन्हा धरतीवर येत आहेत.

*प्रश्न : महाराज, भगवंत गीतेत सांगतात 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।' इथे आत्मा या शब्दाचा अर्थ काय घ्यायचा ?*

उत्तर : इथे आत्मा या शब्दाचा अर्थ बुद्धी असा घ्यायला पाहिजे. रोज आपल्या बुद्धीनेच आपले निरीक्षण करायचे. माझे वागणे सत्पुरुषाप्रमाणे झाले कां? असे विचार केले तरच शांत झोप लागते. नाहीतर नाही. माझ्याविरुद्ध जो वागला त्याला मी सरळ कसा करेन याचा विचार जर करत राहीलं तर झोप यायचीच नाही. अशा विचारांचा काहीही उपयोग नसतो. अशा बुद्धीने वागले तरच आपण आपला उद्धार करुन घेऊ शकतो. सर्व संतमहात्मे याच बुद्धीने वागले आणि ईश्वररुप झाले. ईश्वररुप झाल्यावर मग दुःख नाही. काही नाही.

*प्रश्न : महाराज, ही शुद्ध बुद्धी पुढील जन्मातही बरोबर येते कां ?*

उत्तर : आपण जे 'अर्थ' आणि 'काम' मिळवतो ते येथेच सोडून जावे लागते. पण बुद्धी मात्र आपल्याबरोबर पुढील जन्मांत येत असते. म्हणून 'अर्थ' आणि 'काम' या पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठी बाहेरच्या व्यवहारावर जास्त लक्ष देऊ नये. त्यापेक्षा आपण आपली बुद्धी शुद्ध करण्यावर अधिक लक्ष दिले पाहिजे. चांगली बुद्धी घेऊन पुढच्या जन्मात गेलो तर पारमार्थिक उन्नतीसाठी आपण आणखी प्रयत्न करु शकतो. सर्व संतमहात्मे हेच सांगताहेत. जे बुद्धी शुद्ध करतात, तेच सर्व दुःखांतून मुक्त होतात. सर्व दुःख जाणे हेच खरे फळ आहे. सर्व पुराणांत, महाभारतात हेच सांगितले

आहे. हेच खरे ज्ञान आहे. त्या ज्ञानापासून आपण दूर जात आहोत ही फारच खेदाची गोष्ट आहे.

*प्रश्न : हे ज्ञान वाढविण्यासाठी काय करावे महाराज ?*

उत्तर : संस्कृत भाषेपासून राजशासन इतके दूर गेले आहे की शास्त्रग्रंथांकडे, पुराणांकडे, महाभारताकडे कोणाचे लक्षच जात नाही आहे. प्राचीन श्रेष्ठ माणसे कशी वागली हे जाणून घेण्याची जिज्ञासाच लोप पावत चालली आहे. व्यासांसारख्यांनी लिहिलेली पुराणे, महाभारत वाचण्याची योग्यता असलेली माणसेही कमी कमी होत चालली आहेत.

वास्तविक या ग्रंथात सगळे प्रयोगशास्त्रच सांगितले आहे. प्रयोग करुन कोणीही पाहू शकेल. पण फार थोडी माणसे तसे प्रयोग करुन सुखी होत आहेत. बाकीचे प्रयोग न करताच नुसती टीका करताहेत, निंदा करताहेत. नाही नाही म्हणून नास्तिक बुद्धी दाखवणे चूकच आहे. महात्म्यांच्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे. आपल्याला प्रयोग करता येत नसेल तर महात्म्यांकडून आस्तिक बुद्धीने प्रयोग कसे करायचे याचे मार्गदर्शन घ्यायला पाहिजे.

*प्रश्न : महाराज, आमच्या मनांतील वासना आम्ही कशा घालवाव्या ?*

उत्तर : मनांत सारख्या वासना निर्माण होत असतात. त्या वाढतच रहातात. त्यामुळे अनेक जन्म घ्यावे लागत असतात. पण कितीही जन्म घेतले तरी वासना काही कमी होऊ शकत नाहीत. एक वासना मनांत आली, वाढली, तृप्त झाली की लगेच मनांत दुसरी वासना येते. हे चक्र असेच चाललेले आहे.

भक्ती हेच एक वासनाक्षयाचे साधन आहे. व्यास म्हणतात, "सर्व वेदवाङ्मय मी पाहिलं आणि त्यांतून भगवद्‌भक्ती करावी असे तात्पर्य

मला मिळालं. त्यामुळेच मी कृतार्थ झालो.'' सर्व वेदवाङ्मय ज्यांच्या बुद्धीत आहे ते व्यास हा आपला अनुभव सांगताहेत. हा अनुभव अनेक संतांनी घेतला आहे. आजही हा अनुभव घेतलेली मंडळी आहेत. मी कोणत्या मार्गाने गेलो. माझ्या मनांतील सर्व वासना भगवद्‌भक्ती केल्यामुळे कशा नाहीशा झाल्या आणि शांती मला कशी मिळाली हे अनुभव सांगणारी मंडळी भेटणे हेही मोठे भाग्य आहे.

*प्रश्न : वासना पूर्ण नाहीशा झाल्यावर जीवदशा संपते कां महाराज ?*

उत्तर : ज्या महात्म्याच्या मनांत कोणतीच वासना शिल्लक राहिलेली नाही त्याची जीवदशा संपते. तो ईश्वररुपच होऊन जातो. त्याच्यासमोर मग जग म्हणून काही उरतच नाही. मन पूर्णपणे शुद्ध होतं. अंत:करण इतकं त्या आनंदात निमग्न होतं की त्या आनंदामुळे सगळ्या शारीरिक, मानसिक व वाचिक क्रियांचाही विसर पडतो. त्या क्रिया आपोआप बंद होतात. ही स्थिती भक्तीनेच येते.

*प्रश्न : महाराज, वाणीच्या तपाने वाचासिद्धी मिळते म्हणतात तसे होते काय ?*

उत्तर : वाणीच्या तपाने वाणीत सामर्थ्य प्राप्त होते. त्यांच्या मुखातून जे निघेल ते खरे होते. हीच वाचासिद्धी. ज्ञानेश्वरमहाराजांनी ती मिळवली होती. अनेकांनी मिळवली होती. आजही तसे अनेक महात्मे आहेत.

*प्रश्न : अशा महात्म्यांचा उपदेश जास्त फलदायी असतो कां महाराज ?*

उत्तर : वाणीचे तप केलेल्या महात्म्यांच्या शब्दांत सामर्थ्य आहे. त्यांचा उपदेश ऐकायच्या वेळी मन स्तब्ध होते. खरे आहे असे वाटते. पण खरं आहे असे वाटून तसे आचरण मात्र सर्वांचे घडत नाही. त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण घडायला चांगले प्रारब्ध पाहिजे, पूर्वसुकृत पाहिजे,

शुद्ध बुद्धी पाहिजे. शुद्ध अंतःकरण पाहिजे. तरच आचरण घडायचे. तरच हातून कांही तप घडायचे.

*प्रश्न : महाराज, प्रेम टिकविण्यासाठी दूर राहिलं पाहिजे असं कां सांगतात ?*

उत्तर : जास्त निकटचं सान्निध्य असल्यानंतर प्रेम टिकत नाही असा सिद्धांत आहे. म्हणून प्रेम टिकविण्याकरता दूर राहिलं पाहिजे असं सांगतात. सगळ्या गोपींना दूर मुद्दाम ठेवलंय भगवंतांनी. समर्थांनी कल्याणस्वामींना अगोदरच डोंगरावर पाठवून दिलं. तू तिथं रहा म्हणाले. केवढा शिष्य, केवढा त्यागी भक्त आहे. पण नाही. त्याला बाजूला ठेवलं.

*प्रश्न : महाराज, परब्रह्म निर्गुण व निराकार आहे असे सांगतात. परब्रह्म निर्गुण आहे याचा अर्थ परब्रह्माच्या ठिकाणी कोणतेही गुण नाहीत असा होतो कां ?*

उत्तर : परमेश्वर निर्गुण आहे याचा अर्थ परब्रह्माच्या ठिकाणी कोणतेही गुण नाहीत असा नाही. शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, "निर्गुण सत्वरजतमांसि गुणाःतैर्वणिज्ञस् ।" सत्व, रज आणि तम हे तीन गुण मायेचे आहेत. ते परब्रह्माच्या ठिकाणी नाहीत. म्हणून निर्गुण आहे. उपनिषदकार सांगतात - परब्रह्म सत् (म्हणजे कायमचे) आहे, चित् (म्हणजे स्वयंप्रकाशी) आहे, आनंदरुप आहे, अव्यक्त आहे, अचिंत्य आहे, अविकारी आहे, अनंत आहे, सर्वज्ञ आहे, सर्वशक्तिमान आहे. हे गुण परब्रह्माच्या ठिकाणी आहेतच.

*प्रश्न : महाराज, ब्रह्म आहे हे सिद्ध कसे करायचे ?*

उत्तर : संतांनी, ऋषीमुनींनी सांगितले आहे. शब्द प्रमाण आहे. त्याला विरोधी प्रमाण जोवर मिळत नाही तोवर ते प्रमाण मानलंच पाहिजे. ब्रह्म नाही असे सिद्ध करणारे प्रमाण कोठे आहे ? ब्रह्मपदार्थ म्हणजे काय आहे

हे माहिती आहे काय? ज्याची माहितीच नाही ते नाहीच असे कसे म्हणता येईल. सर्व पदार्थांना देश, काळ या मर्यादा आहेत. परंतु ब्रह्म ही एकच वस्तू अशी आहे ज्याला या मर्यादा नाहीत. एकही पदार्थ ब्रह्मासारखा नाही. हे सगळं संतमहात्म्यांनी अनुभव घेऊन सांगून ठेवलंय. सद्गुरुंच्या शब्दामुळे ब्रह्म कळू शकते. पण त्या शब्दांवर श्रद्धा पाहिजे.

*प्रश्न : महाराज, ब्रह्म बुद्धीने समजून घेता येते कां ?*

उत्तर : ब्रह्म बुद्धीनेच समजून घ्यायचे आहे. त्यासाठी बुद्धी शुद्ध करायला हवी. बुद्धीला काही कारणांनी मलीनपणा आला आहे. तो मलीनपणा घालवला पाहिजे. तो घालवता येतो. अमलीन बुद्धी शुद्ध झाली की त्या शुद्ध बुद्धीने ब्रह्म कळू शकते, आत्मा कळू शकतो, असे उपनिषदे सांगतात. बुद्धीत योगशक्ती उत्पन्न झाली की सारे कळू शकते.

*प्रश्न : महाराज, आम्ही आमची बुद्धी अशी शुद्ध कशी करुन घ्यायची ?*

उत्तर : बुद्धीतील रजोगुण आणि तमोगुण गेले की बुद्धी शुद्ध होते. सत्वगुण वाढवला पाहिजे. साधकाने त्यासाठी काय करायचे ते सद्गुरुच सांगणार. गीतेच्या बाराव्या अध्यायात शुद्ध बुद्धीची लक्षणे सांगितली आहेत. अद्वेष्टा सर्वभूतानाम वगैरे. सद्गुरुंच्या उपदेशाप्रमाणे वागले तर बुद्धी तितकी शुद्ध करता येईल.

*प्रश्न : मनाने बुद्धीनेच सगळे मिळवायचे कां ?*

उत्तर : जशी मनाने भावना करावी तसे वाटते. नास्तिक माणसाला ईश्वरप्राप्तीची बुद्धी नाही. त्यामुळे त्याला सगळेच नाहीसे होऊन तो अधोगतीला जातो. पण ईश्वर आहे म्हटल्यावर भगवंतांनी सांगितलेला सगळा साधनामार्ग आहे. मग तसे आचरण घडत जाते आणि फलप्राप्ती होते. मनाने बुद्धीने सगळे मिळवायचे आहे.

*प्रश्न : म्हणजे श्रद्धा सर्वात महत्वाची कां ?*

उत्तर : ईश्वरावर विश्वास ठेवावा, श्रद्धा ठेवावी असे शास्त्र सांगते. मुख्य अंतरंग साधन म्हणजे श्रद्धा आहे. बाकीच्या साधनांपेक्षा श्रद्धा हे साधन मुख्य आहे. श्रद्धेनेच लौकर होते.

*प्रश्न : संसार भ्रम कसा जाईल महाराज ?*

उत्तर : सद्गुरुंचा प्रसाद जर झाला तरच संसारभ्रम पूर्णपणे नाहीसा होतो. सद्गुरुंचा प्रसाद होऊन मार्गदर्शन मिळाल्यावर जीवाकडून प्रयत्न घडतात. ते प्रयत्नही अखंड दीर्घकाळ व्हावे लागते. कृपेमुळेच ते शक्य होते. नाहीतर सारखे चाललेच आहे. ''पुनरपि जननं पुनरपि मरणम् ।'' भक्तीच तारुन नेऊ शकते.

*प्रश्न : आत्मस्वरुप अज्ञानाने झाकले आहे म्हणून समजत नाही कां महाराज ?*

उत्तर : आत्मस्वरुप जे आहे ते अज्ञानाने झाकलेले आहे असे वाटते. पण स्वयंप्रकाशीत आत्मा अज्ञानाने कसा झाकला जाईल ? सूर्यावर मेघ आले की आमची दृष्टी सूर्यापर्यंत जाऊ शकत नाही. म्हणून सूर्य दिसत नाही. पण मेघांनी सूर्याला झाकलेले नसून आपल्या दृष्टीला झाकलेले आहे. तसे परमात्म्याला आत्मस्वरुपाला पाहणारे जे भक्त आहेत, त्यांची बुद्धी इंद्रिये आवृत्त झाली आहेत. म्हणून ती आत्मस्वरुप पाहू शकत नाहीत. तो स्वयंप्रकाशी सर्वव्यापी सर्वज्ञच आहे.

*प्रश्न : ''अभयं सत्वसंशुद्धी'' असे कां म्हटले आहे महाराज ?*

उत्तर : ईश्वराच्या भक्ताला कसली भीती ? भीती मनांत असली तर ती काढून टाकावी. दैवी सपंत्तीचे अभय हे मुख्य लक्षण आहे. अभय ही

देवाने दिलेली संपत्ती आहे. निर्भय झाले पाहिजे भक्तांनी. कशाचीही भीती नको. अगदी मृत्युचीही भीती नको.

*प्रश्न : गोपींसारखी स्मरणभक्ती असली की इंद्रिये आवरता येतात कां महाराज ?*

उत्तर : भगवान गोपालकृष्णांच्या भक्तीत गोपी रंगून गेल्यावर त्यांना सर्वत्र गोपालकृष्णच दिसू लागले. सगळ्या जुन्या आठवणी आल्या. या झाडाखाली गोपालकृष्ण उभे राहिले होते, तिथे मुरली वाजवली, इथे आमच्याशी बोलले होते. स्मरणभक्तीत मनाला इंद्रियांना आवरण्याची गरजच रहात नाही. हे या भक्तीचे वैशिष्ट्य आहे.

*प्रश्न : महाराज, शास्त्रे मूळातून वाचून, समजून घेणे कठीण वाटते. आम्ही काय करावे ?*

उत्तर : वेदांतून, शास्त्रांतून जे सांगितले आहे तेच संतमहात्म्यांनीही सांगितले आहे. ज्ञानदेव, एकनाथमहाराज अशा संतांनी करुन ठेवलेले ग्रंथ वाचावे. ज्ञानेश्वरी आहे, एकनाथी भागवत आहे. त्यांत सगळे दिलेले आहे. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग सगळे विवेचन आहे. सामान्य माणसाने भक्तीमार्गाने जावे हेही त्यांनी सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, परब्रह्म जर एकमेव सत्य वस्तू आहे तर त्या परब्रह्मासंबंधीचे विचार म्हणजे अध्यात्मविचार सांगणारे संत व पंडीत वेगवेगळे विचार कां सांगतात ? सर्वांच्या सांगण्यात एकवाक्यता कां आढळत नाही ? भिन्न भिन्न अध्यात्मविचार कां सांगितले जातात?*

उत्तर : परब्रह्म ही वस्तू अत्यंत सूक्ष्म आहे. सूक्ष्म म्हणजे खूप लहान. परब्रह्म किती सूक्ष्म आहे हे श्वेताश्वर उपनिषदात सांगतात. केसाच्या शंभराव्या भागाचाही शंभरावा भाग जेवढा लहान असतो, त्याच्यापेक्षाही

परब्रह्म लहान आहे. ब्रह्म इतके सूक्ष्म आहे. तेव्हा ब्रह्माबद्दलचे यथार्थ विचार समजून घ्यायला, सांगायला तशी सूक्ष्म बुद्धी असावी लागते.

अध्यात्मविचार सांगणे सोपे नाही. साधारण बुद्धीला पटत नाही. यथार्थ आकलन होत नाही. मग यथार्थ अध्यात्मविचार स्वतःच्या बुद्धीत स्फुरणे आणि ते योग्य शब्दांत सांगणे दूरच रहाते. निष्काम धर्माचरण केले, वैराग्य प्राप्त झाले म्हणजेच बुद्धी सूक्ष्म होते. सूक्ष्म बुद्धीलाच अध्यात्मविचारांचे आकलन होते. जे धर्माचरणी आहेत, पूर्ण वैराग्य ज्यांना प्राप्त झाले आहे अशा संतांची बुद्धीच सूक्ष्म असते. संतमहात्म्यांची अनुभूती एकच असते. त्यांनी सांगितलेले अध्यात्मविचार भिन्न रहात नाहीत. सगळे संतमहात्मे तेच सांगताहेत. सर्व संतमहात्म्यांचे सांगणे एकच आहे. हे कळायलाही आपली बुद्धी सूक्ष्म असावी लागते. त्यासाठीच धर्माचरण करायला सांगतात.

प्रश्न : महाराज, आमच्याजवळ वैराग्यही नाही व सूक्ष्म बुद्धीही नाही. मग आम्ही अध्यात्मविचारांचे आकलन कसे करुन घ्यायचे?

उत्तर : आपण आपल्या अशुद्ध बुद्धीचा भरंवसा बाळगू नये. संतांच्या वचनांना पूर्ण मान द्यावा. त्यांच्यावर श्रद्धा ठेवावी. पूर्ण श्रद्धेने श्रवण करावे.

*प्रश्न : महाराज, काही बुद्धीवादी लोकांना वाटते श्रद्धा फक्त भाबड्या अशिक्षित* लोकांसाठीच आहे. त्यांना श्रद्धावंतांचा उपहास करावासा वाटतो.

उत्तर : केवळ बुद्धीवादी असं कोणी नसतंच. भगवंत गीतेत सांगतात 'श्रद्धामयं पुरुषः ।' मनुष्य श्रद्धावानच आहे. जशी मनुष्याच्या ठिकाणी बुद्धी ही स्वाभाविक असते, तशीच श्रद्धाही स्वाभाविक असते. प्रत्येकाची

कुठे ना कुठे श्रद्धा असतेच. भक्ताची भगवंतावर असते. बुद्धीवाद्यांची त्यांच्या ग्रंथांवर, त्यांतल्या विचारांवर असते.

*प्रश्न : महाराज, काही बुद्धीवादी लोक श्रद्धावंत पुरुषाची अंधश्रद्धा ठेवणारा म्हणून हेटाळणी करतात.*

उत्तर : जोवर भगवंताचे स्वरुप पूर्णपणे जाणून घेतलेले नाही, जोवर मनांतील विषयांची आसक्ती पूर्णपणे गेलेली नाही, तोवर आपली श्रद्धा अंधच असते. एक आत्मज्ञानी पुरुषच खरा डोळस श्रद्धावंत असतो. धर्माचरण करुन आपली बुद्धी ज्याने शुद्ध करुन घेतली आहे आणि ज्याने संतांच्या वचनांवर पूर्ण विश्वास ठेवून त्या वचनांतील सिद्धांत ज्याने जाणून घेतले आहेत, तोच पुरुष खरा बुद्धीवान आहे. तोच खरा डोळस श्रद्धावान आहे. बाकीच्यांना अंधश्रद्धाळूच म्हणावे लागेल.

*प्रश्न : महाराज, भगवंत गीतेत सांगतात 'श्रद्धावान लभते ज्ञानम् ।' म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी बुद्धीचा वापर करुच नये असे भगवंतांना सांगायचे आहे कां ?*

उत्तर : संतांची वचने श्रद्धेने श्रवण करणे या एकाच मार्गाने आत्मज्ञान प्राप्त होऊ शकते. माणूस कितीही बुद्धीवान असला तरी त्याच्या बुद्धीत विकार असतात. त्यामुळे ती बुद्धी अशुद्धच असते. अशुद्ध बुद्धीने आत्मज्ञान होऊ शकत नाही. श्रीगुरुंच्या वचनावर पूर्ण श्रद्धा ठेवली आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे वागावे. तरच आत्मज्ञान होते.

"तद्विज्ञानार्थ । स गुरुमेवाभिगच्छेत् ।" अशी मुंडकश्रुति आहे. आत्मज्ञान मिळविण्यासाठी गुरुला शरण जावेच लागते. आचार्यांनी या श्रुतिवर भाष्य करतांना म्हटले आहे- "शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यात् ।" ज्याने सर्व शास्त्रांचे अध्ययन केले आहे.

अशा पुरुषाने सुद्धा स्वतःच्या बुद्धीच्या सहाय्याने आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करु नये. आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी त्यानेही सद्गुरुंना शरण गेले पाहिजे असे आचार्य सांगतात. "सद्गुरुविणे मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे॥" असे समर्थ रामदासस्वामी सांगताहेत. श्रद्धेशिवाय आत्मज्ञान होतच नाही असा अनुभव अनेक संतांनी सांगितला आहे.

*प्रश्न : महाराज, श्रद्धावान लभते ज्ञानम् असे भगवंत सांगतात. हे भगवंतांना नेमकं काय म्हणावयाचे आहे ? श्रद्धा ठेवल्याशिवाय शब्दज्ञान होत नाही असे भगवंतांना म्हणायचे आहे कां श्रद्धा ठेवल्याशिवाय त्या शब्दज्ञानाची अनुभूती येत नाही असे भगवंतांना म्हणायचे आहे?*

उत्तर : शंकराचार्य स्वामीमहाराजांनी आत्मज्ञानाचे दोन प्रकार सांगितले आहेत. परोक्ष ज्ञान व अपरोक्ष ज्ञान. अनुभवी संतांच्या मुखातून आत्मज्ञानाचे स्वरुप समजून घेणे याला परोक्ष ज्ञान म्हणतात. ते परोक्ष ज्ञान दृढ अभ्यासाने आपल्या ठिकाणी अनुभवणे याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात. श्रद्धेवाचून यथार्थ परोक्ष ज्ञानही होत नाही आणि अपरोक्ष ज्ञान तर नाहीच नाही असे सगळे संत सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, म्हणजे केवळ बुद्धीने आत्मज्ञान मिळू शकत नाही कां ?*

उत्तर : केवळ आपल्या स्वतंत्र बुद्धीने विचार करुन आत्मस्थिती जाणून घेता येत नाही आणि ती आत्मस्थिती आपल्या ठिकाणी अनुभवता येत नाही असेच सगळ्या संतांनी सांगितले आहे .

*प्रश्न : महाराज, भगवंत जसे पूर्णब्रह्म असतात तसेच अवतारी पुरुषही पूर्णब्रह्म असतात कां ?*

उत्तर : जगाचे मूळ कारण जे ब्रह्म त्यालाच परब्रह्म किंवा पूर्णब्रह्म म्हणतात. भगवंतांनी स्वतःच्या मुखानेच गीतेत सांगितले आहे की, अवतारी पुरुष पूर्णब्रह्म असतात. अवतारी पुरुषांची पूर्णब्रह्म या भावनेने उपासना करावी असेच वेदांतसूत्रांत सांगितले आहे. अवतारी पुरुषांची उपासना करुन परब्रह्माशी एकरुप होण्याचा अनुभव अनेक संतमहात्म्यांनी घेतलेला आहे.

*प्रश्न : महाराज, जग माया आहे असे संतमहात्मे सांगतात. माया म्हणजे काय ?*

उत्तर : जी वस्तू एक प्रकारची आहे ती दुसऱ्या प्रकारची भासणे याला माया म्हणतात. माया म्हणजे भ्रम, भ्रांति. आपल्या भोवती आपल्याला जग दिसते, हे जे जग भोवती दिसते, आहे ते काय आहे? ते खरे आहे कां ? वेदांतात सांगितले आहे की हे जग मिथ्या आहे. जग असे काही नाहीच आहे. भगवंत स्वतःच अनेक नामरुपे घेऊन जगरुपाने प्रकटले आहेत. पण आपल्याला ते कळत नाही. आपल्याला भ्रम होतो. आपल्याला जग खरे वाटते. यालाच माया असे म्हणतात. 'माया इति अविद्यानामस्य आख्या।' माया म्हणजे नसलेल्या वस्तूचे नांव असे शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात.

*प्रश्न : महाराज, जीवनमुक्ताचे कसे असते ? जीवनमुक्त कोणत्या लक्षणांनी ओळखता येईल ?*

उत्तर : जीवनमुक्त पुरुष जगांत वावरतांना आपल्याला दिसतो. जगाचे व्यवहार करतांना आपल्याला दिसतो. पण मनाने तो सगळ्या व्यवहारांपासून पूर्णपणे अलिप्तच असतो. त्याच्या देहाकडून जे कर्म घडते त्याचा लेप त्याला लागत नाही. त्या व्यवहारांतील सुखदुःखे त्याला जाणवत नाहीत. तो सदैव आनंदी असतो. तृप्त असतो. प्रसन्न असतो.

त्याचे अंतःकरण आकाशाप्रमाणे व्यापक आणि स्वच्छ असते. त्याच्या हातून घडणाऱ्या कोणत्याही कार्याचा त्याला अहंकार नसतो. कोणी आपले मित्र आहेत किंवा शत्रू आहेत असे त्याला वाटतच नाही. त्याच्या शत्रूमित्र अशा भावना नष्ट झालेल्या असतात. म्हणून तो लोकांना कंटाळत नाही आणि लोकही त्याला कंटाळत नाहीत. हर्ष, क्रोध, भिती, संशय या विकारांपासून तो मुक्त असतो. त्याचे चित्त भगवंताच्या ठिकाणी स्थिर झालेले असते. कार्यात लाभ होवो वा हानी होवो, त्याच्या चित्तात हर्ष किंवा विषाद अशी पीडा निर्माण होत नाही. तो सदैव भगवंताच्या अनुसंधानातच असतो. ही सगळी जीवनमुक्त अवस्थेची लक्षणे आहेत.

*प्रश्न : महाराज, जीवनमुक्ताची अवस्था प्राप्त होण्यासाठी आम्ही काय करावे ?*

उत्तर : जीवनमुक्ताची अवस्था म्हणजे मोक्षप्राप्ती. मोक्षप्राप्तीसाठी मनोनाश, वासनानाश आणि तत्वज्ञान यांचा पूर्ण अभ्यास व्हावा लागतो. यासाठी अनेक साधनामार्ग आहेत. ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग,कर्ममार्ग, योगमार्ग. सद्गुरुंनी जो मार्ग त्याला सांगितला त्या मार्गाने साधकाने पुढे जात रहायचे. सद्गुरुंवर श्रद्धा ठेवून पुढे जात रहायचे. गुरुकृपेनेच वाटचाल पुढे पुढे होते. गुरुकृपेनेच जीवनमुक्ताची अवस्था मिळू शकते. विशिष्ट टप्प्यावर साधक जेव्हा पोचतो तेव्हा अन्य साधनांचा त्यात समन्वय होतो. त्या सहज समन्वयाची अवस्था प्राप्त झाली म्हणजे पूर्णावस्था दूर नाही. ज्ञान, कर्म, भक्ती व योग या चारही साधनमार्गांचा समन्वय जाणीवपूर्वक होऊ लागणे किंवा त्या चारही मार्गात अविरोध आहे हे अनुभवायला मिळणे हे केवळ सद्गुरुंच्या कृपेनेच होऊ शकते.

*प्रश्न : महाराज, मोक्षप्राप्तीसाठी सद्गुरुंचे मार्गदर्शन कां आवश्यक असते ?*

उत्तर : श्रीसद्‌गुरु म्हणजे चालते बोलते धर्मशास्त्र. ते 'शाब्देपरेच निष्णाते' असतात. ते श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ असतात. त्यांचे चित्त, वाणी आणि वर्तन यामध्ये सुसंवाद असतो. 'आधि केले मग सांगितले' असे त्यांचे जीवन असते. त्यांच्या विशुद्ध आचरणाचा व वर्तनाचा एवढा प्रभाव असतो की ते न बोलताच शिष्याला कार्याची प्रेरणा देत रहातात. त्यांच्या जीवनदर्शनाने ज्ञान, भक्ती, कर्म आणि योग या सर्वही मार्गांचे निःसंदिग्ध मार्गदर्शन होत राहते. साधकाची अवस्था ओळखून त्याला मार्गदर्शन करणे, हे अशा अधिकारी सद्‌गुरुशिवाय कोणीही करु शकणार नाही.

*प्रश्न : महाराज, सद्‌गुरुंची कृपा झाली म्हणजे पुरेसे नाही कां ? सद्‌गुरुंवर पूर्ण श्रद्धा हवी असे शास्त्रकार कां सांगतात ?*

उत्तर : सद्‌गुरु शिष्यावर कृपा करुन त्याला मोक्षप्राप्तीचे दिव्य साधन देतात. ते साधन दृढ निष्ठेने होण्यासाठी शिष्याची सद्‌गुरुंवर आत्यंतिक श्रद्धा असावी लागते. श्रद्धा ही निःशंक करणारी, निःसंशय करणारी शक्ती आहे. ही श्रद्धाच साधनमार्गावर साधकाला पुढेपुढे नेत असते. सद्‌गुरुंना फक्त भक्तांचे प्रेम, श्रद्धा तेवढी दिसते. जात, आचार, वय, विद्या, अर्थ वगैरे कशाचीच जरुरी नसते.

*प्रश्न : महाराज, संतांच्या आत्मस्थितीचा बोध सामान्य लोकांना सहज होत नाही असे म्हणतात. मग संतांची चरित्रे वाचायला कां सांगतात ?*

उत्तर : संतांच्या आत्मस्थितीचा बोध सामान्य लोकांना सहज होणारा नसतो. परंतु संतचरित्राचे लेखक चिंतनशील असतील, श्रद्धाभक्तीयुक्त अंतःकरणाचे असतील, तर त्यांनी लिहिलेल्या संतचरित्रात संतगुणदर्शनाची मार्मिकता उतरत असते. संतांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करत गेले म्हणजे संतांचे माहात्म्य समजून येते. समजून घेणाऱ्याने

आपलीही पात्रता वाढवीत वाढवीत नेली म्हणजे संतांच्या माहात्म्याचा बोध होत जातो. शिवाय बोध हा एकदिशीय विषय नसतो. जो जसा भेटेल त्याच्यात स्वतःला सामावून घेण्याचे सामर्थ्य संतांमध्ये असते.

*प्रश्न : तत्त्वज्ञानावरील ग्रंथाचा अभ्यास केल्याने परमार्थ साधायला सहाय्य होईल कां ?*

उत्तर : तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वाचून पांडित्य येते. पण तेवढ्याने परमार्थ साधता येणार नाही. परमार्थ साधण्यासाठी तसे आचरण मनापासून घडावे लागते व सद्गुरूंची कृपा व्हावी लागते.

*प्रश्न : महाराज, संसारात रहात असूनही स्वतःच्या मनांत मात्र संसार नाही अशी स्थिती आम्ही कशी प्राप्त करून घ्यावी ?*

उत्तर : संसारात रहात असून सुद्धा मनांत संसार नाही, अहंकार नाही ही स्थिती अनेक संतमहात्म्यांनी प्राप्त करून घेतली होती. आजही तसे महात्मे आहेत. ती स्थिती मिळविण्यासाठी या महात्म्यांनी सतत ईश्वरस्वरूपाचं चिंतन केलं आहे. ईश्वररूपाचं चिंतन हेच खरं तप आहे. हेच खरं ध्यान आहे. संतमहात्मे सारखं ते करीत असतात. चित्ताचा अभ्यास तो आहे.

*प्रश्न : महाराज, साधकानं प्रथम अहंकार सोडला पाहिजे असं शास्त्रकार सांगतात. मी ईश्वराचा दास आहे असा अहंकार राहिला आणि त्या बुद्धीने कर्म करीत राहिले तर ते परमार्थाला पोषकच ठरणार नाही कां ?*

उत्तर : जगांत जे काही घडते आहे ते घडवण्याची क्रियाशक्ती भगवंताचीच आहे. सर्व कर्तृत्व त्याचेच आहे. मग माझ्या हातून जे कर्म घडले ते कर्म मी केलेलं आहे, हा खोटा अहंकार आहे. तो अहंकार सोडायचा आहे. एखादं कर्म मी केलं असं म्हणायचं तरी कसं ? प्रत्येकाच्या देहाचा, मनाचा,

बुद्धीचा नियामक सूत्रात्मा असतो. तो सूत्रात्मा हे परमात्म्याचं स्वरुप आहे. त्या सूत्रात्म्याच्या प्रेरणेमुळेच देहातील इंद्रिये कार्य करीत रहातात. त्याच्यामुळेच देहाचं चलनवलन होत आहे. त्याच्यामुळेच देहाच्या सगळ्या क्रिया होत आहेत. ते मूळ कनेक्शन आहे. ते बंद झालं की देहाकडून काहीच होऊ शकत नाही. तो सूत्रात्मा देहाचा अधिष्ठाता आहे, नियामक आहे. सगळं त्याच्या ताब्यात आहे. मग मी केलं, मी करतो असं कसं समजायचं ? माझ्या वाणीनं केले, माझ्या बुद्धीने केलं, माझ्या देहानं केलं असं कसं समजायचं ? संतमहात्मे हे अनुभव घेऊन सांगताहेत. कुठे वाचून ते सांगत नाहीत.

*प्रश्न : महाराज, आम्ही अहंकार कसा कमी करावा ?*

उत्तर : सगळं ईश्वराच्या इच्छेनं चालू आहे, ईश्वराच्या प्रेरणेने चालू आहे. विश्वाचं चक्र त्यानं चालू ठेवलं आहे. ईश्वरशक्तीचेच जर सतत चिंतन करीत राहिलं तर अहंकार कमी कमी होत जातो. तो अहंकार जोपर्यंत कमी झालेला नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने ध्यान नाही, ईश्वर पूजन नाही, काही नाही. प्रत्येक ठिकाणी अहम् येणारच. ईश्वरपूजा केली तरी मी ईश्वरपूजा केली ही भावना आहेच. हा अहंकार आहेच. भगवान श्रीकृष्ण सांगतात, ''यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ग। यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥''

भोग, यज्ञ, दान, तप या सगळ्या क्रिया जशा होतील तशा कर, पण माझे ध्यान ठेवून कर. माझ्याप्रीत्यर्थ करीत जा. आपल्या अंतःकरणात मी अमुक केलं अशी कर्तृत्वाची यत्किंचितही आठवण होणार नाही अशी धुतल्यासारखी सर्व कर्मे मला अर्पण कर असेच भगवंत सांगताहेत.

कर्तृत्च आपले नाही असेच शास्त्रे सांगताहेत. संतमहात्मेही तेच सांगताहेत. त्याप्रमाणे समजून घ्यायचा प्रयत्न करायचा. चित्ताला आणखी तो विषय द्यायचा. कर्तृत्व आपलं नाही, क्रियाशक्ती परमेश्वराची आहे हे पक्कं समजल्यावरच अहंकार जातो. अहंकार पूर्णपणे गेला, आणि प्रत्येक कर्माच्या वेळी पूर्ण निरहंकार वृत्ती झाली तरच त्या कर्माचा लेप आपल्याला लागणार नाही. मगच त्या कर्मांची पुन:पुन्हा जन्म द्यायची शक्ती नाहीशी होईल.

*प्रश्न : महाराज, योग्यता असली तरच त्याच्या हातून कर्म चांगलं घडणार नां ? योग्यता असल्याशिवाय एखाद्याच्या हातून चांगलं कर्म, लोकोत्तर कर्म कसे घडणार ?*

उत्तर : एखाद्याजवळ कर्म करण्याची योग्यता असली तरी ती योग्यता स्वत:च्या तोंडाने सांगणं ही खरी योग्यता नाही. ते अज्ञानच आहे. कर्तृत्व आपल्याकडे घेतलं की ते अज्ञान आपल्या जन्माला कारणीभूत होते. ईश्वरशक्तीच ज्ञानसंपन्न आहे क्रियासंपन्न आहे. सर्व ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती ईश्वराचीच आहे. लोकोत्तर कार्य करण्याचं पूर्ण सामर्थ्य ईश्वराचंच आहे, हेच पूर्ण ज्ञान आहे.

ज्ञानदेवांनी भिंत चालवली ती चांगदेवांचा अहंकार दूर करण्यासाठी. चांगदेव वाघावर बसून हातात सर्प घेऊन येताहेत. मी यांचं नियंत्रण करु शकतो हा अहंकार आहे. हा अभिमान घेऊनच गुरुच्या दर्शनाला निघालेत. इकडं तर भिंत चालायला लागली. सामोरी गेली. चांगदेवाच्या लक्षात आलं. माझं योगसामर्थ्य फक्त चेतन वस्तूच नियंत्रण करु शकतंय. पण ज्ञानदेव अचेतन भिंतीचं नियंत्रण करताहेत. अभिमान बाळगावा अशी

शक्ती कोणाची आहे हे ध्यानात आलं आणि चांगदेवांचा अहंकार गळून पडला.

अचेतन भिंतीत क्रियाशक्ती निर्माण करण्याची मोठी योगशक्ती ज्ञानदेवांजवळ आहे. पण इतकी मोठी शक्ती ते विसरुन गेले आहेत. सर्व कर्तृत्व ईश्वराचे आहे, ही पूर्ण श्रद्धा आहे, पूर्ण ज्ञान आहे. आपलं काही नाही ही पक्की बुद्धी ज्ञानदेवांजवळ आहे. सर्व योगशक्ती ते विसरुन गेले आहेत. हे फार मोठं आहे.

*प्रश्न : महाराज, या देहात जोपर्यंत आम्ही आहोत तोपर्यंत या आमच्या देहाची काळजी घ्यावीच लागणार नां ? स्वतःच्या देहाची काळजी स्वतःशिवाय दुसरं कोण घेणार ?*

उत्तर : हे माझं शरीर आहे असं मी म्हणतो आहे. म्हणजे मी हे शरीर निर्माण केलेलं आहे कां ? मी हे शरीर केव्हा निर्माण केलं ? संपूर्ण विश्व ज्याने निर्माण केलं तो या जगाचा स्वामी आहे. हे शरीरही त्यानंच निर्माण केलं आहे. तोच या शरीराचा स्वामी आहे. हे शरीर माझं आहे, मी या शरीराचा स्वामी आहे असं समजणं हे अज्ञान आहे. ईश्वरानं निर्माण केलेलं शरीर हे माझं आहे असं कसं मानता येईल ? शरीर निर्माण करणाराही तोच आहे, शरीराचा स्वामीही तोच आहे आणि या शरीराचं संरक्षण करणाराही तोच आहे.

*प्रश्न : महाराज, आम्ही संसारात असतांना संसार सांभाळण्याकडे दुर्लक्ष करुन कसं चालेल ? संसारात आहोत आम्ही संसाराची काळजी घ्यायला नको कां ?*

उत्तर : संसाराची आसक्ती गेली पाहिजे. सर्व शक्ती ईश्वराची आहे. जशी क्रियाशक्ती त्याची आहे तशीच संरक्षणशक्तीही त्याचीच आहे. हे ज्ञान

झालं पाहिजे. विश्व निर्माण करणारा तोच आहे आणि विश्वाचं संरक्षण करणाराही तोच आहे. खरी काळजी मालकालाच असणार. मालकही तोच, चालकही तोच आणि संरक्षणकर्ताही तोच. याचं पूर्ण ज्ञान झालं म्हणजे मग संसाराची काही काळजी मनांत राहणारच नाही.

*प्रश्न : महाराज, कर्म सोडून देणं शक्य होईल कां? कर्म सोडून दिली की मग जन्ममरण यांतून सुटका होईल कां?*

उत्तर : आपली कर्मे सुटणं हे आपल्या हातात नाही. कर्म सुटतील कां नाही हे भगवंतच ठरवू शकतो, आपण नाही. "करणे कां न करणे । हे आघवे तोचि जाणे ।" तुमच्याकडून कर्म व्हायची कां न व्हायची हे त्याला माहिती आहे. नियामक तो आहे.

*प्रश्न : महाराज, श्रीगुरुमहाराजांना प्राप्त झालेली शक्तिपात ही साधनप्रणाली योगविद्या आहे कां ?*

उत्तर : श्रीगुरुमहाराजांना प्राप्त झालेली शक्तिपात ही साधनप्रणाली योगविद्याच आहे. ही साधनप्रणाली सर्व साधनांचा समन्वय साधणारी साधनप्रणाली आहे असे साधकांच्या सर्व तऱ्हेच्या अनुभवांवरुन दिसते.

*प्रश्न : महाराज, शक्तिपात योगसाधनेमध्येही साधकावर गुरुकृपा व्हावी लागते कां ?*

उत्तर : शक्तिपात योगसाधनेत साधकाची साधना अन्तस्थ प्रेरणेने चालत असते. श्रीसद्गुरुकृपेने अन्तस्थ शक्ती जागृत होऊन कार्यरत होते. सद्गुरुंची कृपा झाल्यानेच साधकाचा साधनमार्ग मोकळा होतो. हा प्रारंभ असतो. पुढे समर्थ सद्गुरु शक्तिरुपाने अन्तस्थ होऊन मार्गदर्शन करीत राहतात.

*प्रश्न : महाराज, शक्तिपातयोग साधनेत ब्रह्मचिंतनाला स्थान आहे कां ?*

उत्तर : शक्तिपात योग साधनेत साक्षीभावाचा जो अनुभव येतो ते ब्रह्मचिंतनच आहे. श्रीगुरुमहाराजांनी दिलेली साधना ही ब्रह्मचिंतनाचीच साधना आहे. या साधनेत चित्तस्थैर्याचा अभ्यास होत असतो. हे चित्ताचे स्थैर्य साक्षीभावाच्या अनुभवाने म्हणजे ब्रह्मचिंतनानेच येत असते.

*प्रश्न : महाराज ब्रह्मचिंतनाचे महत्व एवढे कां सांगतात ?*

उत्तर : ब्रह्मचिंतनाने चित्ताचे स्थैर्य येत असते. म्हणून ब्रह्मचिंतनाचे महत्व सांगतांना आचार्य महाराज सांगतात, मन क्षणभर जरी ब्रह्मचिंतनात तन्मय झाले तरी त्याने सर्व तीर्थात स्नान केल्यासारखे आहे, सर्व देवांची पूजा केल्यासारखे आहे, हजार यज्ञ केल्यासारखे आहे.

*प्रश्न : महाराज, "वीतरागविषयं वा चित्तम्" या पतंजलमहर्षींच्या सूत्राचा नेमका अर्थ काय ?*

उत्तर : योगसूत्रकार श्रीपतंजलमहर्षींनी चित्त स्थिर करण्यासाठी जे विविध उपाय सुचविले आहेत त्यामध्ये "वीतरागविषयं वा चित्तम्" हा एक महत्वाचा उपाय आहे. या सूत्राचे दोन अर्थ केले जातात. सिद्धमहात्म्यांच्या चरित्राचे चिंतन केल्याने चित्त स्थिर होते हा पहिला अर्थ आहे. महात्मे वीतराग गुणातीत असतात. त्यामुळे त्यांचे चरित्र अलौकिक असते. सामान्य जीवांना अविद्या, काम, कर्म या बंधनांत अडकून पडावे लागते. महात्म्यांना या बंधनाची काहीच भिती नसते. ते या बंधनांच्या पलीकडे असतात. त्यांची सर्वही कार्ये ईश्वरादेशानुसार विश्वकल्याणासाठी चालू असतात. त्यांत त्यांचा काहीच स्वार्थ नसतो. त्यामुळे त्यांचे चरित्र ईश्वरशक्तीचे निदर्शक असते. संतमहात्म्यांच्या चरित्रांतून आम्हाला

मार्गदर्शन मिळते. संतमहात्म्यांच्या चरित्राचे चिंतन करीत राहिले की आपले चित्त स्थिर होते.

"वीतरागविषयं वा चित्तम्।" या सूत्राचा दुसराही अर्थ होतो. वीतराग पुरुषांच्या म्हणजे महात्म्यांच्या चित्तात ज्या व्यक्तीबद्दल अनुग्रहबुद्धी निर्माण होते त्या व्यक्तीचे चित्त आपोआप स्थिर होऊ लागते. शिष्याचे कल्याण व्हावे असा सद्गुरुंचा संकल्प झाल्याबरोबर शिष्याचे चित्त स्थिर होऊ लागते आणि तो कल्याण मार्गाने जाऊ लागतो. या दृष्टीने या सूत्रांत श्रीपतंजलीमहर्षींनी शक्तिपातयोगही सूचित केला आहे असे म्हणायला हरकत नाही.

*प्रश्न : महाराज, महात्म्यांचा प्रसाद यासाठीच घ्यायचा असतो कां ?*

उत्तर : भगवान श्रीशंकराचार्यांनी प्रसाद या शब्दाचा अर्थ 'प्रसादो अनुग्रहबुद्धिः" असा सांगितला आहे. महात्म्यांचा प्रसाद म्हणजे महात्म्यांच्या चित्तांत अनुग्रहबुद्धी निर्माण होणे. महात्म्यांच्या चित्तांत शिष्याबद्दल अनुग्रहबुद्धी निर्माण झाली की शिष्याचे चित्त आपोआप स्थिर झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. हाच त्या महात्म्यांचा खरा प्रसाद. हा प्रसाद मिळाल्यावर शिष्याचे कल्याण होणारच.

*प्रश्न : महाराज, दंभ म्हणजे काय ?*

उत्तर : भगवान श्रीशंकराचार्यांनी "स्वधर्मप्रकटीकरणं दंभः" अशी दंभ याची व्याख्या केली आहे. आपल्या सत्कर्माची आपल्या मुखाने जाहिरात करणे म्हणजे दंभ असा याचा अर्थ आहे. दंभ हा जीवांचा नैसर्गिक दोष आहे. त्यांना वाटते मी नेहमी योग्यच वागतो. कधीही चुकत नाही. 'सर्वकांतमात्मीय पश्यति' असा अभिमानच आहे. भगवान श्रीकृष्णांनी दंभ हा दोष असुरी संपत्तीमध्ये पहिल्या क्रमांकात घातला आहे.

*प्रश्न : महाराज, आम्ही आमचा दंभ कसा दूर करायचा ?*

उत्तर : संतमहात्म्यांची चरित्रे वाचावीत. त्यांच्या चरित्रांचे चिंतन करावे. ते वीतराग गुणातीत असतात. संतमहात्म्यांच्या हातून अलौकिक कार्ये घडत असतात. पण त्याबद्दल त्यांना कणभरही अभिमान वाटत नाही. हे पाहिले म्हणजे आपला अभिमान लगेच गळून पडतो. आणि आपल्या गुणांची फुशारकी मारणेही बंद होते. त्यामुळे आपले चित्त स्थिर, समाधानी होते.

*प्रश्न : महाराज, परमात्म्याचे पूर्ण दर्शन कसे होऊ शकेल ?*

उत्तर : ईश्वराचे पूर्ण दर्शन गुरुकृपेनेच होणार. सर्वही संतमंडळी सांगतात की अखंड सद्गुरुंचे स्मरण ठेवावे आणि त्यांच्या भक्तीने आपले मन शुद्ध करुन घ्यावे. गुरुंच्या कृपेने अशा भक्ताला परमात्म्याचे पूर्ण दर्शन होऊ शकते. मूर्तीमध्ये ईश्वर आहे ही आपली भावनाही वाईट नाहीये. पण ईश्वर सर्वत्र भरुन राहिलेला आहे, हे ज्ञान होण्याकरिता पांडुरंगांनी नामदेवांना गुरुंच्याकडे पाठवलं. विवेकानंदांनी श्रीरामकृष्णांना विचारले "आपण परमेश्वर पाहिला आहे काय ?" श्रीरामकृष्ण म्हणाले, "होय, मी परमेश्वर पाहिला आहे. तुला जेवढा स्पष्टपणे पहात आहे त्याच्यापेक्षाही अधिक स्पष्टपणे परमेश्वर पाहिला आहे. तुला परमेश्वर पाहायचा आहे काय?" असे विचारले. ही गुरुकृपाच. ज्ञानेश्वरमहाराजांसारख्या संतमहात्म्यांना गुरुकृपेने ईश्वराचे पूर्ण दर्शन झाले. तसे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, ईश्वर पाहिल्यावर भक्त ईश्वररुप होऊन जातो कां ?*

उत्तर : ईश्वराचे परिपूर्णत्व पाहणाराही ईश्वररुप होऊन जातो. हे अध्यात्मामध्ये फार मोठे आहे. बाकीच्या ज्ञानामध्ये ज्ञाता आणि ज्ञेय वेगळे राहतात. पण इथे ज्ञाता आणि ज्ञेय एक होऊन जाते. ही सद्गुरुंची कृपा आहे.

*प्रश्न : महाराज, अज्ञान हा स्वतंत्र पदार्थ आहे कां ?*

उत्तर : अज्ञान हा स्वतंत्र पदार्थ आहे असे शास्त्रकार सांगतात. ज्ञान झाल्यावर अज्ञानही जाते व ज्ञानही जाते. गढूळ पाण्याला निवळीची बी लावली की पाण्याचा मलीनपणाही नाहीसा होतो आणि ती निवळीची बीसुद्धा नाहीशी होते. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात - 'ज्ञान झाल्यावर अज्ञानही जाते आणि ज्ञानही जाते.'

*प्रश्न : महाराज, ज्ञानदेव सांगतात -*

*म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे । व्युत्पत्ती आवघी विसरिजे ।*
*जैं जगा धाकुटें होईजे । तैं जवळीक माझी ।।*

*परमेश्वर व्यापक आहे. मग परमेश्वराची प्राप्ती व्हायला ज्ञानदेव धाकुटे व्हायला कां सांगत आहेत, परमेश्वराइतके व्यापक व्हायला कां सांगत नाही ?*

उत्तर : परमेश्वर व्यापक आहे. तो इतका व्यापक आहे की त्याच्यावाचून दुसरी वस्तूच नाही. व्यापकत्व सूक्ष्मतेवर अवलंबून असते. सूक्ष्म वस्तूच व्यापक होऊ शकते. पर्वत स्थूल असतो म्हणून तो घटांत शिरु शकत नाही. पण आकाश व्यापक असल्यामुळे घटांत शिरु शकते, कोठेही शिरु शकते. परमेश्वराशी ऐक्य अनुभवायचे असेल तर परमेश्वरासारखे सूक्ष्म झाले पाहिजे. देहाचा, संपत्तीचा, ज्ञानाचा, मोठेपणाचा अहंकार जीवाला असतो. त्या अहंकारामुळे जीव स्थूल झाला आहे. म्हणून ज्ञानदेव सांगताहेत - सर्व प्रकारचा अहंकार सोडून द्यावा, बाजूला ठेवावा, शहाणपणा विसरुन जावे, जगापेक्षा धाकुटे व्हावे म्हणजे परमेश्वराची प्राप्ती होते.

अमृतानुभवांतही ज्ञानदेव सांगतात "लघुत्वाचेनि मुद्दले । बैसला गुरुत्वाचेनि सेले ।" परमात्मा पूर्णपणे अहंकाररहीत आहे. म्हणूनच तो अत्यंत सूक्ष्म आहे, अत्यंत थोर आहे. परमेश्वराशी एक व्हायचं असेल तर जीवानेही अहंकार पूर्णपणे सोडला पाहिजे. लघुत्व धारण केले पाहिजे. दीनभाव घेतला पाहिजे. सर्व जगाला परमेश्वर समजून लीन झाले पाहिजे. तरच तो परमेश्वराशी एकरुप होईल.

*प्रश्न : महाराज, वेदांतसिद्धांताप्रमाणे जीवही व्यापक आहे. मग जीवाने स्वतः व्यापक असल्याचा अनुभव घेतला तर तो परमेश्वराशी एकरुप नाही कां होणार ?*

उत्तर : वेदांतसिद्धांताप्रमाणे जीवही व्यापकच आहे. पण मी देह आहे असे तो समजतो. स्वतःला देहापुरता मर्यादित मानतो. अशी विपरीत कल्पना करुन घेतो म्हणून जीवाला स्वतःच्या मूळ व्यापकतेचा अनुभव येत नाही. अहंकार पूर्ण गेला पाहिजे. मी व्यापक झालो, मी पूर्ण झालो, मी कृतार्थ झालो हा जीवाचा नुसता अभिमान आहे. हाच रसास्वाद. या अभिमानामुळे भोक्तृत्व निर्माण होते. मी व्यापक आहे, मी परमेश्वराशी एक झालो आहे हा अभिमान असला की तो जीव परमेश्वरापेक्षा निराळा पडतो. त्याला परमेश्वराचे प्रेम रहात नाही व परमेश्वराशी ऐक्य स्थिती त्याला अनुभवता येत नाही. अहंकार गेला तरच मूळ मी, व्यापक मी याचा अनुभव येतो. ज्ञानदेव तेच सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, परमात्मा व्यापक आहे असे सांगतात आणि जीवही व्यापक आहे असे सांगतात. मग दोन्हींमध्ये फरक आहे कां?*

उत्तर : परमात्मा विभु म्हणजे व्यापक आहे. तो सर्व देशांत, सर्व काळांत आणि सर्व वस्तूत आहे. म्हणून तो अनंत आहे. परब्रह्म या शब्दाचा अर्थच

ब्रह्म म्हणजे मोठा असा आहे. परमात्मा स्वरुपानेही मोठा आहे आणि गुणांनीही मोठा आहे. या अर्थाने परमात्मा सर्व व्यापक आहे.

जीव स्वरुपाने अणुएवढा लहान आहे, सूक्ष्म आहे. परंतु ज्ञान हा त्याचा गुण खूप मोठा आहे. म्हणून आत्मा (जीव) व्यापक आहे असे सांगतात. जीवाला ज्ञान होते. पण त्या ज्ञानाचा संकोच किंवा विकास होतो. जीवाचे ज्ञान येणारे असते आणि जाणारेही असते असे सांगतात. म्हणून जीवाचे व्यापकत्व लहानमोठे होते, बदलते. या अर्थाने जीवाचे व्यापकत्व सापेक्ष आहे. तसे परमात्म्याचे नाही. परमात्मा स्वरुपानेही मोठा आहे आणि गुणांनीही मोठा आहे. इतका मोठा आहे की त्याच्याइतका कोणी दुसरा नाहीच. या अर्थाने परमात्माच खरा विभु म्हणजे व्यापक आहे.

*प्रश्न : महाराज, बौद्धवादी सर्व शून्य आहे असे सांगतात. हा शून्यवाद बरोबर आहे कां ?*

उत्तर : बौद्धांना शून्यवाद कळलाच नाही म्हणतात. सर्व शून्य आहे असे जो म्हणतो तो सत्यच असतो ना? तोच जर असत्य असेल तर इतर सर्व विश्व सत्य ठरेल. तो सत्य मानला तर सर्व शून्य आहे हे त्याचे म्हणणेही खोटे ठरेल. त्यामुळे शून्यवाद सिद्ध होत नाही. श्रुतिसिद्धांताला बाधा येत नाही.

*प्रश्न : महाराज, आत्मा म्हणजे जीव कां ? जीवात्मा असाही शब्द वापरतात. आत्मा म्हणजे काय ?*

उत्तर : आत्मा या शब्दाचे विवरण शास्त्रकारांनी एका श्लोकांत केले आहे.

"यच्चाप्नोति यदादत्ते यच्चात्ति विषयानिह।
यच्चास्य सन्ततो भावस्तस्मादात्मेति गीयते॥"

आप, आ + दा, अद व अत या चार धातुंच्या संबंधाने आत्मा हा शब्द झाला आहे. आत्मा ज्ञाता असतो. सर्व विषयांचे ज्ञान व भोग त्याला कळतात. आत्मा ज्ञानरुपाने व्यापून रहाणारा असतो. आत्मा नित्य असतो. त्याला जन्म नाही, मृत्यु नाही.

जीव, जीवात्मा, आत्मा सगळे एकच. आत्मा कायमच असतो. एक देह जातो आणि कर्माप्रमाणे दुसरा देह मिळतो असे शास्त्रकार सांगतात.

*प्रश्न : महाराज, आत्मा सूक्ष्म असतो असे सांगतात. सूक्ष्म म्हणजे काय ?*

उत्तर : सूक्ष्म म्हणजे लहान. ''एषो ऽ णुरात्मा ।'' आत्मा अणु आकाराचा असतो असे मुंडकोनिपनिषदांत सांगितले आहे. ''वालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च। भागो जीवः ।'' केसाच्या शंभराव्या भागाच्याही शंभरावा भाग होईल इतका जीव लहान असतो असे श्वेताश्वेतर उपनिषदांत सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, आत्मा शरीरांत कोणत्या ठिकाणी असतो ? कां तो शरीरभर पसरलेला असतो ?*

उत्तर : ''योऽयं विज्ञानमयः प्राणेषु हृद्यंतर्ज्योतिः।'' आत्मा हृदयांत असतो असे बृहदारण्यक उपनिषदांत सांगितले आहे. पण त्याला शरीराच्या सर्व भागांतील सुखदुःखांचे ज्ञान होते. दीपाचा प्रकाश जसा आजुबाजूला पसरतो तसा आत्मा ज्ञानरुपाने शरीरांत सर्वत्र पसरतो.

*प्रश्न : महाराज, आत्मा अणुसारखा लहान आहे तर तो व्यापक आहे, असे कां सांगतात ?*

उत्तर : नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मम् । आत्मा व्यापक असतो असे मुंडकोनिषद सांगते. आत्मा ज्ञाता आहे. त्याला ज्ञान व्यापक असते, नित्य

असते. जीव आकाराने लहान आहे, सूक्ष्म आहे. परंतु ज्ञानगुणाने तो व्यापक आहे. त्याला सर्व विश्वाचे ज्ञान होऊ शकते. ज्ञानगुणाने तो विश्वही कापू शकतो. म्हणून जीव व्यापक आहे असे सांगतात.

*प्रश्न : महाराज, सुखे व दुःखे आत्म्यापर्यंत पोचत नाहीत कां ?*

उत्तर : सुख म्हणजे काय ! शब्दस्पर्शादि विषयांची अनुकूलता म्हणजे सुख! स्वतःच्या इच्छेप्रमाणे विषयांची प्राप्ती झाली की सुख वाटते. उन्हाचा ताप झाला तर थंडगार पाणी मिळाले की मी सुखी आहे असे वाटते. पण कडक थंडी पडली असता थंडगार पाणी प्रतिकूल वाटते आणि ते पुढे आले तर दुःख वाटते. म्हणजे विषय एकच. पण मनांत जशा अनुकूल किंवा प्रतिकूल वृत्ती होतात तसे सुख किंवा दुःख मनालाच होते.

विषय किंवा काळ एकच असला तरी एका मनुष्याला सुख मिळते तर दुसऱ्याला दुःख मिळते. ताप आल्यावर अन्नाची वासना गेल्यामुळे रोगी माणसाला अन्न प्रतिकूल वाटते व ते अन्न पुढे आले की दुःख होते. पण निरोगी माणसाला भूक लागली असल्याने तेच अन्न अनुकूल वाटते, हवेसे वाटते व ते अन्न पुढे येताच तो सुखी होतो.

सुखदुःख सगळे मनावरच असते. पण आत्मा सदैव आनंदरुप असतो. त्याला सुखदुःख असे काही नसते. सुखदुःखहा मनाचा खेळ आहे. नित्य आनंदस्वरुप आत्म्याचा व त्यांचा काही संबंध नाही.

*प्रश्न : ज्ञानेश्वर आत्म्याचे वर्णन करतांना सांगतात,*

*रित ना भरित । रहित ना सहित । मूर्त ना अमूर्त । शून्यपणे ॥*

*आनंद ना निरानंद । एक ना विविध । मुक्त ना बद्ध । आत्मपणे ॥*

*या ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे?*

उत्तर : ज्ञानदेव येथे आत्म्याचे वर्णन करीत आहेत. देह हा पंचभूताचा बनलेला आहे. तो डोळ्यांनी दिसतो. पण आत्मा काही पंचभूतांचा बनलेला नाही. म्हणून तो डोळ्यांनी दिसत नाही. तो दिसणारा नाही तसा तो न दिसणाराही नाही. तो प्रकाशरुपही नाही व अंधाररुपही नाही. तो कोठे रिकामा आहे असे नाही किंवा कोठे भरलेला आहे असेही नाही. तो कशाच्यातरीवाचून आहे असे नाही किंवा कशाच्या तरी बरोबर आहे, कशाच्यारहित आहे असेही नाही. तो मूर्तही नाही किंवा अमूर्तही नाही. तो प्रत्यक्ष आत्मस्वरुप आहे म्हणून तो आनंदासहीत आहे असे नाही किंवा आनंदरहीत आहे असेही नाही. तो एक आहे असे नाही किंवा अनेक आहे असेही नाही. तो मुक्तही नाही आणि बद्धही नाही. तो आपला आहे असेही नाही किंवा कोणी निर्माण केलेला आहे असेही नाही. तो आहेपण आणि नाहीपण या दोहोला नाहीसा करणारा आहे. तो मोजता येत नाही. तो वाढत नाही किंवा कमी होत नाही. भगवंताच्या व्यापक सत्तेवर सर्व देह आकार व रुपे घेतात व ती नाहीशीही होतात. पण तो आत्मा देहाचा आकार होत नाही किंवा आकार सोडत नाही. आत्मा देहाच्या ठिकाणी आहे असे म्हणणे म्हणजे आकाश हे मातीच्या घड्याच्या आकाराचे झालं असे म्हणण्यासारखे आहे. आत्मसत्तेवर देह येतात व जातात. पण तो आत्मा जसाच्या तसा असतो. तो देहाच्या ठिकाणी कर्म करत नाही किंवा करवीत नाही. देहाच्या व्यापारांत तो भाग घेत नाही. तो पूर्णस्वरुपच आहे. म्हणून तो उणेपणा घेत नाही. म्हणून तो देहांत असूनही देहाशी लिप्त होत नाही. आकाश सूक्ष्म असल्याने कोणत्याच वस्तूत ते लिप्त होत नाही. आत्मा हा आकाशाहून सूक्ष्म आहे. म्हणून तो देहांत राहूनही देहात लिप्त होत नाही. आकाश कोठे नाही ? ते सर्वत्र आहे. पण ते कोण्या ठिकाणी शिरले नाही किंवा कोठून निघालेही नाही. ते वेगळेच आहे, असंग आहे. तसा आत्मा

असंग आहे, अलिप्त आहे. हे सर्व जाणले म्हणजे मी ब्रह्म आहे हा अनुभव येतो.

*प्रश्न : महाराज, आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे कां ? कां दोन्ही एकच आहेत ?*

उत्तर : आत्मा व परमात्मा दोन्ही एकच आहेत. प्रारंभाला दोन्ही एक आहेत हे कळत नाही. आत्मा परमात्म्याचा अंश आहे असे वाटते. पुढे दोन्ही एक आहेत हा अनुभव येतो. शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, आत्माच ब्रह्म (परमात्मा) आहे. पण प्रथम मी देह नाही तर मी आत्मा आहे असा अनुभव घ्यावा लागतो. पुढे सर्वव्यापी परब्रह्माचा (परमात्म्याचा) अनुभव येतो. तो अनुभव घेण्यासाठी ज्ञानमार्ग आणि भक्तीमार्ग असे दोन प्रधान मार्ग सांगितले आहेत.

*प्रश्न : महाराज, कोणते कर्म करायचे हे ठरवायचे स्वातंत्र्य जीवाला आहे नां? मग जीवाचे कर्तृत्व ईश्वराधीन आहे असे कां म्हणतात ?*

उत्तर : जीव स्वतःच्या इच्छेने एखादे कर्म करतो किंवा करत नाही. शरीरांतील इंद्रियांच्याद्वारा एखादे कर्म करावे असे वाटल्यास तो करतो. एखादे कर्म करु नये असे वाटल्यास तो करीत नाही. या अर्थाने जीव कर्ता आहे. पण त्याच्याकडून कर्म करवून घेणारा, ईश्वरच आहे. एखादे कर्म करण्याची जीवाला इच्छा झाली तरी केवळ आपल्या इच्छेने जीव ते कर्म करु शकत नाही. कर्म टाळण्याची इच्छा झाली तरी केवळ आपल्या इच्छेने जीव ते कर्म करण्याचे टाळूही शकत नाही. तसेच सर्वही जीवांच्या कर्मांचे फळही देणाराही ईश्वरच आहे. कर्म सफल व्हायचे की नाही हे ठरवणारा ईश्वरच आहे. या अर्थाने जीवाचे कर्तृत्व ईश्वराधीन आहे.

*प्रश्न : महाराज, सर्व कर्मे करवून घेणारा ईश्वरच आहे, कर्म करण्याची प्रेरणा देणारा तोच आहे. असे जर आहे तर काहीजणांना सत्कर्मे करण्याची इच्छा होते तर काहीजणांना वाईट कर्मे करण्याची इच्छा होते. सर्वांना चांगले कर्मे करण्याची प्रेरणा ईश्वर कां देत नाही ? काहीजणांना चांगली कर्मे करण्याची प्रेरणा द्यायची आणि काहीजणांना वाईट कर्मे करण्याची प्रेरणा द्यायची हा विषम भाव ईश्वर कां दाखवतो ?*

उत्तर : जीवाने मागे जी बरीवाईट कर्मे केलेली असतात ती कर्मे ईश्वर पाहतो, जीवाचे प्रयत्न पाहतो आणि त्या पूर्वकर्माला अनुसरुनच तो जीवाकडून कर्म करुन घेत असतो. जीवाचे प्रयत्न व जीवाने केलेली कर्मे पाहूनच ईश्वर त्या कर्मांचे फळ देतो. सत्कर्माचे फळ सुख हे मिळते. वाईट कर्मांचे फळ दु:ख हे प्राप्त होते. वेदांनी विहीत कर्मे सांगितली आहेत आणि निषिद्ध कर्मेही सांगितली आहेत. धर्माने वागणाऱ्याला, विहीत कर्मे करणाऱ्याला सुखच मिळते. अधर्माने वागणाऱ्याला, निषिद्ध कर्मे करणाऱ्याला दु:ख भोगावेच लागते. ईश्वर न्यायाधीशाप्रमाणे अलिप्त आहे. सुख वा दु:ख यांच्या रुपांतील कर्माचे फळ ईश्वर स्वत:च्या इच्छेने देत नाही. म्हणून ईश्वर विषम आहे, भेदाभेद करणारा आहे असे म्हणता येत नाही.

*प्रश्न : महाराज, भारतीय परंपरेने वेदांना परमोच्च स्थान दिले आहे, परमपूजनीय मानले आहे. वेदांचे एवढे महत्व कां सांगतात ?*

उत्तर : भारतीय अध्यात्मविद्या वेदांमधूनच प्रकटली आहे. या अध्यात्मविद्येतील गंभीर तत्वे वेदांमध्ये सरल सुबोध भाषेत सांगितली आहेत. वैदिक काळांतील अनेक ऋषींची नांवे वेदांच्या निरनिराळ्या भागांशी जोडलेली आहेत. तप, इंद्रियसंयम, श्रद्धा व गुरुनिष्ठा या साधनांचे

कटाक्षाने पालन करुन या ऋषींनी अंतःकरण शुद्धी करुन घेतली होती. दैवी तेज व पावित्र्य यांची ते घनीभूत मूर्तीच होते. सर्व सुखी व्हावेत, सर्वांनी निरामय जीवन जगावे, सर्वांचे कल्याण व्हावे, कोणालाही दुःख भोगायला लागू नये असा वैदिक ऋषींचा परमोच्च पवित्र संकल्प होता. या उदात्त भावनेने प्रेरित झालेल्या तेजस्वी ऋषींना दैवी मेधाशक्ती, असाधारण धारणाशक्ती आणि अलौकिक प्रतिभाशक्ती या देणग्या लाभल्या होत्या. निर्वैर अंतःकरणाने समत्व बुद्धीने ते विश्वाकडे पहात होते. वैदिकऋषींच्या पावित्र्याचा, शुचितेचा व मांगल्याने ओतप्रोत भरलेल्या समत्व बुद्धीचा तेजस्वी आविष्कार वेदांमध्ये आहे. अध्यात्मविद्येचे प्रकाशन करणारे वेद हे भारताचे अमूल्य धन आहे.

कर्म, उपासना व ज्ञान अशी तीन कांडे वेदांमध्ये आहेत. ईश्वरी शक्तीचे स्वरुप वेदांमध्ये वर्णन केले आहे आणि ईश्वरी शक्तीची आराधना करुन जीवनाचे सार्थक कसे करुन घ्यावे याचे प्रतिपादनही वेदांमध्ये आहे. वेदांचे हे प्रतिपादन इतके निर्दोष आहे की आजही ते अंतिम सत्य, शाश्वत सत्य, त्रिकालाबाधित सत्य वाटते असेच जगांतील बहुतेक विचारवंत सांगत आहेत.

*प्रश्न : महाराज, उपनिषदे वेदानंतरची कां ?*

उत्तर : मंत्र व ब्राह्मण असे वेदांचे दोन भाग आहेत. यज्ञादि कर्मांतील देवतादिप्रकाशन मंत्रभाग म्हणजे संहिता, या भागात कर्मकांडाचे विवेचन अधिक आहे. ब्राह्मणाचाच एक भाग म्हणजे उपनिषदे.

*प्रश्न : महाराज, वेदांत कशाला म्हणतात ?*

उत्तर : वेद संपूर्ण दिव्य ज्ञानमय आहेत. पण त्यांतही वेदांचा शिरोभाग मानल्या जाणाऱ्या उपनिषदांमध्ये ज्ञानाचा पूर्ण विकास झालेला दिसतो.

उपनिषदे हा वेदांचा अंतिम भाग आहे. अंतिम भाग म्हणजे शेवटचा भाग नव्हे. अंतिम भाग म्हणजे निश्चयात्मक भाग. ब्रह्मविद्येच्या रहस्याचा संपूर्ण बोध करुन देणारा भाग. उपनिषदांत वेदांचे अंतिम तात्पर्य आहे, ब्रह्मविद्येचे रहस्य आहे म्हणून त्यांना वेदांत असे मुंडकोपनिषद व श्वेताश्वर या उपनिषदांत म्हटले आहे. वेदांतसारकर्त्यांनीही वेदांत शब्दाचा अर्थ उपनिषदे असाच केला आहे. भारतीय अध्यात्मविद्येवरील सर्व वाङ्मयाला वेदांताचाच मूलाधार आहे. विश्वातील सर्व मानव समाजाला नवचेतना देऊन आत्यंतिक शांतीच्या मार्गाकडे नेण्याचे सामर्थ्य फक्त उपनिषदांतील सिद्धांतातच आहे, वेदांतातच आहे.

*प्रश्न : महाराज, वेद आणि उपनिषदे यांना श्रुति म्हणतात. श्रुति वाङ्मय म्हणजे ऐकलेले वाङ्मय म्हणजे ते ऐकलेले वाङ्मय आहे, लिहिलेले वाङ्मय नव्हे. वेदांना श्रुति असे कां म्हणतात ?*

उत्तर : भारतीय दर्शनकार वेदांची उत्पत्ती किंवा नाश कधीच मानत नाहीत. काळाच्या ओघांत वेदज्ञानाचा आविर्भाव होतो किंवा तिरोभाव होतो असेच ते मानतात. सृष्टीच्या आरंभी वेदज्ञानाचा आविर्भाव ऋषींच्या पवित्र अंतःकरणांत झाला. ज्याप्रमाणे आपल्याला रेडिओमधून दूरचा शब्द ऐकू येतो, त्याप्रमाणे सृष्टीच्या आरंभकाळात ध्यान करतांना ऋषींच्या अंतःकरणांत वेदज्ञानाचा आविर्भाव ईशकृपेने झाला. त्यांनी हे वेदमंत्र ध्यान करीत असतांना ऐकले आहेत. म्हणून वैदिक ऋषींना मंत्रद्रष्टे ऋषी असे म्हणतात.

*प्रश्न : महाराज, उपनिषद या शब्दाचा नेमका अर्थ काय आहे ?*

उत्तर : ''षद्ऌ विशरणगत्यवसादनेषु । विशरणगति व अवसादन'' असा धातुपाठ आहे. त्या धातुपाठाप्रमाणे उपनिषद या शब्दाचा मूळ अर्थ

ब्रह्मविद्या असा आहे. परमेश्वर, भगवंत, परब्रह्म या संज्ञाही ब्रह्माचाच निर्देश करतात. भगवंताची प्राप्ती कशी करुन घ्यावी हे सांगणारी विद्या म्हणजे ब्रह्मविद्या म्हणजेच अध्यात्मशास्त्र. साद् या धातूचे अर्थ तीन आहेत. शिथिल करणे, गति व नाश. ''उपनिसादयति इति उपनिषत्'' म्हणजे 'विरुद्ध वासना शिथिल करणारी', 'विरोधी अविद्येचा नाश करणारी', 'ब्रह्माच्या समीप पोचवणारी', ती ब्रह्मविद्या असा उपनिषद शब्दाचा मुख्य अर्थ आहे. ब्रह्मविद्येचे प्रतिपादन व विवरण उपनिषदांमध्ये आहे.

*प्रश्न : महाराज, वेदांतील व उपनिषदांतील वाक्ये मूळांतून वाचायला गेलो तर त्यांचा अर्थ बरोबर कळत नाही. पुस्तकांतून जे अर्थ दिलेले आहेत ते अनेकवेळा पटत नाहीत. परंपरेशी सुसंगत वाटत नाहीत. वेद व उपनिषदे यांतील वाक्यांचा अर्थ कसा लावला पाहिजे ?*

उत्तर : भारतांत इंग्रजांचा प्रवेश झाला तेव्हापासून वाक्यांचा अर्थ लावण्यासाठी ऐतिहासिक पद्धती ही पद्धती वापरतात. ग्रंथकर्ता कोण आहे? तो कोणत्या भूमिकेतून गंथ लिहितो ? ग्रंथ निर्मिती झाली त्या काळात परिस्थिती कशी होती ? या गोष्टींचा विचार करुन ग्रंथांतील वाक्यांचा अर्थ या पद्धतीत लावतात. ते सर्वथा अयोग्य आहे असे नाही. परंतु ग्रंथाचा अर्थ लावतांना त्या ग्रंथाचा उपयोग कोणाला होणार आहे व कसा होणार आहे याचा विचार प्रथम झाला पाहिजे.

सिद्ध व साधक असे जीवांचे दोन वर्ग असतात. पहिला वर्ग म्हणजे सिद्ध. सिद्ध म्हणजे ज्ञानी. कृतार्थ झालेल्या ज्ञानी पुरुषांना कर्मरुप साधन करण्याची जरुरी नाही. दुसरा वर्ग म्हणजे साधक. ज्यांना कर्मरुप साधन करायचे आहे ते साधक.

वेद प्रकटले आहेत साधकांसाठी. मोक्ष मिळवण्यासाठी कर्मांचे अनुष्ठान साधकांनी कसे करावे याचे मार्गदर्शन करण्यासाठी. साधकांना कर्मांचे अनुष्ठान करण्याची गरज आहे. साधकांना पोषक असणारा विचारच अर्थ लावतांना महत्वाचा मानला पाहिजे. त्याप्रमाणे वेदांतील वाक्यांचा अर्थ लावला पाहिजे. ज्ञानी माणसाला स्वतःला अनुष्ठान करण्याची गरजच नसते. तो सिद्धच आहे. सर्वभूतहितेरतः असा तो वागतो आहे. त्याच्या प्रवृत्तीचा विचार करण्याचे कारणच नाही. साधकाच्या प्रवृत्तीचा विचार करतांनासुद्धा साधक अनुष्ठान म्हणून ते कर्म करेल तेव्हा त्या कर्माचे स्वरुप कोणते असावे हे पाहिले पाहिजे. अनुष्ठानाचा प्रकार कोणता असावा, साधकाला ते अनुष्ठान करुन कोणते फळ मिळवायचे आहे, साधक ते अनुष्ठान करणार आहे तो काळ कोणता असेल याचा विचार झाला पाहिजे. तसा विचार करुनच वेदांतील वाक्यांचा अर्थ लावला गेला पाहिजे.

प्राध्यापकही अभ्यास करतात याचा विचार विद्यार्थ्याला फारसा उपयुक्त नसतो. परंतु अमुक विद्यार्थ्याने अभ्यास केला, त्यामुळे तो चांगल्या प्रकाराने उत्तीर्ण झाला व त्याला पारितोषिक मिळाले इत्यादि विचारच विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीला खरे पोषक ठरतात.

इंग्रजांच्या आगमनानंतर वेदांमधील वाक्यांचा अर्थ ऐतिहासिक पद्धतीनेच लावलेला आहे. तर्काला प्राधान्य देऊन लावलेला आहे. साधकाने कर्माचे अनुष्ठान कसे करावे म्हणजे त्या साधकाला फळ मिळेल हा विचार त्यात केलेला नाही. वेदांचा बराचसा भाग कर्मप्रतिपादक आहे. त्या कर्मांचे विवेचन करणे हेच मीमांसाशास्त्राचे उद्दिष्ट आहे. शब्द नित्य आहे व अर्थही नित्य आहे. यामुळे वेदाला पुरुषबुद्धीचा संबंधच नाही असे मीमांसाशास्त्र सांगते. वेद अपौरुषेय आहेत. शब्दप्रमाणच प्रधान आहे.

धर्मशास्त्रांत सांगितलेली कर्मे करुन जीव मोक्षापर्यंत जाऊ शकतो असे मीमांसाशास्त्र सांगते.

मीमांसाशास्त्रांत वेदांचा अर्थ लावण्याची वाक्यशास्त्र ही पद्धत घालून दिली आहे. एखाद्या वाक्याचा अर्थ लावतांना एकूण प्रकरणांत सुरुवातीला व शेवटी काय सांगितले आहे याचा विचार करतात. सर्वांतून एकच अर्थ निघतो आहे हे पहातात. प्रकरणामध्ये एखादे वाक्य स्तुति करणारे असते, एखादे वाक्य निंदा करणारे असते. अशा वाक्यांच्या अर्थाचा स्वतंत्र विचार करत नाहीत. संपूर्ण प्रकरणाच्या सुरुवातीला काय बोध केला आहे आणि प्रकरणाच्या शेवटी कोणत्या अर्थाचा बोध केला आहे, तोच महत्वाचा मानतात. एकूण प्रकरणाचे तात्पर्य काय आहे याचा विचार करतात. त्याप्रमाणे विशिष्ट वाक्याचा अर्थ लावतात. साधकाला कोणते फळ मिळवायचे आहे याचा एकूण प्रकरणांत असलेला विचार लक्षात घ्यायचा आणि एका विशिष्ट वाक्याचा अर्थ लावायचा. तात्पर्य निर्णयाकरिता शब्द व अर्थ या दोघांचे परीक्षण करण्याची ही पद्धती मीमांसक वापरतात. तीच पद्धती योग्य आहे. या पद्धतीलाच वाक्यशास्त्र म्हणतात.

वेद हे केवळ वाङ्मय नाही. ते परंपराप्राप्त वाङ्मय आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. वेदमंत्राकडे केवळ जिज्ञासू दृष्टीने पाहून चालणार नाही. केवळ अभ्यासक या दृष्टीने पहाणे योग्य नाही. वेद हे केवळ एक वाङ्मय आहे आणि त्या वाङ्मयाचा अर्थ लावायचा आहे ही वृत्ती असेल तर वेद व उपनिषदांतील रचनांचा अर्थ लावता येणार नाही. योग्य प्रकारे अर्थ लावायचा असेल तर भारतीय परंपरेचा अभिमान असायला हवा. ती परंपरा प्राण पणाला लावून जतन करण्याची वृत्ती असायला हवी. भारतीय परंपरेतील परमात्ममीमांसा, ज्ञानमीमांसा व मूल्यमीमांसा यांचे ज्ञान असायला हवे. तरच वेदवाक्यांचा योग्यप्रकारे अर्थ लावणे शक्य होईल.

आज इंग्रजीत असलेली भाषांतरे युरोपियन विद्वानांनी ऐतिहासिक पद्धतीने वाक्यार्थ लावून केलेली आहेत. त्यामुळे ती यथार्थ नाहीत. ज्या भारतीय पंडीतांनी भारतीय भाषांमधील अनुवाद या इंग्रजी भाषांतरावरुन प्रसिद्ध केले त्यांतही यथार्थ प्रकटलेला नाही. वेदवाक्यांचा अर्थ लावतांना मीमांसाशास्त्रांतील वाक्यशास्त्र ही पद्धती वापरली तरच यथार्थ समजू शकतो.

*प्रश्न : महाराज, भारतात अनेक अध्यात्मग्रंथ, अनेक सिद्धांत, अनेक संप्रदाय आहेत आणि त्यांत खूप भेद आहेत, विरोधही आहेत. त्यामुळे भारतीय अध्यात्मविद्येचे नेमके स्वरुप सामान्य माणसाला कळत नाही. संप्रदायांमध्ये असलेल्या विरोधामुळे तो गोंधळून जातो.*

उत्तर : ''हितं शास्तीति शास्त्रम् ।'' दर्शनशास्त्र कोणतेही घेतले तरी ते हिताचा उपदेश करणारेच आहे. सर्व शास्त्रांचा मूलतः विरोध नाही. त्यांचा समन्वयच आहे. फक्त तशी दृष्टी बाळगून विचार झाला पाहिजे. दूरदूरच्या खेडेगांवातून माणसे काशीला जायला निघतात. त्यांना बैलगाडी, मोटार, रेल्वे अशी अनेक साधने वापरावी लागतात. रेल्वेही अनेक ठिकाणी बदलावी लागते. परिस्थितीप्रमाणे या सर्व साधनांचा उपयोग करुन माणसे काशीला पोचतात. याप्रमाणे विश्वात्म्याच्या विविध रुपांचे ज्ञान भिन्न रुपाने करुन देणारी सर्वही शास्त्रे उपकारकच आहेत.

राज्यामध्ये विविध खाती असतात. प्रत्येक खात्याचा वेगळा मंत्री असतो. ते मंत्री तन्मयतेने आपापल्या खात्यापुरतेच त्या त्या खात्याचे काम पहात असतात. तथापि ती सर्व खाती मिळून एकच राज्य असते. राज्य एकच असल्यामुळे त्या खात्यांचा किंवा मंत्र्यांचाही आत्यंतिक विरोध संभवत नाही. उलट समन्वयाची एक राज्यदृष्टी आंत बाळगूनच प्रत्येक मंत्री

त्याच्या खात्याचे काम पहात असतो. बाहेरुन त्यांचे कार्य वेगवेगळे चालू आहे असे दिसते. पण सर्व खाती मिळून एकच राज्य असते. एकच राज्यदृष्टीने ते चालते. तसे हे आहे.

माणसाची दुःखे दूर व्हावीत आणि माणसाला स्वतःचे व इतरांचेही जीवन सुखी करता यावे यासाठीच सर्व दर्शनशास्त्रे आहेत. उद्देश एकच आहे. शेवटी संप्रदाय एकाच ठिकाणी जाऊन पोचतात. कोणत्याही मार्गाने निघाले तरी एक मार्ग धरुन चालत राहिले की शेवटी मनुष्य त्याच ध्येयाला जाऊन पोचतो.

*प्रश्न : महाराज, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदांत अशी सहा दर्शने आहेत. या प्रत्येक दर्शनाचा वेगळा संप्रदाय दिसतो. वेदांतामध्ये पुन्हा द्वैत, द्वैताद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्ठाद्वैत, केवलाद्वैत असे संप्रदाय आहेत. या संप्रदायामध्ये जो तो आपणच बरोबर आहे असे सांगतो. त्यावरुन शास्त्रचर्चा होतात. म्हणून तर आमचा गोंधळ होतो.*

उत्तर : भारतीय तत्त्वज्ञानांतील सर्व दर्शने, उपदर्शने, सर्व संप्रदायांचे व उपसंप्रदायांचे तत्त्वज्ञान या सगळ्यांत समत्वच आहे. हे समत्व जाणवणे, या समत्वाची अनुभूती स्वतः घेणे ही बुद्धीची अंतिम शक्ती आहे. येथेच बुद्धीविकास पूर्ण होतो. बुद्धी पूर्ण विकसित झाली की त्या पुरुषाला सर्व दर्शनांमध्ये, सर्व संप्रदायांमध्ये असलेले समत्व दिसू शकते आणि त्या समत्वाची अनुभूती येऊ शकते. ही समत्वबुद्धी असलेले अनेक ऋषी आणि संतमहात्मे झाले आहेत. आजही तसे महात्मे आहेत.

*प्रश्न : महाराज, ऋतंभरा प्रज्ञा असेल तर ही समत्वबुद्धी प्राप्त होते कां ?*

उत्तर : ऋतंभरा प्रज्ञा ही असामान्यच आहे. पण ऋतंभरा प्रज्ञा प्राप्त असली तरीही त्या पुरुषाच्या बुद्धीत संशय, विपर्यास हे दोष निर्माण होऊ शकतात.

आणि त्यामुळे ऋतंभरा बुद्धीचे स्वरुपही तिरोहित होऊ शकते. समत्वबुद्धी येण्यासाठी शास्त्रप्रतीती, गुरुप्रतीती व आत्मप्रतीती व्हावी लागते. शास्त्रप्रतीती म्हणजे शास्त्राचे तात्पर्य काय आहे याचे योग्य आकलन होणे. शास्त्रप्रतीती मिळाली तरी गुरुकृपा झाल्याशिवाय त्यामागील अनुभूती येत नाही. गुरुकृपा झाली तरच शास्त्रांतील तात्पर्याची अनुभूती येते. याला गुरुप्रतीती म्हणतात. शास्त्रप्रतीती व गुरुप्रतीती लाभली की दोन्हींचा संवाद होऊन शेवटी आत्मप्रतीतीचा लाभ होतो. आत्मप्रतीती म्हणजे सर्वत्र एकच आत्मरुप आहे, एकच भगवंत आहे ही अनुभूती येणे. ही अनुभूती ही अंतिम अवस्था आहे.

आत्मप्रतीती येणे हेच अंतिम ध्येय आहे. हे ध्येय गाठता यावे यासाठीच वेगवेगळे संप्रदाय निघाले आहेत. प्रत्येक संप्रदायाचे ग्रंथ आहेत, ते सांगणारे अध्यापक आहेत. विविध संप्रदायांमध्ये वेगवेगळे मार्ग सांगितले असले तरी शेवटी ते एकाच अनुभूतीला जाऊन मिळतात.

केवळ ग्रंथ वाचून काही होत नाही. भ्रांती, प्रमाद वगैरे दोष ग्रंथवाचनानंतरही रहातातच. गुरुकृपेनेच ते दोष दूर होतात आणि सर्व शंका नाहीशा होतात. म्हणूनच भारतांत सद्गुरुंचे महत्व प्रत्येक संप्रदायांत आहे. सद्गुरुंच्या कृपेवाचून आत्मप्रतीतीच्या ध्येयापर्यंत जाणे अशक्य आहे असे सांगतात.

*प्रश्न : महाराज, आपण वैदिक ऋषींच्या समत्वशक्तीचा उल्लेख केलात. समत्वशक्ती म्हणजे काय ?*

उत्तर : समत्वशक्ती म्हणजे समत्वदर्शनशक्ती. सर्व विश्वांत असलेले समत्व पहाण्याची शक्ती. ही बुद्धीची अंतिम शक्ती आहे. बुद्धीचा पूर्ण विकास इथेच होतो. विश्वांतील सर्व जड व चेतन वस्तुंमध्ये समत्व पाहू

शकणाऱ्यालाच पूर्ण शांतीचा लाभ होतो. "सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलान्ति शांत उपासीत ।" या उपनिषदांतील वाक्यांत हेच सांगितले आहे. उपासना ही शांत राहूनच करायची असते. उपासनेत ती शांती राहण्याकरता "सर्वं खल्विदं ब्रह्म" जे सर्वकाही आहे ते ब्रह्मच आहे हा ठाम विश्वास ही समवृत्ती उपयोगी पडते. यत्र समत्वदर्शनः तत्र शांतीः। सर्वत्र एक ब्रह्मच आहे ही दृष्टीच पूर्ण शांती प्राप्त करुन देते.

आज सर्वत्र विश्वांत जी अशांती आहे तिचे मूळ कारण ही समत्त्वदृष्टी आमच्यात नाही हेच आहे. सर्व ब्रह्म आहे. जगात जे जे कांही दिसते ते सर्व भगवंताचीच रुपे आहेत हे शब्दज्ञानही मनाची शांती देते. पुढे त्याची प्रत्यक्ष अनुभूतीही येते. ती अनुभूती घेतलेल्या पुरुषाला समदर्शी पुरुष म्हणतात. समदर्शी पुरुषच नेहमी संतुष्ट असतो. म्हणून गीतेत समदर्शी पुरुषाचे वर्णन "उदासीनो गतंव्यथः ।"," अनिकेतः स्थिरमतिः ।", " संतुष्टो येनकेनचित् ।" असे केले आहे. समोहं सर्वभूतेषु किंवा समत्वं योग उच्चते असे गीतेत याच अर्थाने सांगितले आहे. संतमहात्मे तेच सांगताहेत. "राखावी बहुतांची अंतरे" यांत समर्थ रामदासस्वामी तेच सांगताहेत. "कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।" या वचनांत तुकाराममहाराजही तेच सांगताहेत. ही समदृष्टी ज्याने मिळवली त्यानेच पूर्णता मिळवली. तोच तरुन गेला.

साध्या डोळ्यांनी पाहिले की भोवतालच्या विश्वांत नाना रुपे दिसतात. नाना वस्तू दिसतात. अनेक नांवे असतात. पण ही विविधता, ही नानारुपे, नाना नामे, ही आपली भ्रांती आहे. सर्व काही एक ब्रह्मच आहे. ही सगळी एका भगवंताचीच रुपे आहेत. हे जो जाणू शकतो, पाहू शकतो तोच समदर्शी. तोच सर्व भेदांच्या पलीकडे जातो. तोच स्थितप्रज्ञ असू शकतो. सर्वत्र ब्रह्मच आहे हे पाहणाराच समदर्शी पुरुष असतो. उपनिषदकारांनी

त्याचा गौरव केला आहे. धम्मपदामध्ये तथागतांनीही त्याचाच गौरव केला आहे. वैदिक ऋषी असे समदर्शी होते. अनेक संतमहात्मे असे होऊन गेले. आजही आहेत.

*प्रश्न : महाराज, समदर्शी पुरुष व्यवहारांत राहू शकतो कां ?*

उत्तर : अनेक समदर्शी पुरुष व्यवहारांतही राहिल्याची व सफल झाल्याची उदाहरणे आहेत. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, धर्मराज असे समदर्शी होते. अनेक संतमहात्मे समदर्शी होते. पण असे समदर्शी फार थोडे असतात. अनेक जन्मात साधना घडल्यावर ही समदृष्टी प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, समदर्शी पुरुषाला व्यवहारांत उतरल्यावर ही समत्वबुद्धी सांभाळता येईल कां ?*

उत्तर : विश्वांतील सर्व चेतन व अचेतन वस्तूंमध्ये जे द्वैत आहे ते मानूनच व्यवहारांत रहावे लागते. ते द्वैत व्यवहारापुरते मानले तरी सर्व चेतन व अचेतन वस्तूंच्या अंतर्यामी भगवंतच आहे याची जाणीव मनांत ठेवणे शक्य आहे. अशी जाणीव मनांत ठेवून व्यवहारांत वागत राहिले तर व्यवहार सफल होतो आणि मनाची शांती ढळत नाही. या भूमिकेने व्यवहार करीत असले तर ते व्यवहार करतांनाही मनाने पूर्णपणे ही अलिप्त रहाता येते. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा हा संगमच आहे. व्यवहारांत असतांना संसारांत राहूनही आंतून निवृत्त असणे शक्य आहे. संसारात रहात असले तरी मनाने अलिप्त रहाता येते असा अनेक संतमहात्म्यांचा अनुभव आहे. तसे सफल जीवन ते स्वतः जगले आहेत. असे अनेक संतमहात्मे झाले आहेत.

*प्रश्न : महाराज, आधुनिक काळांत वैज्ञानिकही माणसाची दुःखे दूर व्हाव आणि तो सुखी व्हावा यासाठीच प्रयत्न करीत आहेत. माणसाची दुःखे दूर व्हावी आणि तो सुखी व्हावा यासाठीच अध्यात्मशास्त्रही सांगितले आहे.*

उत्तर : अध्यात्मशास्त्रही विचारशास्त्र आहे व आधुनिक विज्ञानही विचारशास्त्रच आहे. परंतु माणसाची दुःखे दूर करुन त्याला सुख देण्याचे दोघांचे मार्ग वेगळे आहेत. अध्यात्मशास्त्र प्रामुख्याने मनाचा विचार करते आणि माणसाच्या मनांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करते. त्याच्या मानसिक शक्तीचा विकास करण्याचा प्रयत्न करते. मानसिक शक्तीच्या आधारावर आत्मतत्त्वापर्यंत जाऊन पोचण्याचा प्रयत्न करते. आत्मतत्त्व म्हणजे भगवंत, परमेश्वर. भगवंताची अनुभूती यायला लागली की माणसाची दुःखे नाहीशी व्हायला लागतात. माणसाला सुखसमाधान मिळू लागते. या मार्गाने जात राहिले की शेवटी सर्व दुःखे कायमची नाहीशी होतात व तो माणूस परमानंदाच्या अवस्थेत रहातो. या अवस्थेलाच मोक्ष असे म्हणतात. हा मानसिक प्रवास आहे.

आधुनिक विज्ञानवादी प्रामुख्याने जड व निर्जीव वस्तूंचा विचार करीत आहेत. संशोधन करुन प्रयोग करुन नव्या नव्या वस्तू ते बनवत आहेत. देहाच्या गैरसोयी दूर करुन देहाला सुख देण्यात प्रयत्न करीत आहेत. देहाच्या सुखाचाच त्यांत प्रामुख्याने विचार आहे. त्यांचे संशोधन प्रामुख्याने अचेतन जड वस्तूंबाबतच आहे.

भारतीय अध्यात्मवादी व आधुनिक देशातील वैज्ञानिक शास्त्रज्ञ दोघांचा उद्देश एकच आहे, माणसाला सुख देण्याचाच आहे. अध्यात्मवादी व विज्ञानवादी दोघांचेही प्रयोग त्यासाठी आहेत. पण आधुनिक विज्ञानवाद्यांच्या प्रयोगांना खूप पैसा लागता. तसे अध्यात्ममार्गाने जाणाऱ्याला फारसा पैसा लागत नाही. त्याला केवळ मनोबलाची आवश्यकता आहे. कारण अध्यात्मप्रवास मनाच्या पातळीवरच आहे.

*प्रश्न : महाराज, आधुनिक विज्ञानवादी माणसाला शाश्वत सुख व समाधान देऊ शकतील काय ?*

उत्तर : वैज्ञानिकांच्या प्रयत्नांनी दुःखनिवृत्ती व परमानंद प्राप्ती होणे केवळ अशक्य आहे हे जवळजवळ सर्वच विचारशील माणसांना आज पटले आहे. श्रीमंत देशांतील आजचे चित्र हेच दाखवीत आहे. आधुनिक विज्ञानाने माणसाला दिलेली भौतिक सुखसाधने फारशी जवळ नसली तरीही मनुष्य समाधानी राहू शकतो. शांती मिळवून आनंदात राहू शकतो. परंतु सुधारलेल्या श्रीमंती देशांत अनेक भौतिक सुखसाधने मिळूनही मनुष्याचे जीवन समाधानी होऊ शकलेले नाही. त्या देशांतील माणसाचे जीवन सुखसमाधान आणि शांती यापासून दूरच राहिलेले आहे. आध्यात्मिक सामर्थ्यावाचून माणसाचे जीवन अशांतच राहते, दुःखीच राहते असेच सर्वत्र दिसून येत आहे. कोणतेही राष्ट्र किंवा समाज आध्यात्मिक शक्तीशिवाय स्थिर राहू शकत नाही. म्हणून वैदिक ऋषींनी सांगितलेल्या मार्गाने आत्मोन्नती करुन घेणे यांतच जीवनाचे खरे साफल्य आहे. विज्ञान हे जीवनाचे गौण साधन आहे.

*प्रश्न : महाराज, असे जर आहे तर फार माणसे अध्यात्माकडे कां वळत नाहीत ?*

उत्तर : विज्ञान हे केवळ प्रयोगप्रधान आहे. प्रयोग करुन आधुनिक वैज्ञानिक जे काही वैज्ञानिक सत्य म्हणून जगापुढे मांडतात, ते डोळ्यांना प्रत्यक्ष दिसू शकते. आध्यात्मिक सत्य प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत नाही. अध्यात्मही प्रयोगशास्त्रच आहे. वैदिकऋषींनी प्रयोग करुन स्वतः अनुभव घेऊनच सत्य जगापुढे मांडले आहे. आजहि प्रयोग करुन ते अनुभवता येते. पण

अध्यात्मक्षेत्रांतील प्रयोग मानसिक पातळीवर असल्याने ते डोळ्यांना प्रत्यक्ष दाखवता येत नाहीत.

वैदिक ऋषींनी चिरशांतीची जी साधने जगापुढे मांडली आहेत, त्यांत विशिष्ट मानसिक शक्तींचा विकास करुन घ्यायचा आहे. अनेकांनी त्या साधनांनी आत्मोन्नती करुन घेतली आहे, शांती मिळवली आहे. आत्मसाक्षात्कारही करुन घेतला आहे. परंतु सर्वांना ते साधणार नाही. विशिष्ट साधक अनुभव घेऊ शकतो, ते फळ मिळवू शकतो. पण त्या साधकाने मिळवलेले फळ इतर लोकांच्या डोळ्यांना प्रत्यक्ष दिसू शकत नाही.

समाज प्रामुख्याने बहिर्मुखच असतो. डोळ्यांनी बाहेर जे दिसते तेच बघणारा असतो. अंर्तमुख प्रवृत्तीची म्हणजे आंत मनांत डोकावून पहाणारी माणसे. अशी अंतर्मुख माणसे थोडीच असतात. बहिर्मुख माणसांना देह डोळ्यांनी दिसतो. म्हणून देहाला सुख कसे मिळेल याचाच विचार बहिर्मुख समाजात जास्त होतो. आधुनिक विज्ञानवादीही मुख्यतः देहाचाच विचार करुन अनेक भौतिक वस्तू जगाला उत्पन्न करुन देत आहेत. यालाच ते भौतिक विकास म्हणत आहेत. विज्ञानवाद्यांनी दिलेल्या भौतिक वस्तू सर्वांनाच डोळ्याने दिसतात. म्हणून आधुनिक विज्ञानाकडे समाजाची जास्त प्रवृत्ती होते. त्यामानाने अध्यात्माकडे प्रवृत्ती कमी असणे स्वाभाविकच आहे.

भारत हे एकच राष्ट्र अनादिकालापासून आध्यात्मिक प्रवृत्तीचे दिसून येते. ''अध्यात्मविद्या विद्यानाम्'' सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या श्रेष्ठ आहे अशी भावना भारतात वेदकाळापासून आहे. म्हणूनच अध्यात्मविद्येची आवड भारतीयांच्या रक्तातच भिनलेली आहे.

*प्रश्न : महाराज, शांती मिळवण्याचा जो मार्ग कठोपतिषदांत सांगितला आहे त्यांत उपनिषदकार सांगतात, ''प्राज्ञ पुरुषाने वाणीचा निग्रह मनामध्ये करावा, मनाचा निग्रह बुद्धीमध्ये करावा, बुद्धीचा निग्रह जीवात्म्यामध्ये करावा व त्या सर्वांचा निग्रह आत्मस्वरुपांत करावा.'' आम्ही ते कसे करावे हे विशद करुन सांगावे अशी प्रार्थना आहे ?*

उत्तर : आत्मस्वरुप म्हणजे परमात्मा. परमात्माच सर्वांचा आधार आहे. शांती आहे तो. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. तोच सर्वज्ञ आहे. तो सर्वांना व्यापून राहिला आहे. परंतु तो आम्हाला दिसत नाही. कारण त्याच्या दर्शनाचा अधिकार आम्हाला आलेला नसतो. म्हणून परमात्मा गूढ आहे हेच भगवंतांनी ''नाहं प्रकाशः सर्वस्य'' असे गीतेत आपल्या मुखाने सांगितले आहे.

भगवंताच्या दर्शनाचा अधिकार कसा प्राप्त करुन घ्यावा हे कठोपनिषदांतील या मंत्रांत सांगत आहेत. प्रथम वाणी इत्यादि सर्व इंद्रियांचा मनामध्ये निरोध करावा. म्हणजे साधकाने इंद्रियांच्या वृत्ती बंद कराव्या आणि फक्त मनोवृत्तीच शिल्लक ठेवाव्या. मग त्या मनाचा बुद्धीमध्ये निरोध करावा. बुद्धीचा जीवात्म्यामध्ये निरोध करावा व त्या सर्वांचा परमात्मरुपांत निरोध करावा म्हणजे शांती प्राप्त होते असे सांगितले आहे. म्हणजे एकेक व्यापार कमीकमी करीत जावे व भगवंताच्या चिंतनात मग्न रहावे. त्यामुळे परमात्म्याच्या दर्शनाचा अधिकार प्राप्त होतो. परमात्मा शांतीरुप आहे. त्याच्याच दर्शनाने पूर्ण शांती मिळते असे उपनिषदकार सांगत आहेत.

*प्रश्न : महाराज, उपनिषदे व पुराणे यातील उपदेश म्हणजे नुसते शब्द, नुसते वाङ्मय आहे असे काही बुद्धीवादी लोकांना वाटते.*

उत्तर : उपनिषदांतील शब्द म्हणजे काही सामान्य शब्द नाहीत. ज्यांच्या मनाची पूर्ण स्थिरता झालेली आहे, खरं ज्ञान ज्यांना झालेलं आहे, त्यांनी सांगितलेले ते शब्द आहेत. आपल्या मनामध्ये श्रद्धा, भक्ती असेल तर त्या शब्दांनी ईश्वराचं स्वरुप कळून येतं आणि ईश्वराचं अनुसंधान घडते. त्यासाठीच उपनिषदे आहेत.

*प्रश्न : महाराज, वेद व उपनिषदांतील वाक्यांचा अर्थ प्रखर बुद्धीमंत तर्काने जाणू शकणार नाही कां ?*

उत्तर : वेद व उपनिषदांत आत्मस्वरुपासंबंधी जे काही ऋषींनी सांगितले आहे ते स्वानुभवांतून सांगितले आहे. आत्मस्वरुपाच्या अनुभवाचे क्षेत्र अतींद्रिय, अपौरुषेय व तर्कातीत आहे. ते तर्काला विरोधी नाही. पण तर्काचे क्षेत्र संपल्यावरच आत्मानुभूतीचे क्षेत्र सुरु होते. माणसाच्या बुद्धीला सीमा आहेत. वेद व उपनिषदांतील भाषा साधी वाटते. पण त्यांतील मंत्रांमध्ये मोठा गूढार्थ भरलेला आहे. अनेक गोष्टी सांकेतिक पद्धतीने सूचित केल्या आहेत. म्हणून वेद व उपनिषदांतील मंत्रांचा खरा अर्थ घ्यानांत येण्यासाठी बुद्धी व तर्क उपयोगाला येत नाहीत. कितीही प्रखर बुद्धीमंत असला तरी तर्कपद्धतीने तो वेदमंत्रांचा खरा अर्थ सांगू शकणार नाही. निष्काम धर्माचरण व वैराग्य यामुळे ज्यांची बुद्धी शुद्ध झाली, सुक्ष्म झाली तेच कांही सांगू शकतील. स्वानुभवानेच वेदमंत्रांचा खरा अर्थ ध्यानांत येऊ शकतो. म्हणून आत्मज्ञानी संतच या मंत्रांचा खरा अर्थ सांगू शकतात. ते जे कांही सांगतात ते शब्दप्रमाण म्हणूनच स्वीकारले पाहिजे.

*प्रश्न : तैत्तरीय उपनिषदांत ''यतो वाचो निवर्तन्ते'' असे ब्रह्माचे वर्णन केले आहे. शब्दांनी ब्रह्म समजत नाही असा या श्रुतिवाक्याचा अर्थ करायचा*

*कां? वेद आणि उपनिषदे शब्दांतच सांगितली आहेत. मग वेद व उपनिषदे वाचूनही ब्रह्म समजून येणार नाही, असा अर्थ नाही कां होणार ?*

उत्तर : शब्दांनी ब्रह्म समजत नाही असा या श्रुतिवाक्याचा अर्थ नाही. ब्रह्माचे स्वरुप व गुण इतके अमर्याद आहेत की तेथे शब्द अपुरेच आहेत. शब्दांनी कितीही वर्णन केले ते गुण संपणारच नाहीत असा या श्रुतिवाक्याचा अर्थ आहे.

प्रश्न : महाराज, जीव व ईश्वर एकच आहेत उपनिषदांतील काही वाक्ये असे सांगतात तर जीव व ईश्वर भिन्न आहेत असेही काही वाक्ये सांगतात. याचा समन्वय कसा करायचा ?

उत्तर : मी परमात्म्याचा अंश आहे. म्हणून माझे व परमात्म्याचे तादात्म्य आहे. तादात्म्य म्हणजे भेद असून अभेद असणे. माती व घडा, सोने व अलंकार हे एकच असतात आणि वेगळेही असतात. त्यांत भेदही असतो आणि अभेदही असतो. याप्रमाणे जीव व ईश्वर या दोन्हीमध्ये जे तादात्म्य असते, तो भेदही असतो आणि अभेदही असतो. तो "सर्व खल्विदं ब्रह्म।" या वाक्यात दाखवला आहे. जीव आणि ब्रह्म हे एकच आहेत आणि वेगळेही आहेत. या दोघांचे तादात्म्य आहे असेच येथे सांगितले आहे.

झाड व पाने यांचा भेद आहे. दोन्ही वेगळे आहेत. कारण झाड म्हणजे पाने नव्हेत. पण झाड व पाने यांचा अभेदही आहे. कारण पानाशिवाय झाड वेगळे आणखी कोणते आहे ? पाने झाडाच्या एकूण रुपांतच समाविष्ट आहेत. जीव ब्रह्माचा अंश आहे. जीव मर्यादित आहे. ब्रह्म अमर्यादित आहे. मर्यादित असल्याने जीव हा अमर्याद ब्रह्माहून भिन्न आहे. आणि शेवटी मातीच्या घड्यांत जसे मातीवाचून दुसरे काहीच नाही त्याप्रमाणे जीव ब्रह्माशिवाय वेगळा नाही. म्हणून जीव व ईश्वर यांचा अभेदही आहे.

*प्रश्न : महाराज, मोक्षाची इच्छा करणाऱ्याने नेहमी ईश्वराचे चिंतन करावे असे उपनिषदकार सांगतात. जीव व परमात्मा एकच आहेत. मग हृदयांत ईश्वराचे चिंतन काय स्वरुपांत करायचे ? मी ईश्वरस्वरुपच आहे असे चिंतन करायचे कां मी ईश्वरापेक्षा वेगळा आहे असे चिंतन करायचे?*

उत्तर : भक्त हा जीव आहे. म्हणून तो ईश्वरापेक्षा वेगळा आहे. तथापि ईश्वर हाच माझा आत्मा आहे. म्हणून मी ईश्वराशी अभिन्न आहे असे ध्यान भक्तीने करावे.

भक्ताने आपण भगवंतापेक्षा भिन्न असूनही अभिन्न आहोत अशीच भावना ठेवावी असे सांगतात. म्हणूनच उपनिषदकार ''एष मे आत्मा एवं सर्वभूतान्तरात्मा ।'' भगवंत हा माझा व सर्व भूतांचा आत्मा आहे असे स्वतः समजतात आणि ''ऐतमात्म्यमिदं सर्व तत्त्वमसि ।'' हे सर्व विश्व भगवंत्स्वरुपच आहे आणि तूंही भगवत्स्वरुपच आहेस असा उपदेश आपल्या शिष्यांना करतात. भगवद्गीतेतही भगवंतांनी तसेच सांगितले आहे.

*प्रश्न : ''तैसा आत्मा देही । आथि म्हणिपे हे कांही । साचे तरी नाही । तो जेथिचा तेथे ।'' या ज्ञानेश्वरीतील ओवीचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : मी शरीर आहे ही आपली भ्रांती आहे, भ्रम आहे. मी आहे आत्मा. आत्मा देहाच्या ठिकाण आहे हे म्हणणे खरे नाही. तो आत्मा जेथल्या तेथेच आहे. आरशाच्या बाहेर असलेले मुख आपण आरशांत पहातो आणि त्याला आरशांतील मुख म्हणतो. तसे आत्मा देहाच्या ठिकाणी पहाणे आहे. आरशाचा व मुखाचा काही संबंधच नाही. तसा आत्म्याचा व देहाचा काही संबंधच नाही. मुख आहे तेथेच आहे. आरसा असला काय,

नसला काय. तो ठेवला काय आणि काढून घेतला काय. आरशाचा मुखाशी काही संबंधच नाही. देह हीच भ्रांती आहे, भ्रम आहे. तो असला काय, नसला काय. आत्मा देहात नाही. आत्मा जेथे आहे तेथेच आहे. आत्मा व देह यांचा संबंधच होऊ शकत नाही. जर दोन पदार्थ सत्य असतील तरच त्या दोन पदार्थांचा संबंध होऊ शकतो. आत्मा अमर्याद आहे, नित्य आहे, अविनाशी आहे. तोच केवळ सत्य आहे. देह विनाशी आहे, मिथ्या आहे. एक सत्य आणि एक मिथ्या या दोहोंचा संबंध होऊ शकतच नाही असे वेदांत सांगतो. ज्ञानदेव येथे तेच सांगत आहेत.

देह पंचभूतांचा बनलेला आहे. भगवंतच त्या देहाकडून कर्मे करुन घेत आहे. तो एक दिवस अग्नीमुखी पडून नाहीसा होईल किंवा मातीत मिसळून कृमीचा ढीग होईल. देहाची ही दशा एक दिवस ठरलेलीच आहे. पण आत्मा त्याच्या उलट आहे. तो अनादि आहे, नित्य आहे, शुद्ध आहे हेच ज्ञानदेव येथे सांगत आहेत.

*प्रश्न : श्रीज्ञानेश्वरमहाराजांना पत्र लिहितांना मायना काय लिहावा हा प्रश्न चांगदेवांना पडला. पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांना तो प्रश्न पडला नाही. ज्ञानदेवांना तो प्रश्न कां पडला नाही महाराज?*

उत्तर : आत्मज्ञान मिळावे म्हणून चांगदेव श्रीज्ञानेश्वरमहाराजांना शरण आलेले आहेत. पण पत्र लिहितांना मनांत गोंधळ झाला. नमस्कार लिहावा तर श्रीज्ञानेश्वरांचं वय लहान आहे. पण गुरु आहेत. त्यांच्यापासून आत्मज्ञान मिळवायचंय, शांती मिळवायचीय. मग आशीर्वाद कसा लिहिणार ? श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद शरीराच्या दृष्टीने केला जातो. आत्म्याच्या दृष्टीने नाही. म्हणजे चांगदेव अद्यापि शरीराचाच विचार करताहेत. निर्णय न करता आल्यामुळे कोराच कागद पाठवून दिला.

पण ज्ञानेश्वरमहाराजांनी गुरुंची आज्ञा झाल्याबरोबर लिहायला सुरुवात केली. नमस्कार लिहावा कां आशीर्वाद हा गोंधळ नाही. ज्ञानेश्वरमहाराजांना आत्मदृष्टी आहे. सर्वत्र एकच ब्रह्मतत्व भरुन राहिलं आहेत. त्या ब्रह्माशिवाय दुसरे काही नाही. आतबाहेर सर्वत्र वासुदेवच आहे अशी वृत्ती आहे. म्हणून ''स्वस्तिश्री वटेषु'' अशी सुरुवात केली. वटेश्वर हे चांगदेवांचे नांव. वटेश्वर चांगदेवांचे कल्याण असो. व्यवहार दृष्टीने लहान समजलं असलात तरी लहान मनुष्याने मोठ्या माणसाचे कल्याण व्हावे असे म्हणायला हरकत नाही. म्हणून ''स्वस्ति'' हा प्रयोग केला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, चांगदेव आत्मरुप आहेत. सर्व विश्वरुपी झालेला परमात्मा जो आहे, तोच चांगदेव आहे. तो जर लपून आच्छादित झाला तर ''जगदाभासु दावि'' म्हणजे जग दिसायला लागेल. पण जर प्रकट झाला तर चांगदेव सर्व विश्वरुपाला ग्रासेल. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी उपनिषदांचा सिद्धांत एका ओवीत सांगितला आहे.

*प्रश्न : महाराज, आध्यात्मिक अनुभव येण्यासाठी काय करावं ?*

उत्तर : नामदेवमहाराज म्हणतात - एकतरी ओवी अनुभवावी. वाचनाने ज्ञान होते. नाही असं नाही. पण मनातले संदेह जात नाहीत. सर्व संशयनिवृत्ती होत नाही. अनुभव घेण्यासाठी संतांकडेच जावे लागते. सद्गुरुंकडून शास्त्रार्थ समजून घेतला तर समाधान मिळते. तेच अनुभव देणारे आहेत.

*प्रश्न : महाराज, भक्ताच्या मनांत भक्ती असणे म्हणजे भगवंताच्या प्रती मनांत भोळा भाव असणे असे सांगतात. तो भोळा भाव असणे पुरेसे आहे. तो भाव असला की पूजाअर्चा, स्नानसंध्या, व्रते, पुण्यकर्मे, आचारपालन असं काही भक्तीमार्गात फारसे लागत नाही असे काही लोक म्हणतात.*

उत्तर : उपासनेची भूमिका प्राप्त होण्यासाठी शास्त्रात सांगितलेल्या क्रिया नित्यनियमाने करणे भक्तीमार्गातही आवश्यक आहे. नियमपालनांत शिथिलता आली तर पतन होऊ शकते. म्हणून साधकाने साधन म्हणून क्रियांचे पालन केले पाहिजे असे नारद भक्तीसूत्रांत सांगतात. मुक्त भूमिकेवर सिद्ध झाल्यावरही या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कारण अशा सिद्धांच्या आचरणाचा विशेष प्रभाव सामान्य लोकांवर पडत असतो.

श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांचा आचारपालनावर मोठा कटाक्ष होता. त्यांचा मुक्काम गंगातीरावर ब्रह्मवर्त क्षेत्रांत असतांना त्यांना शौचाचा उपद्रव सुरु झाला. दिवसांतून ८/१० वेळा सुद्धा शौचाचा प्रसंग येत असे. वैशाखांतला उन्हाळा. नदीचे पाणी दूर. पण भर उन्हांत तापलेली वाळू तुडवीत ते दरवेळी गंगेमध्ये स्नान करुन येत असत. ''आत्मा देहादिभ्यो भिन्नः ।'' हे वाक्य त्यांनीच उच्चारावे एवढी भूमिका प्राप्त झालेली होती. पण एवढी भूमिका होऊनही त्यांनी नियमपालन सोडले नाही. ''भक्तीमार्गात कर्माची जरुरी नाही, भोळा भाव पुरे'' हे उद्गार आळशीपणा दाखवणारे आहेत. ते ग्राह्य नाहीत. अनेक जन्म पुण्यकर्माचे अनुष्ठान साधन म्हणून करावे तेव्हांच भक्ती प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, उपवास हे व्रत करण्याला एवढे कां महत्व सांगतात ?*

उत्तर : ''तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व । तपोब्रह्मेति ।'' असे तैत्तिरीयोपनिषदांत सांगितले आहे. तप हे ब्रह्मज्ञानाचे साधन असल्याचे यांत सुचवले आहे. गृहस्थाश्रमी भक्तांसाठी उपवासव्रत हेच प्रधान तप सांगतात. दीर्घकालीन व्रताचे विधान न करता महिन्यांतून दोन वेळा एकादशी व्रत करावे. शरीरांतील अकरा इंद्रियांच्या संयमाला पोषक असे एकादशीव्रत आहे.

अग्नीमध्ये सोने तापून शुद्ध होतं तसं जठराग्नी प्रदीप्त झाला की अंतःकरण शुद्ध होतं. निराहारव्रताने इंद्रियवृत्ती आपोआप शांत होऊ लागतात हे वैज्ञानिक सत्य आहे. पण नुसतं निराहार राहणे म्हणजे उपवास नाही. इंद्रियसंयमाने हरिसंन्निध राहणे हा उपवास शब्दाचा खरा अर्थ आहे.

उपावृतस्य पापेभ्यो यो हि वासो गुणैहरैः ।
उपवासः स विज्ञेयो नोपवासस्तु लंघनम् ।।

उपवास असा झाला पाहिजे. एकादशीव्रत नित्य करावे सांगतात. वर्षातून चोवीस दिवस एकादशीचे येतात. शरीरांतील चोवीस तत्त्वांच्या शुद्धीचे स्मरण करुन देणारे हे एकादशी व्रत आहे.

*प्रश्न : महाराज, एकादशीव्रत निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या पद्धतीने करतात. एकादशी व्रत खरे कसे केले पाहिजे ?*

उत्तर : एकादशी व्रत कसे करावे ते पद्मपुराणांत सांगितले आहे. एकादशी व्रतांत कायिक, वाचिक व मानसिक असे तिन्ही प्रकारचे व्रत झाले पाहिजे.

एकवेळ साधा आहार, एक वेळ निराहार किंवा अहोरात्र निराहार असे रहाता येईल . किंवा कोणाजवळ काही न मागता जे मिळेल त्यावर निर्वाह करता येईल. हे शरीर शुद्ध करणारे कायिक व्रत झाले.

सद्ग्रंथांचा अभ्यास, भगवंताचे नामसंकीर्तन, भजन, सत्य भाषण आणि कोणाच्याही दोषांचा उच्चार न करणे हे वाणी शुद्ध करणारे वाणीचे तप झाले.

मनाने कोणाचे अहित न चिंतणे, सर्वांच्या हिताचेच चिंतन करणे, कोणाचीही वस्तु चोरण्याची इच्छा न करणे, मत्सर न करणे हे मानस तप झाले. इंद्रियांमध्ये मन हे मुख्य आहे. त्याच्या संयमाकरिता मौनाचा विशेष पुरस्कार केला आहे.

भगवंताचे जसे स्वाभाविक निर्मल गुण आहेत, तसे जीवात्म्याचे झाले पाहिजेत. याकरिता साधनांचा उपदेश आहे. असे नियमांचे पालन करुन एकादशीव्रत केले तर आत्मशुद्धी होत जाते.

*प्रश्न : एकादशीचे व्रत किंवा तसेकोणतेही अनुष्ठान करण्यापूर्वी सद्गुरुंची आज्ञा घेणे आवश्यक आहे काय ?*

उत्तर : कोणतेही व्रत,अनुष्ठान,साधना,सत्कर्म करण्यासाठी सद्गुरुंच्या आज्ञेची किंवा अनुमतीची वाट पहात बसू नये. अशासाठी सद्गुरुंचे आशीर्वाद सदैव असतात. ईश्वराला प्रार्थना करुन सरळ प्रारंभ करावा. ते करण्याची बुद्धी होत आहे हेच परमभाग्याचे लक्षण आहे. नाहीतर काही लोक सारखे पैसे मिळवण्याच्या मागे असतात. मालक एखाद्याला परदेशी पाठवतो. तो माणूस परदेशाच्या वाऱ्या करुन खूप द्रव्य मिळवतो. याला ईश्वराची कृपा म्हणता येणार नाही. अशा माणसाला सुख मिळेलच असे नाही. ईश्वराची सेवा करण्यांतच खरे कल्याण आहे.

*प्रश्न : महाराज, ज्ञान झाल्यावरही अभ्यास करावा लागतो काय ?*

उत्तर : मनाचा निरोध करावाच लागतो. ज्ञान झाले म्हणजे 'मीच ब्रह्मरुप आहे' हे कळते. पण ज्ञान झाल्यावरही मनामध्ये असलेल्या सगळ्या वासनांचा क्षय होण्यासाठी पुन्हा अभ्यास पाहिजे. प्रारब्ध कर्माचा प्रतिबंध असेल तर प्रयत्न करुनसुद्धा समाधी टिकू शकत नाही. आपल्या इच्छेप्रमाणे आम्ही झोपही घेऊ शकत नाही. ठरवून निजलो तरी प्रारब्ध कर्माने जाग येते. मग समाधी अवस्था तर कितीतरी दूर आहे. समाधीतून उठल्यावर ज्या वासना मनांत उत्पन्न होतात, त्यांचा क्षय करण्यासाठी अभ्यास करावाच लागतो. भगवंताच्या नामस्मरणाने, चिंतनाने, वाचनाने मनांतील वासनांचा तो स्वतंत्र क्षय करावाच लागतो.

*प्रश्न : महाराज, संन्यासमार्ग कोणाकरता सांगितला आहे ?*

उत्तर : शास्त्रकार सांगतात - आपल्या मनामध्ये पूर्ण वैराग्य उत्पन्न झालं अशी खात्री पटेल त्या दिवशी संन्यास घ्यायला हरकत नाही. ज्याला पूर्ण विरक्ती झाली, विषयाची इच्छा नको आपल्याला, हे ज्याला पूर्ण पटलेलं आहे, त्याच्याकरता हा मार्ग आहे. त्याने संन्यास घ्यायला हरकत नाही अशी शास्त्राची संमती आहे.

पण ज्यांच्या मनांत विषयासक्ती अद्याप आहे, त्यांनी सावकाश करावे. त्यांनी कर्मानुष्ठान करावे. कर्मानुष्ठान म्हणजे गृहस्थाश्रम करायचा. सगळी कर्मे व्यवस्थितपणे करायची. मनांमध्ये अनंत वासना असतात. त्या वासनांचा क्षय करण्याकरता किंवा वासनापूर्ती करण्याकरता हा गृहस्थाश्रम आहे. स्त्रीपुत्र, आप्तेष्ट, नातेवाईक या सर्वांचे पोषण करावे. देवतांच्या प्रीतीकरता यज्ञयाग करावेत आणि जे जे काही गृहस्थाश्रमाचे धर्म सांगितलेत, त्याप्रमाणे आचरण करावे. त्यांत अतिथीधर्माचे पालन मुख्य आहे. मग पुत्राच्या स्वाधीन करुन वानप्रस्थाश्रमांत जायचे. वासनाक्षय झाल्यावर वानप्रस्थाश्रम सांगितला आहे. कर्मनिवृत्ती हे त्याचे उद्दिष्ट आहे. विषयासक्तीची निवृत्ती, शरीरासक्तीची निवृत्ती, इंद्रियांचा निग्रह, चित्तशुद्धी याकरिताच वानप्रस्थाश्रम आहे. इंद्रियनिग्रह पूर्ण होईपर्यंत तिथे रहायचे. मग भार्येची अनुमती घेऊन संन्यासदीक्षा धारण करायची. गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम. शेवटी संन्यास.

*प्रश्न : महाराज, ज्ञान झाल्यावर तरुन जाता येते कां ?*

उत्तर : नुसते शाब्दिक ज्ञान होऊन भागत नाही. शास्त्रार्थ समजून घेतला आणि ओघवत्या वाणीने श्रोत्यांपुढे उत्तमरितीने मांडला तर त्या विद्वानाला प्रतिष्ठा मिळेल. पण ते मुक्तीचे साधन ठरणार नाही. ज्ञानाचे फळ म्हणजे

आत्मसाक्षात्कार. साक्षात्काराचे फळ पदरांत पडेपर्यंत शास्त्राध्ययन शाब्दिक ज्ञानच राहणार. आचार्य म्हणतात, 'शास्त्रीय शब्दजाल हे मोठे अरण्य आहे. त्यांत सापडलेल्या माणसाचे चित्त गोंधळून जाते.' म्हणून सद्गुरुंच्या कृपेने साधकाने आत्मसाक्षात्कार करुन घेतला पाहिजे. तरच तो तरुन जाणार. शाब्दिक ज्ञानांत गुरफटून गेले तर हाती काहीच लागत नाही. अंधारात बसलेल्या माणसाने दिवा दिवा असे कितीही म्हटले तरी जोवर प्रत्यक्ष दिवा आणत नाही, तोवर अंधःकार जात नाही. तसे सद्गुरुंच्या कृपेने आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय, वेदशास्त्रांतील ज्ञानाचा अनुभव आल्याशिवाय मोक्ष नाही.

*प्रश्न : महाराज, भक्त ईश्वररुप होऊ शकतो काय ?*

उत्तर : शास्त्रकार सांगतात - कर्माबरोबरच ईश्वराची उपासनाही घडली पाहिजे. ज्या देवतेबद्दल प्रेम वाटते. तेथे मन स्थिर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कर्मामध्ये शुद्धी ईश्वराच्या कृपेनेच होईल. जशी उपासना वाढत जाईल तसे तसे मन शुद्ध होत जाईल आणि शेवटी उपासक ईश्वररुप होईल. ईश्वररुप होणं, उपास्यरुप होणं ही उपासनेची शेवटची मर्यादा आहे असं शास्त्रकार सांगतात. संतमहात्म्यांचा तसा अनुभवही आहे. भगवंताचं ध्यान करता करता भक्त शेवटी भगवंताशी एकरुप होऊन जातो. शंकराचार्यांचे शिष्य पद्मपादाचार्य नरसिंहाचे मोठे उपासक होते. नरसिंहाचे ध्यान करता करता शेवटी नरसिंहरुप होऊन जायचे. पद्मपादाचार्य नाहीतच. तिथे नरसिंहच दिसायला लागायचे. अशी उपासना आहे.

*प्रश्न : महाराज, असे ध्यान लागावे म्हणून आम्ही काय करायला पाहिजे?*

उत्तर : ईश्वर भक्ती जितकी वाढत जाईल, तितके मन स्थिर होत जाईल.

मनांतील विकार गेले पाहिजेत. अहंकार, राग, द्वेष हे सगळे मनांतील मळ गेले पाहिजेत. ते मळ जेव्हा जातील, तेव्हाच ते अंतःकरण शुद्ध झाले. अंतःकरण शुद्ध झाले पाहिजे. अंतःकरण शुद्ध झाले म्हणजेच खरे ध्यान होऊ शकते. मग ध्यानांत प्रगती होते आणि मन स्थिर होऊन त्याचा परिपाक समाधीमध्ये होतो. ह्या सगळ्या अवस्था ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात.

*प्रश्न : महाराज, अंतःकरण शुद्ध व्हावं यासाठी आम्ही काय केलं पाहिजे ?*

उत्तर : विषयांचा उपभोग घेतल्याने इच्छा थांबत नाहीत. वासनाक्षय होत नाही. उलट इच्छा वाढत जातात. म्हणून वासना, इच्छा या घालवल्या पाहिजेत. त्या नाहीशा करण्याकरता इंद्रियांचा निरोध प्रथम केला पाहिजे. म्हणजे मग मनांत साठलेल्या वासनाच तेवढ्या रहातात. नवीन वासनांची भर काही पडत नाही. त्यासाठी इंद्रियांचा निरोध हा प्रथम करायला सांगितला आहे. त्यानंतरच निष्काम भक्तीची सुरुवात होते.

*प्रश्न : सकाम भक्ती ही साधनेची सुरुवात आहे असे म्हणता येईल कां महाराज ?*

उत्तर : पापक्षयाशिवाय सकाम भक्ती घडणेही कठीण आहे आणि सकाम भक्त झाला तरी किती दिवस प्रवृत्ती होईल ? रोजच्या रोज तेच काम आहे नां ! सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण करतो तरी काय दुसरं ? पदार्थांमधला फरक सोडला तर तेच जेवणखाणं चाललेलं आहे रोज. त्यामुळे याच्याहून काहीतरी वेगळा आनंद पाहिजे अशी इच्छा झाली पाहिजे. ज्यामुळे नेहमी प्रसन्नता राहील असा आनंद मला मिळावा ही इच्छा झाली की मग चिंतन मनन सुरु होते.

*प्रश्न : महाराज, मनन चिंतनाचा संस्कार मनावर होतो कां ? तो दीर्घकाळ टिकतो कां ?*

उत्तर : देवाने जे अंतःकरणतत्त्व माणसाला दिलेले आहे ते खूपच समर्थ आहे. अनेक जन्मांच्या वासना आणि त्यांचे संस्कार अंतःकरणात साठून रहातात. माणसाने जो ज्ञानाचा अभ्यास केलेला असेल, त्याचे संस्कारही त्या अंतःकरणांत साठून रहातात. कर्माचे जे आचरण झालेलं असेल, त्याचे संस्कारही अंतःकरणांत साठून रहातात. भक्ती झालेली असेल तर ती भक्ती अनेक जन्म अंतःकरणांत साठून राहिलेली असते. जन्मजन्मीचे संस्कार त्या मनामध्ये आहेत.

*प्रश्न : निष्काम भक्ती म्हणजे काय ?*

उत्तर : निष्काम भक्ती म्हणजे मनांत काहीही कामना नाही, इच्छा नाही. जोवर मनांत कामना आहेत, इच्छा आहेत, तोवर निष्काम भक्ती आहे असं म्हणता येत नाही. अयाचित वृत्तीने जे येईल त्यांत संतुष्ट आहे. सुदामजींचे पहा. आपले मित्र श्रीकृष्ण हे ईश्वर आहेत, विश्वाचे चालक आहेत हे माहिती आहे. पण त्यांच्याकडे जाऊन आपली परिस्थिती सांगावी, काही मागावं असं वाटलंच नाही. भगवंत सर्वज्ञ आहेत ना ? मग भगवंतांना सर्व ज्ञान आहेच. म्हणून भगवंताकडे काही मागण्याची इच्छाच होत नाही.

मागायला लागणाऱ्या भक्ताकडे एक तर त्या भगवंताचे खरं लक्ष जात नाही. कांही मागणारा भक्त जेव्हा पुढे येतो तेव्हा भगवंत त्या भक्ताला तेवढ्यापुरतं देऊन टाकायचं आणि पाठवून द्यायचं असं करतात. जे भगवंताकडे मागितले ते मिळाले की त्या भक्ताच्या मनांतील वासना अधिकाधिक वाढत जाणार. संसारातून मोकळा होण्याची याची योग्यताच नाही. वासनाक्षय करण्याचा प्रयत्नही नाही. त्याच्याबद्दल त्याला खेदही

वाटत नाही. आपली परिस्थिती एकंदर चांगली असावी असा विचार मनांत येतो आहे, याचा अर्थच असा की, देहत्रयातीत आत्मा आहे याची खात्री पटलेली नाही. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक झालेला नाही. पण खऱ्या भक्ताच्या मनांत काही इच्छा येतच नाही. ईश्वराकडे काही मागावं, आपली काही व्यवस्था करुन घ्यावी असं काही मनांतच येत नाही. वासनाक्षय करायचा हा निग्रह आहे. न मागतांही शिवाजीराजांनी पाठवलं पण तुकाराममहाराजांनी परत करुन टाकलं. देवाकडचे लक्ष कमी करण्याचा हा तुमचा प्रयत्न आहे असं तुकाराममहाराज म्हणाले.

धनाची इच्छा नाही. मानाची इच्छा नाही. मनांत काहीच कामना नाही. ईश्वरार्पण बुद्धीनं कर्म करीत रहातात. निष्काम अंतःकरण हीच मुक्ती. सर्वकामनिवृत्ती यालाच मुक्ती म्हणतात. मनांत इच्छा नाही, वासना नाही, काही हवं आहे असं नाही. प्रल्हादजी सांगतात, हीच मुक्ती. असं निर्वासन अंतःकरण झालं की जीवभाव संपला. मग तो भक्त ईश्वररुपच झाला. ज्ञानाचं फळ म्हणजे विरक्ती. मनांत इच्छाच नाही. ईश्वराची जी कृपा आमच्यावर झालेली आहे त्याचा व्यवहारातील कोणत्याही गोष्टीशी संबंध नाही. सर्व इच्छांचा त्याग मनापासून झालेला आहे. केवळ ईश्वराबद्दल प्रेम आहे. भगवंताचं सतत स्मरण होत राहिलं आहे. म्हणजे दुःख नाही आणि दुःखांचं कारणही नाही. आत्मस्वरुपाचं अनुसंधान सुरु झालं की चित्ताचा विषयांशी असलेला संबंध सुटून जातो. ध्यानानं समजतं की आपण देहापेक्षा वेगळे आहोत. बुद्धी आणि अहंकार यापेक्षा आपण वेगळे आहोत. मग देहाचे विस्मरण होते. देहाचे भान नाहीसे होते.

आपले अंतःकरण जिथे स्थिर होते, त्या वस्तूचे स्वरुप अंतःकरणाला कळून येतं. जी सूक्ष्म वस्तू डोळ्यांना दिसत नाही, अशा सूक्ष्म वस्तूंचं चिंतन सुरु केलं की त्या सूक्ष्म वस्तूचेही अंतःकरणाला ज्ञान होते. हे बुद्धीचं

सामर्थ्य आहे. ती बुद्धी बाहच जगावर स्थिर करायची की आत्मरुपावर स्थिर करायची हे आपल्याला समजलं पाहिजे. म्हणून ध्यानाचा अभ्यास करणाऱ्याचा संसारभ्रम निघून जातो. ध्यानाभ्यासाने म्हणजे मानसिक शक्ती वाढते. सिद्धी काही बाहेरुन येत नाहीत, मानसिक शक्ती विकास म्हणजे सिद्धी.

भगवंत अजित आहेत. परंतु इंद्रियनिग्रह केलेले, मनोनिग्रह केलेले जे अकाम भक्त आहेत, त्यांनी भगवंतांना जिंकलेलं आहे. भगवंतांनीही त्या भक्तांना जिंकलेले असतं. भगवंतांची इच्छा असेल तसं ते भक्त वागतात. म्हणून भगवंत त्या भक्तांना आत्मस्वरुप देऊन टाकतात.

कोणताही संकल्प मनामध्ये करु नये मनुष्यानं. मनांत संकल्प आले की प्रयत्न करावेसे वाटतात. हे करावं ते करावं असं वाटत रहातं. परंतु कितीही प्रयत्न केले तरी दुःखच आहे. म्हणून जितक्या इच्छा कमी कमी करता येतील, तितकी शांती लाभते. कोणतीही वासना मनांत ठेवू नये. सुख मिळावे म्हणून आपण कितीही प्रयत्न केला तरी सुख मिळत नाही. दुःखे जावीत म्हणून आपण कितीही प्रयत्न केले तरी दुःखे काही आपल्या प्रयत्नांनी जात नाहीत. मग संकल्प तरी कशाला करायचे? इच्छा तरी कशाला करायची? मनांत इच्छा करण्याचा, संकल्प करण्याचा काय उपयोग? व्यावहारीक प्रयत्न कमी कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्रद्धेने उपासना केली पाहिजे. भक्तीनेच शेवटी मुक्त होऊ शकतो. भक्तीसुद्धा ईश्वरार्पण बुद्धीने झाली पाहिजे. त्यांत कर्तृत्वाभिमान येता कामा नये. बुद्धीला प्रेरणा करणारा तो भगवान श्रीहरी आहे. त्याच्या प्रेरणेनं माझ्या हातून ही सेवा घडते आहे अशी भावना ठेवून भक्ती झाली पाहिजे. प्रल्हादजी सांगतात, भगवंतांची भक्ती दुसऱ्याच्या सांगण्याने होत नाही किंवा स्वतःच्या प्रयत्नांनी होत नाही.

आत्मा अविनाशी आहे. नित्य आहे. शुद्ध आहे. स्वयंप्रकाशी आहे. आनंदरूप आहे. तोच आत्मा मी आहे. ही अनुभूती येण्यासाठी निष्काम भक्ती सांगितली आहे.

*प्रश्न : महाराज, काही बुद्धीवादी म्हणतात, जगात ईश्वर असे कांही नाहीच?*

उत्तर : अभाव कोणाचा सांगता येईल ? ज्याची माहिती आहे, त्याचाच अभाव सांगता येईल. अमुक एक व्यक्ती आली होती कां ? हे कोण सांगू शकतो? ज्याला त्या व्यक्तीची माहिती आहे, तोच सांगू शकतो. ईश्वर नाही हे युक्तीवादानं सिद्ध होऊ शकत नाही. शशशृंग जगात नाही असे सांगता येईल. वांझेचा मुलगा नाही असं सांगता येईल . कारण ते काय आहे हे आम्हाला माहिती आहे. ज्या पदार्थाबद्दल काही माहिती आहे त्याबद्दलच आपण तो पदार्थ आहे कां नाही हे सांगू शकतो. ज्या पदार्थाबद्दल काहीच माहिती नाही, तो पदार्थ नाहीच असे कसे सांगता येईल? फारतर असं म्हणता येईल, राजाला ईश्वर म्हणता येत नाही. अमक्याला ईश्वर म्हणता येत नाही असं फारतर म्हणता येईल. भागशः त्याचं खंडन करता येईल. पण ईश्वर नाही हा सिद्धांत मांडताच येणार नाही.

सर्व ठिकाणी ईश्वर आहे असे सांगणारं शास्त्र आहे. शब्दप्रमाण आहे ते. व्यवहाराची बाजूही त्यांनी या शास्त्रांत सगळी मांडली आहे. अभ्युदय साधना आणि निःश्रेयस साधना. अभ्युदय म्हणजे आपली उन्नती, उत्कर्ष, कल्याण त्याची साधना सगळी शास्त्रकारांनी मांडून ठेवली आहे. ती साधना करुन ईश्वर आहे याचा प्रत्यक्ष अनुभव अनेक संतमहात्म्यांनी घेतलेला आहे. साधना करुन कोणीही ईश्वराचा अनुभव घेऊ शकतो. असं प्रमाण असतांना ईश्वर नाही असं कसं म्हणता येईल ?

*प्रश्न : महाराज, ईश्वर आहे असं प्रयोगशाळेत चिकित्सा करुन सिद्ध करता येत नाही असं शास्त्रज्ञ सांगतात.*

उत्तर : चिकित्सेने ईश्वर आहे असे सिद्ध होत नाही याचा अर्थ चिकित्सा कमी पडली आमची. पण आमची चिकित्सा कमी पडली हे कबूल करायची आमची तयारी नाही. आमचीच चिकित्सा बरोबर आहे हा पुन्हा अहंकार आहे. माझ्या बुद्धीने जी काही चिकित्सा ठरवली आहे, तीच बरोबर आहे असं कसं म्हणता येईल ? दुसऱ्याची चिकित्सा नाही कां? दुसऱ्याची बुद्धी नाही कां ? बुद्धीवादाने सगळे मान्य करायचं ठरलं तर दुसऱ्याच्या बुद्धीची चिकित्सा मान्य करायला काय हरकत आहे? आम्हाला ती चिकित्सा नीट करता आलेली नाही हे मान्य करावंच लागेल.

शास्त्रकारांनी पुष्कळ चिकित्सा केली आहे. पुष्कळ युक्तीवाद मांडून ठेवले आहेत. आम्हाला ईश्वर आहे हे पटत नाही. आम्ही ईश्वर पाहू शकत नाही असं आम्ही कितीही म्हटलं तरी त्यामुळे ईश्वर नाही हे सिद्ध होत नाही. ईश्वर आम्हाला दिसत नाही याचं कारण आमच्या दृष्टीमध्ये दोष आहे. आमची दृष्टी दूरचे तारे बघू शकत नाही. म्हणजे दूर तारेच नाहीत असं म्हणायचं कां? आमच्या दृष्टीला आपल्याच डोळ्यांत घातलेलं काजळ दिसत नाही. म्हणजे डोळ्यांत काजळ नाहीच असं म्हणायचं कां ? पाहणारे सगळे सांगताहेत, ''अरे, तुझ्या डोळ्यांत काजळ घातलेलं आहे. डोळा अगदी काळा झालेला आहे.'' आमची दृष्टी तिथपर्यंत जाऊ शकत नाही असं म्हणा पाहिजे तर !

*प्रश्न : महाराज, ईश्वराचे ज्ञान कसे करुन घ्यावे ?*

उत्तर : ''परिप्रश्नेन सेवया'' असं शास्त्रकारांनी सांगून ठेवलं आहे. श्रेष्ठ पुरुषाला नमस्कार करणं, नम्रतेनं वागणं, त्यांची सेवा करणं या उपायांनीच

ईश्वराचं ज्ञान प्राप्त करुन घेता येतं असं शास्त्रकार सांगतात. ज्ञान मिळेल. प्रश्न करा तुम्ही. वाटेल तितके प्रश्न करा. उत्तर देणारे समर्थ आहेत. म्हणजे चिकित्सा हाही विषय शास्त्रकारांना मान्य आहे.

ईश्वराचे ज्ञान भक्तीनेही मिळते. त्यासाठी भगवंताबद्दल निष्काम भक्ती हवी. परमप्रेम हवे. मनामध्ये भगवंतावर पूर्ण विश्वास हवा. पूर्ण श्रद्धा हवी. देव रागावतच नाही अशी निश्चित वृत्ती असल्याशिवाय उपयोग होत नाही. काही प्रतिकूल घटना घडल्यानंतर देव रागावला म्हणून प्रतिकूल घडलं असं वाटणं म्हणजे देवाचा दोषच आमच्या मनांत आहे. देव नेहमी अनुकूल आहे. देव नेहमी कृपाच करत आहे असा विश्वास असेल तरच उपासना होते. हिरण्यकश्यपूचा वध केल्यानंतर प्रल्हादजींनी नरसिंहाची प्रार्थना केली. मला आपली भिती वाटत नाही. पण मला संसाराची भिती वाटते. या संसारातून आपण लौकर माझा उद्धार करा, सर्वांचाच उद्धार करा. माझा एकट्याचाच उद्धार नको आहे. त्यासाठी त्यांनी भक्ती मागितली. वाणीने स्तुती घडावी, देहाने सेवा घडावी, पूजा घडावी. आपल्या दिव्य चरित्राचं अखंड स्मरण घडावं. कथांचं सदैव श्रवण घडावं.

मानसिक प्रयत्न कमी कमी करत जाणं आणि अयाचित वृत्तीनं राहणं ही अमृत वृत्ती आहे. श्रीकृष्ण मुचकुंद राजाला सांगतात, माझा एकनिष्ठ भक्त असेल त्याच्या मनांत कोणतीही कामना रहात नाही. बुद्धीभेद त्याचा होत नाही. योगाभ्यास व प्राणायाम याने मनाचा निग्रह करणारे असतात. पण काही साधक केवळ योगाचा अभ्यास करतात. आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी मन जिंकण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांच्या मनांत जर भगवंताबद्दल भक्ती नसली तर त्यांचा वासनाक्षय होत नाही. सूक्ष्म वासना त्यांच्या मनांत राहतात आणि पुन्हा मन संसारामध्ये जातं. पुन्हा संसारात पडतात. म्हणून भगवंतांनी भक्तीच करायला मुचकुंदाला सांगितली.

निष्काम भक्ती घडली पाहिजे. प्रल्हादजी खरे निष्काम भक्त होते. त्यांनी काही मागितलं नाही. देवाजवळ काही मागणं हा भक्तीयोगाचा प्रतिबंध आहे. ते म्हणाले, ''मला काय मोहामध्ये टाकता काय वर मागून घे असे सांगून ? मला कोणतीच इच्छा नाही. आपल्यासारखे मला स्वामी मिळालेले आहेत. मी खरा अनन्य भक्त आहे. ईश्वराकडे काही मागणारा हा खरा भक्त होत नाही. तेव्हा मला काहीही इच्छा नाही. जर आपल्याला काही देण्याची इच्छा असेल तर माझ्या मनामध्ये कोणतीही वासना राहू नये, माझ्या मनामध्ये कोणतीही इच्छा उत्पन्न होऊ नये. एवढाच वर द्या.''

सर्वकामनिवृत्ती ही मुक्तीच आहे. हे मुक्तीचं स्वरुप आहे. कोणतीही इच्छा राहू नये याचा अर्थ जीवभाव संपलेला आहे. तो प्रत्यक्ष परमेश्वर झालेला आहे.

*प्रश्न : महाराज, कोणी म्हणतात ज्ञानदेवांचे गीतेवरील भाष्य कर्मयोगपर आहे. कोणी म्हणतात ज्ञानेश्वरी भक्तीयोगपर आहे. ज्ञानेश्वरीत योगमार्ग आहे, ज्ञानमार्ग आहे असेही म्हणणारे आहेत. श्रीशंकराचार्य स्वामी महाराजांनी गीतेचा अर्थ संन्यासपर लावला आहे. आचार्यांनी गीतेवर संन्यासपर भाष्य कां केले ? ज्ञानदेवांचे भाष्य आणि आचार्य महाराजांचे भाष्य यांचा समन्वय कसा करायचा ?*

उत्तर : गीतेवर भाष्य करतांना शंकराचार्य स्वामीमहाराजांनी संन्यासाश्रमाचे विवेचन केले आहे. परमेश्वरप्राप्तीसाठी प्रत्येकाने संन्यास घ्यावा असे आचार्य सांगत नाहीत. परमेश्वरप्राप्तीसाठी संन्यासाश्रमाशिवाय दुसरा मार्गच नाही असेही आचार्यांचे मत नाही.

मोक्ष मिळविण्यासाठी वेदप्रमाण मानून कर्माचे अनुष्ठान कसे करावे हे सांगण्यासाठी महर्षि जैमिनी यांनी मीमांसाशास्त्र रचले. त्यासाठी त्यांनी

वेदांतील वाक्यांचा अर्थ लावण्याची पद्धती जी घालून दिली, ती पद्धती शास्त्रकारांनी मान्यच केली आहे. तथापि मोक्षप्राप्तीसाठी संन्यास हा वेदविहीत आश्रम नाही असे मीमांसकांनी सांगितले आहे. संन्यास घ्यावा असे वाक्य वेदांमध्ये नाही असे ते म्हणतात. वेदांमध्ये संन्यास आश्रमाचा जो उल्लेख केला आहे तो केवळ मुक्याबहिऱ्यांसाठीच आहे. शारीरीक असमर्थतेमुळे कर्मयोगाचा अधिकार मुक्याबहिऱ्यांना प्राप्त होत नाही. अशा मुक्याबहिऱ्यांनीच केवळ परमेश्वरप्राप्तीसाठी संन्यास घ्यावा असे मीमांसकांचे मत आहे.

मीमांसकांचे हे मत आचार्यांना मान्य नाही. परमेश्वरप्राप्तीसाठी संन्यास घेण्याचा मार्ग वेदविहीत कसा आहे हे आचार्यांनी दाखवून दिले आहे. संन्यास कोणी घ्यावा, केव्हा घ्यावा याचे सविस्तर विवेचन आचार्यांनी गीतेवर भाष्य करतांना केले आहे.

*प्रश्न : महाराज, संन्यास कोणी घ्यावा असे शंकराचार्य स्वामीमहाराजांचे मत आहे ?*

उत्तर : कांही पुरुषांना संसाराचा तिटकारा येतो. तीव्र वैराग्य येते. त्यांचा सत्त्वगुण खूप वाढतो. रजोगुण व तमोगुण क्षीण होतात. म्हणून त्यांची कर्मप्रवृत्तीही क्षीण होते. अशा पुरुषांनीच संन्यास घ्यावा असे आचार्य सांगतात. अशा पुरुषांनी कर्मत्याग करुन आत्मचिंतनातच रहावे व निर्गुण परब्रह्माशी ऐक्य करुन घ्यावे असे आचार्यांनी सांगितले आहे.

ज्यांचे रजोगुण व तमोगुण क्षीण झालेले नाहीत, त्यांची कर्मप्रवृत्ती जात नाही. कर्मप्रवृत्ती क्षीण झालेली नसेल तर कर्मत्याग करु नये, संन्यास घेऊ नये. त्यांनी कर्मयोगाचेच आचरण करावे आणि भगवंताच्या सगुण रुपाची उपासना करुन परमेश्वराशी ऐक्य साधून घ्यावे असे आचार्य सांगतात. तीव्र

वैराग्य आले नसेल, कर्मप्रवृत्ती क्षीण झालेली नसेल तर बळजबरीने संन्यास घेणे व कर्मत्याग करणे हा मिथ्याचार आहे असेच गीताभाष्यांत आचार्यांनी सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, गीतेत संन्यासाश्रम हा विहीत आश्रम आहे असे सांगितले आहे कां ?*

उत्तर :''यतीनां चापि यो धर्मः सते पूर्व नृपोत्तमः । कथितो हरिगीतासु समासविधिकल्पितः ॥'' असे महाभारतात शांतिपर्वात महाभारतकार सांगतात. म्हणजे भगवद्गीतेत श्रीकृष्णांनी संक्षेपाने यतिधर्म सांगितला आहे. संक्षेप म्हणजे नुसता उल्लेख नव्हे. यतीधर्माचे म्हणजे संन्यास आश्रमाचे विवेचन करणारे श्लोक गीतेत मधूनमधून येतात.

*प्रश्न : महाराज, गीतेवरील भाष्य सुरु करतांना आचार्य सुरुवातीलाच सांगतात, ''तत्च (परं निःश्रेयसं) सर्वकर्मसंन्यासपूर्वकात् आत्मज्ञाननिष्ठारुपात् धर्मात् भवति''। यावरुन असे वाटते की मोक्ष मिळविण्यासाठी सर्वकर्मसंन्यासच केला पाहिजे असे आचार्यांचे मत आहे. पण देह आहे तोवर कर्म राहणारच. स्वस्थ बसणे हे सुद्धा देहाचे कर्मच नाही कां ? मग कोणत्याही माणसाला सर्वकर्मसंन्यास करणे कसे शक्य होईल?*

उत्तर : जो ज्ञानी पुरुष आहे तो काही कर्मे करीतच नाही असे शंकराचार्य स्वामीमहाराज म्हणत नाहीत. आचार्यांच्या मते संन्यास हा आंतरिक आहे, बाह्य नाही. आचार्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, ''सर्वकामपरित्यागेन च संन्यासः सिद्धी भवति।''

कर्म करतांना मनांतील वैयक्तिक कामना (इच्छा) नाहीशी झाली की कर्मसंन्यास होतो. म्हणजे स्वतःला काही मिळावे अशी इच्छा नसेल, स्वतःचा काही हेतू नसेल, स्वतःची काही कामना नसेल तर तो पुरुष कर्म

करीत राहिला तरीही त्या पुरुषाने सर्वकर्मसंन्यासच केला आहे असे म्हणावे लागेल.

कर्म पूर्णपणे थांबवणे कोणालाच शक्य नाही. सर्वकर्मसंन्यासाचा तो अर्थ नाही. सर्वकर्मसंन्यास म्हणजे स्वतःची कामना न ठेवता कर्म करणे. मला काही मिळवायचे आहे, साधायचे आहे अशी कामना न ठेवता कर्म केले म्हणजे सर्वकर्मसंन्यास झाला. हा सर्वकर्मसंन्यास आंतरिक आहे. देहाने, वाणीने, मनाने कर्मे घडताहेत. पण मनांत वैयक्तिक कामना नाही असा हा सर्वकर्मसंन्यास आहे.

*प्रश्न : महाराज, ज्ञानदेवांनीही आंतरिक संन्यासच सांगितला आहे कां ?*

उत्तर : ज्ञानदेवांच्या मतेही संन्यास आंतरिकच असतो. पाचव्या अध्यायात ज्ञानदेव सांगतात -

आणि मी माझें ऐसी आठवण। विसरलें जयाचें अंतःकरण।
पार्था तो संन्यासी जाण। निरंतर॥
आतां गृहादिक आघवें। तें कांही नलगे त्यजावें।
जें घेतें जाहलें स्वभावें। निःसंगु म्हणऊनि॥

या ओव्यांत ज्ञानदेव आंतरिक संन्यासच सांगताहेत. मी अमुक देहधारी आहे, माझे अमुक आहे अशी आठवण ज्याचे मन विसरुन गेले आहे, तो निरंतर संन्यासीच आहे. असा संन्यास घ्यायला घरदार सोडावे लागत नाही किंवा संपत्ती, नातलग वगैरे सोडून कुठे जावं लागत नाही. संन्यासी होण्यासाठी जो सर्वसंगपरित्याग करायचा असतो, तो देहाने नव्हे तर केवळ मनानेच करायचा असतो. मनानेच निस्संग व्हायचे असते. घरदार सोडलं, बायकामुलांचा त्याग केला, भगवे कपडे घातले, डोईचे मुंडन केले म्हणजे तो संन्यासी झाला असं नाही. मनांतील सर्व संग सुटला

पाहिजे. मनांतला संसार गेला पाहिजे. मन पूर्णपणे अलिप्त झालं पाहिजे. मन निस्संग होणे हेच संन्यासाचे लक्षण आहे. घरात रहात असला, गृहस्थाचे कपडे घातलेले असले, संसाराची कामं करीत राहिला तरी मनाने निस्संग असेल, अलिप्त असेल तर तो संन्यासीच आहे. सर्वसंगपरित्याग मनाने करायला पाहिजे असेच ज्ञानदेव सांगतात. मनाने त्याग करणेच मुख्य आहे. शरीराने कुठेही राहिलं तरी काय त्याचं ?

संन्यास घेण्यासाठी कर्मांचा त्याग करावा लागत नाही. मी कर्म करीत नाही, भगवंतच कर्ता आहे, कर्तृत्व भगवंताचेच आहे हे ओळखणे हाच संन्यास आहे. मी कर्म करतो आहे, मी भोग घेतो आहे ही भावना मनांतून गेली नसेल तर त्या माणसाने कर्मसंन्यास केला आहे असे म्हणता येत नाही. मनांतली आसक्ती गेली पाहिजे. इच्छा व वासना गेल्या पाहिजेत. संसारातच रहावे. पण मनाने अलिप्त राहून गृहस्थाश्रमाची कर्तव्यकर्मे करावीत. मनांतून सगळ्यांचा संग सोडावा. असा आंतरीक संन्यास ज्ञानदेवांनी सांगितला आहे.

*प्रश्न : महाराज, कर्म करतांना मनांत कोणतीही वैयक्तिक कामना नसेल तर तो सर्वकर्मसंन्यासीच आहे असे म्हणता येईल कां ?*

उत्तर : मनांत काही वैयक्तिक कामना नसणे, इच्छा नसणे हेच सर्वकर्मसंन्यासाचे लक्षण आहे. स्वतः शंकराचार्य स्वामीमहाराज आयुष्यभर कर्मे करीत होतेच. तरीही वैयक्तिक कामना नव्हती म्हणून ते सर्वकर्मसंन्यासीच आहेत. ज्ञानदेव सांगताहेत -

म्हणोनि अवसरें जें जें पावे । कीं तेणेंचि तो सुखावे ।
जया आपुलें आणि परावें । दोन्हीं नाहीं ॥
म्हणोनि सर्वांपरी मुक्तु । तो सकर्मुचि कर्मरहितु ।

सगुण परि गुणातीतु । एथ भ्रांति नाहीं ॥

ज्यावेळी जे होईल ते होऊ द्यावे. जे होईल ते सुखाने स्वीकारावे. आपले परक्याचे अशा भावना मनांत ठेवू नयेत. मला काही मिळवायचंय, मला काही साधायचंय असं काही मनांत नाहीच. मनांत काही इच्छाच नाही. असं झालं म्हणजे तो मुक्तच झाला. तोच संन्यासी. मग देहाने, वाणीनं, मनाने कितीही कर्मे केली तरी तो संन्यासीच आहे. तो कर्मरहीतच आहे. गुणातीत झाला तो. काही मिळवायचं नाही, काही नाही. शंकराचार्य स्वामीमहाराजांचे असे आयुष्यभर कर्म करीत राहिले. जगाच्या कल्याणासाठीच करीत राहिले. स्वत:साठी काहीच नव्हतं. ते सर्वकर्मसंन्यासीच आहेत. ज्ञानदेवही आयुष्यभर कर्म करीत राहिले. जगाच्या कल्याणासाठीच करीत राहिले. तेही सर्वकर्मसंन्यासीच आहेत. असे अनेक सर्वकर्मसंन्यासी संतमहात्मे झाले आहेत. आजही आहेत.

कर्मत्याग वेगळा सांगितला आहे. कर्म करतो आहे पण मनांत जाणून आहे की, त्या कर्माचा मी कर्ता नाहीये. भगवंतच त्या कर्माचा कर्ता आहे. कर्म करतांना त्या कर्माचं अमुक एक फळ मला मिळावं अशी काही अपेक्षा मनांत नाहीये. फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करतो आहे, तो कर्मत्याग आहे. हा असा कर्मत्याग हा महात्याग आहे असं ज्ञानदेव सांगतात. ज्ञानदेवांनी सर्वकर्मसंन्यास आणि कर्मत्याग यांत फरक सांगितला आहे. ज्ञानदेव म्हणतात कर्मत्याग कर्मसंन्यासापेक्षा वेगळा आहे. देह आहे तोवर कर्म राहणारच. पण आत्मा देहापासून वेगळा आहे. आत्म्याचा देहाशी काही संबंध नाही. देहाकडून जे कर्म घडते आहे, त्याचा आणि आत्म्याचा काही संबंध नाही. देह म्हणजेच मी असे आपण समजतो आणि देहाकडून जे कर्म घडते त्याचे कर्तृत्व आपल्याकडे उगीचच ओढवून घेतो.

मी देह नाही, मी आत्मा आहे. हे ज्याने जाणले तो सर्वकर्मरहितच झाला असे आचार्य सांगतात. देहाचे कर्म व कर्तृत्व यांच्याशी माझा काही संबंधच नाही. देह कर्म करतो आहे म्हणजे मी कर्म करतो आहे असे वाटणे हे अज्ञानच आहे. देहाच्या कर्मांचा मी केवळ साक्षी आहे. हे जाणून घेणे याला नैष्कर्म्यस्थिती म्हणतात. साक्षीवृत्ती ठेवून कर्म करणे, साक्षीभाव ठेवून कर्म करणे म्हणतात ते हेच आहे.

*प्रश्न : महाराज, हा साक्षीभाव आम्ही कसा मिळवावा ?*

उत्तर : चिंतन करावे. मी देह आहे कां ? मी मन आहे कां ? मी बुद्धी आहे कां ? आपले मूळ स्वरुप काय आहे ? मी कोण आहे याचा विचार करावा. या अभ्यासाने साक्षीभाव येतो.

*प्रश्न : महाराज, कर्मयोगात कोणतेही कर्म करीत रहाणे चालते कां ? संसारातील व व्यवसायांतील कर्मे उत्तमप्रकारे, कौशल्याने केली तर आम्ही कर्मयोगाचे आचरण करीत आहोत असे म्हणता येईल कां ?*

उत्तर : कोणतेही कर्म करणे हा कर्मयोग होत नाही. कर्मयोग या शब्दांत योग शब्द महत्वाचा आहे. योगयुक्त कर्म केले तरच ते कर्म परमेश्वराची प्राप्ती करुन देते. योगयुक्त कर्मच कर्मयोगांत अभिप्रेत आहे. योगावाचून नुसते कर्म उत्तमप्रकारे करीत राहिले तर ईश्वरप्राप्ती होणार नाही. जन्ममृत्यु चालूच रहातील. परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी स्थिर करणे हाच योग आहे असे भगवंत गीतेत सांगतात. देह, मन व इंद्रिये यांच्या ठिकाणी आपली जी आसक्ती आहे ती नाहीशी करणे व अंत:करण परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करणे याला योग म्हणतात. योगस्थ राहून कर्मे कर म्हणजे परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी ठेवून कर्मे कर असा उपदेश भगवंतांनी गीतेत केला आहे.

परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी ठेवून कर्म करतो आहे याचा अर्थच माझ्यासाठी मी कर्म करीत नाहीये. माझी काही कामनाच नाहीये. मनांत स्वतःची अशी काही इच्छा नाही. मग ते कर्म निष्कामच आहे.

*प्रश्न : महाराज, कर्मयोगांतही कर्मसंन्यासच आहे असे शंकराचार्य स्वामीमहाराजांना म्हणायचे आहे कां ?*

उत्तर : कर्मयोगी कर्म करतो ते स्वतःसाठी नसतेच. योग म्हणजेच परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी स्थिर झालेली आहे. मर्ग कर्म स्वतःसाठी नाहीच. भगवंतासाठीच तो कर्म करतो आहे.

सर्वकर्मसंन्यास म्हणजेही तो कर्म करतो आहे, पण त्या कर्मात स्वतःची काही कामना नाही. जगाच्या कल्याणासाठीच तो कर्म करतो आहे. दोन्ही एकच आहे. कर्मयोगीही सर्वकर्मसंन्यासीच आहे असे आचार्य सांगतात. सगळं जग हे ईश्वराचेच रुप आहे हे ज्ञान झाल्यावर इतरांच्या कल्याणासाठी कर्म करीत रहाणे हे ईश्वरासाठी कर्म करीत रहाणेच आहे. ज्ञानदेवांनीही तेच सांगितले आहे-

आईकें योगी आणि संन्यासी जनीं ।
हे एकचि सिनाने झणीं मानी ।
एरव्हीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥

जो कर्मयोगी तोच संन्यासी. एका मनुष्याला दोन नांवांनी संबोधावे तसे हे आहे. कामना सोडून जो कर्म करणारा आहे तोच संन्यासी आहे व तोच निश्चयाने कर्मयोगीही आहे असे ज्ञानदेवही सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, भक्तीयोगांतही सर्वकर्मसंन्यासच आहे असे शंकराचार्य स्वामीमहाराजांना म्हणायचे आहे कां ?*

उत्तर : परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी स्थिर करणे, मनांतील इच्छा काढून

टाकणे, निष्काम चित्ताने परमेश्वराप्रीत्यर्थ कर्म करणे व ते कर्म परमेश्वराला अर्पण करणे हा भक्तीयोग आहे. भक्तीयोगांत भक्त भगवंताप्रीत्यर्थ कर्म करतो. वैयक्तिक इच्छा नाही, कामना नाही, काही नाही. भक्तीयोगांत सर्वकर्मसंन्यासच आहे असे आचार्य सांगतात. ज्ञानदेवही तेच सांगताहेत. देह, इंद्रिये आणि मन यांच्यातली आसक्ती गेली पाहिजे. ती आसक्ती संन्यासाने जशी जाते तशी परमेश्वराच्या ठिकाणी अंतःकरण स्थिर झाल्यानेही जाते. म्हणून भक्तीयोग व सर्वकर्मसंन्यास एकच असे ज्ञानदेव सांगतात.

*प्रश्न : महाराज, ज्ञानमार्गी, संन्यासी, कर्मयोगी व भक्त हे चौघेही कर्म करीत असले तरी ते सर्वकर्मसंन्यासीच असतात असे आचार्यांना म्हणावयाचे आहे कां ?*

उत्तर : भक्त काय, कर्मयोगी काय, ज्ञानमार्गी काय किंवा संन्यासी काय ! सर्वांचे कर्म चालूच असते. जे कर्म घडते आहे ते इतरांसाठीच आहे. जे कर्म करीत आहेत त्यांत स्वतःला काहीच मिळवायचं नाही. स्वतःची काही कामना नाही. स्वतःची काही इच्छा नाही. मनांत वासना नाही. कांही नाही. म्हणून ते सर्वजण सर्वकर्मसंन्यासीच आहेत. कर्मयोगी, ज्ञानमार्गी, संन्यासी, भक्त हे सगळे सर्वकर्मसंन्यासीच आहेत.

आचार्यांनी गीतेवर भाष्य करतांना गीतेचा जो संन्यासपर अर्थ लावला आहे तो हा असा आहे. आचार्यांनी आंतरिक संन्यासच सांगितला आहे. आचार्यांच्या भाष्यातील सर्वकर्मसंन्यासाचा हाच खरा अर्थ आहे. कर्मयोग पूर्णावस्थेला गेल्यावर सर्वकर्मसंन्यासच आहे. ज्ञानमार्गही पूर्णावस्थेला गेल्यावर सर्वकर्मसंन्यासच आहे. भक्तीमार्गही पूर्णावस्थेत गेल्यावर सर्वकर्मसंन्यासच आहे. आचार्य तेच सांगताहेत. ज्ञानदेवही तेच सांगताहेत.

सर्व संतमहात्मेही तेच सांगताहेत. शब्द वेगवेगळे आहेत पण सर्वांची एकच अनुभूती आहे.

ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग , संन्यासमार्ग व योगमार्ग यात विरोध नाही. त्यातील अविरोध, समन्वय शंकराचार्यस्वामीमहाराजांनी स्वतः अनुभवलेला आहे. ज्ञानदेवांनीही अनुभवला आहे. अनेक संतमहात्म्यांनीही तो अनुभवला आहे.

*प्रश्न : महाराज, ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग किंवा योगमार्ग यापैकी कोणत्याही मार्गाने अद्वैतस्थिती प्राप्त होऊ शकेल कां?*

उत्तर : अद्वैतस्थिती म्हणजे सर्वत्र ईश्वर आहे हा अनुभव येणे. जे समोर दिसते आहे ते जड, चेतन जे काही सगळं दिसते आहे, ते सगळे भगवंताचेच रुप आहे. समोरची सगळी रुपं म्हणजे ईश्वरच आहे. आणि मीही कोणी वेगळा नाही. मीही ईश्वरच आहे. हा अनुभव येणे म्हणजे अद्वैतस्थिती. भक्ती करुन हा अनुभव घेता येतो तसा ज्ञानमार्गाने, कर्ममार्गाने किंवा योगमार्गानेही हा अनुभव घेता येतो. अद्वैतस्थितीचा अनुभव म्हणजे मोक्ष. मोक्षाची दोन अंगे आहेत. एक अंग म्हणजे सर्वदु:खनिवृत्ती - सर्व दु:खे नाहीशी होतात. दुसरं अंग म्हणजे परमानंदप्राप्ती. मन सदैव आनंदात रहाते. निखळ आनंद. परम आनंद. अखंड आनंद. हा आनंद हे मोक्षाचे दुसरे अंग आहे.

ज्ञानमार्गी म्हणतो समोर दिसणारे जग मिथ्या आहे. जग दु:खमय आहे, पण ते मिथ्या आहे. हे कळल्यावर दु:ख असं काही नाहीच. दु:खनिवृत्ती झाली. पण दु:खमय जगाची जाणीव गेली नाही. जग मिथ्या आहे म्हणून जगाची उपेक्षा करावीशी वाटते. स्वत:ला काही दु:ख नाही. पण जगांत दु:खे असतात याचा विसर पडलेला नाही. म्हणून परम अखंड हे मोक्षाचे

दुसरे अंग ज्ञानी पुरुषाला लाभत नाही. भक्ताचे तसे नसते. त्याच्या मनांत भगवंताचे उत्कट प्रेम आहे. त्याला सर्वत्र भगवंत दिसतो आहे. भगवंत दिसला की त्याला परम आनंदच होतो आहे. म्हणून तो सदैव आनंदात आहे. परम आनंद. अखंड आनंद. अतीव आनंद. त्याला जगाचा विसर पडला आहे आणि जगांतील दुःखांचाही विसर पडला आहे. सगळीकडे भगवंत दिसतो आहे म्हणून तो सतत भक्त सदैव अतीव आनंदातच आहे. हा परम आनंद ज्ञानी पुरुषाला मिळत नाही. म्हणून तर भक्त युक्ततम आहे असे भगवंत गीतेच्या बाराव्या अध्यायांत सांगताहेत.

ज्ञानी पुरुषाला, संन्यासी यतीला जे सुख मिळते, त्यापेक्षा भक्ताला जास्त सुख मिळते असेच महाभारतकार सांगताहेत. संतांचाही तोच अनुभव आहे.

*प्रश्न : महाराज, भगवंताचे सगुण रुप व निर्गुण रुप यात वेगळेपणा आहे कां?*

उत्तर : भगवंताचे सगुण रुप व भगवंताचे निर्गुण रुप ही दोन रुपे वेगळी नाहीत. दोन्ही एकच आहेत.

भगवंताच्या निर्गुण रुपापेक्षा सगुण साकार रुप कमी नाही. तसे म्हणणाऱ्यांना एकनाथमहाराजांनी महामूर्ख म्हटले आहे. वितळलेलं तूप आणि थिजलेल्या तूपाचा गोळा दोन्ही एकच आहेत. पण वितळलेल्या तुपापेक्षा तुपाचा गोळा सेवन करतांना जास्त सुख मिळते. तसे निर्गुण निराकार रुपापेक्षा भगवंताचे सगुण साकार रुप जास्त सुख देते. म्हणूनच संतमहात्मे पूर्ण ज्ञान झाल्यावरही भगवंताच्या सगुण रुपाची भक्ती करीत राहिले आहेत, भक्तीचा आनंद घेत राहिले.

भगवंतच सगळं आहे, भगवंतच नाना रुपांनी नटला आहे. हे सगळे जग भगवंताचीच अनेक रुपे आहेत. हे ज्ञान होणे ही पहिली पायरी आहे.

त्या नानारुपाने दिसणाऱ्या जगाबद्दल परम प्रेम वाटणे ही दुसरी पायरी आहे. हीच भक्ती.

पुढची तिसरी पायरी म्हणजे केवळ जगच भगवंताचे रुप आहे असे नाही तर मीही भगवंताचेच रुप आहे ही जाणीव होणे. भगवंत व मी हे एकच आहेत हा अनुभव येणे ही तिसरी पायरी.

या नंतर शेवटची चौथी पायरी म्हणजे परमानंदाची अवस्था. जगाची सगळी जाणीव संपते, ज्ञान संपते, फक्त आनंद उरतो. परम आनंद, निखळ आनंद, शुद्ध आनंद. ही अंतिम अवस्था आहे असे ज्ञानदेव सांगतात. ''मग जयातयाकडे। ब्रह्मचि दिठी उघडे। किंबहुना जोडे। अपार सुख॥'' जिकडे तिकडे भक्ताला स्पष्ट भगवंत दिसायला लागला. म्हणजे भगवंतावाचून दुसरे काही नाहीच. मग जग मिथ्या आहे, उपेक्षणीय आहे असे भक्ताला वाटतच नाही. जग असं काही नाहीच. जे आहे ते सगळं भगवंतच आहे. ही सगळी भोवती दिसणारी नाना रुपे ही भगवंताचीच आहेत. भगवंताची रुपे सगळीकडे पहातांना मनांत प्रेम दाटून येत आहे. तो सगळीकडे प्रेमानेच पहायला लागतो. भक्ताच्या डोळ्यांतून जगावर प्रेमाचा वर्षावच होतो आहे. कारण सगळीकडे भगवंतच दिसतो आहे.

''जिकडे पाहे तिकडे सर्वमय गोविंदु।'' ही दृष्टी आल्यावर मग मिथ्या काही नाही. उपेक्षा करावी असे काही नाही. मग केवळ परम आनंदच आहे. नामदेवरायांनी या अवस्थेचे वर्णन केले आहे-

मन झाले उन्मन वासना तल्लीन। देखे हरिचरण सर्वांठायी॥
नामा म्हणे पाहे रुप चहू बाही। दिशा द्रुमित दाही हरि दिसे॥
निजानंद बोधे नामाचेनि छंदे। डोलती आनंदे वोसंडते।

नाही देहस्मृती निमाली वासना । मावळली कल्पना भावाभाव ।
अखंड विदेही रजतमावेगळे । भोगिती सोहळे प्रेमसुख ॥

दाही दिशांना, सगळीकडे भगवंत दिसतो आहे. भगवंताचे नाम घेतांनाही तो आनंदाने डोलतो आहे. देहाचे स्मरणही नाही. वासना, इच्छा सगळ्या निमाल्या आहेत. कल्पना, भाव भावना सगळं मावळून गेलं आहे. अखंड विदेही अवस्थेतच आहे. रजतम हेही गुण राहिलेले नाहीत. मग आनंदच आनंद. प्रेमच प्रेम. प्रेमसुख भोगावयाचाच सोहळा तो सतत अनुभवतो आहे.

सर्वत्र भगवंत दिसतो आहे आणि तो भक्त स्वतःही भगवंत होऊन जातो आहे. तरीही तो भक्ती करीतच रहातो आहे.

सबाह्य विठ्ठल दाटे घनदाट । दशदिशा अफाट विठ्ठलचि ।
नामा म्हणे तुम्ही विठ्ठल होऊन । अभंग भजन करीतसा ॥

हीच अद्वैत भक्तीची अवस्था. या अवस्थेचा अनुभव अनेक संतमहात्म्यांनी घेतला आहे .

*प्रश्न : महाराज भक्ती हेच ज्ञानाचे फळ. मग जोपर्यंत भक्ती निर्माण होत नाही तोवर खरे ज्ञान झाले नाही असे म्हणता येईल कां?*

उत्तर : ज्ञानाचे कार्य म्हणजे त्याप्रमाणे प्रेम उत्पन्न झाले पाहिजे. ईश्वररुपाचे ज्ञान म्हणजे त्याची शक्ती केवढी आहे, अनादि अनंत आहे तो. सच्चिदानंद आहे तो. विश्वरुपी आहे तो. सर्व विश्व त्याचेच हे रुप आहे. मानव, पशुपक्षी, जड वस्तू सर्व तोच आहे. हे ज्ञान झाल्यावर जास्ती प्रेम उत्पन्न होते. ज्या ज्ञानामुळे ईश्वरभक्ती उत्पन्न झाली तेच खरे ज्ञान. खरा ज्ञानी हा भक्तच असतो. त्याला भक्ती करायला सांगायची जरुरीच नाही. तो भक्तच आहे. विभक्त नाहीच तो.

संसारात असला तरी ज्ञानी संसारात आसक्त नसतो. तो ईश्वरच अंतर्यामी. तोच प्रेरक. तोच विश्वाचा मालक. चालक, प्रतिपालक, संरक्षक. सगळं तोच आहे. सगळ त्याचंच आहे. हे ज्ञान झाल्यावर सगळं आयुष्य ईश्वरभजनांत, ईश्वरभक्तीतच घालवावसं वाटतं.

*प्रश्न : महाराज, ज्ञानमार्गाने भक्ती मिळते. ज्ञानमार्गाने न जाता भक्ती प्राप्त करुन घेता येईल कां ?*

उत्तर : केवळ ज्ञानमार्गानेच भक्ती मिळते असे नाही. भक्ती केव्हा निर्माण होते हे भगवंत सांगतात -

''येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥''

पुण्यकर्मे केली की त्या पुण्यकर्मांनी पापक्षय होतो आणि मन ईश्वराकडे तन्मय होऊन जातं. ''ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता'' हे भक्तीचे स्वरुप आहे. सुकृतं घडली की संतमहात्मे भेटतात. त्यांची संगती लाभते. त्यांच्या कृपेनं ईश्वराचं अखंड स्मरण मनात उत्पन्न होऊ शकतं. निरंतर ईश्वरस्मरण. ईश्वरावाचून एक क्षणही जात नाही अशी अवस्था त्यांच्या कृपेनं होऊ शकते. चित्तशुद्धी, वासनाक्षय, इच्छा नाहीशा होणं असं होऊन जातं. निष्काम अंतःकरण होतं. मनांत पूर्ण भक्ती निर्माण होते.

ज्ञानदेव सांगतात ''बहुत सुकृताची जोडी। म्हणूनी विठ्ठली आवडी ॥'' नामदेवराय म्हणतात ''जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले'' म्हणूनच आम्हाला पांडुरंगाची भक्ती मिळाली. अनेक अशिक्षित निरक्षर सामान्य लोकांनी ज्ञानमार्गाने न जाता पूर्वसुकृताने या मार्गाने पराभक्ती मिळवली आहे.

सेना न्हावी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सोयराबाई, बहिणा,

कान्होपात्रा अशा अनेक संतमहात्म्यांनी ज्ञानमार्गाने न जाता पुण्यकर्माच्या मार्गाने पराभक्ती मिळवली. याच मार्गाने अनेक संतमहात्म्यांनी अद्वैत भक्तीची अवस्था प्राप्त करुन घेतली.

*प्रश्न : महाराज, परमेश्वराशी एकरुप झाल्याचा अनुभव आल्यानंतर परमेश्वरापेक्षा काही उणेपणा जाणवतो कां ?*

उत्तर : देव व भक्त एकच हा अनुभव घेतला तरी जोवर देह व मन आहे तोवर त्यांच्या मर्यादा थोड्या कां होईना पण त्या जाणवत रहातातच.

शंकराचार्यस्वामीमहाराज म्हणतात - ''सत्यपि भेदापगमे, नाथ, तवाहं न मामकीनस्त्वम् । सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥'' भगवंता, तुझ्यामाझ्यात भेद नाही हे ज्ञान झाले. पण तरीसुद्धा मी तुझा आहे. तू माझा आहेस असं मी म्हणत नाही. तू माझा नाहीस. समुद्र आणि लाट यात भेद नाही हे खरे. तरी समुद्राच्या लाटा असेच लोक म्हणतात. लाटेचा समुद्र असे म्हणत नाहीत.

हे जे आचार्य सांगताहेत ते त्यांचा तसा अनुभव आहे म्हणूनच सांगताहेत. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात ज्ञानदेव सांगतात -

पुनवेहुनी चतुर्दशी । जेतुलें उणेपण शशी ।
कां सोळेपाऊनि जैसी । पंधरावी वानी ॥
सागरीही पाणी वेगें । संचरे तें रूप गंगे ।
येर निश्चळ जें उगें । तं समुद्र जैसा ॥
ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये । योग्यतें तैसा पाडु आहे ।
तेचि शांतीचेनि लवलाहें । होय तो गा ॥

पौर्णिमेपेक्षा चतुर्दशीला चंद्राच्या ठिकाणी कांही उणेपण असतेच. सोळा कशी सोन्यापेक्षां पंधरा कशी सोनं कांही कमी कसाचे असतेच.

समुद्रामध्ये वेगाने गंगेचे पाणी जात असते परंतु दुसरे स्थिर असलेले पाणी आणि येणारे गंगेचे पाणी यांत थोडा फरक रहातो. ब्रह्म आणि ब्रह्म होणारा, यांच्या योग्यतेमध्ये तसे अंतर आहे. तसं भक्त भगवंताशी मिळून गेला तरी त्याला देह व मन यांच्या काही मर्यादा रहातातच. ज्ञानदेव हे जे सांगताहेत ते त्यांचा स्वतः तसा अनुभव आहे म्हणूनच सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, शंकराचार्य स्वामीमहाराज स्वतः महाज्ञानी होते. पण त्यांनी ज्ञानमार्गाचा पुरस्कार तितका केला नाही. त्यांनी अनेक भक्तीस्तोत्रे रचली व भक्तीमार्गाचाच पुरस्कार केला आहे. असे कां ? त्यांनी ज्ञानमार्गाचा पुरस्कार कां केला नाही ?*

उत्तर : सर्वसामान्य माणसाला ज्ञानमार्ग अवघड आहे. त्यामानाने भक्तीमार्ग सुलभ आहे. म्हणूनच अनेक स्तोत्रे रचून आचार्यांनी भक्तीमार्गाचाच पुरस्कार केला. अमृतानुभव रचणारे महाज्ञानी ज्ञानदेवही विठ्ठलभक्तीचे अभंग रचत राहिले. भक्तीचाच प्रसार करीत राहिले. वारकरी संप्रदाय भक्तीचाच संप्रदाय आहे.

*प्रश्न महाराज, योग 'क्लेशोधिकतर' असतो असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. मग योगमार्गाचा उपदेश कां करतात ?*

उत्तर : योगाबद्दल 'क्लेशोधिकतर' असे भगवंत म्हणतात. भगवंतांच्या शब्दाचा आधार घेऊन योगमार्गाकडे अनेकजण दुर्लक्ष करतात. वास्तविक गीता हे ब्रह्मविद्येचे योगशास्त्र आहे. गीतेमध्ये भगवंत 'तस्मात योगी भवार्जुन' असा अर्जुनाला उपदेश करतात. इतकेच नव्हे तर तपस्व्यापेक्षा, ज्ञानापेक्षा आणि कर्म करणाऱ्या पुरुषापेक्षाही योगी हा श्रेष्ठ असतो असे भगवंतांनी सांगितले आहे. अर्जुना, तू योगी हो असा उपदेश भगवंतांनी अर्जुनाला स्पष्टपणे केला आहे.

श्रीज्ञानदेवमहाराज सांगतात - भजन करणारे ज्या परब्रह्माचे भजन करतात, यज्ञ करणारे ज्या परब्रह्माचे यज्ञ करतात, साधक ज्याच्याकरिता साधने करतात ते परब्रह्म स्वयंसिद्ध तत्व आहे आणि योगी स्वतःच ते परब्रह्म होऊन राहतो. योगी शरीरधारी असतांनाच जीवपरमात्मा यांचे ऐक्य जाणून अनुभवू शकतो असे शास्त्रकार सांगतात. वास्तविक ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग यांत विरोध नाही. या सगळ्या मार्गांमध्ये अविरोध आहे, समन्वय आहे. या सर्व मार्गांमध्ये जो समन्वय आहे त्या समन्वयाचा अनुभव स्वतः घेता येईल. संतमहात्म्यांनी तो अनुभव घेतलेला आहे. समोरच्या माणसाचा अधिकार ते पहाताहेत आणि त्याच्या अधिकाराप्रमाणे त्याला ते संतमहात्मे तो तो मार्ग सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग व योगमार्ग यांतील अविरोध यांचा समन्वय आम्ही कसा काय अनुभवू शकू ?*

उत्तर : मोक्षप्राप्तीसाठी मनोनाश व वासनानाश व्हावा लागतो. ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग व योगमार्ग यातल्या एका मार्गावर पुढे चालत रहायचं. एका विशिष्ट टप्प्यावर पोचलं म्हणजे इतर मार्गांचाही समन्वय त्या मार्गात होतो. हीच सहज समन्वयाची अवस्था. अविरोधाची अवस्था. ही अविरोधाची अवस्था ही पूर्णावस्थेतील अनुभूती आहे. सद्गुरुंची कृपा झाली की ही अनुभूती येते.

*प्रश्न : महाराज, भगवान श्रीकृष्ण एवढी गीता सांगून झाल्यावर ''यथेच्छसि तथा कुरु'' असे अर्जुनाला सांगतात. तू युद्ध कर असे भगवंतानी अर्जुनाला ठासून कां सांगितले नाही. ही अमूक एक गोष्ट करा असे शास्त्रे ठासून सांगत नाहीत. असे कां ?*

उत्तर : शास्त्रप्रमाण आहे. त्या शास्त्रांनी सर्वं मार्गदर्शन करुन ठेवलेलं आहे. चांगली कर्म कोणची आणि वाईट कर्म कोणची हे शास्त्रे सांगतात. शरीराने चांगली कर्म करावी. वाणीनं चांगली कर्म करावी. म्हणजे मनांतील दोष दूर होतात. बुद्धीतील दोष दूर होतात. बुद्धी शुद्ध होत जाते. असे सर्वच संतमहात्मे सांगत आले आहेत.

सर्वहि विश्वाला समजून सांगण्याकरिता म्हणून शास्त्र आहे. शास्त्र न्यापक आहे. दाखवणं फक्त शास्त्राचे काम आहे. कारक नाही शास्त्र. अमुक एक केलंच पाहिजे असं शास्त्र म्हणत नाही. म्हणून ''यथेच्छसि तथा कुरु'' असं भगवानांनी सांगितलं आहे.

*प्रश्न : महाराज, केवळ प्राणायाम किंवा योगमार्गाने मनाचा निरोध करता येईल का?*

उत्तर : भगवद्भक्ती करणाऱ्या संतमहात्म्यांचे संसाराकडे मन कधीही जात नाही. ईश्वराचं चिंतन, भक्ती करण्यामध्ये ते निमग्न असतात. अशी भक्ती अंतःकरणामध्ये असेल तर मनाचा निरोध होऊ शकतो. पण जर मनात भक्ती नसतांना केवळ प्राणायामाच्या सहाय्याने (योगमार्गाने) मनाचा निरोध करण्याचा प्रयत्न केला तर वासनांमुळे मन पुन्हा संसाराकडे जातं, आपल्या मनाचा पूर्ण निरोध ते करु शकत नाहीत. मनामध्ये ईश्वराची भक्ती असली, सद्गुरुची भक्ती असली म्हणजेच त्यांच्या कृपेने योगमार्गाचे फळ मिळते.

*प्रश्न : महाराज, उपनिषदकार आनंद हा शब्द कोणत्या अर्थाने वापरतात?*

उत्तर : उपनिषदकार सांगतात, आनंद म्हणजे देहाचा आराम नव्हे, देहाचे सुख नव्हे, तृप्ती नव्हे. आनंद म्हणजे प्रपंचाची सुस्थिती नव्हे. मला जे जे हवेसे वाटते ते ते मिळणे म्हणजे आनंद नव्हे.

आनंद या शब्दांत मूळ धातु नन्द आहे. त्याचा अर्थ प्रसन्न होणे, तृप्त होणे, समाधान पावणे. 'आ' या उपसर्गाचा अर्थ कमाल मर्यादा, परिसीमा किंवा अगदी शेवटचे टोक गाठणे. उपनिषदकार आनंद हा शब्द प्रसन्नतेची किंवा तृप्तीची परिसीमा या अर्थाने वापरतात. आनंद म्हणजे पूर्ण समाधान, पूर्ण आत्मशांती, पूर्ण आत्मवृत्ती. हाच खरा आनंद आहे. हा खरा आनंद इंद्रियांनी दिसणारी कोणतीही वस्तू पाहून मिळवता येत नाही. देहाने जे जे भोगता येते, त्या कोणत्याही दृश्य वस्तुपासून असा आनंद प्राप्त होऊ शकत नाही. आपण देहांत असतांनाच आनंद अनुभवतो. पण आनंद देहातून भोगायचा नसतो. अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश आणि विज्ञानमय कोश ओलांडून पुढे गेल्यावरच आनंद अनुभवता येतो. देह कितीही सुखांत, आरामांत ठेवला तरी तो आनंद मिळत नाही. पण देहाची परिस्थिती अगदी वाईट असली तरीसुद्धा जर हे चार कोश ओलांडून पुढे जाता आले तर तो आनंद अनुभवता येतो. आत्मा आनंदरूपच आहे. त्या आत्म्याच्या दर्शनानेच खरा आनंद मिळतो.

*प्रश्न : महाराज, आम्ही हा आनंद कसा मिळवावा ?*

उत्तर : आत्मा हे आनंदाचे खरे स्थान हृदयाच्या खोल गुहेत आहे. उपनिषदकार तेथे जाऊन आनंदाचा शोध घ्यायला सांगतात. उपनिषदकारांनी सांगितलेले हृदय म्हणजे शरीरात डाव्या बाजूला असलेले हृदय नव्हे. आत्मस्वरूप ज्यांत सापडते ते हृदय सूक्ष्म असून उजव्या बाजूला आहे. त्या हृदयांत उतरायचा मार्ग उपनिषदकार सांगतात - मी कोण आहे याचा शोध घ्यायला लागले की वृत्तींचा वेग हळूहळू मंद होऊ लागतो. वृत्तींचा वेग मंद होऊ लागला की आपण आपोआप आंत खेचले जाऊ लागतो. वृत्तींचा प्रवाह थांबला की विचार थांबतात. केवळ 'मी

आहे' असे सूक्ष्म स्पंदन हृदयांत अनुभवाला येते. हा अनुभव आला म्हणजे आपण हृदयाच्या गुहेत पोचलो. याच्यापुढे जायला फार मोठे तपोबल लागते. भक्तीच्यामार्गाने पुढे जाणे त्या मानाने सोपे आहे. आपण भगवंताला पूर्ण शरण जावे. जितकी शरणांगती तीव्र असेल तितके हृदयाच्या गुहेत आंत आत्म्याच्या जवळ जाता येते. शरणांगती तीव्र असली की एक तृप्तीचा, सुखाचा, समाधानाचा अनुभव येतो. त्यालाच ऋषिरस म्हणतात. हा अनुभव एकदा जरी घेतला तरी मग जगांतली सगळी सुखं किती कमी आहेत हे कळते.

*प्रश्न : महाराज, सामान्य माणसाने हृदयाच्या गुहेत उतरून आत्म्याचे दर्शन घेण्यासाठी काय करावे ?*

उत्तर : नामस्मरणाच्या मार्गानेही तिथे जाता येते. नामस्मरण करीत रहावे. भगवंतच माझ्या जीवनाचा स्वामी आहे, मालक तोच, चालक तोच, पालक तोच आणि संरक्षण करणारी तोच अशी पूर्ण श्रद्धा ठेवावी. प्राप्त झालेली परिस्थिती भगवंताच्या इच्छेने आलेली आहे. त्यांतच माझे कल्याण आहे. माझे खरे कल्याण कशात आहे हे केवळ भगवंतालाच ज्ञात असणार. मला ते कसे कळणार? भगवंत सारे कांही माझ्या कल्याणासाठीच घडवत आहे. जे होईल ते त्याच्याच इच्छेने होणार आहे. भगवंताचे अनुसंधान सतत ठेवण्यासाठीच त्याचे नामस्मरण करतो आहे. सगळं त्याच्यावर सोपवून दिलं, त्याला पूर्ण शरण गेलं म्हणजे आनंद आपोआप वर उफाळून येतो आणि मन कोणत्याही परिस्थितीत तृप्त, प्रसन्न, शांत रहाते. मग तो आनंद, ते पूर्ण समाधान लाभते.

*प्रश्न : महाराज, ज्ञानदेव सांगतात,*

*''तै गा ज्ञान पै बरवे। जरी मनी आथी जाणावे।*

*तरी संताते भजावे । सर्वेस्वेसी।।*
*जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंठा ।*
*तो स्वाधीन करी सुभटा बाळगोनी ।।''*

*या ओव्यांचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : आत्मज्ञान प्राप्त करुन घ्यायचं असेल तर संतांची उपासना, त्यांची सेवा हा एकच मार्ग आहे. त्यांचे पाय धरले पाहिजेत. नम्र होऊन, निरहंकार घेऊन त्यांना शरण गेलं पाहिजे. अत्यंत प्रेमाने त्यांची सेवा केली पाहिजे. त्यांच्याच कृपेने हे आत्मज्ञान आपल्या अंतःकरणांत प्रकट होते. संतांची सेवा करणे म्हणजे त्यांचे अखंड स्मरण करणे. सेवा आणखी दुसरी तिसरी काही नाही. संत हे आत्मज्ञानाचे कोठारच आहेत. त्यांची सेवा करणे, त्यांच्या स्मरणात रहाणे हाच त्या कोठाराचा उंबरठा आहे असं ज्ञानदेव सांगताहेत. संतांच्या कृपेनेच परब्रह्माचे स्वरुप समजून येतं आणि जाणलेलं जे काही आहे त्याचा आपल्या ठिकाणी अनुभव येऊ शकतो. ''म्हणुनी गुरुसी भजावे। गुरुपायी देव आहे ।।''

जीव कितीही बुद्धीवान असला तरी आत्मस्वरुपाचा अनुभव स्वतःच्या बुद्धीने घेऊच शकत नाही. ''तद्विज्ञानार्थ । स गुरुमेवाभिगच्छेत् ।'' अशी मुंडकश्रुती आहे. या श्रुतीवर भाष्य करतांना शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात ''शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यात् ।'' पुरुष कितीही बुद्धीमान असला, सर्व शास्त्रांचे अध्यापन त्याने केले असले तरी स्वतःच्या बुद्धीने ब्रह्मस्वरुप जाणण्याचा प्रयत्न करु नये. श्रद्धापूर्वक गुरुसेवा हाच एकमेव मार्ग आहे असे आचार्यांनी सांगितले आहे.

आचार्य स्वतः असेच गुरुंना शरण गेले आहेत व अखंड गुरुदास्यांतच राहिले आहेत. आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी गुरुसेवा हाच मार्ग वेदांतशास्त्रांतही सांगितला आहे. भगवान रामकृष्ण, भगवान श्रीकृष्ण

यांनीही श्रद्धापूर्वक गुरुसेवा करुन, गुरुदास्य करुन, ज्ञानप्राप्ती करुन घेतली आहे. स्वतः ज्ञानदेवांनी शास्त्राध्यान केलेलेच होते. ते महाज्ञानी होते. ज्ञानस्वरुपच होते. ज्ञानाची मूर्तीच होते. तरीही ते निवृत्तीनाथांना पूर्णतया शरण गेले होते. गुरुसेवेत, गुरुभजनांत, गुरुदास्यात रहाण्यातच ज्ञानदेवांनीही कृतार्थता मानली आहे.

शंकराचार्य स्वामीमहाराज जे सांगताहेत, ज्ञानदेव जे सांगताहेत ते कुठे वाचून सांगितलेले नाही. ती त्यांची अनुभूती आहे. त्यांनी स्वतः तसे केले आहे. आधी केले मग सांगितले असे हे आहे.

*प्रश्न : महाराज, ज्ञानदेव सांगतात -*

*"तैसें हारपलें आपणपें पावे । तैं संतातें पाहाता गिंवसावें ।*
*म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥"*

*या ओवीचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : वस्तुतः जीव हा ब्रह्मच आहे. मीही भगवंताचेच रुप आहे. हीच आत्मस्थिती. पण ती आत्मस्थिती आपण विसरुन गेलो आहोत. मी भगवंताचाच अंश आहे याचा आपल्याला विसर पडला आहे. स्वतःची विसरलेली आत्मस्थिती प्राप्त करुन घ्यायची आहे. मी ब्रह्मच आहे हा अनुभव घ्यायचा आहे. मी व भगवंत एकच आहोत हा अनुभव घ्यायचा आहे. त्यासाठी ज्ञानदेव एक मार्ग सांगताहेत. जे स्वतः पूर्ण ब्रह्म आहेत अशा संतांचे स्मरण करावे. त्यांची कीर्ति गावी. श्रवण करावी.

"आम्ही संत म्हणू तया । अवघी देवावरी माया ।" ज्याची सगळी माया, प्रेम भगवंतावरच आहे, दुसऱ्या कशावरही नाही तोच संत असे तुकाराममहाराज सांगताहेत. "माझ्या स्वरुपी ज्याचे चित्त । अखंड जडले भजनमुक्त । त्यासी बोलीजे मद्भक्त । तेचि संत सज्जन ॥" असे

एकनाथमहाराज म्हणतात. चित्त भगवंताच्या ठायीच अखंड लागलेले आहे. जो भगवंताच्या प्रेमांतच पूर्णपणे रंगला आहे. तोच भगवंताचा खरा भक्त आहे. तोच संत. विभक्त नाहीच तो.

असे संत हे साकार परब्रह्मच आहेत. ते सद्‌चिदानंदरुपच आहेत. त्यांचा शब्द म्हणजे वेदवाणीच आहे असं ज्ञानदेवांनी सांगितलं आहे. अशा मुक्त संतमहात्म्यांचा सतत मनात विचार करीत रहाणे, त्यांचे स्मरण सतत मनांत करीत रहाणे, त्यांच्या सतत अनुसंधानात रहाणे याचा अर्थ आपल्या मूळ स्वरुपाचा विचार करण्यासारखेच आहे, आत्मस्थितीचा विचार करण्यासारखेच आहे.

संतांचे प्रेम जडले की ती आत्मस्थिती आपल्या ठिकाणी अनुभवता येते. संतांच्या चरित्राचे वर्णन करणे, त्यांचे गुण गाणे, त्याचे श्रवण करणे, यामुळे आपल्या अंतःकरणांत त्या संताचे प्रेम दृढ होत जाते. मनांत त्यांचीच मूर्ती स्थिर होत जाते. त्यांचेच ध्यान मनांत होऊ लागते. वाणीनेदेखील त्यांचेच नामस्मरण होऊ लागते. मनाला त्यांचाच ध्यास लागतो. हे संत प्रेमाचे सागर असतात. त्यांचे प्रेम धरले की त्या प्रेमाचा ओघ आपल्याकडे वळतो. ‘‘आपणासारखे करिती तात्काळ । नाही काळवेळ तयालागी ।’’ संत अशा प्रेमाने जवळ आलेल्या भक्ताला स्वतःसारखेच करुन टाकू शकतात. ते सामर्थ्य पूर्णतया त्यांच्याजवळ असते. त्यांच्या संकल्पानेच भक्ताचे मन स्थिरावते. त्या भक्ताच्या मनांत ब्रह्मबोध ठसतो. त्याच्या मनांतील संकल्पविकल्प नाहीसे होत जातात. विषयसुखाची ओढ कमी कमी होत जाते. संतांच्या संकल्पानेच हे होऊ शकते. हाच शक्तीपात. संत संकल्पानेच सर्व शक्ती शिष्याला देऊन टाकतात.

मग तो भक्त विभक्त रहातच नाही. संतांशी एकरुप होऊन जातो ज्ञानराज तेच सांगताहेत.

*प्रश्न : महाराज, ज्ञानदेव सांगतात, पैं आपुलेनि भेदेंवीण । माझे जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ या ओवीचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : भगवंताला शरण जाणे म्हणजे काय हे ज्ञानदेव या ओवीत सांगताहेत. मीपणाची जाणीव पूर्णपणे विसरुन गेली पाहिजे. मी अमुक आहे ही भावना पूर्णपणे विसरुन जाणे म्हणजे भगवंताला शरण जाणे. घडा फुटला की त्या घड्यांतील आकाश सहजच बाहेरच्या सर्वत्र पसरलेल्या आकाशांत मिळून जाते. तसे भक्त स्वतःला पूर्णपणे विसरुन गेला. म्हणजे भगवंतच एकमेव उरला. झोपेतून आपण उठलो की झोपही नाहीशी होते. त्या झोपेत आपण जे स्वप्न पहात होतो तेही नाहीसे होते. तसे मीपण विसरले की मी अमुक जीव आहे हे अज्ञानही नाहीसे झाले. मग भगवंतच एकमेव. भगवंतापासून दुसरे काही नाहीच. ''तोच मी आहे'' या ज्ञानाने तो भक्त भगवंताशी एकरुप झाला. भगवंतापेक्षा वेगळा राहिलाच नाही. भगवंताशी तो एकरुप झाला. शरणागती भावनेत केवळ भगवंताचे प्रेमच रहाते. मग भक्त व भगवंत एक आहेत ही दोघांची एक असण्याची जाणीवही रहात नाही. ती जाणीवही नाहीशी होते. मी शरण गेलो आहे हेही निघून गेले. मी शरण गेलो असेही कांही राहिले नाही. भक्त व भगवंत यांचे जे स्वाभाविक ऐक्य आहे ते असे आहे.

*प्रश्न : महाराज, कोणी निंदा केली, टोचून बोललं तरी मन निर्विकार रहावं, पूर्णपणे शांत रहावं यासाठी आम्ही काय करावं ?*

उत्तर : कोणी स्तुती केली, देहाची केली. निंदा केली देहाची केली. मुद्दाम लागेल असं बोललं, देहाला बोलले. शरीराला उद्देशून ते बोलताहेत. बोलू द्या बिचाऱ्यांना. ज्ञानीमहात्म्यांचं स्वतःच्या शरीराकडेच लक्ष नाही. मग त्या शरीराला उद्देशून लोकांनी जे शब्द वापरले, त्या शब्दांकडे ज्ञानी महात्म्याचं कुठलं लक्ष असणार ? स्तुति करणं, निंदा करणं, प्रेम करणं, रागावणं, व्याधी हे सगळं केवळ देहालाच आहे. क्लेश सगळे देहालाच आहेत. देह जन्माला आलेला आहे. मला जन्म नाही, मृत्यु नाही, काही नाही. मला देहाचे हे कोणतेच विकार नाहीत. जिवंत किंवा मृत हे सगळं देहाला आहे. आदि, अंत हे सगळं देहाला आहे.

'तुम्ही स्वामी, मी नोकर.' 'तुम्ही शत्रु,' 'तुम्ही मित्र' हे सगळं खरं मानायचं कशावरुन? कुठले स्वामी? कुठले सेवक? कुठले शत्रु? कुठले मित्र? 'तुम्ही स्वामी, तुम्ही शत्रु' हे सगळं खरं असेल तरच तुम्ही मला कांही टोचून बोलाल नां ! ते खरं असेल तरच तुम्ही माझी तुम्ही निंदा कराल, मला लागेल असं बोलाल ! 'तुम्ही स्वामी आणि मी सेवक' हे खरं असेल तरच तुम्ही मला शिक्षा करु शकाल. तरच तुम्ही मला काही शासन करु शकाल. 'मी कोण आहे हे मला समजलं आहे. मी देह नाही. मी आत्मा आहे हे आता मला कळले आहे. आता तुम्ही मला आणखी काय शिकवणार ? आता काही आणखी शिकायचं राहिलंच नाही.'

ज्ञानी महात्म्याला मान अपमान असं काहीही नाही. निंदा स्तुती असं काहीही नाही. मान अपमान सगळं सारखंच आहे. मान करणारे सारखेच आणि अपमान करणारे सारखेच आहेत. शत्रु मित्र असं काही नाहीच आहे. कोण शत्रु! कोण मित्र ! कुठले लोक ? लोकबिक असं काही नाहीच आहे. कुठलं जग ? जग वगैरे काही नाहीच आहे. केवळ एक आत्मतत्त्व आहे. एक आत्मतत्त्वच केवळ सत्य आहे. बाकी काहीही सत्य नाही. बाकी सर्व

मिथ्या आहे. हेच खरं ज्ञान आहे. हेच आत्मज्ञान. आत्मज्ञान झाल्यावर व्यवहार खरा वाटत नाही आणि सुखदुःख असं काही रहात नाही. तोच मुक्त झाला.

*प्रश्न : महाराज, आत्मज्ञान झाल्यावर व्यवहार संपून जातो. व्यवहार खरा वाटत नाही ही अवस्था समजावून सांगावी अशी प्रार्थना आहे.*

उत्तर :आत्मज्ञान झाल्यावर व्यवहार नाहीये. व्यवहार संपलाय. व्यवहारच जिथे नाही, तिथे व्यवहार खरा कोण समजणार ? वर्णधर्म, आश्रमधर्म, राजधर्म हे सगळे व्यवहारांत येतात.

वर्णधर्म म्हणजे ब्राह्मण म्हणून करायची कर्तव्ये, क्षत्रिय म्हणून करायची कर्तव्ये, वैश्य म्हणून करायची कर्तव्ये.

आश्रमधर्म म्हणजे ब्रह्मचर्य आश्रमात ब्रह्मचारी म्हणून करायची कर्तव्ये. गृहस्थाश्रमांत गृहस्थ म्हणून करायची कर्तव्ये, वानप्रस्थाश्रमांत करायची कर्तव्ये.

राजधर्म म्हणजे राजा म्हणून, शासक म्हणून करायची कर्तव्ये. सेवक म्हणून करायची कर्तव्ये.

वर्णधर्म, आश्रमधर्म आणि राजधर्म हे सगळे व्यवहार आहेत. ज्ञानी माणसाचे शरीर हे व्यवहार करतांना आपल्याला दिसते. पण त्या सर्व व्यवहारांमधून तो ज्ञानी महात्मा अलिप्त आहे. कोणतेच व्यवहार तो ज्ञानी महात्मा खरे मानत नाही. स्वप्नातसुद्धा आपण व्यवहार करतो, सुखदुःखे भोगतो. पण म्हणून काय स्वप्नांतले व्यवहार, स्वप्नांतली सुखदुःख आपण खरी मानायची? स्वप्नांतले व्यवहार, स्वप्नांतली सुखदुःख मिथ्याच असतात. ती खरी नसतातच. संसारातले व्यवहारही ज्ञानी माणसाला स्वप्नांतल्या व्यवहारासारखे मिथ्या वाटतात.

आपल्या मनांत जोवर रजोगुण आणि तमोगुण आहेत, तोपर्यंत आपल्याला व्यवहार दिसतो आहे, भासतो आहे. मनांतल्या रजोगुणांमुळेच आणि तमोगुणांमुळेच तर आपल्याला सुख मिळालं, दुःख मिळालं अस भासतं आहे. सुख आणि दुःख हे सर्वही फळ मिळते ते केवळ मनांतल्या वासनांमुळे. मनांत वासना असतात म्हणून आपल्या हातून कर्म होतं आणि व्यवहार घडत रहातात. जोपर्यंत मनाला आत्मस्वरुपाचं भान होत नाही, तोपर्यंतच सर्व व्यवहार खरा वाटतो.

व्यवहार भासतो याला सगळ्याला कारण मन आहे. हा व्यवहार खोटा आहे असं ज्ञानी माणसं सांगताहेत. आम्हाला ज्ञानी माणसांचं ते सांगणं खरं वाटत नाहीय. कारण आमच्या मनांत वासना आहेत. आमचं मन विषयांतच आसक्त आहे. आमच्या मनांत इच्छा आहेत. म्हणूनच हे व्यवहार आहेत, ही संकटं आहेत, ही दुःख आहेत. ईश्वरकृपेने गुणातीत अवस्था प्राप्त झाली तर संसार खरा वाटत नाही. ज्याला अशी गुणातीत अवस्था प्राप्त झाली त्याचंच पूर्ण कल्याण आहे. त्यालाच पूर्ण शांती मिळाली.

मनांतले सगळे दोष दूर करता आले तर आपलं कल्याण होतं. मन हाच खरा शत्रु आहे. सदगुरुंची भक्ती, भगवंताची भक्ती हे शस्त्र मिळवता येतं आणि मनाला शासन करता येतं. हे मन आत्मस्वरुपाचं ज्ञान करुन देऊ शकतं. संसारतापही दूर करणारं मनच आहे.

कारणदृष्टी आणि कार्यदृष्टी अशी दोन प्रकारची दृष्टी सांगतात. मूळ सुवर्ण हे कारण आहे. त्या सुवर्णाचे घडलेले अनेक दागिने हे त्या सुवर्णाचे कार्य आहे. जोवर दागिने दिसताहेत तोवरच हा दागिना चांगला आहे, हा मला मिळाला पाहिजे, हा दागिना मी घालणार आहे असं मनांत येतं आहे. पण सोनाराला दागिने असं काही नाहीच. दागिने म्हणजे सुवर्णच आहे ही

सोनाराची दृष्टी आहे. हे सर्व दागिने म्हणजे एक सुवर्णच आहे असे पहाणे ही कारणदृष्टी झाली. हे सगळे वेगवेगळे दागिने आहेत असे पहाणे ही कार्यदृष्टी झाली.

कार्यदृष्टी उपयोगी नाही, कारणदृष्टी पाहिजे. तरच पूर्ण शांती आहे. शुद्ध असं एकच आत्मतत्त्व आहे ही कारणदृष्टी आहे. जगांत आपल्याभोवती ही सर्व नाना रुपं दिसतात. पण ते केवळ आत्मतत्त्वच आहे. ती भगवंताचीच रूपं आहेत. ही कारणदृष्टी आहे. आमच्या मनांत वासना आहेत. म्हणूनच आम्हाला नानारुपे दिसताहेत. म्हणून कर्मे घडताहेत. म्हणून व्यवहार होताहेत. म्हणून हा संसार भासतो आहे.

मनांतल्या वासना निमाल्या, इच्छा नाहीशा झाली की सर्वत्र एक भगवंत आहे ही दृष्टी येते. ही दृष्टी प्राप्त करुन घेण्यासाठी योगाभ्यास उपयोगी पडत नाही, दानधर्मही उपयोगी पडत नाही, तपश्चर्याही उपयोगी पडत नाही. आत्मज्ञानी महात्म्यांच्या चरणावरील धुळीचे कण जोवर आपल्या मस्तकावर पडले नाहीत, इतकी नम्रता आणि निरहंकार बुद्धी झाली नाही, तोपर्यंत कोणत्याही साधनाने आनंदरुपी आत्मा मिळणार नाही. भगवंताबद्दल शुद्ध भावना अंतःकरणांत उत्पन्न झाली तर सर्व व्यवहार संपून जातो.

*प्रश्न : महाराज, ज्ञानाचे दोन प्रकार सांगतांना अन्वय ज्ञान आणि व्यतिरेकज्ञान. हे दोन्ही प्रकारचे ज्ञान आवश्यक आहे कां ?*

उत्तर : आपण आपल्या भोवती जी अनेक नामेरुपे पहातो, त्यापेक्षा भगवंत निराळा आहे असे पहाणे याला व्यतिरेक ज्ञान असे म्हणतात. ही नामेरुपे म्हणजे आपला भ्रम आहे. भगवंत या नामरुपांहून वेगळा आहे असे पाहणे म्हणजे व्यतिरेक ज्ञान. ही पहिली पायरी झाली.

त्यानंतर दुसरी पायरी म्हणजे अन्वयज्ञान. भोवती जे दिसले त्या सर्व नामांना आणि त्या सर्व रुपांना भगवंताहून स्वतंत्र अस्तित्वच नाही. सर्व नामरुपांत भगवंतच भरलेला आहे. म्हणून सर्व नामेरुपे हा भगवंतच आहे. भगवंताहून वेगळे असे काही दुसरे नाहीच. हे जाणून घेणे याला अन्वय ज्ञान असे म्हणतात.

दोन्ही प्रकारचे ज्ञान झाले म्हणजेच तो जीवनमुक्त झाला. भगवंताचा अनुभव येण्यासाठी आपल्याला हे कळावे लागते की माया व भगवंत एकच आहे. दोन्ही मिळून भगवंत आहे हे अन्वयज्ञान. हेच खरे ज्ञान आहे. हेच पूर्ण ज्ञान आहे. ज्याला हे पूर्ण ज्ञान झाले तोच सिद्ध झाला. तोच पूर्ण झाला. तोच मुक्त झाला.

साधकाला एकदम अन्वयज्ञान सांगत नाहीत. कारण तो त्याचे अंतःकरण तेवढे शुद्ध झालेले नसते. म्हणून साधकाला प्रथम ही नामेरुपे खरी नाही असे सांगतात. तो तुझा भ्रम आहे असे सांगतातही. भगवंत या नामरुपाहून निराळा आहे असे सांगतात. हेच व्यतिरेक ज्ञान. हे व्यतिरेक ज्ञान दृढ झाल्यावर नामेरुपे वेगळी व भगवंत वेगळा अशी द्वैत भावना साधकाच्या मनांत निर्माण होते. पण ही द्वैत भावनाही जावी लागते. म्हणून नामरुपेही भगवंतच आहेत असे अन्वय ज्ञान सांगतात.

या जगांत सर्वत्र भगवंतच आहे. दुसरे काही नाहीच. सर्व चराचर सृष्टी भगवंतच आहे. मीही भगवंतच आहे. सगुण व निर्गुण, व्यक्त आणि अव्यक्त सगळं काही भगवंतच आहे. हाच अद्वैताचा अनुभव. हा अद्वैत अनुभव आल्यानंतर भक्ताच्या हृदयांत भगवंताबद्दलचे प्रेम उफाळून येते.मग सगुण रुपाची भक्ती करावीशी वाटते असे अनेक संत सांगतात.

अद्वैताचा अनुभव घेतलेला भक्त भगवंताची भक्ती करीत रहातो. हीच अद्वैत भक्ती. "शिवो भुत्वा शिवं यजेत"। अशी श्रुति आहे. शिव

झाल्यावरही शिवाचेच भजन करीत रहावेसे वाटते. "मी होऊनि मज तैसे। सर्वस्वे भजती"। असे ज्ञानदेव सांगतात. ही अंतिम अवस्था आहे.

*प्रश्न : महाराज, केवळ गुरुवचनावर विसंबून राहिले व त्याप्रमाणे वागत राहिले तर तरुन जाता येईल कां ? अद्वैत अनुभूतीपर्यंत जाता येईल कां ?*

उत्तर : ज्ञानदेवांनी तेराव्या अध्यायांत तरुन जाण्यासाठी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व योगमार्ग या तीन मार्गाबरोबरच गुरुवचनावर पूर्ण श्रद्ध ठेवण्याचा चौथा मार्ग सांगितला आहे. तो पहिल्या तीन मार्गांपेक्षा अधिक सोपा आहे असे सांगितले आहे. ज्ञानदेव म्हणतात -

आणिक एक ते रिती ऐसे। अभिमान दवडूनि।
एकाचिया विश्वासे। टेकती बीला ॥
तयांचेनि मुखें निघे। तेतुलें आदरें चांगें।
ऐकोनियां आंगें। मनें होती ॥
तया ऐकणेयाचे नांवें। ठेवती गा आघवें।
तया अक्षरांसी जीवें। लोण करिती ॥
तेही अंती कपिध्वजा। इया मरणार्णवसमाजा-।
पासूनि निघती वोजा। गोमटिया ॥

आपला अभिमान पूर्णपणे टाकून द्यावा. आपले हिताहित आपल्या गुरुंनाच कळते. त्यांच्या हृदयांत आपल्याबद्दल पूर्ण कणव आहे. तेच आपली विचारपूस करुन आपली दुःखे दूर करु शकतात. तेच मनाला समाधान देऊ शकतात. हे जाणून त्यांच्या दर्शनाला जावे. ते सांगतात ते ऐकावे. त्यांच्या उपदेशावर पूर्ण विश्वासाने अवलंबून रहावे. त्यांचे ऐकणे हेच या जन्मीचे एकमेव कर्तव्य आहे या श्रद्धेने त्यांचे बोलणे ऐकावे व हृदयांत साठवावे. शरीराने व मनाने पूर्णतया त्यांच्या सांगण्याप्रमाणे करावे.

असे करणारे भक्त जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटून जातात. भवसागर तरुन जातात. अद्वैत अनुभूतीपर्यंत जातात असे ज्ञानदेवांनी सांगितले आहे.

*प्रश्न : महाराज, आत्मा आनंदरुप असतो म्हणतात. तोच खरा आनंद असेही सांगतात. हा अनुभव आम्हाला कां येत नाही ?*

उत्तर : जीव हा आपल्या मूळ स्वरुपाचा विचार करीत नाही. आपले मूळ स्वरुप आनंदरुपच आहे हे आपण जाणून घेत नाही. म्हणूनच आपल्याला जगांत सुखे आणि दुःखे यांचा अनुभव येत रहातो. पण मी देह नाहीये हे जाणून घेतले आणि देहबुद्धी सोडली की जीव आपले मूळ स्वरुप आनंदरुप अनुभवू शकतो. आपल्या मूळ आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिरावणे म्हणजेच भवसागर तरुन जाणे. हे ज्याला साधले तोच खरा भाग्यवान.

आपले मूळ स्वरुप जाणून घेतले पाहिजे. मी देह आहे ही कल्पना सोडून दिली पाहिजे. सदैव आत्मस्वरुपाच्या आनंदात रहाता येते. हेच परब्रह्मसुख हे ज्याने मिळवले त्यालाच सर्व सुखे मिळाली. भगवंतच कार्य करुन घेत आहे. सर्वकाही साक्षीवृत्तीने पहात रहावे.

घरातील माणसे कामे करतात. घर त्यांची कामे साक्षीवृत्तीने पहात रहाते. ते घर अकर्ता असते. तसे मी अकर्ता आहे. भगवंतच सर्व कर्मे कर्मेंद्रियांकडून करुन घेत आहे. हे जाणले पाहिजे.

मग बाहेरही सर्वत्र भगवंतच आहे याचा अनुभव यायला लागतो. भगवंत एकच सत्य आहे. भगवंतावाचून दुसरी वस्तूच नाही. जे कांही सर्व दिसते आहे ते भगवंतच आहे. हा व्यापक अनुभव आला म्हणजे सगुण निर्गुण सगळे एकरुप होऊन जातात. सगुण निर्गुण सगळे भगवंतच आहे. हीच अवस्था शंकराचार्यस्वामीमहाराज सांगतात.

तरंगफेन भ्रमबुद्बुदादि सर्वस्वरुपेण जलं यथातथा ।

तथैव देहाद्यहमंतमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुधम् ॥

या अनुभूतीलाच अपरोक्ष अनुभूती म्हणतात. येथेच ज्ञानाची पूर्णता होते. हा अनुभव आला म्हणजे मग जगांत मिथ्या असे काहीच उपेक्षणीय उरतच नाही. सगळीकडे भगवंतच आहे. मग अपार सुखच आहे. निव्वळ शुद्ध आनंदच आहे.

मी ब्रह्मच आहे ही अनुभूती आली. मी देह आहे ही जाणीव गेली. मी देह आहे असे मी उगीचच समजत होतो. त्यामुळेच मला दुःख भोगावे लागत होते. पण मी देह नाहीच आहे. मी ब्रह्मच आहे. हा अनुभव यायला लागला म्हणजे परमानंदाचा अनुभव यायला लागतो. भगवंताच्या भक्तीनेच हा अनुभव येतो. या परम आनंदाचे वर्णन शब्दांच्या पलीकडचे आहे. जी गोड वस्तु खाल्ली तिचे वर्णन मुका मनुष्य करुच शकत नाही. तसे हे आहे. अद्वैताचा अनुभव हीच अंतिम अवस्था आहे.

*प्रश्न : महाराज, 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा जप ही परिपूर्ण साधना आहे, अद्वैतअनुभूतीपर्यंत नेणारी साधना आहे असे सांगतात. हे विशद करुन सांगावे अशी प्रार्थना आहे.*

उत्तर : 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्रामध्ये दिगंबरा अशी तीन संबोधने आहेत आणि श्रीपादवल्लभ असे एक संबोधन आहे.

पहिला दिगंबर शब्द म्हणजे खरा मी - त्याचे अनुसंधान. मी देह नाही. मी आहे आत्मा. तो आत्मा म्हणजे शुद्ध अहम्. तो साक्षी आहे. निर्विकार आहे. आनंदरुप आहे. पहिल्या दिगंबरा या शब्दाने त्या शुद्ध अहमला हाक मारली आहे.

दुसऱ्या दिगंबरा या शब्दाने परब्रह्माचे अनुसंधान केले आहे. आपल्या भोवती जे सर्वही विश्व दिसते आहे ते केवळ भासणारे आहे. वस्तुतः ते सर्व

एकमेव भगवंतच आहे, परब्रह्मच आहे. परब्रह्मानेच ही अनेक भासणारी रुपे धारण केली आहेत. त्या परब्रह्माला दुसऱ्या दिगंबरा शब्दाने हाक मारली आहे.

श्रीपादवल्लभ या तिसऱ्या शब्दाने श्रीपादवल्लभांना हाक मारली आहे. श्रीपादवल्लभ भगवंताचे सगुण साकार रुप आहेत. ते भगवंताचेच अवतार आहेत. त्यांना संबोधन केले आहे.

चौथ्या दिगंबरा या शब्दाने प्रार्थना केली आहे. माझ्यातील सर्व विकार नाहीसे करा. मला लवकर आपल्याजवळ न्या. आपले स्वरुप मला प्राप्त होऊ द्या. मी देह आहे असे जे मला वाटते आहे तो माझा भ्रम आहे. तो भ्रम नाहीसा करा. अहं ब्रह्मास्मि हा अनुभव मला येऊ द्या. आपल्यासारखी दिगंबर स्थिती मलाही द्या. अशी ही प्रार्थना चौथ्या दिगंबर शब्दात आहे.

*प्रश्न : महाराज, या महामंत्रांत स्वामीमहाराजांनी "श्रीपादवल्लभ" यांचा कां उल्लेख केला आहे ?*

उत्तर : महाराजांना श्रीपादवल्लभ यांचे स्मरण झालं. कारण श्रीपादवल्लभ हा श्रीदत्तात्रेयांनी घेतलेला अवतार आहे. गुरुचरित्रांत या अवताराची कथा आलेली आहे. श्रीपादवल्लभ हे भगवंताचे सगुण साकार रुप आहे.

श्रीपादवल्लभ हेच दिगंबर आहेत. सद्गुरुंचा हा अवतार आहे. जीवांना मार्गदर्शन करुन त्यांचं अज्ञान दूर करणं त्यांच्या मनांतले विकार दूर करणं, त्यांच्या मनाची शुद्धी करणं आणि शेवटी त्यांचं खरं स्वरूप त्यांना दाखवून देण्यासाठी हा अवतार आहे. जीवानां खरं स्वरूप दाखवणे याचा अर्थ भक्त आणि भगवंत हे दोन्ही एकच आहेत ही अनुभूती भक्ताला देणं. त्यासाठीच सद्गुरूंचा अवतार आहे. सद्गुरू आणि परमेश्वर एकच आहेत.

*प्रश्न : या महामंत्रांत शेवटी पुन्हा दिगंबरा हे संबोधन आले आहे. हे संबोधन म्हणजे परमेश्वराकडे काही मागायचं असं आहे का ?*

उत्तर : ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' या महामंत्रांत शेवटी दिगंबरा हे जे संबोधन आहे, ती परमेश्वराची प्रार्थना आहे. परमेश्वराला दिगंबरा असे संबोधन करुन दिगंबरा अशी हाक मारुन मागितलं काय? माझ्या मनांतील विकार दूर करा. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या विकारांनी मला ग्रासलं आहे. माझे हे सर्व विकार दूर करा. मला तुमच्यासारखं निर्विकार करा. निर्विकार रूप म्हणजे दिगंबर रूप. मलाहि तुमच्यासारखंच दिगंबर रूप द्या.

निर्गुण निराकार परमात्मा, आत्मतत्त्व आहे हे समजून घ्यायला कित्येक जन्म घ्यावे लागतात. द्वंद्वातीत अवस्थेपर्यंत जायला मन निर्वासिन व्हायला हवं. वासना, इच्छा, आकांक्षा' हे सर्व मनांतून जावेत या अवस्थेपर्यंत जायला मला मदत करा. म्हणून महाराजांनी या महामंत्रामध्ये सगुण साकार परमेश्वराला हाक मारलेली आहे. श्रीपादवल्लभ स्वरुप हे त्याकरता त्यांनी दाखवलेलं आहे.

त्याच्याही पुढे जर जीवाची विकसित झालेली बुद्धी जाऊ शकली तर तो परमात्मा सच्चिदानंदघन आहे, विश्वरुपी तो आहे, विश्वकर्ता तो आहे, तोच जीवरुपीही झालेला आहे. मीसुद्धा त्याच्या स्वरुपापेक्षा निराळा नाहीये, हे ज्ञान होतय. मी देह आहे ही भावना काढून टाकून निर्गुण निराकार शब्द ब्रह्म मी आहे हा अनुभव घ्यायचा आणि तोसुद्धा शेवटी त्या परमेश्वराच्या स्वरुपातच विलीन करुन टाकायचा.

अहं ब्रह्मास्मि । मी ब्रह्म आहे. सकलमिदं अहं च वासुदेवः । हे सर्व जे काही आहे तेही ईश्वर आहे आणि मीही ईश्वर आहे. हीच अद्वैत अनुभूती. त्या अनुभूतीपर्यंत जाण्यासाठी या महामंत्राचा जप आहे.

वेदांतातील मुख्य सिद्धांत म्हणजे अहं ब्रह्मास्मि । (मी ब्रह्म आहे). दुसरा सिद्धांत म्हणजे सर्व खल्विदं ब्रह्म । (या विश्वांत जे कांही आहे ते केवळ एक ब्रह्मच आहे). आणखीही सिद्धांत वेदांतात आहेत. ब्रह्म बुद्धीग्राह्य आहे. बह्म बुद्धीने आकलन करून घेता येते. ब्रह्माचे चिंतन करीत राहिले म्हणजे तो चिंतन करणारा स्वतःच ब्रह्मरूप होतो. मी ब्रह्म आहे याची अनुभूति घेऊ शकतो. भगवंताचे सगुण रूप व निर्गुण रूप दोन्ही एकच आहेत असाही सिद्धांत वेदांतात आहे. वेदांतातील हे सर्व महत्वाचे सिद्धांत श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्रांत आणले आहेत.

त्याशिवाय वेदांतातील या तत्त्वज्ञानाला भक्तीची जोड दिली आहे. श्रीपादवल्लभ हे भगवंताचा अवतार. भगवंताचे सगुण रूप आहे. संत हे भगवंतच असतात, परब्रह्मच असतात. त्यांची भक्ती करता करता भक्त स्वतःच ईश्वररूप होऊन जातो. हे भक्तीशास्त्रांतील सिद्धांतही या महामंत्रांत आले आहेत.

पहिल्या दिगंबरा या शब्दाने जीवाच्या अंतर्यामी असलेल्या ब्रह्माला हांक मारली आहे. दुसऱ्या दिगंबरा शब्दाने सर्व विश्वाच्या कणांकणांत असलेल्या ब्रह्माला हांक मारली आहे. श्रीपादवल्लभ यांना म्हणजे भगवंताचा अवतार असलेल्या परब्रह्माचे सगुण साकार रूप अशी हांक मारली आहे आणि शेवटी दिगंबरा या संबोधनाने भक्त या भूमिकेतून प्रार्थना आहे. मला ब्रह्मरूप करा, मला दिगंबर करा अशी ही प्रार्थना आहे. ब्रह्माचे एकाग्र चित्ताने ध्यान करणे म्हणजे ब्रह्मचिंतन. ब्रह्मचिंतन करणारा ब्रह्मच होऊन जातो हा वेदांतातील सिद्धांत आहे. या ज्ञानी भूमिकेला भक्तीची जोड स्वामीमहाराजांनी दिली आहे.

या महामंत्रांत स्वामीमहाराजांनी दाखवून दिले आहे की भगवंताचे सगुण साकार रूप आणि भगवंताचे म्हणजे परब्रह्माचे निर्गुण निराकार रुप सगळं एकच आहे. सगुण आणि निर्गुण, व्यक्त आणि अव्यक्त सगळं एकच ब्रह्म आहे अशी वेदांताची भूमिका यांत आहे. वेदांतांतील ज्ञानाचे सिद्धांत आणि भक्तीशास्त्रांतील भक्तीचे सिद्धांत यांचा समन्वय या महामंत्रांत आहे. शंकराचार्य स्वामीमहाराज यांची हीच भूमिका आहे. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांची हीच भूमिका आहे. तीच त्यांनी या महामंत्रांत आणली आहे. ज्ञानसिद्धांत व भक्तीशास्त्रांतील सिद्धांत या महामंत्रांत एकवटले आहेत. संपूर्ण महासागर घटांत भरावा तसा हा महामंत्र आहे.

महामंत्राच्या अर्थाकडे लक्ष देऊन जर पठण झालंतर त्याचं मोठं फळ मिळणार आहे. पण अर्थ न कळता केवळ वाणीने या मंत्राचा जप केला तरीही त्याचे महत्त्व काही कमी नाही. वाङ्मय तपाचं पर्यवसान मानस तपापर्यंत होत आहे.

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा या महामंत्रांत सद्गुरु वासुदेवानंद सरस्वतीस्वामीमहाराजांनी केवढी मोठी भूमिका आणली आहे! सर्व देव बाजूला करुन एका चैतन्यघन परमत्त्वाची वाणीने प्रार्थना करण्याची फार मोठी भूमिका या महामंत्रांत आहे. या महामंत्राचा जप करीत राहिले तर आपल्या बुद्धीची निर्दोषता वाढत जाईल आणि शेवटी जीवभाव नाहीसा होऊन तो जीव मुक्त होईल. परमेश्वरस्वरुप होऊन जाईल एवढे सामर्थ्य या महामंत्रांत आहे.

**ॐ पूर्णमदः पूर्णमदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**
**ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥**

विचारधनच्या पूर्वीच्या भागांत प्रसिद्ध न झालेले साधकांचे आणखी काही प्रश्न व श्रीदत्तमहाराजांची उत्तरे प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत. वैराग्य, पावित्र्य व शुचिता यांची श्रीदत्तमहाराज घनीभूत मूर्तीच आहेत. सर्व शास्त्रग्रंथाचे सार त्यांनी पचवले आहे, त्यातील अनुभूती स्वतः घेतल्या आहेत आणि त्या अनुभूती श्रोत्यांपर्यंत पोचवण्यासाठी आवश्यक असलेले तपसामर्थ्य, ऋतंभरा प्रज्ञा आणि अलौकिक प्रतिभा त्यांना लाभली आहे. ते शब्दप्रभु आहेत, शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. आपल्या अनुभूती श्रोत्यांपर्यंत पोचवण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. नेमके शब्द, सोपी व सुटसुटीत वाक्ये, आणि पारिभाषिक शब्द टाळून केलेले प्रतिपादन ही विचारधनमध्ये वैशिष्ट्ये आहेत. अनुभूती घेऊनच विवेचन केले असल्यामुळे प्रतिपादनांत ठामपणा, सोपेपणा व निःसंदिग्धपणा आपोआपच आला आहे. अनेक वाक्ये भावावस्थेत स्फुरलेली आहेत. त्यामुळे मंत्ररूप घेऊनच ती वाक्ये प्रगटलेली आहे असे वाचकांना सतत जाणवत रहाते.



